म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३२०४

मध्यप्रांत-वऱ्हाडातील डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळ

वसंत मून


REFBK-0025523

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

संदर्भ निबंध
3288
२५५२३
१३।८८



मध्यप्रांत- वऱ्हाडातील

डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळ

वसंत मून


REFBK-0025523

सुगावा प्रकाशन, पुणे

मध्यप्रांत– वऱ्हाडातील डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळ
वसंत मून

प्रकाशक
उषा वाघ
सुगावा प्रकाशन
८६१/१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

मुद्रक
विलास वाघ
सुगावा मुद्रण
८६१/१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

सर्व हक्क : सौ. मीनाक्षी मून
य ६/९० शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१

प्रकाशनकाल
ऑगस्ट १९८७

किंमत : ३० रुपये

मुद्रणस्थळ
हंस प्रिंटिंग प्रेस
४७४/१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०



प्रास्ताविक

या पुस्तकातील लेखांतून आंबेडकरपूर्व काळातील दोन प्रमुख व्यक्तींच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यापैकी एक म्हणजे विठोबा रावजी मून संतपंडे व दुसरे कालीचरण नंदागवळी. विठोबाजींच्या जीवनातील सर्वच प्रमुख घटनांची साधार माहिती सादर करण्यात आलेली आहे, तर कालीचरण नंदागवळी व नानासाहेब गवईंच्या मध्यप्रांत वऱ्हाड विधानमंडळातील अनमोल कार्याचा सविस्तर वृत्तान्त दिलेला आहे.

आंबेडकरपूर्व चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते म्हणून किसन फागोजी बनसोडे यांचे नाव सर्वत्र परिचित आहे. श्रीमान बनसोडेंच्या पूर्वी मध्यप्रांत वऱ्हाडात कोणतेही कार्यकर्ते नव्हते व असले तरी त्यांचे कार्य नगण्य होते असा सर्वत्र समज पसरला आहे. हा समज कितपत वरोबर आहे याचा विचार व्हायला हवा.

किसन फागोजींच्या जीवन व कार्याबद्दल पहिल्या प्रथम श्री. ना. रा. शेंडे यांनी चरित्रात्मक एक लेख 'प्रदीप' या काव्यसंग्रहात समाविष्ट केला. या चरित्रातील माहितीची कोणतीच शहानिशा न करता महाराष्ट्रातील दलित व अन्य लेखकांनी हे चरित्र पूर्णांशाने सत्य मानले व किसन फागोजींना ना. रा. शेंडे यांनी लावलेली विरुदे ग्राह्य समजण्यात आली. दि. २२ नोव्हें. १९८१ च्या 'नागपूर पत्रिकेत' बनसोडे चरित्रातील विधानांची चिकित्सा करणारा माझा लेख जेव्हा

पहिल्यांदा प्रसिद्ध झाला तेव्हापासून, थोडाफार तरी, या चरित्रासंबंधी चिकित्सक विचार होऊ लागला. श्री. एच. एल. कोसारे यांनी अलिकडे 'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास' प्रसिद्ध केला. त्यामुळे ना. रा. शेंडे यांचा किसन फागोजींना 'आद्यत्व' प्रदान करण्याचा प्रयत्न कसा वाळूवर उभारलेला आहे हे दिसून आले.

'प्रदीप' या काव्यसंग्रहातील किसन फागोजींसंबंधी चरित्रात्मक लेखात श्री. शेंडे यांनी त्यांना 'दलित वर्गाचा पहिला झुंजार पुढारी, पहिला पत्रकार, पहिला लेखक व कवी, पहिला प्रभावी वक्ता आणि पहिलाच मुद्रक व प्रकाशक' ठरविलेला आहे. परंतु, वरवर पाहताही हे विधान किती ठिसूळ आहे याची वाचकांना कल्पना येईल.

जेव्हा श्री. शेंडे, श्रीमान बनसोडेंना 'पहिलेपणा'चा मानाचा मुजरा प्रदान करतात तेव्हा त्यांच्यापूर्वी कुणीही कार्य केले नाही किंवा वरील विशेषणास पात्र होईल अशी व्यक्तीच झाली नाही असे ते गृहीत धरतात. तेव्हा तत्कालीन पुढाऱ्यांबद्दल त्यांना काहीही माहिती नसावी असे म्हणावे लागेल.

दलित वर्गाचा पहिला झुंजार पुढारी बनसोडेंना ठरवताना पश्चिम महाराष्ट्रातील गोपाळबाबा वलंगकरांपासून शिवराम जानबा कांबळेंपर्यंतच्या अनेक कार्यकर्त्यांना शेंडे यांनी अनुल्लेखाने मारले आहे. काय अन्य कार्यकर्ते झुंजार पुढारी नव्हते ? बाबासाहेब आंबेडकरांचे वडील सुभेदार रामजी आंबेडकर हेही सामाजिक कार्य करीत असत, याची शेंडेंना जाणीव नसावी.

निव्वळ विदर्भाचा विचार जरी केला तरी, बनसोडे यांच्या पूर्वी श्री. जानोजी खंडारे व त्यांचे पुत्र केशवरावजी खंडारे यांनी अकोला जिल्ह्यात दलितोद्धाराचे कार्य सुरू केलेले होते. विठोबा रावजी मून संतपंडे आणि कालीचरण नंदागवळी यांच्यादेखील कार्यास बनसोडे यांच्यापूर्वीच सुरुवात झालेली होती. समाजसुधारणेचे कार्य अनेक दलित कार्यकर्ते करीतच होते. त्यामुळे बनसोडे कोणत्या निकषांवर पहिले दलितोद्धारक मानकरी व पहिलेच समाजसुधारक ठरतात हे कळत नाही.

श्री. ना. रा. शेंडे यांनी २० मार्च १९८१ रोजी श्री. बनसोडे यांचा चरित्रग्रंथ प्रसिद्ध केलेला आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेतदेखील 'प्रदीप' काव्यसंग्रहातील विशेषणांची पुनरुक्ती केलेली आहे. बनसोडे हे दलितांतील आद्य कवी ठरविण्याचा प्रयत्न शेंडे यांनी केलेला आहे. 'प्रदीप' या काव्यसंग्रहात जी रचना आलेली आहे ती सर्वच्या सर्व १९२० च्या पूर्वीची आहे असे म्हणणे धाडसाचे होईल. परंतु श्री. शेंडे यांच्या म्हणण्यानुसार बनसोडे यांनी १८८९ साली म्हणजे वयाच्या १० व्या वर्षी काव्यरचना केली. (पृ. ८) हे काव्य बनसोडे यांनी पूर्वी कधी प्रसिद्ध केले याचा कुठेही उल्लेख नाही. निव्वळ शेंडे म्हणतात म्हणून किशोर वयातच बनसोडे यांनी काव्यरचना केली असे मानावे लागेल. या काव्याच्या शेंडे यांनी दिलेल्या ओळी खालीलप्रमाणे आहेत.

वरी नव्हे स्वस्थता ही आता क्षणभरी

अपमानी जगत राहणे व्यर्थ भूवरी
करुनी आमुचा छळ
वरी मानती हे विटाळ
भूलोकी हेचि खळ
बंद करिती देऊळ
वाटे तयाते तत्काळ, दावू यमपुरी,

ही रचना आधुनिक मराठी काव्यप्रकाराची असल्याचे सहज जाणवते. हे काव्य बनसोडे यांनी १८८९ साली लिहिले असे गृहीत धरले तर त्यांना केशवसुतांच्या काव्याचे आकलन वयाच्या दहाव्या वर्षीच झाले होते असे मानावे लागेल. ना. रा. शेंडेंनी हे काव्य १८८४ साली बनसोडेंनी लिहिले असे म्हटले असले तरी त्याला कुणाचीही आडकाठी नव्हती. त्यामुळे आधुनिक मराठी कवितेचे जनकत्व-देखील त्यांच्याकडे देता आले असते. बनसोडे यांना दहाव्या वर्षी आधुनिक मराठी काव्याची जाण होती असे समजल्यास त्यांना 'आधुनिक मराठी कवितेचे ज्ञानेश्वर' म्हणावे लागेल.

'प्रदीप' काव्यसंग्रहात बनसोडे यांचा पहिला पत्रकार म्हणून त्यांच्या 'निराश्रित हिंद नागरीक' या वृत्तपत्राचा उल्लेख आहे. परंतु यापूर्वीच शिवराम जानबा कांबळे यांच्या 'सोमवंशीय मित्र' या साप्ताहिकाचे प्रकाशन झाले असल्याचे बहुधा शेंडे यांच्या लक्षात आले असावे, म्हणून त्यांनी बनसोडे यांच्या नावाने १९०१ साली, 'मराठा दीनबंधु' निघत असे, असा उल्लेख बनसोडेचरित्रात (पृ. ५६) केलेला आहे. हे पत्र कधी काळी प्रसिद्ध झाले असल्याचे कोणत्याही अन्य लेखकाने लिहून ठेवलेले नाही. जर चरित्रलेखकास या पत्राची प्रत गवसली असेल तर ती त्याने बनसोडे चरित्रातच फोटोद्वारे प्रसिद्ध करणे आवश्यक होते. श्री. शेंडे यांच्या मतानुसार या साप्ताहिकाने विदर्भातच नव्हे तर मराठवाडा, पुणे, मुंबई, कोल्हापूर सोलापूर, रत्नागिरी या पश्चिम महाराष्ट्राच्या टापूत खळबळ माजवली हे शेंडेचे विधान पुराव्याअभावी हास्यास्पद झाले आहे. या पत्राचे किती अंक निघालेत व ते आज कुठे आहेत ? असल्यास शेंडेव्यतिरिक्त अन्य कुणा लेखकाने पाहिले काय ? व नसल्यास ही माहिती शेंडेंनी कुठून प्रसिद्ध केली याचा खुलासा होणे आवश्यक आहे. श्री. नंदागवळी व पतितपावनदास यांनी काढलेली वृत्तपत्रे देखील बनसोडेंच्या प्रेरणेने निर्माण झाली असे पुस्तकात नमूद करून श्री. बनसोडे हे या दोन कार्यकर्त्यांचे मार्गदर्शक होते असे दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. कालीचरण नंदागवळी हे काही बनसोडेंचे बोट धरून चालणारे कार्यकर्ते नव्हते. पतितपावनदास-देखील बाबासाहेबांच्या चळवळीत कार्य करीत असत. या उभयतांनी कुठेही बनसोडेंचे शिष्यत्व स्वीकारल्याचा उल्लेख केलेला नाही.

शेंडे यांनी बनसोडेंना महापुरुष करण्याकरता बालपणीच्या काही कल्पित कथा सदरहू चरित्रात समाविष्ट केल्यात. मराठी तिसरीतच बनसोडे यांना काव्य

स्फुरले आणि वयाच्या अकराव्या वर्षापासून त्यांच्यात समाजक्रांतीचे बीजारोपण झाले असे म्हटलेले आहे. बनसोडेंना एका स्पृश्य विद्यार्थ्याकडून अपमान सहन करावा लागला व त्याकरता त्यांनी ३०–४० मुलांचा घोळका जमा केला काय, त्यांचेसमोर भाषण दिले काय आणि 'अस्पृश्योद्धार करूनच मरेन' वगैरे प्रतिज्ञा केल्या काय, आदी कथांद्वारे बनसोडेचरित्रास रंजक करण्यात आले आहे. बनसोडे हयात असताना त्यांनी स्वतःसंबंधी माहिती कुठेही लिहून ठेवलेली नाही. महापुरुषांच्या नावाने प्रसिद्ध होणाऱ्या चरित्रात बालपणीच्या खऱ्याखोट्या अनेक कथा समाविष्ट केल्या तरी त्या तपासणे शक्य नसते. बनसोडेंना 'महापुरुष' ठरवायचे असे ठरवूनच शेंडे यांनी त्यांच्याभोवती एक वलय निर्माण करण्याचा गेल्या ३० वर्षात जो प्रयत्न चालविला त्यात त्यांना पुष्कळ अंशी यश आले असे म्हणावे लागते. कारण बनसोडेंसंबंधी वारंवार केलेली विधाने सत्य आहेत असे गृहीत धरून त्यांची सत्यासत्यता तपासण्याचा एकाही दलित लेखकाने प्रयत्न केलेला नाही.

आपण प्रथम १९३० च्या पूर्वीच्या कार्याचा आढावा घेऊया.

शेंडे यांचे बनसोडेंच्या कार्याचे विवरण पाहिले तर असे आढळून येते की, महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी जे जे कार्य केले ते ते सर्व कार्य बनसोडेंनी हाताळले असा आभास चरित्रलेखकाने निर्माण केला आहे. शाळा, वसतिगृहे यांची स्थापना, वृत्तपत्रे काढणे, सभासंमेलने भरवणे वगैरे कार्य प्रारंभी बनसोडेंनी आरंभले म्हणून ते सर्व सुधारणांच्या बाबतीत अग्रणी ठरतात असे त्यांचे म्हणणे आहे.

बनसोडे हे ऐश्वर्यसंपन्न कुटुंबात जन्मास आले असे सांगून शेंडे म्हणतात, 'तारुण्याच्या ऐन उमेदीचे पूर्वीच संपत्तीचे दान करून ते स्वतः कंगाल बनले.' अर्थात हे दान लोकसेवेसाठी व दलितांच्या उद्धारासाठी केले असे जेव्हा ते म्हणतात तेव्हा त्यांनी हे दान कोणत्या विशिष्ट वर्गासाठी केले हे सप्रमाण सिद्ध करायला हवे.

शेंडे म्हणतात, बनसोडेंनी १९०१ मध्येच नागपूर येथील पाचपावलीत तळ ठोकला. बनसोडेंचे कार्य नागपूर भागातच फार पूर्वीपासून आहे असा दावा मांडण्याकरिता नागपूरहून बनसोडे कार्य करीत हे दाखवणे आवश्यक आहे. १९३० पर्यंतच्या सभासंमेलनांत बनसोडे रा. मोहपा असेच नमूद करीत असत. किसन फागोजींनी १९०१ साली सन्मार्गशोधक निराश्रित समाज स्थापन केला व १९०५ साली टिळकांच्या 'केसरी'त या समाजासंबंधी स्फुट लिहिण्यात आले. वृत्तपत्राकडे पत्रक आल्यानंतर ते हिंदुसमाज सुधारणेसंबंधी आहे या भूमिकेने 'केसरी' ने स्फुट लिहिणे स्वाभाविक आहे. परंतु शेंडे एवढ्यावरच समाधान मानीत नाहीत. ते म्हणतात, हा लेख खास टिळकांनी लिहिला. आणि क्षणभर धरले की तो टिळकांनी अस्पृश्यांना सहानुभूती दाखवण्याकरिता व ब्राह्मणेतर पक्षाला शह देण्यासाठी जरी लिहिला असेल तरी त्यामुळे बनसोडेंनी फार मोठे कार्य केले असा अर्थ होतो काय ?

शेंडेंच्या म्हणण्यानुसार या संस्थेच्या शाखा गुरुवर्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर

पसरल्या. परंतु यासंबंधी एकही पुरावा मागे उरू नये याला शेंडे यांचे दुर्दैवच समजावे लागेल. या संस्थेच्या संचालकांत कोण होते, या संस्थेने कुठे काही कार्य केले असल्यास त्याची नोंद आहे काय वगैरे माहिती चरित्रलेखकाकडून अपेक्षित आहे. आमच्या मते ही 'संस्था' नावापुरतीच निर्माण झाली. ज्या मोहपा या खेड्यात बनसोडेंच्या घरी ही संस्था निर्माण झाली तेथेच ती गतप्राण झाली. म्हणून कोसारे यांनी आपल्या ग्रंथात स्पष्ट म्हटले आहे की, या संस्थेने कुठेही काही कार्य केल्याचा पुरावा नाही.

बनसोडेंनी सत्यशोधक जलशाची स्थापना केली व त्या द्वारे संपूर्ण मध्यप्रांत वऱ्हाडात कार्यक्रम केले असे विधान शेंडे यांनी केलेले आहे. जलसे, तमाशे आदी लोकनाट्याचे जे प्रयोग होतात त्यांची नोंद फारशी कुणी घेत नाही हे जरी खरे असले, तरी या जलशातून तत्कालीन कोणत्या व्यक्ती काम करीत हे लेखकाला देता आले असते. जलसा, नाटकादींच्या प्रयोगापूर्वी जी हस्तपत्रके वाटण्यात येत ती या दृष्टीने महत्त्वाचा पुरावा मागे ठेवतात. सत्यशोधक जलसा विदर्भात होता ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्याचे अनाठायी श्रेय बनसोडेंना देण्याचा प्रयत्न अश्लाघ्य आहे. हा जलसा दौलतराव वारसे मास्तर, गुरुदास ढेमरे गुरुजी आणि सत्यशोधक समाजाचे नागपुरातील कार्यकर्ते बाबुराव भोसले यांनी एकत्र बसून १९२८च्या सुमारास स्थापन केला. हा जलसा सर्वत्र प्रसिद्ध होता. या जलशात स्त्रीपात्र करणाऱ्या उद्धवराव रामटेके या दुर्लक्षित कलाकाराच्या म्हणण्यानुसार बनसोडेंचा कोणताही जलसा त्या काळात अस्तित्वात नव्हता व त्यांची नाटके वा जलसे कुणीही केल्याचे स्मरणात नाही.

बनसोडे हे सपत्नीक सार्वजनिक कार्य करीत असत याबद्दल दुमत नाही. परंतु त्यांच्याही पूर्वीपासून नागपूर प्रांतात अनेक कार्यकर्ते समाजसुधारणेचे कार्य करीत होते. अकोल्याच्या जानोजी खंडारेंनी १८८४ साली दलित मुलांकरिता फ्री बोर्डिंग हाऊस काढले होते. नागपुरात १८९०च्या सुमारास महारांनी महारांकरिता स्थापिलेली व चालविलेली एक शाळा अस्तित्वात असल्याचा उल्लेख शासकीय कागदपत्रांत आहे. नागपूर विभागात सामाजिक कार्य हे नेहमी संघटनात्मक राहिलेले आहे, व्यक्तिगत नव्हे. बनसोडेपूर्वी विठोबा रावजी, कालीचरण नंदागवळी, रामजो पैकू शेटचा, विश्रामजी सवाईथूल आदी अनेक कार्यकर्ते कार्य करीत होते. ते वयाने ज्येष्ठ होते ही बाब विसरता येत नाही. तो काळ लक्षात घ्या. अगदी कालपरवापर्यंत वयोवृद्ध माणसाला विशेष मान होता. त्यांना डावलून कोणत्याही तरुणाला समाजाचे नेतृत्व मिळत नसे. म्हणूनच 'लॉयल महार सभे'च्या सदस्यांत बनसोडेंना घेतले होते, तरी त्यांना पदाधिकारी नेमले नव्हते. १९१३ च्या परिषदेनंतर नागपूरच्या सार्वजनिक जीवनातील महत्त्वाची घटना म्हणजे चोखामेळा वसतिगृहाची स्थापना. यासंबंधीचे कागदोपत्री पुरावे उपलब्ध आहेत. त्यात कुठेही 'बनसोडेंच्या मार्गदर्शनाखाली या वसतिगृहाची स्थापना झाली' असा उल्लेख नाही.

यासंबंधीची विस्तृत माहिती विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास या ग्रंथात आहेच.

१९१७–१८ च्या मजुरांच्या संपात बनसोडे व विठोबा रावजी हे विरुद्ध बाजूंनी उभे ठाकल्याचे दिसते. परंतु त्यापुढे बनसोडे–गवई यांचा गट 'महार लॉयल सभे'तून बाहेर पडलेला दिसून येतो आणि याच गटाने १९२० ची अखिल भारतीय बहिष्कृत परिषद आयोजित केली. अर्थात विठोबा रावजी व त्यांच्या सहकाऱ्यांचा यात फारसा सहभाग नव्हता; हे उघड आहे.

१९२० च्या परिषदेसंबंधी बरेचसे चर्वितचर्वण झालेले आहे. या परिषदेला राजर्षी शाहू छत्रपती हजर राहिले, त्यामुळे अर्थातच हिला शासकीय आशीर्वाद प्राप्त होणे स्वाभाविक होते. परंतु छत्रपतींच्या उपस्थितीमुळे समग्र महाराष्ट्रातील सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळींचे प्रमुख कार्यकर्ते हजर होते. दलित कार्यकर्ते पाहिले तर मुंबईचे डॉ. आंबेडकर, शिवतरकर, डॉ. सोळंकी, पुण्याहून शि. जा. कांबळे, नागपूरचे बनसोडे, ग. आ गवई आणि नंदागवळी ही प्रमुख मंडळी होती.

वरील पुढाऱ्यांच्या उपस्थितीमुळे या परिषदेला भारदस्तपणा प्राप्त झाला होता. परंतु वर निर्दिष्ट केलेल्या २–३ कार्यकर्त्यांना वगळल्यास नागपुरातील अस्पृश्यांचे अन्य प्रमुख पुढारी या परिषदेत सहभागी झालेले दिसत नाहीत. याचाच अर्थ असा की अस्पृश्यांचे अन्य सर्व प्रमुख कार्यकर्ते म्हणजे धरमदास नगरारे, विठोबा रावजी, मुकिंदा शेटचे, विश्रामजी सवाईथूल, करणूजी मालगुजार इ. ना या परिषदेत स्थान नव्हते.

बनसोडेंचे हे एक महत्त्वाचे कार्य असले तरी त्याचेही संपूर्ण श्रेय त्यांना एकट्याला जात नाही. नानासाहेब गवई व नंदागवळी यांनाही या परिषदेच्या यशाचा वाटा जातो. परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. नंदागवळी होते ही बाब विसरून चालण्यासारखी नाही. याच सुमारास नानासाहेब गवई व नंदागवळी हे दोघेही मध्यप्रांत–वऱ्हाड लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सदस्य होते व त्यांचा भरघोस पाठिंबा असल्याशिवाय अखिल भारतीय स्तरावरील परिषद आयोजित करणे अशक्य होते. या परिषदेतील कार्यासंबंधी बनसोडेंचे सर्व प्रतिनिधींनी कौतुक केलेले होतेच. परंतु या परिषदेत वि. रा. शिंदेमार्फत बनसोडे व गवई यांच्याद्वारे जो ठराव मंजूर करण्याचा घाट घालण्यात आला तो बाबासाहेबांनी उधळून लावला, हे सर्वश्रुत आहे.

१९३० ते ४६ च्या दरम्यान बनसोडेंचे कार्य कोणते? शेंडेंच्या चारित्रग्रंथावरून आढावा घेतल्यास हे कार्य पूर्णतः शून्य आहे. सार्वजनिक जीवनात बनसोडे पूर्णतः एकाकी होते. त्यांच्या मागे लोकसमुदाय तर नव्हताच, परंतु समाजात एक वयोवृद्ध व्यक्ती एवढेच त्यांचे स्थान होते. कारण बनसोडेंची प्रमुख भूमिका आंबेडकरविरोधकाची होती. श्री. ना. रा. शेंडे व गुरुवर्य बनसोडे हे दोघेही खादी वापरीत. वि. रा. शिंदे यांच्या 'डिप्रेस्ड इंडिया असोसिएशन'चे ते या प्रांताचे अध्यक्ष होते व बाबासाहेबांच्या कोणत्याही चळवळीशी ते कधीही समरस झाले नाहीत.

गवई आणि ठवरे यांच्याप्रमाणेच बनसोडे यांना हिंदू महासभेच्या पुढाऱ्यांचे हस्तक समजण्यात येई. १९३० ते ४६ चा काळ आंबेडकरी चळवळीचा समजल्यास बनसोडेंचे कार्य शून्यवत होते असेच म्हटले पाहिजे. आंबेडकरी चळवळीच्या अभ्यासकांना हे माहीत आहे की या चळवळीविरोधी कृत्ये करणाऱ्या दलित पुढाऱ्यांना दलित समाजाने वाळीत टाकले होते. त्यांच्या कुटुंबियांशी सामाजिक व कौटुंबिक व्यवहारदेखील लोक ठेवीत नसत. म्हणूनच शेंडे म्हणतात त्याप्रमाणे, 'त्या महाभागाच्या पडत्या काळात मात्र समाजाने कसलीही दखल घेतली नाही' हे म्हणणे पूर्णसत्य आहे.

बनसोडेंची बाबासाहेबांबद्दलची भूमिका समजून घेण्याकरिता एखादी घटना सांगायला हरकत नाही. १९३० च्या अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेचे आयोजन करण्याकरिता मध्यप्रांत-वऱ्हाडातील सर्वच प्रमुख अस्पृश्य पुढाऱ्यांना पाचारण करण्यात आले होते. या पुढाऱ्यांत विदर्भातील सर्वच कार्यकर्त्यांनी भाग घेतला होता. श्री नंदागवळी स्वागताध्यक्ष होतेच. श्री. बनसोडे यांनादेखील निमंत्रित म्हणून बोलावलेले होते. एकदोन बैठकांना हजर झाल्यानंतर बनसोडे गैरहजर राहून व बाहेर राहून परिषदविरोधी भूमिका घेत राहिले.

दि. १६-२-३० च्या नागपूर येथील 'महाराष्ट्र' दैनिकात श्री. बनसोडे यांनी या परिषदेसंबंधी असलेली आपली भूमिका प्रसिद्ध केलेली आहे. या मुलाखतीतील प्रश्नोत्तरे समजून घेणे आवश्यक आहे.

प्रश्न– अखिल भारतीय दलित काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर बहुमताने निवडून आले तर तुम्ही त्यात भाग घ्याल की नाही?

उत्तर– मोठा बिकट प्रश्न आहे. ज्याच्या त्याच्या मर्जीचा प्रश्न आहे. पण अस्पृश्य वर्गातील चमकणारा तारा पाहण्यासाठी तरी मी खास जाईन.

पुढे ते असेही म्हणतात, 'असोसिएशन लोकनियुक्त आहे असे माझ्याच्याने म्हणवत नाही. आमची ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लास काँग्रेस शेगावला भरणार होती. परंतु तिचे अध्यक्ष डॉ. आंबेडकरांना करावे असे सुचविण्यात आले होते, म्हणून ती काँग्रेस बारगळली. मी ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लास असोसिएशनचा येथील शाखेचा अध्यक्ष आहे' इ. यावरून बनसोडे हे बाबासाहेबांच्या चळवळीपासून अलिप्त होते हे जसे स्पष्ट होते, तसेच त्यांना त्यांचे नेतृत्वही मान्य नव्हते हेही दिसून येते.

१९४१ साली प्रसिद्ध झालेले चोखामेळा चरित्र (पद्यबद्ध) सोडले तर, अन्य कोणतेही नामोल्लेख करावे असे कार्य १९३० नंतरच्या काळात बनसोडेंच्या लेखी आढळून येत नाही.

किसन फागोजी बनसोडेंचे चरित्रलेखक श्री. शेंडे यांनी निराधार विधाने करून त्यांना महापुरुष करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तो कसा चुकीचा आहे व श्री. बनसोडे हे अन्य अनेक कार्यकर्त्यांपैकी एक असून त्यांच्या कार्याला जे सर्वश्रेष्ठत्व देण्यात आले ते कसे वरपांगी आहे हे दिसून येईल.

शेंडेंच्या चरित्राची चिकित्सा करण्याची दलित साहित्यिकांना गरज वाटली नाही. का ते कळत नाही. शेंडे यांनी आंबेडकरविरोधकांची चरित्रे लिहिली व असा आभास निर्माण केला की मध्यप्रांत–वऱ्हाडातील दलित चळवळ जी आहे ती बनसोडे, ठवरे व गवई या तीन व्यक्तींनीच केलेली होती. आंबेडकरी चळवळीचे म्होरके कालीचरण नंदागवळी, धरमदास नगरारे, दशरथ पाटील, रेवारामजी कवाडे, बाबू हरदास, एल. एन. दौलतराव वारसे, संभूजी खंडारे आदी पाच–पन्नास व्यक्तींनी केलेले कार्य या त्रिमूर्तीसमोर नगण्य होते. किंवहुना, बनसोडे हे तर सर्वांचे मार्गदर्शक होते. आणि मार्गदर्शक होते म्हणून ते कोणत्याही पदावर राहत नसत, असे शेंडे यांनी मांडले आहे.

आपल्या भूमिकेचे समर्थन करताना शेंडे म्हणतात, 'विदर्भातील अस्पृश्य कार्यकर्त्यांच्या चळवळीचे धोरण त्यांच्या (डॉ. आंबेडकरांच्या) धोरणांहून बऱ्याच बाबतीत निराळे राहत आलेले आहे... (पृ. ८१) किसन फागोजी बनसोडे हे केवळ विदर्भातीलच नव्हे, तर महाराष्ट्रातील ज्येष्ठ व श्रेष्ठ कीर्तिमान पुढारी, दलितोद्धाराच्या चळवळीतील ते डॉ. आंबेडकरादि थोर नेत्यांच्या कितीतरी काळ आधी उद्धारक कार्य व अस्पृश्योद्धाराच्या चळवळीसाठी सुलभ पार्श्वभूमी निर्माण करणारे.' (पृ. ८२)

या शेंडेंच्या विधानात त्यांची मनोभूमिका स्पष्ट झालेली आहे. बनसोडे, ठवरे आणि गवई यांनी आंबेडकरविरोधी जी भूमिका घेतली तिला ते धोरण म्हणतात व त्यांचे धोरण तेच विदर्भातील (सर्व) अस्पृश्य कार्यकर्त्यांचे धोरण म्हणून नमूद करतात. बाबासाहेबांच्या चळवळीत जे लक्षावधी लोक प्राण ओतून काम करीत त्यांचे मार्गदर्शन करणाऱ्या शेकडो कार्यकर्त्यांना जणू काही धोरणच नव्हते, असा आभास निर्माण करतात. तसेच डॉ. आंबेडकरांच्या चळवळीची सुलभ पार्श्वभूमी याच त्रिमूर्तीने निर्माण केली असा धादांत खोटा इतिहास सादर करतात.

श्री. बनसोडेंनी काव्य लिहिले, नाटके वा तमाशे लिहिले म्हणून ते सर्वश्रेष्ठ पुढारी ठरू शकत नाहीत. विदर्भ– मध्यप्रांतात झालेल्या बहुतेक चळवळींचा इत्थंभूत इतिहास श्री. एच. एल. कोसारे यांनी लिहून काढलेला आहे. उपलब्ध लेखी पुरावे, पत्रके आणि जुन्या कार्यकर्त्यांच्या भेटींतून सत्यासत्यता पडताळून हा इतिहास लिहिल्यामुळे यातील माहिती ग्राह्य समजण्यास प्रत्यवाय नसावा. या संपूर्ण ग्रंथात बनसोडेंचे प्रमुख कार्य म्हणजे १९२० च्या अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेचे संयोजन. अन्यत्र त्यांचे चळवळीतील स्थान नगण्य असे आहे.

बनसोडे हे सुरुवातीच्या काळात झुंजार पुढारी होते, परंतु ही झुंजार वृत्ती डिप्रेस्ड इंडिया असोसिएशनच्या दावणीला बांधल्यामुळे बोथट झाली. ज्यावेळी दलित समाज स्वाभिमानाचा लढा देत होता, बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली विविध आंदोलने उभारीत होता, त्यावेळी बनसोडे हे गवईंसोबत या आंदोलनाच्या विरोधकाची भूमिका घेत होते. ते सुरुवातीला काँग्रेस व नंतर हिंदुसभेच्या पुढाऱ्यांच्या सल्ल्याने

कार्य करीत. या त्यांच्या धोरणाबद्दल भाऊसाहेब माडखोलकरांनी देखील त्यांची प्रशंसा केलेली आहे. १९३०ते४६ हा बनसोडेंचा निष्क्रिय कर्मयोगाचा काळ समजण्यास हरकत नाही.

श्री. शेंडे म्हणतात, '१९२० साली नागपूर येथे अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे जे अधिवेशन भरले होते ते घडविण्यात व त्याची फलश्रुती दर्शविण्यात इतर थोर नेत्यांबरोबर गुरुवर्यांचाही सिंहाचा वाटा होता.(पृ. १०६) त्याचप्रमाणे १९२० नंतर महात्मा गांधी यांच्याशी बराच संबंध आला होता. (पृ. १०७)टिळक आणि गुरुवर्य यांचा निकटचा संबंध आला होता.'(१०७)अशी अनेक विधाने शेंडेंच्या गुरुचरित्रात आहेत. परंतु लो. टिळक आणि म. गांधी यांच्याशी झालेल्या एकाही, भेटीचा वा चर्चेचा कल्पितदेखील, वृत्तांत ते देऊ शकलेले नाहीत. आणि गंमत अशी की बनसोडेंचा सर्वच प्रमुख कॉंग्रेस पुढाऱ्यांशी संबंध होता हे गौरवाने नमूद करणारे शेंडे आंबेडकरांच्या चळवळीतील एकाही पुढाऱ्याशी बनसोडेंचा संबंध असल्याचे नमूद करीत नाहीत, नव्हे त्यांचा नामोल्लेखही करीत नाहीत. दशरथ लक्ष्मण पाटील– १९२० पासून समाजकार्य करणारे, मध्यप्रांत–वऱ्हाड शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे अध्यक्ष, बाबासाहेबांचे निष्ठावंत सहकारी– त्यांच्याशी बनसोडेंचा संबंधच नाही. दुसरे आंबेडकरी चळवळीतील प्रमुख पुढारी पंडित रेवारामजी कवाडे. १९१९ साली त्यांनी मजुरांचा बैठा संप घडवून आणला. १९२३ साली नागपूर गिरणी मजूर संघाची स्थापना झाली. त्यावेळी कार्यकारिणीत श्री. रुईकर या मजूर पुढाऱ्यासोबत धरमदास नगरारे, रेवाराम कवाडे व किसन फागोजी बनसोडे हे होते. परंतु १९२९ पासून बनसोडेंचे नाव कोणत्याही मजूर चळवळीशी, दूरान्वयानेही, संबंधित नव्हते. कवाडे आपल्या कर्तृत्वाने १९३४ साली गि. म. संघाचे कार्यवाह झाले, धरमदास नगरारे उपाध्यक्ष झाले, तरीही बनसोडेंना मजुरांचे झुंजार पुढारी म्हणून त्यांचे चरित्रकार संबोधतात.

बनसोडेंचे कॉंग्रेस व हिंदुमहासभेच्या पुढाऱ्यांशी संबंध होते. स्वतः श्री. शेंडे खादी वापरीत व बनसोडेही खादी वापरीत. ज्या काळात खादीधारी विदर्भात दलितांच्या वस्तीत प्रवेश करू शकत नव्हता त्या काळात बनसोडे जर कॉंग्रेसशी संबंध ठेवून असतील तर त्यांचे दलित समाजात काय स्थान असेल याची कल्पना येऊ शकते.

किसन फागोजींच्या कार्याचे वास्तव स्वरूप काय आहे हे आपण पाहिले. बनसोडेंच्या पूर्वी जे कार्यकर्ते कार्य करीत त्यांत विठोबा रावजी व कालीचरण नंदागवळी हे दोन प्रमुख कार्यकर्ते होते. या व्यतिरिक्त अन्य अनेक कार्यकर्तेही कार्य करीत. या ज्येष्ठ कार्यकर्त्यांना डावलून जातपंचायतीचे पुढारीपण नवोदित तरुणांकडे येणे त्या काळात असंभव होते. त्यामुळे कोसारेंनी आपल्या 'इतिहासा'त असे विधान केले आहे की 'किसन फागोजींना सामाजिक कार्याची स्फूर्ती त्यांच्या पूर्वी समाजात कार्य करीत असलेल्या ज्येष्ठ पुढाऱ्यांपासून झाली असणे अगदी स्वाभाविक संभवते. या

ज्येष्ठ पुढाऱ्यांत अग्रणी असलेले विठोबा रावजी व त्यांचे समकालीन मुकिंदा शेटे मुरारकर, करणूजी मालगुजार, गोमाजी गणेश सावकार आदी सहकारी होते.'

डॉ. गंगाधर पानतावणे यांनी अगदी अलिकडे श्री. आर. टी. इंगळे यांचे हस्तलिखित 'महारांचा सांस्कृतिक इतिहास' या नावाने प्रसिद्ध केले, त्यातील प्रस्तावनेत वरील विधानास आक्षेप घेताना म्हटले आहे की,

'सामाजिक कार्याचा किंवा कोणत्याही कार्याचा विचार करावयाचा असल्यास एखाद्या व्यक्तीचे वय जास्त आहे म्हणून कार्य ज्येष्ठ आहे असे मानणे हास्यास्पद होईल. आणि हा निकष आपण मानू लागलो की मग आपल्याला बाबासाहेब आंबेडकरांचे कार्यही गौण मानावे लागेल. कारण बाबासाहेबांपेक्षा वयाने अधिक असलेल्या व्यक्ती समाजकार्य करीतच होत्या.'

वरील वाक्यातील 'ज्येष्ठ' शब्दाचा अर्थ ओढूनताणून 'श्रेष्ठ' असा करण्यात आलेला आहे. एखाद्याने अगोदर कार्य सुरू केले म्हणजे तो स्वाभाविकपणेच ज्येष्ठ ठरतो यात हास्यास्पद भाग कोणता? कोसारेंनी विठोबा रावजींचे कार्य सर्वश्रेष्ठ होते असे कुठेही म्हटलेले नाही.

डॉ. पानतावणे यांनी उपस्थित केलेला श्रेष्ठत्वाचा मुद्दा या ठिकाणी अप्रस्तुत आहे. कोसारेंनी बनसोडेंची अन्य कार्यकर्त्यांसोबत कालसापेक्ष तुलना केली, कार्यसापेक्ष नव्हे. वयाने ज्येष्ठ असलेल्या पुढाऱ्यांपासून नवोदित कार्यकर्त्यांने व जुन्या लेखकापासून नवोदित लेखकाने प्रेरणा घेणे स्वाभाविक बाब आहे. त्यामुळे विठोबा रावजींचे कार्य बनसोडेंच्या कार्यापेक्षा श्रेष्ठ होते असा चुकीचा समज गंगाधररावांनी करून घेतला.

याच अनुषंगाने पुढे जे विश्लेषण करण्यात आले तेही गैरलागू आहे. डॉ. पानतावणे म्हणतात; (नागपूर येथे १९६४ साली)

'वयापेक्षाही कार्यप्रेरणा व स्वरूप, अंगभूत क्षमता व तीव्रता, लोकसंग्रह करण्याची हातोटी आणि स्वार्थरहितता या बाबी सार्वजनिक जीवनात महत्त्वाच्या असतात. त्या दृष्टीने विचार करू लागलो तर विदर्भातील विठोबा रावजी मून महार संतपंडे आधी जन्माला आले म्हणून किसन फागोजी बनसोडे, कालीचरण नंदागवळी किंवा गणेश आकाजी गवई या नंतर जन्मास आलेल्या सक्रिय कार्यकर्त्यांचे कार्य नगण्य किंवा प्राथमिक स्वरूपाचे होते असे म्हणणे केवळ दुराग्रहाचे व अज्ञानजन्य होईल. (पृ.६)'

कोसारेंचे वरील विधान कितीही ताणले तरी पानतावणे म्हणतात त्याप्रमाणे विठोबा रावजी निव्वळ आधी जन्मास आले म्हणून ते अन्य कार्यकर्त्यांपेक्षा श्रेष्ठ होत असा कोसारेंनी निष्कर्ष काढला नाही. कोसारेंचे जे वाक्य वर दिलेले आहे त्या व्यतिरिक्त अन्य कोणतेही विधान पानतावणेंच्या आरोपाशी संबंधित दिसत नाही.

बरे, वरील विधानातदेखील निव्वळ विठोबा रावजींचा उल्लेख कोसारेंनी केलेला नाही. विठोबा रावजींसोबत समकालीन मुकिंदा शेटचे मुरारकर, करणूजी

विठ्ठल मालगुजार, गोमा गणेश सावकार आदी अनेक सहकाऱ्यांचा उल्लेख या वाक्यात असल्यामुळे विठोबा रावजींना कोसारेंनी ज्येष्ठत्व बहाल करण्याचा प्रयत्न केला हा हेत्वारोप चूक ठरतो.

'संदेश' साप्ताहिकात बनसोडेंचे अस्पृश्य परिषदेतील भाषण छापून प्रसिद्ध झाले होते. त्यात त्यांनी म्हटले होते की,

'मी जेव्हा संस्था काढली तेव्हा 'मदत देतो' म्हणून पुष्कळ सांगत. पण एकट्या गवई यांच्याखेरीज स्वार्थत्यागी असा मला कोणी भेटला नाही. विटाळ काढून टाकण्याचा प्रयत्न प्रथम मी मोहप्यास सुरू केला. आज या तेरा वर्षांनंतर हजारो लोक या परिषदेला येत आहेत.' (पृ. ५४)

१९२० साली छापून आलेले हे भाषण ग्राह्य धरले तर बनसोडेंच्या कार्याचा आरंभ १९०७ च्या सुमारास झाला असे समजण्यास हरकत नाही.

पानतावणेंनी बनसोडेंसोबत गवई व नंदागवळी यांचे कार्य कोसारेंनी 'नगण्य' व प्राथमिक स्वरूपाचे समजले असा दूरान्वयाने अर्थ काढण्याचा जो प्रयत्न केला तो अनावश्यक आहे असेच म्हटले पाहिजे.

विठोबा रावजी मूनपंडे यांच्या कार्यासंबंधीचे विवरण प्रस्तुत पुस्तकात आहे. हेच विवरण कोसारेंच्या पुस्तकात आहे.

श्री. कोसारे यांच्या काही विधानांचा परामर्श पानतावणे कसा घेतात व त्यांची चिकित्सा कितपत योग्य आहे हेही आपणास पाहता येईल.

'विठोबाजींनी अस्पृश्यांना स्नानासाठी हक्क मिळवून दिला असे कोठेही सूचित होत नाही. घाट बांधला, पायऱ्या बांधल्या, स्वतंत्र मंदिर बांधले असेच उल्लेख दिसतात,' असे पानतावणे प्रस्तावनेत म्हणतात.

श्री. कोसारेंच्या वाक्यास अनुलक्षून त्यांच्या पुस्तकातील परिशिष्ट १ मधील मजकुरासंबंधी पानतावणे म्हणतात की, 'विठोबा रावजींनी राजे रघुजींकडून हुकूम मिळविला होता असे स्पष्ट होत नाही.' तसेच 'धार्मिक समानतेचा प्रश्न विठोबाजींनी हाती घेतला होता' असा निष्कर्ष काढणे खूपच ताणल्यासारखे होईल. अंबाळा तलावावर स्नान करण्याचा अधिकार मिळवणे ही विठोबांची काही वैयक्तिक बाब नव्हती. तलावावर घाट बांधण्याची परवानगी मिळवून स्वतः विठोबाजींनी घाट बांधला. त्यानंतर एक देऊळही बांधले. आता हा घाट म्हणजे 'स्मशानघाट' तर नव्हताच. तलाव अथवा नदीच्या काठावर घाट कशाकरिता बांधण्यात येतो? महारांना स्नानाचा हक्क जरी होता, तरी त्यांची सोय करण्याचे काम विठोबांनी जातीने केले हे निर्विवाद आहे. पानतावणे याला धार्मिक लढा मानायला तयार नाहीत. रामटेक देवस्थानावर श्राद्ध व पिंडदान करण्याकरिता हिंदू समाज दरवर्षी जमत असतो. महार समाजही त्यावेळी जमत असे. पिंडदानाकरिता जर पक्का घाट नसेल तर सर्व कार्य चिखलात उरकावे लागे. व पिंडदान म्हणजे स्नान आलेच. ज्या कार्याबद्दल महार समाजाने सभा-परिषदा घेऊन कृतज्ञपणे विठोबांच्या कार्याचे ऋण

मान्य केले ते कार्य पानतावणे अमान्य करतात. वहिवाट बंद पडली ती सुरू करण्याकरिता विठोबांनी रघुजी राजे भोसलेंकडून हुकूम आणला. हे कार्य आजच्या पिढीस नगण्य वाटत असले तरी तत्कालीन महार समाजाच्या दृष्टीने ते महत्त्वाचे होते यात शंका नाही. प्रस्तुत पुस्तकातील विठोबाजींवरील लेख त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करण्यास पुरेसा आहे.

महाडच्या तलावावर पाणी भरण्याचा हक्क नगरपालिकेने मान्य करूनदेखील तो तेथील जनता नाकारीत होती व म्हणूनच बाबासाहेबांना तेथे लढा उभारावा लागला. त्याला बाबासाहेबांनी धर्मसंगर असे म्हटले आहे.

दोन्ही ठिकाणचे लढे तलावातील पाण्याच्या वापरासंबंधीचे होते. एक होता पिंडदानाच्या हक्काचा, तर दुसरा होता तळ्यातील पाण्याच्या वापराचा. दोन्हीमध्ये अस्पृश्य समाज हिंदू म्हणून समान हक्काची मागणी करीत होता. अर्थात महाडच्या लढ्याची भूमिका जास्त व्यापक होती हे निर्विवाद आहे.

गवई, बनसोडे व नंदागवळी यांना एकाच मापाने तोलण्यात अर्थ नाही. गवई आणि बनसोडे यांचे कार्य डिप्रेस्ड इंडिया असोसिएशनशी गुंतलेले होते. उलट, कालीचरण नंदागवळी दलित समाजाच्या लोकाभिमुख चळवळीशी समरस होते. १९२० ते २३ च्या विधानमंडळात गवई व नंदागवळी यांनी एकत्रितरीत्या दलितांचे प्रश्न सोडवले. परंतु अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेत वि. रा. शिंद्यांचे हस्तक म्हणूनच गवईंनी प्रथम भूमिका घेतली, जी बाबासाहेब आंबेडकरांनी उधळून लावली. यावेळी बनसोडे हे गवईंचे सहकारी होते. यापुढे देखील बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली विदर्भात ज्या चळवळी झाल्या त्यांचे विदर्भातील नेते श्री. लक्ष्मण कृष्णाजी ओगले, दौलतराव बारसे, दशरथ लक्ष्मण पाटील, नंदागवळी, तुलाराम साखरे, रेवाराम कवाडे, जैराम शेटचा, विठ्ठल मालगुजार आदी असंख्य कार्यकर्ते होते. यांत बनसोडेंना कुठेही स्थान मिळत नव्हते ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

१९२० नंतरच्या कालखंडात दलितांच्या ज्या ज्या प्रमुख संस्था, संघटना व चळवळी निर्माण झाल्या त्यांत कुठेही बनसोडेंचे, अभावानेदेखील, अस्तित्व आढळत नाही. तरुण महार संघ, (विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास यात सविस्तर माहिती आहे) स्वतंत्र मजूर पक्ष, कामगार युनियन, त्यानंतरचे शेडचूल्ड कास्ट फेडरेशन या सर्व दलित चळवळींच्या प्रणेत्या संघटना होत. ज्याअर्थी विदर्भातील दलित चळवळी या संस्थांमार्फत चालविण्यात येत आणि ज्याअर्थी या संस्थांमध्ये बनसोडेंना कोणतेही स्थान नव्हते, त्याअर्थी बनसोडे हे निव्वळ एकाकी कार्य करीत असावेत हेच सिद्ध होते. अशा एकाकी कार्यकर्त्याने समग्र चळवळीत 'विचार व आंदोलन या दोन्ही पातळ्यांवर अत्यंत व्यापक कार्य केले' असे डॉ. पानतावणेंनी म्हणणे म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास होय.

नानासाहेब गवई यांचे कार्य तर उघडउघड आंबेडकरी चळवळीच्या विरोधातच होते, आणि बनसोडे हे चळवळीचे उघडउघड विरोधक नसले तरी समर्थक तरी

निश्चितच नव्हते. आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीने त्यांचा वाटा शून्यच म्हणावा लागेल.

किसन फागोजींबद्दल मी उपस्थित केलेले मुद्दे त्यांच्या कार्याचे अवमूल्यन करण्याच्या हेतूने केलेले नसून त्यांच्या कार्याचे वस्तुस्थितिनिदर्शक मूल्यमापन व्हावे या हेतूने केलेले आहे. दलित चळवळीच्या इतिहासाचे लेखन नुकतेच कुठे सुरू झालेले आहे. तेव्हा अनैतिहासिक, असत्य व अवास्तव माहिती इतिहास म्हणून सादर केल्यास ती सामाजिक चळवळीस व त्यात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना बाधक ठरण्याचा संभव आहे.

प्रस्तुत पुस्तकातील लेखाद्वारे १९२५ च्या पूर्वी झालेल्या चळवळीची माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे, विदर्भातील महार समाज महाराष्ट्रातील अन्य प्रदेशातील अस्पृश्यांच्या तुलनेत पूर्वीपासून सधन आहे. अस्पृश्यता सर्वत्र प्रचलित असली तरी ती पूर्व महाराष्ट्रात सौम्य होती. संख्याबल हे प्रमुख कारण होतेच, परंतु अर्थबल देखील होते. शिक्षणाची जाणीव समग्र महाराष्ट्रातील अस्पृश्यांत सर्वप्रथम महारांनाच प्रकर्षाने जाणवली. मिशनऱ्यांच्या सहवासाने ती बळावली. रेल्वे, सुताच्या व कापडाच्या गिरण्या व अन्य छोटे मोठे धंदे यातून आर्थिक स्वतंत्रता मिळाली आणि म्हणून सुरुवातीची चळवळ आर्थिक सुबत्ता असलेल्या महारांनी पुढाकार घेऊन केली. विशेष बाब म्हणजे, एकेकटयाने पुढारीपण करण्यापेक्षा जातपंचायतीच्या प्रमुख पुढाऱ्यांना एकत्र आणून सामूहिक स्वरूपात या चळवळीचा उगम झालेला आपणास दिसून येतो.

पश्चिम महाराष्ट्रात गोपाळबाबा वलंगकरांनंतर शिवराम जानबा कांबळे यांनी १९०४ च्या सुमारास सार्वजनिक कार्यास आरंभ केला आणि याच सुमारास पूर्व महाराष्ट्रात म्हणजे तत्कालीन मध्यप्रांतवऱ्हाडात कार्यकर्त्यांची लाट आली. किसन फागोजी बनसोडे यांच्यावर बरेचसे लेखन झालेले आहे. परंतु त्यांच्या पूर्वीपासून कार्य करणारे रावजी मूनपंडे, कालीचरण नंदागवळी आदी अनेक कार्यकर्ते विभिन्न क्षेत्रात कार्य करीत होते. यांच्यासंबंधी फारसे लिहिले गेलेले नाही. अकोला येथे १८८४ साली फ्री बोर्डिंग हाऊस स्थापन करणारे जानोजी खंडारे १९००पूर्वीच दिवंगत झाले, त्यांचे चिरंजीव केशवराव यांनीही सार्वजनिक कार्यास स्वतःस वाहून घेतले. नागपूरला विठोबा रावजी मूनपंडे यांचे नेतृत्व१९०४ च्या सुमारास उदयास आले. कालीचरण नंदागवळी, किसन फागोजी व नानासाहेब गवईंसोबत अनेक कार्यकर्त्यांची मालिका आपणास दिसून येते. यापैकी विठोबा रावजी १९२४ च्या सुमारास म्हणजे बाबासाहेबांचे नेतृत्व मध्यप्रांतात रुजण्यापूर्वी कालवश झाले. अन्य कार्यकर्त्यांपैकी बहुतेकांनी बाबासाहेबांचे नेतृत्व स्वीकारले. परंतु किसन फागोजी बनसोडे व नानासाहेब गवई हे आंबेडकर चळवळीशी समरस होऊ शकले नाहीत ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

संपूर्ण अस्पृश्य समाजाचेच नव्हे, तर निव्वळ महाराष्ट्रातील अस्पृश्यांचे नेतृत्व करण्याची क्षमता व धडाडी गवई व बनसोडे यांच्यात नव्हती. देशातील

राजकीय स्थित्यंतराची दिशा लक्षात घेऊन समग्र भारतातील अस्पृश्यांच्या भवितव्याचा आराखडा कसा असावा याची बाबासाहेबांना जाणीव होती. ही जाणीव लक्षात घेऊन विदर्भातील असंख्य कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांच्या क्रांतिसंग्रामात उडी घेतली. या अन्य कार्यकर्त्यांसोबत कार्य करण्यास लागणारी सहकारीपणाची जाण ह्या उभयतांत नव्हती. स्थानिक अस्पृश्यांच्या प्रश्नांवर यांनी सभा–संमेलने भरवली तरी राष्ट्रीय पातळीवरील अस्पृश्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यास हे पुढारी असमर्थ ठरले.

नाग- विदर्भात महार समाज स्वतःच्या हक्कांकरिता सुरुवातीपासून जागरूक असल्याचे दिसून येते. राजकीय व सामाजिक स्थित्यंतरात आपल्या आशा–आकांक्षा फलद्रूप करण्याचे सामर्थ्य अन्य कार्यकर्त्यांच्या तुलनेत बनसोडे–गवई यांच्या नेतृत्वात नाही असे लक्षात येताच, त्या समाजाने या उभयतांचे नेतृत्व १९२४ नंतरच सोडले व हे दोघे पुढारी एकाकी पडले तरीही, तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता, गवई व बनसोडयांनी जे उल्लेखनीय कार्य केले त्याचे महत्त्व नाकारता येत नाही.

या लेखात निर्देश केलेल्या कार्यकर्त्यांची काही वैशिष्टचे आपणास निश्चितच जाणवतात. आपण करीत असलेल्या कार्याची नोंद अजाणतेपणें त्यांनी निरनिराळचा पत्रकांद्वारे मागे ठेवली. १९१३ च्या महार परिषदेची कार्यक्रमपत्रिका जशी आहे, तसाच परिषदेचा रिपोर्ट दुसऱ्या वर्षी म्हणजे १९१४ साली छापून काढलेला आहे. पहिल्या प्रथमच महाराष्ट्रातील महारांना संघटित करण्याचा जसा कार्यकर्त्यांचा प्रयत्न दिसतो तसाच तो पुढे व्यापक झालेलाही दिसतो. १९१३ साली महार परिषद, तर १९२० साली अखिल भारतीय बहिष्कृत परिषद. १९२९–३० पर्यंत चळवळ बहुजातीय म्हणजे मांग–चांभारांना समाविष्ट करणारी झाल्याचे दिसून येते. नंदागवळींसारखे पुढारी मात्र भंगी जातीत देखील १९२० च्या पूर्वीच समाजकार्य करीत होते. सुरुवातीचे अर्ज, निवेदने, सभासंमेलने याचे परिषदांमध्ये रूपांतर झाल्याचे दिसते. प्रत्यक्ष कृतिप्रवण चळवळी यातूनच पुढे साकार झाल्या. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची पूर्वतयारी या कार्यकर्त्यांनी केली. इतकेच नव्हे, तर पुढील क्रांतीची पार्श्वभूमी यांनी तयार करून ठेवली होती.

विधानमंडळात पहिल्यांदाच अस्पृश्य समाजास प्रतिनिधित्व मिळाले व संसदीय राज्यप्रणालीचा पुरेपूर उपयोग नंदागवळीसारख्यांनी समाजासाठी राजकीय व नागरीकत्वाचे हक्क मिळविण्याकरिता करवून घेतला. सार्वजनिक पाणवठ्यावर अस्पृश्यांना पाणी भरण्याचा हक्क, शाळा–कॉलेजात प्रवेशच नव्हे तर शिष्यवृत्त्यांची देखील अस्पृश्य विद्यार्थ्यांकरिता तरतूद करणे, लोकनियुक्त प्रतिनिधी असलेल्या लोकलबोर्ड आदी स्वायत्त संस्थांवर अस्पृश्यांचे प्रतिनिधी नियुक्त करणे, पोलिसात नोकऱ्या वगैरे मागण्या विधान मंडळाकडून या प्रतिनिधींनी पुष्कळशा संमत करवून वेतल्या. यावरून त्यांच्या कौशल्याची जाणीव होते. एका ठरावाद्वारे तर अस्पृश्यांच्या स्वतंत्र वसाहती स्थापन करण्यात याव्यात अशीही मागणी होती. बाबासाहे-

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
ग्रंथ क्र. ५५२.३
दिनांक

बांच्या तुलनेत तत्कालीन दलित पुढाऱ्यांचे अत्यल्प शिक्षण व अनुभव लक्षात घेता, बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक लढ्याचाच ते अल्पांशाने पाठपुरावा करीत असे म्हणावे लागते.

हे लेख 'अस्मितादर्श' त्रैमासिकात निरनिराळ्या वेळी प्रसिद्ध झाले. या सर्व लेखांना त्याच स्वरूपात न छापता त्यातील माहितीच्या आधारे स्वतंत्र विवेचनात्मक पुस्तक तयार करावे असे अनेक मित्रांनी सुचविले, परंतु तसे न करता हे लेख मूळ स्वरूपातच संकलित करून छापण्यात येत आहेत. याचे कारण असे की मूळ स्वरूपांत असलेल्या अनेक दस्तैवजांची ही नोंद आहे. दस्तैवजांचा उल्लेख करून पुढे जाता आले असते, परंतु त्यामुळे तत्कालीन कार्यकर्त्यांच्या लेखनस्वरूपाची कल्पना आली नसती. आणि हे दस्तैवज अन्यत्र कुठे उपलब्ध नसल्यामुळे ते तपासणे कुणाला शक्यही झाले नसते. विधानमंडळातील १९१९ ते २३च्या डिबेट्सची पुस्तके मुंबई विधिमंडळ ग्रंथालय सोडल्यास अन्यत्र कुठे असतील याची कल्पना नाही. दलित समाजाच्या अभ्यासकांच्या दृष्टीने तत्कालीन स्पृश्यास्पृश्य वैधानिकांचा दृष्टिकोन समजण्याच्या दृष्टीने संपूर्ण चर्चा मराठीतून येणे आवश्यक वाटल्यामुळे ती समग्र चर्चा इथे नोंदलेली आहे.

या सर्व लेखांचा वापर अनेकांनी केला. काहींनी नामनिर्देश केला, तर काहींनी उल्लेखही केला नाही. म्हणून या लेखांचे प्रकाशनमास इथे नमूद करणे उचित ठरेल.

अस्पृश्यांची प्रारंभिक चळवळ- अस्मितादर्श दिवाळी अंक १९७६
अस्पृश्यांची शैक्षणिक चळवळ- अस्मितादर्श दिवाळी अंक १९७५
विधान मंडळातील कार्य- अस्मितादर्श दिवाळी अंक १९८०
व जाफेमा अंक १९८१

शेवटचा लेख १९८४ साली मराठवाडा विद्यापीठाच्या परिसंवादाकरिता तयार करण्यात आला.

या लेखांपैकी विठोबा रावजी मूनपंडे यांच्यासंबंधीच्या लेखाबद्दल थोडे सांगावेसे वाटते. विठोबा हे माझ्या वडिलांचे वडील, म्हणजे माझे आजोबा. ते उत्तम वक्ते होते, सामाजिक कार्यकर्ते होते, वगैरे माहिती वस्तीतील वृद्ध मंडळींकडून ऐकू येई, परंतु त्यासंबंधी कोणतेही पुरावे मला पहायला मिळाले नाहीत. १९७५ च्या सुमारास एकदा नागपूर येथील शनिवारी वस्तीतील विठोबाजींच्या एका चिरंजीवाच्या राहत्या घरी त्यांच्यासंबंधी चौकशी करण्यास गेलो. प्रभाकर काशीनाथ मून- विठोबांचे नातू- याने जुने कागद असलेले एक लहानसे धुराने कळकटलेले गाठोडे माझ्यासमोर ठेवले व म्हटले, 'आजोबांचे यात काही कागद आहेत. किती दिवस जवळ ठेवायचे, असा विचार करून मी ते जाळणार होतो. बरे झाले, तू आलास!' मी ते प्रथम उघडून पाहिले. जीर्ण झालेल्या त्या कागदांचे तुकडे पडायला लागले होते. ते मी घी आणले व व्यवस्थित लावले. त्या कागदांनी एका कार्यकर्त्याचा अल्पसा इतिहास हाती लागला. एरवी हा कार्यकर्ता कधी अस्तित्वात असल्याचा मागमूसही

लागला नसता.

दलित चळवळीची दखल तत्कालीन वृत्तपत्रे क्वचित घेत असत. नागपूर येथे १९१४ पासून 'महाराष्ट्र' हे टिळकपंथी वर्तमानपत्र होते. बाबासाहेबांच्या चळवळीची कोणतीही बातमी द्यायची नाही अशी शपथ जणू काही या पत्राने घेतलेली होती. मात्र बाबासाहेबांच्या विरोधात गवई, खांडेकर, ठवरे यांनी काढलेली पत्रके या वृत्तपत्रात न चुकता छापून येत. दलित चळवळीच्या इतिहासाचा अभ्यास करताना तत्कालीन वृत्तपत्रांतील बातम्या वाचून काढलेले निष्कर्ष तत्कालीन चळवळीचे सम्यक दर्शन घडवू शकत नाहीत. म्हणूनच बातमीपत्रांची छाननी करणे आवश्यक आहे. दलित चळवळीच्या इतिहासाचे दुवे व धागेदोरे कशात सापडत असतील तर ते छापलेल्या पत्रकांतून आणि दलितांच्या अनियतकालिकांतून. 'ज्ञानप्रकाश' सारखे एखादेच स्पृश्य समाजाचे वृत्तपत्र दलितांच्या चळवळीसंबंधी बातम्या देत असे, परंतु त्याच्याही काही मर्यादा होत्या.

विदर्भातील दलित चळवळीची वेगवेगळी अंगे आहेत. सर्वच अंगांना स्पर्श करणे हा या पुस्तकाचा हेतू नाही. बाबासाहेबांची चळवळ नागपूरविभागात रुजण्यापूर्वी त्या भागात जे पुढारी निर्माण झालेत व त्यांनी जे कार्य केले त्या कार्याचा, उपलब्ध झालेल्या तत्कालीन कागदपत्रांच्या आधारे थोडक्यात आढावा घेणे एवढाच मर्यादित हेतू या लेखांचा आहे. अर्थात सर्वच तत्कालीन पुढाऱ्यांबद्दलही हे लेखन नाही. या पुस्तकात नाग- विदर्भातील दलित चळवळीच्या काही पैलूंवर प्रकाश टाकणारे लेख आहेत. तसाच एक लेख पश्चिम महाराष्ट्रातील १९२० ते २५ च्या दरम्यानच्या दलित चळवळींचा आढावा घेणारा आहे, मराठवाडा विद्यापीठात वाचण्याकरिता तयार केलेला हा निबंध चांभार, मांग, स्पृश्य नि महार या विभिन्न जातींच्या अंतःप्रवाहाचे स्वरूप लक्षात यावे म्हणून यात समाविष्ट केलेला आहे.

यातील बहुतेक लेख 'अस्मितादर्श' 'मधून छापून आलेत, याबद्दल संपादक डॉ. गंगाधरराव पानतावणे यांचा मी आभारी आहे. विठोबा रावजी मूनपंडे यांची मूळ कागदपत्रे माझ्याकडे सोपवल्याबद्दल रावजी काशीनाथ मूनपंडे व प्रभाकर काशीनाथ मूनपंडे या बंधुद्वयांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. मुंबई विधिमंडळ ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. अ. सु. थोरात यांनी संशोधनाकरिता मध्यप्रांत वऱ्हाड विधिमंडळ डिबेट्स उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे. या पुस्तकाचे बारकाईने निरीक्षण करून काटेकोर व अचूक मुद्रण व प्रकाशन केल्याबद्दल विलास वाघ व सौ. उषा वाघ यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. सौ. मीनाक्षी मून यांच्या सहकार्यावाचून अर्थात हे पुस्तक बाहेर येणे असंभव होते.


– वसंत मून

अनुक्रमणिका

प्रास्ताविक	तीन
एकोणिसाव्या शतकातील महार	१
मध्यप्रांत वऱ्हाडातील दलितांची प्रारंभिक चळवळ	१०
स्वातंत्र्यपूर्व काळातील, मध्यप्रांत वऱ्हाडातील अस्पृश्यांची शैक्षणिक चळवळ	३१
प्रांतिक असेंब्लीत अस्पृश्य सदस्यांचे कार्य	४६
दलित चळवळ १९२१ ते १९२५	९६
संदर्भ	१२५
सूची	१२९

दुरुस्तीपत्रक

पृष्ठ	ओळ		चूक	अचूक
४८	(शेवटून ५)	३१	न्यायमूर्ति गोविंद रानडे	न्या. महादेव गोविंद रानडे
४९	(शेवटून २)	३४	ॲडिक्ट्रट स्कूलमध्ये	हॅन्डीक्राफ्ट स्कूलमध्ये
५०	(शेवटून २)	३४	१७५४	१८५४
१०२		१६	बाबासाहेब	नानासाहेब
११९	(शेवटून ४)	२९	एप्रिल १९२६ ला	१४ एप्रिल १९२३ ला
१२३		१३	भाटघांसारख	मार्टेसारखे



१ एकोणिसाव्या शतकातील महार

मध्यप्रांत–वऱ्हाडातील १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील महार समाजासंबंधीची इंग्रज ग्रंथकारांनी लिहून ठेवलेली माहिती उद्‌बोधक ठरेल. १९०१च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १९,२७,१९,७३८ होती. यात ५,३१,९६,६३२ लोक अस्पृश्य होते. मध्यप्रांत-वऱ्हाडात एकूण १,३३,३२,३९८ लोकसंख्येपैकी अस्पृश्यांची संख्या २३,४५,२१० होती. अस्पृश्य समाजात खालील जाती[1] समाविष्ट होत्या. (१) बलाटी (२) बसोड (३) चमार अथवा चांभार (४) धोबी (५) गंडा (६) घासिया (७) कतिया (८) कोरी (९) कुंभार (१०) मेहरा अथवा महार (११) मांग (१२) मेहतर वा भंगी (१३) पंका.

यापैकी महारांची संख्या मध्यप्रांतात ६, १९, ४१२ व वऱ्हाडात ३, ५०, ९२९ म्हणजे एकूण ९, ७०, ३४१ होती. वऱ्हाड पूर्ण व मध्यप्रांतातील नागपूर, चांदा, भंडारा व वर्धा या जिल्ह्यांव्यतिरिक्त छिंदवाडा जिल्हा, सौंसर तहसील, बैतुल जिल्ह्यातील मुलताई येथे बहुसंख्येने व छत्तिसगढ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात खूप आतपर्यंत महार समाज पसरलेला होता, व आजही आहे.

महार समाजाचा मुख्य धंदा कोतवाली म्हणजे गावकामगाराचा होता. वतनदार कोतवालास गावात त्याच्या समाजात खूप मान रहात असे. काही भागात कोतवाली करणारी कुटुंबे समाजातील इतर लोकांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजत व समाजातील इतरांशी बेटीव्यवहार करणे कमीपणाचे मानीत. ते कोतवाली करणाऱ्या कुटुंबांशीच सोयरीक करीत.[2] गावात कोतवालास हाक मारायची असल्यास 'महारास बोलवा' म्हणत असत, इतके महार व कोतवाल हे दोन्ही शब्द परस्परसंलग्न होते. एखाद्या महारास जात विचारल्यास तो 'कोतवाल' म्हणन सांगे.

कोतवालीच्या कामामुळे दोन गावांत अथवा शेतांच्या सीमेबाबतच्या तंटचात महारांच्या साक्षीला फार महत्त्व असे. याबद्दलचे अनेक पुरावे महर्षी वि. रा. शिंदे यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' व श्री. श्री. म. माटे यांनी 'अस्पृष्टांचा प्रश्न'

या ग्रंथांतून दिलेले आहेत. त्यामुळे त्यांची पुनरुक्ती करण्याची आवश्यकता नाही.

महारांच्या वतनाबद्दल त्यांना जी मजुरी मिळत असे, त्याचा सर्वसाधारण हिशोब [३] खालीलप्रमाणे करण्यात येई.

१) ५ एकर रब्बी अथवा १० एकर खरीप जमिनीचा तुकडा–सारा माफ.
२) एक औतास (४ एकर) – ३२ पौंड धान्य.
३) उसाच्या प्रत्येक मळ्यास – २ पौंड ऊस (उकळण्याचे वेळी.)
४) विधवाविवाहाचे वेळी – ८ आणे.
५) प्रत्येक मृत्यूचे वेळी मृतांच्या वारसाकडून – ६ पै (२ पैसे=अर्धा आणा)
६) गावातील समारंभात गुढ्या – तोरणे उभारण्यासाठी – ६ पै.
७) काही मोहाची झाडे.
८) गावात मरणाऱ्या सर्व गुरांची कातडी.
९) सणासमारंभात काही भाकरी.

वरीलपैकी कातडीची किंमत सुमारे ३०–४० रुपये येत असे. इतर बाबींचे वर्षाकाठी कोतवालास अंदाजे ३४/– रु. उत्पन्न होत असे. १८३३ साली बाजरीचा भाव रुपयास १४० पौंड होता

वतनाने कोतवालास जखडून टाकले होते. तो त्यातून सुटका करून घेऊ शकत नव्हता. गडकऱ्यांनी दारू पिणाऱ्या माणसांची जी अवस्था वर्णिली आहे, त्याप्रमाणे वतन कोतवालास सोडीत नव्हते व कोतवाल वतनास सोडीत नव्हता. वरवर पाहता कोतवाल हा जरी शासकीय कर्मचारी होता व वतनामुळे त्याच्या समाजात त्याला प्रतिष्ठा लाभलेली होती, तरी संपूर्ण ग्रामव्यवस्थेत त्याचे स्थान निकृष्ट होते. राजस्व विभागातील सर्वात कनिष्ठ असे गावकीचे काम तो करीत असे. गावात असलेल्या अंमलदारापासून राजस्व निरीक्षकापर्यंत सर्वच अधिकाऱ्यांचे खाजगी काम त्याला करावे लागे. मध्यप्रांतात अनेक ठिकाणी अशी प्रथा होती की, तहसीलदार वगैरे अधिकारी दमणीतून (छकडा अथवा रेंगी) दौरा करीत असताना तेथील कोतवालास एका गावाहून दुसऱ्या गावापर्यंत त्यांची सोबत करावी लागे. अधिकाऱ्यांचे सामान तो स्वतः डोक्यावरून वाहून नेत असे. अधिकारी जर छकडा अथवा दमणीतून प्रवास करीत असेल तर, कोतवालास त्या दमणीच्या समोर पळत पळत मार्ग दाखवावा लागे. मजुरापेक्षाही कोतवालास तसा जास्त मान नव्हता. पोलिस अथवा रेव्हेन्यूचा अधिकारी गावात आला की सरबराईस कोतवालास रहावे लागे. जर कोतवाल गैरहजर असेल, तर त्याची पत्नी किंवा मुलगा कोतवालाच्या बदलीवर येत असत. कोतवालाचा पगार हा तहसील कचेरीच्या मुख्यालयातून देण्यात येई. त्यावेळी ४ रु. पगार व ४ रु. महागाई त्यांना मिळत असे. तहसीलमध्ये पगारास येणाऱ्या कोतवालांना अधिकाऱ्यांच्या घरची लाकडे फोडण्यापासून पडतील ती कामे करणे भाग पडे. एखाद्याने कामचुकारपणा केल्याचा नुसता संशय जरी आला, तरी त्याला शिक्षा म्हणून १५-२० मैलांवरील एखाद्या शेतकऱ्याची नोटीस अथवा

टपाल देण्यास पायी पाठविण्यात येई. त्यावेळी आजच्यासारखी वाहने नसल्यामुळे ही कामे त्याला पायपीट करून बिनबोभाट करावी लागत. रात्री गावाची गस्त घालण्यापासून पाटील- पटवाऱ्यांची वेठबिगार करण्यापर्यंत सर्वच कामे कोतवालास करावी लागत. बाबासाहेब आंबेडकरांनी कोतवालांची वतनापासून मुक्तता करण्यासाठी जे प्रयत्न केलेत, त्यांची सर्वांना ओळख आहेच. त्यांनी आपल्या लेखनातून व भाषणांतून गावकामगारांची तत्कालीन अवस्था सविस्तर रेखाटली असल्यामुळे त्याची आता पुनरुक्ती करण्याची गरज नाही.[४]

महारांचा कोतवाली हा धंदा नसून नोकरी होती. अस्पृश्यांतील मांग, चांभार व भंगी आदी जातींना जसा जातिनिहाय व्यवसाय होता, तसा महारांना नव्हता. त्यामुळे उदरंभरणाचे निश्चित असे साधन नव्हते. शतकानुशतके व्यवसायबंदी ही त्यांच्या पायातील एक बेडीच होती. जातिव्यवस्थेतील एक व्यवच्छेदक महत्त्वाचे लक्षण म्हणजे जातिनिहाय व्यवसाय व्यक्तीला सोडता येत नाही. तसेच इतर जातींचे व्यवसाय त्याला स्वीकारताही येत नाहीत. त्यामुळे महारांना कोणत्याच व्यवसायात वाव नव्हता. म्हणून महार हा सर्वत्रच 'मजूर' राहिला. निकृष्ट प्रतीची कामे करून तो पोट भरत असे. परंतु व्यवसायनिष्ठा नसल्यामुळे महारांना व्यवसायबंदी तोडणे सुलभ झाले, ही गोष्टही तितकीच महत्त्वाची आहे. प्रतिष्ठा अथवा मानपान याची त्यांना पर्वा राहिली नाही व ते कोणत्याही धंद्यात शिरू लागले.

महार खेड्यापाड्यातून जाडेभरडे कपडे विणू लागले. हे कपडे ते आठवडी बाजारात नेऊन जीवनावश्यक वस्तूंच्या मोबदल्यात विकत असत.[५] त्यांना शेतीतून मजुरी मिळत नसे, परंतु 'आपल्या घराच्या परसातील जागी उत्तम भाजीपाला ते लावीत असत.' 'इतर हिंदूंप्रमाणे त्यांना व्यावसायिक बंधने नसल्यामुळे ते कोणत्याही कामात हात घालीत. ते उद्योगी व कमालीचे मेहनती आहेत, याबद्दल शंका नाही,' असे डब्ल्यू. रॅम्से साहेबांनी उद्‌गार काढले आहेत.

महार हे मिळेल तेथे, वाटेल ती मजुरी करीत असत.[६] जंगलातून काटक्या, मोळ्या व गवताचे भारे बांधून महार स्त्रिया गावात व शहरांतून विकायला आणीत. आजही अनेक लहान गावांतून महार स्त्रिया ५–१० मैल अंतरावर असलेल्या सरकारी जंगलातून महत्प्रयासाने अशा मोळ्या व भारे आणीत असतात. दिवसेंदिवस हेही उपजीविकेचे साधन हळूहळू नाहीसे होत आहे.[७]

महार लोक हातमागावर कापड विणीत असत.[८] जानेवारी १८७७ मध्ये नागपूरला टाटांनी एम्प्रेस मिल्स सुरू केली, तेव्हा पुष्कळ महार खेडी सोडून नागपूरकडे नोकरीसाठी येऊ लागले. यवतमाळ, अकोला आदी विदर्भातील शहरांत जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरींमधून महारांना मजुरी मिळत असे. परंतु त्यांची नेमणूक फक्त जिनिंग (पिंजणे) कामाकरिता करीत. मात्र 'कापसाच्या गाठी' बांधण्याच्या कामासाठी सोलापूर जिल्ह्यातून मराठा कामगार बोलावण्यात येत.[९] या मजुरांना अर्थात महार मजुरांपेक्षा जास्त वेतन राही.

हातमागाचा धंदा महारांनी केला, परंतु तो कधीही महारांची आर्थिक परिस्थिती सावरू शकला नाही. बैतुल जिल्ह्यात अशा महारांना उद्देशून लोकांत अशी म्हणच पडलेली होती की, 'ज्याप्रमाणे बेहडच्याचे फूल हे पहिल्याच वादळाने गळून पडते, त्याप्रमाणे दुष्काळ येताच महार कोसळून पडतो.' [१०]

महार हे खूप उद्योगी आहेत असे ज्यांनी लिहिले, त्या सर्व इंग्रज अधिकारी ग्रंथकारांनी एक गोष्ट एकजात नमूद केली आहे, ती लक्षात घेण्यासारखी आहे. ती म्हणजे, 'महारासारखी मद्यपी जमात कोणतीही नाही. या बाबतीत ते गोंडांवरही मात करतात. मद्यपान करण्यामुळेच की काय, ते जास्त बडबडे आहेत'

(As a rule they are drunkard. They are much addicted to drink and are consequently talkative.)

या बोलकेपणाच्या परिणामी जे वक्तृत्व येते ते आजही महार समाजाला भूषण आहे की दूषण हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

काही भागात महार पुरुष गोऱ्हयांना खच्ची करण्याची [११] व महार स्त्रिया, मांग महिलांप्रमाणे, बाळंतपणाची कामे करीत असल्याचे उल्लेख आहेत. परंतु मध्यप्रांत वऱ्हाडात, मुंबईप्रमाणे, कुठेही महारांनी भंगीकाम केल्याचे आढळून येत नाही.

महारांनी धंद्याचा बाऊ न करता सर्व व्यवसायात शिरकाव केला. बऱ्याच ठिकाणी ते सावकारी करू लागले [१२] व या सावकारीत बरेच महार श्रीमंत झाले. सावकारीशिवाय निरनिराळ्या ठेकेदारी, व्यापार आदी व्यवसायांत महार शिरू लागले. १९ व्या शतकाच्या शेवटासच महारांच्या प्रगतीचा स्पष्ट ठसा इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनावर उमटलेला दिसून येतो.

महारांतील बरीचशी मंडळी मालगुजार होती. नागपूर जिल्ह्यातच चार महार मालगुजार होते. गोंदियाचे कालीचरण नंदागवळी, बेल्याचे दशरथ लक्ष्मण पाटील, सीताराम लक्ष्मण पाटील, तसेच करणुजी विठ्ठल शेटचे ही मालगुजार मंडळी बाबासाहेबांच्या चळवळीत सार्वजनिक कार्यात आघाडीवर होती. बैतुल [१३] व छिंदवाडा [१४] जिल्ह्यांतही अनेक महार मालगुजार होते. समग्र महार समाज गरीब असूनही त्यांतील काही व्यक्तींच्या घरी लक्ष्मी पाणी भरीत असल्याची उदाहरणे आढळतात.

अकोला जिल्ह्यातील वाशिम तालुक्यात तोरणाळा नावाचे गाव आहे. तेथे राघो महाराचा वाडा आहे. दुष्काळाचे दिवस होते. तहसीलदाराने तालुक्यातील श्रीमंत लोकांची बैठक बोलावली. देणग्या मागितल्या कुणी पाच हजार, कुणी दहा हजार असे आकडे सांगू लागले. राघो आपल्या घोंगडीवर जमिनीवर बसून होता. तहसीलदाराने विचारले, 'राघो, तू काय देतो ?' राघो म्हणाला, 'महाराज, या तहसीलला मी सहा महिने पोसतो.' वाशिमची दगडांनी बांधलेली जुनी तहसील कचेरी राघो महाराने तहसीलदाराच्या शब्दाखातर बांधून दिली. ज्याच्या बैल-

गाडचांच्या चाकांत वंगणाऐवजी अत्तर फासण्यात येई, त्या राघो महाराची श्रीमंती कशी मोजावी ? नवे गाव बांध (ता. साकोली, जिल्हा भंडारा) येथील एका महार सावकाराच्या मृत्यूनंतर पैशांची वाटणी झाली. नोटा ठेवण्याची फारशी प्रथा नव्हती. कलदार रुपयांचे टाके उघडण्यात आले व कुडवाच्या मापाने (१कुडव=८ पायल्या = अंदाजे १२ किलोचे धान्य मोजण्याचे माप) रुपयांची वाटणी करण्यात आली. या सावकारांना कुडवे सावकार म्हणत.

तर सांगायचे तात्पर्य असे की, दरिद्री महार समाजाच्या दारी श्रीमंतीही थोडीफार नांदत होती महार सभाजासंबंधी मि. क्रॅडॉक सेटलमेंट कमिशनर, यांनी १८९५ साली जे भाकीत करून ठेवले आहे ते वाचून इंग्रजांच्या दूरदर्शीपणाचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल. ते म्हणतात-

महारांना निव्वळ एकच धंदा आहे असे नाही. हिंदूंच्या दृष्टीने त्यांना तुच्छ लेखले गेले असले तरी त्यांच्या प्रतिष्ठेस धक्का लागलेला नाही. ते मद्यपी आहेत तितकेच ते कामसूही आहेत. त्यांचेपैकी काही स्वस्त दराचे जाडे-भरडे कापड विणतात. अशा कापडास बाजारात गरिबांत सहज ग्राहक मिळतात. काहीजण कोष्टचांच्या सुरस विणकरीची बरोबरी करतात व मिळालेल्या उत्पन्नातून मशीनचा धागा विकत आणतात. त्यांचा हात प्रत्येक धंद्यात फिरत आहे. काहींनी सुतारकाम, तर काहींनी रंगारीकाम पत्करले आहे. परंतु बहुसंख्य शेतीव्यवसाय व मजुरी करीत आहेत. ते जिल्हचाच्या लोकसंख्येचा १/६ भाग आहेत. सध्या ग्रामीण महार पुष्कळ मागासलेला आहे. जर गावात एकच विहीर असेल तर त्याला तिचा उपभोग घेता येत नाही व मिळेल तिथून पाणी आणावे लागते. गावच्या शाळेच्या कोपऱ्यात तो कुठेतरी बसलेला असतो. व शाळेचा शिक्षक जातिद्वेष्टा असेल, तर तो विद्यार्थ्यांना शिक्षणापासून परावृत्तही करतो.

महारांचे उज्ज्वल भविष्य

काहीही असले तरी महार दडपलेल्या स्थितीत फार काळ राहणार नाहीत. पतितावस्थेतून बाहेर पडण्यास त्यांनी तशी सुरवातही केली आहे. काही गावांतून नवीन विहीर स्वखर्चाने खोदण्यास ते एकजुटीने पुढे आलेले आहेत. नागपूरमध्ये स्वतःच्या मुलांकरिता त्यांनी स्वतःच शाळा स्थापन केलेली आहे. अलीकडे काही गावांतून महार हा सर्वांत धनिक माणूस आढळतो. तो कधीकधी व्यापार करतो व ठेके घेत असतो. नागपूर जिल्हचाच्या पटवारी वर्गात कमीत कमी एक तरी पटवारी महारांतून असतोच.

आपण अन्य कोणत्याही वरिष्ठ जातींपेक्षा उद्योग व संपत्तीत कमी नाही अशी ज्या जातीच्या लोकांना जाणीव झाली, ती जात फार काळ दडपलेली राहू शकत नाही. येत्या पन्नास अथवा शंभर वर्षात महार समाजाचा विकास हा या जिल्हचातील सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा भाग ठरेल. सध्या त्यांच्यात शिक्षण व स्वाभिमानाचा अभाव आहे, परंतु तो लवकरच दूर होईल. आणि तो दिवस

दूर नाही जेव्हा महार हा न्यायाधीशांच्या खुर्चीवर इतरांसोबत बसलेला दिसेल.

(Report of L. R. Settlement of the Nagpur District 1890-95 Published– Govt. Press, Nagpur, 1900 चे लेखकाने केलेले मराठी भाषांतर)

महार समाजाने केलेल्या नेत्रदीपक प्रगतीचा आढावा घेताना १९१७ साली सेटलमेंट कमिशनर मि. डायर यांनी नोंदलेले मत देखील लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात–

ज्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे असा शेतकरी वर्गाचा तिसरा विशेष म्हणजे महारांनी गेल्या काही वर्षात केलेली नेत्रदीपक प्रगती हा होय. सर आर. ऋँडॉक यांनी पूर्वीच सांगून ठेवले की, भरपूर लोकसंख्या असलेली जात दडपून ठेवता येणार नाही. अर्थात त्यांची सामाजिक दुरवस्था एकाएकी जाणारी नाही. परंतु त्यांच्या भौतिक प्रगतीस कुणाच्याही दयेची भीक नको. महार हा उच्चवर्णीयांपेक्षा शरीराने दणकट आहे. तो लाथ मारील तेथून पाणी काढतो, भिकेपासून वँकेपर्यंत कोणत्याही व्यवसायास तो हात घालतो, मात्र तेथे त्याला पैसा मिळायला हवा. ज्यावेळी कापसाचा व्यापार वाढला त्यावेळी त्याला प्रथम संधी मिळाली. आता अनेक महार कापसाचे छोटे व्यापारी आहेत. शेतकरी म्हणून तो आता उत्तम शेतकरी समजायला हरकत नाही व या बाबतीत उमरेड तहसिलीतील त्याची कामगिरी लक्षात येण्याजोगी आहे. या तालुक्यातील अन्य लोक बव्हंशी आळशी असल्यामुळे त्यांना डावलून पुढे जाणे महारांना सहज शक्य आहे. सावनेर व काटोल तालुक्यात इतर वर्गही स्पर्धक असल्यामुळे त्यांची प्रगती तेवढी दिसत नाही. ग्रामीण प्रशासनात गावकामगारांचे महत्त्व योग्य स्थळी दिलेलेच आहे. परंतु हाच कोतवाल शेतीमध्येही अन्य शेतकऱ्यांचा पुढारीच असतो. कारण बहुधा कोतवालाचे पीक गावात सर्वोत्तम व त्याचे घर सर्वोत्कृष्ट दिसून येते. महाराला स्वत:च्या घराची झाडलोट करण्यास लाज वाटत नाही. त्यामुळे गावात नुसता दृष्टिक्षेप टाकला तरी कोतवालाचे घर कोणते हे ओळखणे कठीण नसते, कारण तेच एकमेव स्वच्छ व ज्याचा परिसरही साफ आहे असे घर असते. तसे पाहता, गोंडांची वस्ती सर्वांत स्वच्छ समजली जाते, परंतु महारांची त्यांच्या खालोखाल स्वच्छ असते.काही महार जमीनदार आहेत, तर बरेचसे भांडवलदार झालेत. जरी गावकऱ्यांना आवडत नसले तरी महार हा अत्युत्तम 'पटवारी' असतो कारण जमिनीच्या कुळासंबंधीचे त्याचे ज्ञान परंपरागत असते. सध्या असे दोन पटवारी आहेत.

(Report on the L. R. Settlement of the Nagpur district in central provinces effected during 1912 to 1917 by Mr. J. F. Dyer, I. C. S. published– Govt. Press, 1917, pp. 21–29 चे लेखकाने केलेले मराठी भाषांतर)

नागपूर प्रांताकडे अस्पृश्यता नव्हती असे नाही, परंतु पेशवाईइतकी जाचक

बंधने मध्यप्रांत वऱ्हाडातील हिंदू राज्यकर्त्यांनी अस्पृश्यांवर लादलेली दिसत नाहीत भोसल्यांच्या सैन्यात भेदाभेद असल्याचे उल्लेख नाहीत. किंबहुना, काही महार सरदारदेखील होते असे सांगण्यात येते. अजून याबद्दल सबळ पुरावा मजजवळ उपलब्ध नाही. अस्पृश्यांजवळ जमिनी होत्या, महार सावकार होते, मालगुजार होते, परंतु सवर्ण हिंदूंच्या खालच्या पायरीवरच त्यांना बसावे लागे. शिक्षणाकरिता महार मुले व्हरांड्यात, वर्गाबाहेर बसत असत. पंतोजीला त्यांना मारायचे असल्यास तो छडी फेकून मारीत असे. १८७० च्या सुमारास चंद्रपूर येथे अस्पृश्य मुलांना शाळेत प्रवेश दिल्याबरोबर सर्व मुले शाळेच्या बाहेर पडली व गावातील स्पृश्यांनी, 'महार सर्व जातींच्या बहार' अशा घोषणा देत मिरवणूक काढली.[१६]

महार समाजाचा स्पृश्य हिंदू समाज विटाळ मानीत असे. परंतु महारांनी वारकरी, महानुभाव, कबीर, सतनामी आदी पंथांचा स्वीकार केलेला होता. बहु संख्य लोक वारकरी पंथाचे होते. भगवद्गीतेला ते पूज्य मानीत असत व पंढरपूरला दरवर्षी नियमाने वारी करीत. बरीचशी मंडळी कबीर पंथाची होती. महानुभाव-पंथीयांची फार मोठी संख्या महारांत आजही भंडारा व चांदा जिल्ह्यांत आहे. पंथकरी लोक स्वतःच्या पंथाची तत्त्वे कटाक्षाने पाळीत असत. प्रत्येक पंथकरी आयुष्यात आपल्या पंथातील महार साधूलाच गुरू करीत असे. या धर्मगुरूच्या आज्ञेप्रमाणे महार वागत असत. दिंड्या व भजने ही महारांत नित्याची होती. निरनिराळ्या ठिकाणी भजनमंडळ्या एकत्र करून, 'भंडारा' करून सर्व समाजबांधवांना जेवू घालायची प्रथा होती. त्यामुळे वारंवार 'भंडाऱ्या' च्या निमित्ताने जमणाऱ्या लोकांचा कार्यकर्त्यांनी समाजसंघटनेसाठी उपयोग करवून घेतला असे दिसून येईल.

चंद्रपूर जिल्ह्यात पनवर राजपूत नावाची जात होती. ते नारायण देवाची पूजा करीत. सणाच्या दिवशी ते प्रथम महाराला जेवू घातल्याशिवाय स्वतः जेवीत नसत. तसेच होळीच्या दिवशी महारांची होळी पेटल्याशिवाय कुणबी व इतर जातींची होळी पेटत नसे; किंबहुना महारांच्या होळीतील आगीनेच इतरांची होळी पेटवली जाई.

महार समाजातील कबीर पंथाचे धर्मगुरू म्हणून चंद्रपूर जिल्ह्यात 'चंदुबुवा' नावाचे गृहस्थ फार नाणावलेले होते. ते महार समाजाच्या उन्नतीसाठी झटत असत. त्यांनी महारांची अनेक कुटुंबे चांद्यातील जंगलात नेऊन वसवली अलेक्स वुड या मिशनऱ्याच्या मदतीने त्यांना जमीन व उद्योग मिळवून दिले.[१७] चंदुबुवाने वसवलेल्या गावाला दुर्गापूर हे नाव आहे. आज तेथे अनेक धर्मांतरित महार-ख्रिस्ती कुटुंबे राहतात. ही सर्व मंडळी आसपासच्या गावातील व परस्परांची नातेवाईक आहेत. चंदुबुवा हे १९०३ च्या सुमारास अलेक्स वुड या मिशनऱ्याकडे गेले व त्यांनी बाप्तिस्मा घेतला. ही बातमी जेव्हा चंदुबुवाच्या शिष्यपरिवारात पसरली तेव्हा त्यांना ती खरी वाटेना. याबद्दलची मजेदार घटना अलेक्स या मिशनऱ्याच्या

चरित्रात वर्णिली आहे.[१८]

The rite of baptism was strange to them (desciples) and they wanted some fuller assurance that their leader (Chandubuva) had really changed his faith. They asked some definite sign, and the sign they demanded was that he should publicly burn some books held sacred by the Hindus, Mohmmedans and followers of Kabir. And so one night, just before midnight, outside the city walls, a number of them assembled together with certain members of the mission to take part in a strange ceremony. A fire was made ready and at a given signal, Chandu walked forward, and solemnly and impressively, consigned to the flames three books representative to the three religions. This burning of the books, on the part of their Guru, had a great effect in bringing some of his followers to a confession of the Christian faith.

चंदुबुवाच्या मुलाला डॉ. मॅकेन्झी नावाच्या ख्रिस्ती मिशनऱ्याने अलाहाबादला डेअरीचे प्रशिक्षण घेण्यास पाठविले, जेणेकरून तो धंदा त्याने सुरू करावा.

चंदुबुवाच्या धर्मांतराने ख्रिस्ती धर्मप्रसाराची महार समाजात लाटच पसरली. बरेच महार सामुदायिक रीत्या ख्रिस्ती झाले. नोकरीच्या आमिषाने, समाजाने वाळीत टाकले म्हणून, हिंदू समाजाच्या अत्याचारास कंटाळून अथवा निराधार म्हणून, अशा एक ना दोन अनेक कारणांनी, अस्पृश्य लोक ख्रिस्ती होऊ लागले होते. अनैतिक संबंधांतून मूल झालेल्या स्त्रियांना ख्रिस्ती अनाथालये व ख्रिस्ती पाद्री व अम्मा यांचा फार मोठा आधार होता. परंतु याच काळात दलितांची चळवळ उभारणारे अनेक कार्यकर्ते उदयास येऊ लागले होते. चंदुबुवाच्या कार्यामुळे अनेक महारांना तो देवाप्रमाणे भासू लागला. चंदुबुवाच्या अंगात दैवी शक्ती आहे व तो चमत्कार करू शकतो अशी त्यांच्या शिष्यसंप्रदायात भावना पसरली होती.

चंदुबुवाचे धर्मांतर हे महार समाजातील पहिले धर्मांतर नव्हते. १८५८ च्या सुमारास रेव्हरंड हिस्लॉप यांनीही नागपूरच्या आसपास काही महारांना ख्रिस्ती करून घेतले होते. परंतु एकेश्वरवादी कबीरपंथी यांचे मात्र पहिले धर्मांतर म्हणून मिशनऱ्यांना या धर्मांतराचे विशेष महत्त्व होते. चंदुबुवाच्या मृत्यूनंतर दुर्गापूर येथे त्याची समाधी उभारण्यात आली व आजपर्यंत त्या ठिकाणी दरवर्षी यात्रा भरत असते.

संदर्भ –

१) भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न- वि. रा. शिंदे
२) डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर ऑफ बैतुल डिस्ट्रिक्ट, १८९०
३) बैतुल डिट्रिक्ट गॅझेटिअर, १८९०
४) नासिक डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, पृ. २७३
५) डॉ. आंबेडकर, रायटिंग्ज अँन्ड स्पीचेस, व्हॉल्यूम २ पहा.
६) लँड रेव्हेन्यू सेटलमेंल रिपोर्ट ऑफ छिंदवाडा डिस्ट्रिक्ट, १८६९
७) मजुरीव्यतिरिक्त नोकर म्हणूनही ते काम करीत.
८) मुलताई व बैतुल जिल्ह्यातील अनेक महार सहकुटुंब मजुरीसाठी ऑगस्ट-मध्ये बाहेर पडत. रोवणी, वखरण आदी शेतीची कामे करून ते डिसेंबरमध्ये परत जात. अनेक मजूर वऱ्हाडमध्येही ज्वारीच्या मोसमात मजुरीसाठी येत.
९) बैतुल डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर१८९०, पृ. १५४
१०) अकोला डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर
११) बैतुल डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १८९०, पृ. १४४
१२) अमरावती डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, पृ. १६३
१३) Occasionally a Mahar is the most prosperous man in the village. Several of them are money - lenders in a small way, and four are Malguzars.
(Nagpur District Gazzeteer, 1908, pp. 84)
१४) Two villages are owned by Mahars–
(Betul District Gazzeteer, 1890, P. 144)
१५) Some hold land on their own account and there are a few Katia Malguzars.
– Report on the Revision of the Land Revenue Settlement of Chhnindwara District effected during the years 1891 to 1895. Page 63, Low Castes.
१६) Alex Wood, Bishop of Nagpur, by Eyre Charleton, 1939
१७) Alex wood, Bishop of Nagpur by Eyre Chatterton, 1939 PP. 24 London, North Hiberland Avenue, w.c. 2-1939 PP. 25-26
१७) Ibid–25-26

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. .....
ठाणे (स्थळ प्रत)

२ मध्यप्रांत वऱ्हाडातील दलितांची प्रारंभिक चळवळ

दलित चळवळीच्या दृष्टीने मध्यप्रांत वऱ्हाडातील चळवळीचे आगळे महत्त्व आहे. आजच्या महाराष्ट्रातील नागपूर, वर्धा, चांदा व भंडारा हे जिल्हे मध्यप्रांताचा भाग समजले जात व अकोला, अमरावती, यवतमाळ व बुलढाणा या जिल्ह्यांना 'वऱ्हाड' म्हणत असत. अस्पृश्यांची समाजोन्नतीची चळवळ पश्चिम महाराष्ट्रात जशी महारांनी सुरू केली, तशीच ती मध्यप्रांत वऱ्हाडातही सुरू केली.

मध्यप्रांत वऱ्हाडातील दलित चळवळीत किसन फागोजी बनसोडे यांचे नाव सर्वत्र प्रसृत झालेले आहे, परंतु त्यांचे कार्य नागपुरात सुरू होण्यापूर्वी, नागपुरातील बऱ्याच मंडळींनी महार समाजाच्या संघटनेची मुहूर्तमेढ रोवलेली होती. ही मंडळी अल्पशिक्षित होती, परंतु सामाजिक तळमळ व निष्ठा त्यांच्या रोमरोमी भिनली होती. कार्यकर्त्यांत प्रमुख होते विठोबा रावजी मून संत पंडे, मुकुंदा शेटचे (वस्ताद), करणुजी विठुल मालगुजार, गोमा गणेश सावकार, कालीचरण नंदागवळी. या मंडळीत किसन फागोजी बनसोडेही पुढे समाविष्ट झाले. इतकेच नव्हे तर, १९१३ नंतर अमरावतीहून नानासाहेब गवई हेही नागपूरला येऊन कार्यकर्त्यांसोबत कार्य करू लागले.

दलितांची चळवळ मराठी मुलखात महारांच्या स्वाभिमानाच्या जाणिवेतून महार पुढाऱ्यांनी सुरू केली ही गोष्ट आता सर्वमान्य झालेलीच आहे. पश्चिम महाराष्ट्रात शिवराम जानवा कांबळे अथवा गोपाळबाबा वलंगकर यांनी महारांची पलटणीत भरती व्हावी म्हणून आंदोलन सुरू केले होते, तर कांबळेंच्या कार्याची प्रेरणा महारांची लढाऊ वृत्ती हे होय. मध्यप्रांतातील कार्याची बैठक मात्र अगदी वेगळी होती. इकडील महारांना इंग्रजांच्या पलटणीत शौर्य दाखविण्याची अथवा भाग घेण्याची संधीच मिळाली नाही, असे म्हटले तरी चालेल. लढाया, युद्धे, बंडाळी यांपासून मध्यप्रांत वऱ्हाड नेहमीच अलिप्त राहिला. त्यामुळे समग्र समाजाप्रमाणे येथील महारांना लढाईसाठी जाण्याची गरज पडली नाही. मात्र पहिल्या रघुजींचा

काळ याला अपवाद असल्याचे काही इतिहासकारांचे म्हणणे आहे.

१८९२–९३ च्या सुमारास विठोबा रावजी मून महार नावाचा ३०–३५ वर्षे वयाचा संतपुरुष हिंगणघाटहून नागपूरला आला आणि 'इमामवाडा रोड' वरील शनिवारी या वस्तीत स्थायिक झाला. विठोबा हे मिशनरी शाळेत ३–४ वर्ग शिकले होते. नागपुरात त्यांनी कापसाचा छोटासा व्यापार सुरू केला. मिल-मध्ये जाऊन 'झडी' चा कापूस घ्यायचा व त्याला स्वच्छ करून नंतर तो मुंबई-पर्यंत विकायचा. गावोगाव फिरल्यामुळे त्यांचा मित्रपरिवार खूप वाढला. सभो-वतालची सामाजिक परिस्थिती पाहून त्यांच्या अंतःकरणात 'आपण काहीतरी केले पाहिजे' अशी जाणीव निर्माण झाली. मुंबईपर्यंत फिरत असल्यामुळे शिवराम जानबा कांबळे पुणेकर याच्याशी त्यांचा घनिष्ट संबंध आला. ते स्वतः देवभक्त होते व रामटेकच्या यात्रेला नियमाने जात. महादेवाच्या 'पोह्या' समोर 'तुतारी,' 'शिंगाडा' अथवा 'शंख' वाजवून ते लोकांना एकत्र करीत, म्हणून ते विठू पोंगाडे याच नावाने ओळखले जात.

१९०३–४ च्या सुमारास रामटेक अंबाळा तलावावर दोन–तीन यात्रांच्या वेळेस महार लोकांचे स्नान करणेही गोरक्षण–कमिटीच्या लोकांनी बंद केले. ही अनिश्चत अवस्था बंद व्हावी व आंघोळीची महार समाजाची कायम व्यवस्था करावी, म्हणून विठोबा रावजी हे स्वतः विचार करू लागले. महारांचा विटाळ 'ते मृतमांस व गोमांस खातात' म्हणून करतात, सबब महारांनी गोमांस खाणे सोडावे, याकरिता गावोगाव महारांच्या सभा घेऊ लागले व महार लोकांकडून 'गोमांस खाणार नाही' अशा शपथा घेऊ लागले.

तत्पूर्वी गोरक्षण सभा नावाची एक संस्था हे काम फार पूर्वीपासून करीत असे. १८९२ साली गोरक्षण सभेचे एक कार्यकर्ते व मानवतावादी व्यक्ती श्री. गोपाळराव भिडे वकील हे या घाटावर आले होते व त्यांनी महार लोकांची सभा भरवून 'गोमांस खाणार नाही' अशा शपथा घेवविल्या व त्यांना स्नानास त्याच ठिकाणी मुभा करून दिली. परंतु हे धार्मिक कार्य जरी असले तरी गोरक्षण सभेचा त्यामागे असलेला आर्थिक हेतू लवकरच उघडकीस आला. त्यानंतर गोरक्षण कमेटीचे कामदार व चपराशी घाटावर पेटी घेऊन बसत व महार लोकांचे धर्म-फंड व मुंडनाचे पैसे घेऊन जात. या पैशांच्या मोबदल्यात गोरक्षण कमेटीने यात्रे-करूंची काही व्यवस्था करावी अशी महार समाजाची स्वाभाविक अपेक्षा होती. परंतु कोणत्याही गोरक्षण संस्थेने 'गायीपेक्षा' माणूस श्रेष्ठ कधीच समजलेला नाही.

रघुजी भोसले हे रामटेक देवस्थानाचे मालक होते. सर्व धार्मिक बाबतीत देवस्थानावर त्यांचा अधिकार असे. रघुजीच्या वाड्यात सहजासहजी कुणालाही प्रवेश मिळत नसे. मग महारांची काय कथा? परंतु अंबाळा तलावावर स्नानाची सोय करायची व महारांना मुभा मिळवून द्यायची म्हणजे भोसल्यांची परवानगी मिळवायलाच हवी. विठोबा हे फार कल्पक व बुद्धिमान होते. महारांचे धर्मगुरू

म्हणून त्यांनी पूर्वीच आपले स्थान निर्माण केले होते. त्यांच्या आवाहनावर लोक एकत्र येऊ लागले होते. त्यांनी निरनिराळ्या वस्तीतील व गावोगावच्या भजनी मंडळांना दिंड्या घेऊन बोलावले व या भजनी दिंड्यांचा मोर्चा रघुजीच्या राजमहालावर नेला. राजे रघुजी भोसले हे नुकतेच आजारातून उठले होते. परंतु दिंड्यांचा मोर्चा आल्याचे कळताच ते बाहेर आले. त्यांनी विचारले, 'काय आहे?'

'महाराज, आपण या प्रदेशाचे राजे. आपली प्रकृती बिघडल्याचे कळले तेव्हा महार समाजाने परमेश्वरास 'नवस' केला की, आमच्या महाराजांची प्रकृती बरी होऊ दे. परमेश्वर नवसाला पावला म्हणून आम्ही आपले दर्शन घेण्यास आलो आहोत.' आघाडीवर नेतृत्व करणाऱ्या विठोबांनी न कचरता उत्तर दिले.

रघुजी राजाला खूप आनंद झाला. त्याने विचारले,

'विठू, तुला काय पाहिजे?'

'महाराज, मला काही नको. आमचा समाज अंबाळा तलावर स्नानास जात असतो. तेथे स्नानाची मुळीच देखील सोय नाही. आमच्या समाजाकरिता तेथे घाट बांधण्याची परवानगी मिळावी, हीच आमची इच्छा आहे.'[१]

रघुजी भोसल्यांनी विठोबांची मागणी मान्य केली. दि.२६-१०-१९०३ रोजी विठोबांनी 'महारांना स्नानास अडथळा करू नये' असा हुकूम आणला[२] व पुढे १४-१-१९०५ रोजी घाट बांधण्यास परवानगी मिळविली. या हुकुमात म्हटले आहे,

'महार लोकांची अंबाळा तळ्यावरील गायमुखाकडील घाटावर स्नान करण्याची वहिवाट सुमारे १२–१३ वर्षांपासून आहे असे समजते. अर्जदार तो घाट बांधणे इच्छित असल्यास त्यास आमची काही हरकत नाही.' या हुकुमावर राजेबहादर रघुजीराव, पांडुरंगराव गुजर, गंगाधरराव चिटणवीस व दामोदरपंत पंडे यांच्या सह्या आहेत.

हा हुकूम मिळताच विठोबा रावजी यांनी स्वखर्चाने घाट बांधला व महार समाजास स्नानाची सोय करून दिली. परंतु तलाव हा मालगुजाऱ्यांच्या मालकीचा होता. त्यांनी ताबडतोब विठोबावर कारवाई सुरू केली. इंग्रजांच्या अमदानीत मालगुजार हे फार मोठे प्रस्थ होते. ते गावचे लहानसे राजेच असत व त्यांच्या कारभारात सरकारी अधिकारीसुद्धा ढवळाढवळ करीत नसत. त्यामुळे मालगुजाराचा गावात व पंचक्रोशीत फार दरारा असे.

त्यावेळी गोपाळ गणेश फडणवीस हे रामटेकचे मालगुजार होते. विठोबा रावजीने घाट जरी सार्वजनिक कामाकरिता बांधला होता, तरी ते व्यक्तिशः जबाबदार होते. मालगुजाराच्या कामदारांनी रिपोर्ट केला. तेव्हा विठोबाला बोलवण्यात आले. रामटेक व सभोवतालच्या परिसरात विठोबाचे नाव 'गोरक्षक' म्हणून प्रसिद्ध झाले होते. विठोबाला बोलाविण्यात आले व तडजोड करण्यात आली. एक विक्रीपत्र करण्यात येऊन घाटाची जमीन विठोबा महार संत पंडे यांच्या नावाने विकण्यात आली.[३] फरोक्त दि. २ मार्च १९०७ साली करण्यात आले

व त्याच दिवशीं रजिस्टर करण्यात आले.

(रजिस्टर बुक नं. १- भाग १- पत्रक ३७३ T ३७४- अ, नंबर ६० आहे.)

'अंबाळा येथील पाहाडाची सन १३१५ (सर्व्हे नंबर) आमचे बिनाइजाजत आपल्या कबजात घेतली. त्याजवर आपले काम सुरू केले व घाट बांधून घेतला, हे आम्हास माहीत झाल्यावरून आम्ही तुजवर त्वा घेतली. जमीन आम्ही कबजात घेण्याची नालीश तुजवर करीत होतो. त्यावर त्वां आम्हास आपसात राजी केले. यावरून या जमिनीसंबंधी म्हणजे खाली लिहिले जमिनीसंबंधी तुजपासून आम्ही आज रोजी नगदी रुपये १०० (शंभर) सिकेकलदार घेऊन खालीलप्रमाणे जमीन तुजला हमेशाकरिता फरोक्त करून देऊन तुझे कबजात दिली. ते जमीन १ रामटेक-नजीक अंबाळा, पो. त. रामटेक, जिल्हे नागपूर येथील अंबाळा तलावाजवळील पाहाड उत्तरेकडील १०६ नंबर पाहाडाकडील जमीन. तुम्ही पायऱ्या बांधल्या, त्या पहिले पाण्याचे पायरीपासून पाहाडापावेतो पू. प. हात अंदाजन ५०, द. उ. हात अंदाजन ४० यांची चतुःसीमा. पू. पहाडी जागा आहे, प. चिंचेचे झाड, उत्तरेस पहाड, द. अंबाळा कुंड तलाव. येणेप्रमाणे जागा वहिवाट व हक्कासुद्धा तुम्हाला हमेशाकरिता फरोक्त केली.'

या फरोक्त पत्रावर गोपाळ गणेश फडणवीस, मालगुजार अशी सही आहे.

वरील फरोक्त पत्रानुसार म्हणजे विक्रीपत्राप्रमाणे विठोबा रावजी पंडे यांना ७५ फूट लांब व ६० फूट रुंद जागा १०० रुपयांस मिळाली. विठोबांनी ही रक्कम स्वतःजवळून देऊन सार्वजनिक कार्यासाठी अंबाळा तलावाकाठची जागा खरेदी केली. त्या काळी महार समाजात श्रीमंत व्यक्ती नव्हत्या असे नाही. परंतु सार्वजनिक कार्यासाठी त्याग करण्याचा पायंडा अजून पडलेला नव्हता. त्या काळी गहू एका रुपयास ३० किलो मिळत असे. म्हणजे तत्कालीन १०० रुपयात तीस क्विंटल गव्हाची किंमत विठोबांनी चुकविली. आजच्या ३०० रु. क्विंटलच्या भावाने या किंमतीचे मूल्य ९००० रु. होईल. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता जमिनीला फारसा भाव नसतानाही ज्या अर्थी मालगुजाराने पहाडातील लहानशा जागेकरिता एवढी आकारणी केली, त्या अर्थी ही किंमत निव्वळ सूडबुद्धीनेच आकारण्यात आली, असे दिसून येते. तरीही ही रक्कम पटवून समाजहिताकरिता त्याग करण्याचे धैर्य दाखवून विठोबांनी आदर्श घालून दिला, असे म्हणण्यास हरकत नाही.

पुढे या घाटाकरिता व मंदिराच्या उभारणीसाठी विठोबांनी पैसा गोळा करणे सुरू केले. रामटेक येथील महार समाजाच्या सहयोगिनी एक अर्ज सेक्रेटरी, गोरक्षण सभा, नागपूर यांनाही पाठविण्यात आला. त्या अर्जात म्हटले आहे, 'मागे आमचे घाटासंबंधी महार लोकांकडून वर्गणी होऊन तो पैसा काही शिल्लक आपले कमेटीत वसूल करून धरवर आहे. तो पैसा हल्ली चालू असलेल्या आमच्या घाटाचे कामास कमेटीकडून आमचा आम्हास देण्याचा हुकूम होईल अशी आशा.'

महार समाजाकरिता अंबाळा तलावावर घाट बांधण्यात आला, ही बातमी

सर्वत्र पसरण्यास वेळ लागला नाही. हा घाट इतर स्पृश्य समाजापासून अगदी विलग असल्यामुळे महारांना एकत्र बसून स्वतंत्रपणे विचार करण्यास अनायासेच संधी मिळाली. आपली उन्नती व्हावी अशी इच्छा महारांचे मनात पूर्वीपासून घर करून होती.

अंबाळा तलावाच्या घाटावर एकत्र बसलेल्या महारांना विठोबाजी सामाजिक उन्नतीचे मार्ग सांगू लागले. १९०६ साली रामटेकच्या रामनवमीच्या यात्रेच्या प्रसंगी महार लोकांची प्रचंड जाहीर सभा झाली व एक 'अंत्यज समाज कमिटी' विठोबांनी स्थापन केली. अशीच सभा कार्तिक पौर्णिमेच्या प्रसंगीही घेण्यात आली. विदर्भातील दलितांची पहिली सामाजिक संस्था म्हणून 'अंत्यज कमिटी' चा उल्लेख करावा लागेल. या सभेमधून विठोबाजींच्या कार्याचा गौरव करण्यात आला. विठोबांनी प्रत्येक गावी सभा करून महार लोकांना उपदेशाद्वारे कसाईकाम व गोमांस-आहारापासून शपथा देववून सोडवणे अशी धर्मसुधारणा व महार लोकांचे स्नानासंबंधी व्यवस्था आजपर्यंत महार लोकांत कोणीही केली नाही, अशी प्रशस्ती देण्यात आली व त्यांचे आभार मानण्यात आले. कमिटीने विठोबाजींना या घाटावर अध्यक्ष पंडे मानून वंशपरंपरेकरिता पिंडदान, संकल्प, दक्षिणा, जी मिळेल ती, घेण्याचा अधिकार देऊन सभा रजिस्टर केली. दि. २८–१०–१९०८ च्या वरील बाबींचा उल्लेख करून विठोबांनी रामटेक देवस्थान कमिटीला विनंती केली आहे की, 'आपण सांगाल त्या कोणत्याही धर्मसंस्थेला आम्हा लोकांकडून काही मदत करवावी.' म्हणजे एवढ्या अल्पावधीत हिंदू धर्मसंस्थांना मदत करायची ऐपत व दिलदारपणा 'अंत्यज समाज कमिटी' त असल्याबद्दल विठोबांनी रामटेक देवस्थान कमिटीला कळविले आहे. 'अंत्यज समाज कमिटी' जरी लोकांनी स्थापन केली, तरी त्या कमिटीचे सूत्रधार, संचालक व मार्गदर्शक विठोबा रावजी हेच होते.

घाट बांधल्यानंतर व 'अंत्यज समाज कमिटी' ने उत्तरक्रियेस पंडेपणाचा पूर्ण अधिकार दिल्यानंतर या घाटाची व्यवस्था लावणे ओघाने आले. एकीकडे गोरक्षण कमिटीचे प्रचारक धर्मपेटी आणून वर्गणी गोळा करीत, तर इतर पंडेही मनास वाटेल ते पिंडदान मागत असत. अर्थात विठोबांना पिंडदानाचा अधिकार समाजाने दिल्याबरोबर इतरेजनांचे घाटावर पैसा गोळा करण्याचे उद्योग बंद पडले असल्यास नवल नाही. परंतु महारांतील न्हावी समाज या घाटावर बसून वाटेल तसा पैसा उकळीत असे. त्यांचा बंदोबस्त होणे जरूरी होते. घाटाधिकारी या नात्याने विठोबाजींनी काही महार न्हाव्यांना केशकर्तन व हमश्रू करण्याची सवलत दिली. हे स्टॅम्पपेपरवरील करारनामे विठोबांच्या कार्यावरही प्रकाश टाकतात.

जैराम वल्द डोंगऱ्या महार म्हाली व शिवराम वल्द डोंगऱ्या महार म्हाली यांनी लिहून दिलेल्या करारनाम्यात[५] म्हटले आहे,

'आपणास रामटेक क्षेत्रास सर्व महार लोकांनी सभा करून सभासद कमेटीचे

अध्यक्ष नेमून अधिकार दिला आहे. करार करतो की या अंबाळा तलावाचे महार घाटावर मुंडन करणाऱ्या प्रत्येक महाराजवळून दर मुंडनास २ (दोन) आणे पैसे मेहनताना घेऊन खऊर करून देवू. सिवाये पैसे घेणार नाही व कोणी विटाळले अगर जातीविरुद्ध वागणारे किंवा ज्यास जातीचा प्रतिबंध अशा इसमाने कितीहि पैसे दिल्यास त्यांचे मुंडन या रामटेक क्षेत्राचे सीवेत देखील करणार नाही. बाहेरगावच्या म्हाल्यानी घाट सोडून अलग ठिकाणी मुंडन करून आपण अधिकाऱ्यास माहित न होता पैसे मारून नेले. व्यवस्था चांगली असावी म्हणून हा करारनामा लिहून दिला असे.'

(करारनामा दि. ४–३–१९०७)

दुसरा करारनामा ६ पुलगाव येथील अर्जुना कचरू महार म्हाली याने लिहून दिला आहे. त्यात म्हटले आहे,

'आपण आपले सर्व महार लोकांत उपयोगाकरिता धर्मसंबंधी कृत्याकडे लक्ष देवून सर्व महार लोकांस देवस्थान रामटेक श्री अंबाळा तलावाचे स्नानाकरिता प्रयत्न करून अर्जाद्वारे देवस्थान कमेटीचा हुकूम आणीला व त्या स्थळी पूज्य स्नानाकरिता खास द्रव्य खर्च करून मालगुजारी जमीन जड खरेदी करून आमचा घाट वांधून दिला व प्रत्येक गावी सभा करून आम्हा लोकांस उपदेशाद्वारे कसाई गोमांस आहारापासून सोडविले. या उपकारास्तव त्या स्थळी आपले फारफार आभार मानून सर्व महार लोकांनी यात्रेप्रसंगी मागे तीन वेळा सभा करून सभासद कमेटीचे रायनी आगवासीन व पुढारी करून आपणास त्या घाटावर पूज्यस्थानी अध्यक्ष मानून पिंडदान, संकल्प, दक्षिणा वगैरे वंशपरंपरे घेण्याचा अधिकार देवून सभा रजिस्टर केली.'

(करारनामा दि. २२–११–१९१०)

तिसरा एक करारनामा लटाळचा वल्द बेंडचा व त्याच्या दोन मुलांनी करून दिला आहे व त्यात, 'पुढील चांगल्या सोयीच्या बंदोबस्ताकरिता अर्जाद्वारे हा करारनामा लिहून दिला आहे' (४–३–१९०७) असे म्हटले आहे.

वरील करारनाम्यातून काही गोष्टी स्पष्ट होतात. अंत्यज समाज कमिटी ही १९०६ च्या कार्तिकी यात्रेत स्थापन झाली. विदर्भातील संघटित चळवळीस १९०६ च्या कार्तिक पौर्णिमेच्या यात्रेपासून सुरवात झाली, असे म्हणण्यास काही हरकत नाही. या चळवळीचे प्रणेते श्री. विठोबा रावजी हे होते. त्यांनी निव्वळ धार्मिक बाबींवर भर न देता गोमांस आहारापासून समाजाला मुक्त करण्याकरिता गावोगाव प्रचार करून विचारजागृती केली. परिणामी महार समाजात त्यांना निव्वळ उपदेशक म्हणूनच नव्हे, तर धर्मगुरूचे स्थान प्राप्त झाले. याच सुमारास शिक्षणावाचून तरणोपाय नाही, याची जाणीव होऊ लागली होती. नागपूर व चंद्रपूर येथे सरकारी शाळांतून अस्पृश्य मुलांना प्रवेश नाकारल्याबद्दल अस्पृश्यांनी मिरवणुका काढल्या होत्या. अस्पृश्यांना शिक्षण मिळू लागले होते. ते मिशनरी शाळांतून शिक्षण

घेत असत. महार समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा, म्हणून महार समाजाची सभा घेणे आवश्यक होते. दि. १८–१२–१९१२ रोजी जैराम पैकू शेटचा यांच्या हस्ते मोतीबाग येथील वाडचात खास सभा बोलावण्यात आली. निमंत्रणपत्र दि. ७–१२–१९१२ च्या पत्रिकेत[७] शिक्षणाबद्दल काढलेले उद्‌गार तत्कालीन सामाजिक कार्यकर्त्यांची शिक्षणविषयक तळमळ व्यक्त करते. त्यात म्हटले आहे, 'महाराणी व्हिक्टोरिया सरकारच्या अंमलापासून विद्येचा सुकाळ असल्यामुळे कित्येक लोकांच्या सुधारणा होऊन योग्यतेस चढले व आम्ही अनाथ ह्यामुळे आमच्या वर्गातील कोणीही विद्याशिखरावर पोहचू शकत नाही व विद्याहीन असल्यामुळे राजसेवा घडत नाही. यामुळे फार उत्कंठा लागली आहे. हल्ली महाराजे पंचम जॉर्ज सरकारच्या प्रकाशापासून तर फारच लोकांच्या उन्नतीचा आनंद वाढत चालला आहे व आम्ही राज्यकल्याणार्थ सदा जय मानतो. यापुढे राजकृपे विद्यादानानी आमच्या क्लासाची उन्नती करून घ्यावी, याबद्दल खास वर्गाची सभा करणे ठरली आहे.' या पत्रिकेवर– १) जैराम पैकू सेटचा गायकवाड, २) विठोबा रावजी संत पंडे, ३) येंकू सखाराम सावकार, ४) गोमा गणेश सावकार व ५) करणू विठ्ठल मालगुजार यांच्या सह्या आहेत. सभा जैराम शेटचाच्या वाडचात असल्यामुळे त्यांचे नाव पहिले टाकण्यात आले आहे, हे लक्षात असू द्यावे.

१९१० नंतर विठोबा रावजी यांनी शिक्षणविषयक उन्नतीकडे व सामाजिक संघटना बांधण्याकडे सर्व वेळ देण्यास सुरवात केली. दि. १८-१२-१९१२ च्या खास सभेनंतर लवकरच १३ एप्रिल १९१३ रोजी टाऊन हॉल, नागपूर येथे महारांची सभा घेण्यात आली. या सभेच्या निमंत्रण पत्रिका[७] इंग्रजीतून धाडण्यात आल्या. या पत्रिकेवर समाजातर्फे विठोबा रावजी, मुकुंदा तुकाराम व रेव्हरंड जी. डी. फिलिप्स यांच्या सह्या आहेत.

महारांची परिषद टाऊन हॉलमध्ये दि. १३, १४ व १५ एप्रिल, १९१३ रोजी घेण्यात आली. महार सभा, नागपूर या संस्थेचे सेक्रेटरी विठोबा रावजी संत पंडे यांनी १५-३-१९१३ रोजी परिषदेच्या कार्यक्रमाची रूपरेषा देणारे एक पत्रक काढले. या पत्रकाच्या पहिल्याच पानावर 'महार सभा, नागपूर यांचा व्हाइसरॉयबद्दल प्रीतिसन्मान दिनोत्साह' असे शीर्षक आहे. आतील मजकुरात महार सभेने केलेल्या कार्याचा अहवाल ग्रथित आहे.

संस्थेच्या हातून झालेली कामे थोडक्यात खालीलप्रमाणे:–

१) विठोबा रावजी संतपंडे यांचे अध्यक्षतेखाली सदर, कामठी येथे जंगी दोन सभा केल्या.

२) कमिश्नर साहेबांकडून बक्षिसे मिळविली.

३) रेव्हरंड फिलिप्स यांस सन्मान दिला.

४) दिल्ली दरबार उत्सवाचे दिवशी फिलिप्स वगैरेंस बोलावून आनंदोत्सव साजरा केला. त्यावेळी मुकुंदराव शेटचांनी मास्तर वगैरे लोकांस वस्त्रभूषणांनी

गौरविले.

५) कैसरे– हिंद महाराज व जॉर्ज मेरी सरकारची स्वारी नागपुरास दर्शन देती झाली. तेव्हा राजकल्याणार्थ सर्वांकडून जयघोष शब्द गर्जविला.

६) हिंदू लोकांतही राजकल्याणेंच्छू सभा भरवल्या.

७) व्हाइसरॉय साहेब आजारी असल्याची 'अमानुष' वार्ता ऐकून संस्थेला भयंकर दुःख झाले. त्या 'दुःखभरे महार कम्युनिटीकडून दिल्लीस तार पाठविली गेली.' या तारेचे व्हाइसरॉयकडून प्रत्युत्तर आले. अत्यंत दुःखी असताही दयाळू व्हाइसरॉयने 'नीच– उच्चपणाचा काही जाती– भेदाभेद न पाळता' महार संस्थेचे आभार मानले. उपरांत महार सभेच्या पुढाऱ्यांनी व्हाइसरॉयचे दुःख दूर करण्यासाठी जगदीशाला नवस केला की, 'या दुर्धर क्लेशातून व्हाइसरॉयला लवकर बरे केल्यास नागपुरास सुमारे एक हजार अन्नछत्र भोजन देऊन दिनोत्साह साजरा करू' या नवसाची पूर्ती म्हणून १३ एप्रिल १९१३ रोजी 'प्रीतिभोजन दिनोत्साह मंगलतुरे तोरणादिकांनी दिंडी-भजनांनी' साजरा करण्याचे ठरले.

पुढे संस्थेने केलेल्या धर्मसंबंधी अंत्यज कामाची माहिती दिली आहे. ती त्यांच्याच शब्दांत खालीलप्रमाणे:–

१) रामटेक देवस्थान श्री अंबाला परमपूज्य तलावाचे स्थान आम्हां लोकांस पूर्वापार नसल्यामुळे विठोबा रावजी संतपंडे, नागपूरकर यांनी, तनमनधन द्वारा खास प्रयत्न करून, स्थानाची सर्वांस मोकळीक करून दिली व त्या ठिकाणी पूजास्नानाकरिता घाट बांधून दिला.

२) थंडी, गरमी व पावसाळ्याचे दिवसांत तेथे आपले लोकांना राहण्याची फार गैरसोय आहे. त्याकरिता गोमाजी गणेश सावकार, खडकपूरकर यांनी तेथे (रामटेक अंबाला तलावाचे काठी) बारवा विहीर (पायऱ्यांची विहीर– हिलाच बावडी म्हणतात) तयार केली व करणुजी विठ्ठल मालगुजार रा. नांदे पिंपळेकर यांचे सामलातीत सुमारे एक हजार रुपये खर्चून लोखंडी सोपा (धर्मशाळा) करण्याचे काम चालू केले. (हा लोखंडी सोपा व विहीर आजही अस्तित्वात आहेत.)

३) कालीचरण गणूजी नंदागवळी मालगुजार, मेम्बर म्यु. कमेटी, गोंदिया यांनी तीन हजार रुपये खर्च करून गोंदिया मुक्कामी 'पुत्री' शाळा स्थापन केली.

वरील २– ४ इसमांनी बराच पैसा खर्च करून 'सर्व महार लोक सुधारण्याचे काम हाती घेतले आहे. त्यांना आपण सर्व महार बंधूंनी सुधारणेच्या कामात राय देऊन (आपल्या) मागासलेल्या जातीची उन्नती करून घ्यावी' अशी विनंती शेवटी या पत्रकात केली आहे.

दि. १३,१४ व १५ एप्रिल १९१३ रोजी होणाऱ्या सभेत चर्चिल्या जाणाऱ्या विषयांची माहितीही या पत्रकात दिलेली आहे. ही माहिती उद्‌बोधक व महार चळवळीची दिशा दर्शविणारी आहे.

१) हल्ली राजकृपेने विद्येच्या शाळा प्रत्येक ठिकाणी असून अंत्यज मुले

उदरनिर्वाहाच्या अडचणींमुळे निरुपायास्तव शाळा सोडतात. त्यास अखेर पास होतपावेतो आपले कमेटीतून खर्च पुरवावा.

२) प्रत्येक शहरात आमचे लोक व्यापारानिमित्त येत असून हमेशा त्यांची राहण्याची गैरसोय होत आहे, तेथे तेथे धर्मशाळा असाव्या.

३) गाव अथवा बाजार, जेथे पाण्याची विशेष अडचण असेल तेथे, अवश्य विहीर असावी.

५) लग्नाचा नवरा असून स्त्रीने विनाकारण चावटपणाने त्याचा त्याग केला अथवा भ्रताराने स्त्री सोडल्यास, होतपावेतो, उभयतांचा संगम करून द्यावा.

अशा प्रकारे सभा स्थापित झाल्यावर प्रत्येक जागी त्याची व्यवस्था केली जाईल असे पत्रकात म्हटले आहे.

या पत्रकातून बऱ्याच गोष्टी स्पष्ट होतात.

१) महार समाजाला शिक्षणाची पूर्ण जाणीव झाली होती. दरिद्री कुटुंबातील मुले आर्थिक बाबींमुळे मधूनच शाळा सोडतात हे दिसून येत होते. शिक्षणाची इच्छा असूनही शिक्षण घेता येत नसणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी सार्वजनिक फंडाची गरज आहे, याची महार पुढाऱ्यांना जाणीव झाली होती.

२) महार समाजासाठी गावोगाव विहीर बांधण्याची योजना करणे म्हणजे लहानसहान काम नव्हते. परंतु समाजाची गरज म्हणून हे कार्य फार महत्त्वाचे होते.

३) पति– पत्नीत वितुष्ट येताच काडीमोड करण्याची प्रथा महार समाजातील नैतिक आचरणावर आघात करणारी ठरली आहे. आजही महार समाजातील घटस्फोटाचे प्रमाण इतर समाजांपेक्षा जास्त असल्याचे वृत्तपत्रातील जाहीर नोटिसांवरूनही अनुमान काढण्यास हरकत नसावी. समाजातील काडीमोडाच्या प्रथेला आळा घालण्याचा पहिल्यांदाच सार्वजनिक प्रयत्न होत होता.

या संस्थेचे कार्यक्रम खालीलप्रमाणे होते-

दि. १३– ४– १३ रविवार. श्रीमान व्हाइसरॉय सरकारबद्दल नवस उत्सव.

दि. १४– ४– १३ सोमवार. आपल्या महार जातीतील विद्यावृद्धी, पंचनियम सुधारणा याविषयीचा साधक–बाधक विचार.

दि. १५– ४– १३ मंगळवार. प्रातःकाळी ७ वा. टौन हॉल येथे अधिकारीवर्गांना आदरपूर्वक प्रीतिसन्मान.

वरील पत्रकावर रेव्हरंड जी. डी. फिलिप्स, अध्यक्ष, महार सभा, नागपूर यांची सही आहे. शिवाय उपाध्यक्ष म्हणून दहा जणांची नावे आहेत.

१) कालीचरण गणूजी नंदागौळी मालगुजार, सदस्य नगरपरिषद, गोंदिया.

२) करणूजी विठ्ठल मालगुजार, नांदेपिपळेकर

३) गोमा गणेश सावकार, खडकपूरकर.

४) मुकुंदा तुकाराम सेटचा, मुरारकर, नागपूर.

५) मोवाजी सेगोजी मालगुजार, लाख व्यापारी, गोंदिया.
६) सकोजी सखाराम ठेकेदार, नागपूर.
७) गणपत सखाराम ठेकेदार, नांदअवलीकर.
८) सुकाजी गोमाजी बंदसोडे पाटील, नागपूरकर.
९) गणपत गुंडू दलाल, टांडेपेठ, नागपूर.
१०) जैराम पैकू सेटचा गायकवाड, नागपूर.

या पत्रकावर मेंबर म्हणून सुमारे ४५ इसमांची नावे आहेत. या सभासदांमध्ये– १) किसन फागोजी बंदसोडे, २) शिवराम जानबा कामळी, पुणेकर, ३) धोंडीबा मास्तर, मुंबईकर, ४) गणेश आक्काजी गवई, उमरावती यांचीही नावे आहेत.

किसन फागोजी बंदसोडे हे महार सभेचे नुसते साधे सभासद होते, ते नुकतेच उदयास येऊ लागले होते, हे लक्षात घ्यायला हवे. शिवाय गणेश आक्काजी गवई यांचेही नाव सदस्यांत १२ वे आहे. पत्रकावर विठोबा रावजी मूनपंडे यांची सेक्रेटरी म्हणून सही आहे.

दि. ७– ४– १९१३ रोजी युरोपियन मंडळी व अधिकारी वर्गांकरिता १५– ४– १३ च्या निमंत्रणपत्रिका वेगळ्या धाडण्यात आल्या. या पत्रिका इंग्रजीतून काढण्यात आल्या. त्यावर महार समाजातर्फे विठोबा रावजी मून संतपंडे, मुकुंदा सेटचा, तुकाराम सेटचा व रेव्हरंड फिलिप्स यांच्या सह्या आहेत.

१३, १४ व १५ एप्रिल १९१३ सालाची महार सभा ही निव्वळ एक सभा नसून परिषदच होती, असे म्हणण्यास हरकत नाही. या परिषदेत हजारो महारांनी भाग घेतला. एवढेच नव्हे, तर या परिषदेला मुंबईपासून नागपूरपर्यंत सर्व प्रमुख पुढारी मंडळी हजर होती. या परिषदेचे सदस्य पूर्वेकडे खडकपूर, रायपूरपर्यंत होते. या परिषदेचे संयोजन विठोबा रावजी यांनी केले होते. १९२० ला पुढे नागपूर येथेच भरलेल्या परिषदेची ही पूर्वतयारी होती. 'महार सभा' म्हणून स्थापन झालेल्या संस्थेचे उपाध्यक्ष असलेली सर्वच मंडळी आधारस्तंभ होती. स्पृश्य हिंदूंकडून कोणतीच सहानुभूती वा उन्नतीपर प्रयत्न होत नसताना ख्रिश्चन, मिशनरी व राज्यकर्ते यांच्याशी जवळीक साधण्याचा हा पहिलाच संघटित प्रयत्न होता. या परिषदेत विठोबा रावजी यांच्यासंबंधी किती आदराची भावना होती, हे त्यांचेसंबंधी पास केलेल्या ठरावावरून दिसून येते. महारांकरिता स्वतंत्र घाट बांधून संपूर्ण समाजाला कायमचे ऋणी केल्याबद्दल विठोबा रावजी संत पंडे यांचे महार सभेत कृतज्ञतापूर्वक आभार मानले आहेत.

या परिषदेने अस्पृश्य कार्यकर्त्यांनाही दिशा दाखवली असे म्हणण्यास काही हरकत नाही. या परिषदेनंतर तीनच वर्षांनी ग. आ. गवई, किसन फागोजी बंदसोडे आदींनी चोखामेळा वसतिगृह काढलेले दिसून येते. या परिषदेच्या पत्रकातील नावांवरून एक बाब विशेष करून जाणवते, ती म्हणजे महार समाजाची उन्नती करण्याचे

कंकण पहिल्यांदा सुखवस्तू मंडळींनी हाती बांधले. उपाध्यक्षांत मालगुजार, सावकार, दलाल, ठेकेदार अशीच मंडळी होती. सदस्यांत रेल्वेतील कर्मचारी व सर्व थरातील शिक्षित व सुखवस्तू लोक होते. पाटील, पटवारी, फोरमन, कारकून, शिक्षक, मास्तर, मिस्तरी या सर्वांचा त्यात समावेश होता. महारांत झालेल्या जागृतीचा परिणाम हिंदू समाजावर होणे अपरिहार्य होते. बाबासाहेबांचे कार्य १९१९ साली जरी सुरू झाले तरी संघटनेचा मजबूत पाया विदर्भातील नागपूर या शहरी विठोबा रावजी संत पंडे यांनी घालून ठेवलेला त्यांच्या लक्षात यायला उशीर लागला नसावा.

व्हाइसरॉय कल्याणार्थ उत्साह साजरा करण्याकरिता सरकारने २०-६-१९१३ दिवस ठरवला. त्या दिवशी प्रीतिसन्मान घेण्याबद्दल सर्व महार मित्रांना मित्रमंडळीसह प्रातःकाळी आठ वाजता 'चांदा मशीन महार शाळे'समोर पेठ शुक्रवारी येथे निमंत्रित करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी मुलांना पाट्या, टोप्या, कुडते व बुके वगैरे बक्षिसे देण्यात आली. हे पत्रक एप्रिलमधील परिषदेनंतर दोनच महिन्यांनी निघालेले आहे. महार सभा किती कार्यतत्पर होती, हे यावरून दिसून येते.

महार सभेतर्फे वारंवार सभा- संमेलने होत असत. दि. ३-१-१९१४ रोजी अशाच एका प्रचंड सभेमध्ये विठोबा रावजी यांना रामटेक घाटावर मिळणाऱ्या दक्षिणेच्या अधिकारावर शिक्कामोर्तब करण्यात आले व अंबाळा घाटावर व्यवस्था राखण्याच्या दृष्टीने विठोबांना कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यास संमती देण्यात आली.

दि. २३- ९- १३ रोजी रामटेक येथे स्थानिक महारांची सभा झाली. विठोबा रावजी व एक धर्मशील विधवा स्त्री भीमाबाई हे घाटाचे उत्पन्न स्वतःच वाटतात, म्हणून रामटेक येथील महारांनी एक कमिटी स्थापन करून हा घाट स्वतःच्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. विठोबा रावजीने हा घाट बांधण्यास किती श्रम घेतले होते, हे मागील विवेचनावरून स्पष्ट होते. त्यामुळे दि. ३-१-१९१४ च्या सभेत कायदेशीर कारवाईचे अधिकार देण्याचा ठराव पास करण्यात आला.

दि. १५-३- १९१४ रोजी महार सभेच्या कार्याचा वार्षिक रिपोर्ट[९] इंग्रजीतून प्रसिद्ध करण्यात आला. त्यात खालील गोष्टी नमूद केल्या आहेत.

१) व्हाईसरॉय प्राणांतिक दुखण्यातून उठल्याबद्दल तीन दिवस उत्साह मानण्यात आला.

२) जनरल सभेला हजारो महार हजर होते. रेव्हरंड फिलिप्स हे सभेचे अध्यक्ष होते व युरोपियन पाहुण्यांना चहा-पार्टी देण्यात आली.

उरलेल्या ३ ते ६ मुद्यांमधून विठोबा रावजी संत पंडे यांनी घाट बांधल्याबद्दल कृतज्ञता व त्यांना दक्षिणा व पिंडदान घेण्याच्या अधिकारास अनुमती या निर्णयांविरुद्ध वागणाऱ्या लोकांविरुद्ध निषेध आणि रामटेक घाटावर हक्क दाखवणाऱ्या लोकांविरुद्ध कारवाई करण्याची सम्मती दि. ३-१-१९१४ रोजी घेण्यात

आलेल्या सभेत ठरल्याचा उल्लेख आहे. या रिपोर्टावर पूर्वी अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांची नावे आहेत. मात्र या वेळी सेक्रेटरी श्री. बापूजी माधवराव पडोळे हे असून विठोबा रावजी संत पंडे हे तिसऱ्या क्रमांकावर उपाध्यक्ष म्हणून नेमलेले दिसतात.

पुढे महार सभेचे सर्व कामकाज रेव्हरंड फिलिप्स यांच्या मार्फत विठोबाच पहात असत. रेव्हरंड फिलिप्स यांनी स्वत:च्या गैरहजेरीत स्वत:तर्फे सही करण्याचे व काम पाहण्याचे संपूर्ण अधिकार त्यांना दिले होते. सतत समाजजागृती करीत फिरत राहणे, महार समाजात संघटना करणे व महारांची कामे युरोपियन अधिकारी व ख्रिस्ती धर्मप्रचारकांकडून करवून घेणे अशा विविध जबाबदाऱ्या विठोबा पंडे पार पाडीत असत. कामठी येथील एम. ई. चर्चचे प्रमुख मिशनरी रे. डब्ल्यू. डी. वॅलर यांनी विठोबाला दिलेल्या प्रमाणपत्रावरून त्यांच्या वाक्‌चातुर्याची व व्यक्तिमत्वाची कल्पना येईल. ते म्हणतात–

विठोबा साधू हे माझे मित्र आहेत. सत्याचा शोध घेण्यास ते माझेकडे येत असतात. मूर्तिपूजा व जातिसंस्था यांविरुद्ध ते प्रचार करतात. मी स्वत: त्यांना असा प्रचार करताना पाहिले आहे. ख्रिस्ती समाजाची मैत्री संपादन करण्याची इच्छा त्यांनी दर्शविली आहे व मला चार शब्द लिहिण्यास सांगितले. ते जेव्हा ख्रिश्चनांना भेटतील तेव्हा त्यांचेबद्दल सद्‌भावना बाळगावी. त्यांचेमार्फत हिंदु-समाजातील पुष्कळ व्यक्तींशी आपला संपर्क साधता येईल. त्यांच्या विनंतीस मान देण्यात मला मुळीही गैर वाटत नाही.

(कामठी, दि. १ जाने. १९१६)[१०]

महार सभा ही स्वत:स लॉयल महार सभा म्हणवून घेत असे. म्हणजे इंग्रज सरकारशी एकनिष्ठ असल्याबद्दल आपल्या भावना ती व्यक्त करीत असे. समग्र हिंदू समाज अस्पृश्यांना पशुवत् लेखत असताना अस्पृश्यांच्या पुढाऱ्यांनी युरोपियन समाजाशी जवळीक निर्माण केल्यास नवल वाटायला नको. जेव्हा टिळक मंडालेच्या तुरुंगातून सुटून आले तेव्हा स्वराज्य पक्षाच्या लोकांनी 'टिळकांची तुरुंगातून सुटका, महाराणी व्हिक्टोरिया की जय' अशी पत्रके काढलीत. इंग्रजांबद्दल राजनिष्ठा व्यक्त करणे हा तत्कालीन समाजाचा स्वभावधर्म बनला होता. अस्पृश्य समाजाने तत्कालीन सरकारवर निष्ठा व्यक्त केल्यास नवल वाटावयास नको. मात्र विठोबा रावजी संत पंडेसारख्या एखाद्या व्यक्तीने स्वकर्तृत्वाने सर्व महार समाजास संघटित करून स्वत: मिशनऱ्यांपासून गव्हर्नरपर्यंत सर्वांशी संपर्क प्रस्थापित करणे, हे आश्चर्यकारक कर्तृत्व समजले पाहिजे.

१९१४ नंतर विठोबा रावजी यांनी युद्धकाळात सैन्यभरतीचेही काम केले. हे प्रचारकार्य करीत असताना अस्पृश्य समाजात, विशेषत: महारांच्या स्वत:च्या उन्नतीबद्दल, त्यांनी बरीच जागृती निर्माण केली, असे समजण्यास हरकत नाही.

१९२० च्या परिषदेत विठोबा रावजी हे मार्गदर्शक म्हणून काम करीत

छत्रपती श्री शाहू महाराज यांना बोलावून विठोबा रावजी यांनी त्यांचा सत्कार केला होता अशी विश्वसनीय माहिती मिळते. या घटनेवरून विठोबांचे व्यक्तिमत्व स्पष्ट होते. ज्या धोंडिबा मास्तर मुंबईकर यांची १९१४ च्या पत्रकावर सही आहे, ते धोंडिबा मास्तर म्हणजे धुंडीराम नारायण गायकवाड हे होत. धुंडीराम गायकवाड व मडकेबुवा जाधव यांचा विठोबांशी १९२० च्या परिषदेत जवळचा संबंध आला. धुंडीराम हे विठोबांचे पूर्वीपासून मित्र. विठोबा १९२४ साली वारल्यानंतर १९३० च्या परिषदेत बाबासाहेब आंबेडकरांकरिता विठोबांच्या घरून हक्काने जेवणाचा डबा ही मंडळी घेऊन जात. विठोबाजी १९१८– १९ साली डिलाईल रोड येथे कापसाच्या व्यापारानिमित्त ६ महिने राहिले तेव्हा धुंडीरामची मैत्री झाली ती कायमची. हेच धुंडीराम व मडकेबुवा बाबासाहेबांचे शरीरसंरक्षक होते.[११]

विठोबा रावजी हे गवर्ईच्या डिप्रेस्ड इंडिया असोसिएशनच्या कारभारापासून अलिप्त असलेले दिसून येतात. मात्र स्वतंत्रपणे त्यांचे महार सभेचे कार्य सुरूच होते. डिसेंबर १९२२ मध्ये मिलचा दुसरा संप झाला. हा संप काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी घडवून आणला असल्याचे दिसते. अस्पृश्य मजुरांचे विठोबा रावजी हेच पुढारी होते. त्यांनी दि. १४–१२–१९२२ रोजी सहकारी डी. एम. नगरारे यांच्यासोबत मजुरांना उद्देशून एक जाहीर पत्रक काढले. या पत्रकातून सर्व महार मजुरांना १५ तारखेच्या भोंग्यास कामावर जाण्याचा सल्ला दिला. हे पत्रक विठोबांची समाजहितैषी दृष्टी तर स्पष्ट करतेच, परंतु तत्कालीन स्पृश्यांपासून अस्पृश्यांनी सावध राहण्यातच त्यांचे हित कसे आहे ही विठोबांची भूमिकाही सूचित करते. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देखील याच धोरणाचा अवलंब केला हे लक्षात घेतले म्हणजे विठोबा रावजीच्या दूरदर्शी धोरणाचे महत्त्व पटून येते. या पत्रकात म्हटले आहे, 'वेळेप्रसंगी धन्यास मागणी करणे हे आपणास अवश्य आहे. तरी पण अट्ट करण्यास जसे इतर लोक सर्वशक्तिमान आहे, तसे आपण महार जात समर्थ नाही व मिल धनी आपणास किती प्रकारे सहाय्य करीत आहेत याचा आपण विचार करा. असे संघनमते झाले ते पुरे. असो. पण विशेष सूचना, मागील संप-अखेरीस मिलचे चालू भोंग्यास मजुरांनी आपआपली कामे नित्याप्रमाणे चालू करून मिल धन्याकडून संतुष्टपणे सर्व हक्क मिळवले, तसेच १५–१२–२२ रोजी चालू होणाऱ्या मिलभोंग्यास मान देऊन आपआपली कामे नित्याप्रमाणे येवून मागील प्रकारे सर्व हक्कास पात्र होऊन जय मिळवाल ही माझी सूचना वरील तुमच्या आणि त्यांच्या नियमात काहीसा फेरफार होऊन धनी संतुष्टपणे तुमचे लळे पुरवतील ही खात्री असू द्या. आपण कांहीसे अशिक्षित असून आपणास संपाची जाणीव नाही. तुम्हास जहाल मवाळ पक्षाचे कांही लोक सल्ला देत असतील, पण त्यांना मजूर पक्षास मिळून मिसळून कामे करण्यास अनुभव नाही, म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवून राहाल तर आपला खात्रीने अपाय होण्यास कांही हरकत दिसत नाही.

धनी असावा बळकट, वारी दासांचे संकट ॥

त्याची करावी चाकरी, शिर घेऊनी हातावरी ॥
करो देहाचे तुकडे, पाहू नये मागे पुढे ॥
मग तो देईल जहागिरी, बसून खाऊ जन्मभरी ॥
तुका म्हणे ऐसा धनी, ठायी पहावा शोधुनी ॥

(तुकाराम)

मित्र हो, तसेच तुम्हीही काम करून धन्यास जिंकून यश मिळवाल, ही माझी सूचना आहे.[१२]

पुढे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये अस्पृश्यांचे प्रतिनिधी घेण्यात यावे, याकरिता अस्पृश्यांच्या निरनिराळ्या सभांतून नावे पाठविण्यात आली. कौन्सिलमध्ये प्रवेश मिळविण्याकरिता पुढाऱ्यांत चुरस निर्माण होऊन तट पडले असल्यास नवल नाही. गवई, किसन फागोजी यांनी डिप्रेस्ड इंडिया असोसिएशन स्थापन केली होती. विठोबांना या संस्थेत स्थान नव्हते. परंतु त्यांचे स्वतंत्र कार्य सुरूच होते.

त्या काळी स्पृश्य हिंदू पुढाऱ्यांनी धार्मिक बाबतीत पुरोगामी धोरण स्वीकारले होते. सावरकरांच्या सर्वधर्म मंदिराची कल्पना नागपुरातील काही हिंदू पुढाऱ्यांनी पुढे रेटली व सार्वजनिक सभांमधून अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाचे ते समर्थन करू लागले होते. अस्पृश्यांच्या सभांमधूनही बरीचशी पुरोगामी स्पृश्य मंडळी पुढाकार घेताना दिसून येत. या पुढाऱ्यांत डॉ. मुंजे, डॉ. खरे, डॉ. परांजपे, डॉ. भवानीशंकर नियोगी, बॅरिस्टर गोविंदराव देशमुख, गोविंद रघुनाथ प्रधान, वकील रावबहादुर नारायण केळकर आदी मंडळी प्रमुख होती.

चोखामेळा सुधारक मंडळ, नागपूरतर्फे दि. ५–१२–१९२३ रोजी झालेल्या सभेत खालील ठराव करण्यात आले. हे ठराव तत्कालीन महार चळवळीच्या संबंधात नागपुरातील स्पृश्य हिंदू पुढाऱ्यांची भूमिका स्पष्ट करतात.

ठराव नं. १: नागपूरमधील हिंदू समाजातील मंडळींनी आणि काँग्रेस व कौन्सिलमधील हिंदू सभासदांनी अस्पृश्य लोकांवरील बंधन काढून धार्मिक बाबतीत मिसळू देण्याची मोकळीक दिल्याबद्दल ही सभा त्या सर्वांचे आभार मानते.

भाषणे: विठोबा पंडे व डॉ. एन. वी. खरे.

ठराव नं २ : ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व अस्पृश्य हे हिंदू आणि सनातन धर्मातील असल्यामुळे सार्वजनिक धार्मिक अधिकार सर्वांस सारखे असावे व या धार्मिक गोष्टींचा सक्तीचा प्रचार अशी योजना करावी.

डॉ. मुजे व बॅ. गोविंदराव देशमुख.

ठराव नं ३ : मध्यप्रांत सरकारने अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींच्या हितासाठी दोन प्रतिनिधी कौन्सिलात घेण्याची व्यवस्था केली, त्याबद्दल आभार मानून, त्या प्रतिनिधींच्या संख्येत नागपूर सी. पी. तर्फे विठोबा रावजी मून पंडे व वऱ्हाड तर्फे पांडुरंग नंदराम भटकर यांच्यासारख्या माणसांची भर घालण्यासाठी कौन्सिलात अवश्य वाढ करावी, अशी विनंती ही सभा सरकारास करीत आहे.

धर्मदास नगरारे, भानुदास विठोबा, मुकुंद शेटे.

ठराव नं ४ : अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजासाठी शिक्षणाच्या बाबतीत वरच्या जागेतील लोकांनी तनमनधने करून खटपट करावी व सरकारने असल्या खटपटी करण्यास उत्साह येईल, अशा सवलती द्याव्यात असे या सभेचे मत आहे.

श्री. जी. आर. प्रधान व वासुदेव विठोबा.

ठराव नं ५ : सर्व हिंदू लोकांची एकी होण्यासाठी सर्वांस सारखे धार्मिक शिक्षण देण्याची शाळांतून व्यवस्था व्हावी. ते शिक्षण प्रयोगयुक्त असावे.[१३]

विठोबा रावजी हे महार सभेच्या दरवर्षी परिषदा भरवीत असत. जी. डी. फिलिप्स हे १९२० चे सुमारास वारल्यानंतर विठोबा हे महार सभेचे अध्यक्ष बनले. १९२३ साली चौथी महार परिषद वेला, ता. उमरेड, जिल्हा नागपूर येथे घेण्यात आली. श्री. दशरथ लक्ष्मण पाटील, मालगुजार हे त्या सभेचे संयोजक होते. ३० डिसेंबर १९२३ रोजी महार सभेची प्रचंड सभा नागपूर येथे घेण्यात आली. ॲडव्होकेट जी. आर. प्रधान हे या सभेचे अध्यक्ष होते. या सभेने विठोबा रावजी यांना कौन्सिलमध्ये घेण्यात यावे, असा ठराव पास केला.

विठोबा रावजी यांनी दि. ४-१-१९२४ रोजी मध्यप्रदेशाच्या गव्हर्नरला जो अर्ज पाठवला, त्यात त्यांच्या कार्याचे संक्षिप्त विवरण आहे. इंग्रज सरकारला पाठविण्यात येणाऱ्या अर्जातून कोणतेही भरमसाठ विधान करता येत नसे अथवा अवास्तव- अतिरेकी मजकूरही खपत नसे. १९२४ चा हा अर्ज विठोबा रावजी यांचे दलित चळवळीतील स्थान निश्चित करण्यास फार उपयोगी असल्यामुळे तो खाली सविस्तरपणे देण्यात येत आहे...[१४]

To,

His Excellency the Governor in Council,
Central Provinces, Nagpur.

Most respected Sir,

The undersingned most humbly and respectfully beg to submit the following with the hope that it will be favourably considered

(1) That he is the leader of Mahars and is also their religious preceptor and is therefore called 'The Guru Pande' of theirs. He is the president of Mahar Loyal Sabha and is trying his best to elevate the status of depressed classes for the last 20 years. He also did the work of preaching in Gorakshan Sabha and had delivered several lectures in that connection being proficient with the art of speaking. He has also built a Ghat at Ambala and also a temple there for the sole use of Mahars, that he is also the

leader of labourers.

(2) He every year holds Mahar Sabhas and conferences and he is known therefore to almost all officers, and big men such as Ministers, Executive Councillors and president of the C. P. Council. He is also acquainted with Sir, C. E. Low. All these officers will speak about his abilities in every respect. They also know how he is striving for depressed classes. It is on account of their sympathy and good feeling and at the request of the Mahar brethren including labourers, that the applicant is daring to apply to be nominated as a candidate in council on behalf of the depressed classes. His name also has been suggested in the Mahar Sabha which was held on 30–12–1923 under the Presidentship of Mr. G. R. Pradhan, pleader. Mr. K. Dick, the Government Advocate, also knows all about him as regards the part he has been playing in the interest of Mahars. He also did some service at the time of recruiting in war. He also took part in suppressing labour strike at Nagpur. He has been loyal to the Government all along.

(3) He files here with several documents about his work above referred which will justify his claims to be nominated as a member of the C. P. Council on behalf of depressed classes.

(4) It is therefore requested that on considering his claims, he should be nominated a member of C. P. Legislative council on behalf of depressed classes, as he is the leader, experienced old man of about 60 and is the resident of Nagpur proper, an important centre of the depressed classes of C. P.

N. B.–Some documents are in original and some are copies.

Sd/–
Vithoba Raoji Moonpande
Sant of Shanichari C. No.2
Nagpur.

Dated the
4th January 1924

शुक्रवार पेठेतील आग्यारामच्या देवालयात पहाटे दिंडी–भजनाकरिता विठोबाजी जात असत. तेथे डॉ. नियोगी, डॉ. परांजपे, डॉ. मुंजे आदी पुरोगामी स्पृश्य मंडळी येत असत. त्यातच धुंडिराजपंत ठेंगडी नावाचे सावरकरांच्या क्रांतिकारी धोरणाचे गृहस्थही होते. या सर्वांनी सार्वजनिक देवालयाची कल्पना उचलून धरली व विठोबास सक्रिय सहकार्य देण्याचे ठरविले. विठोबा सकाळी घरून निघत व

दिवसभर वर्गणी गोळा करण्यास फिरत. या देवालयासाठी नगर परिषद, नागपूरकडून अभ्यंकरांच्या पुतळ्याजवळ जागाही मिळाली होती.

तो महाशिवरात्रीचा दिवस होता. मार्च महिन्याच्या रखरखीत उन्हातून विठोबाजी सकाळी सात पासून दुपारी दोन वाजेपर्यंत चिंधुजी मिस्त्री, विठोबा दशरथ पाटील , मुकुंद मुरारकर यांच्यासोबत फिरले. दोन वाजता परत आले, तेव्हा ते फार आनंदात दिसत होते. जेवणखाण झाल्यावर त्यांनी थोडीशी वामकुक्षी केली. सायंकाळी इंदोरा येथे मजुरांची सभा होती म्हणून ४ वाजण्याच्या सुमारास ते घरून निघाले. कॉटन मार्केटच्या चौकापर्यंत आले. तेव्हा त्यांना बरे वाटेना, म्हणन तेथेच एका टिनाच्या झोपडयात पडले. वाटेने वस्तीतील मांगो नावाचा एक मुलगा जाताना दिसला. त्यासोबत घरी निरोप पाठविला, तेव्हा घरची मंडळी गेली. डॉ. मंडळी वेळेवर मिळाली नाहीत. सायंकाळी डॉ. परांजपे आले. बरीच पराकाष्ठा केली, परंतु यश आले नाही. हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे सायंकाळी ६ च्या सुमारास प्राणोत्क्रमण झाले.

आणि विठोबांच्या मृत्यूने दलित चळवळीचा एक कालखंड समाप्त झाला. एक झुंजार नेता, प्रभावी वक्ता, कुशल संघटक कालपटावरून पुसला गेला. परंतु त्याने अंबाळा तलावावरुन सुरु केलेल्या समाजजागृतीच्या जलाचा प्रवाह बाबासाहेबांच्या प्रचंड प्रवाहात विलीन झाला.

विठोबाजींचे व्यक्तिमत्व अतिशय प्रभावी होते. हिंदू पुढारी, गोरे राज्यकर्ते, सरकारी अधिकारी, ख्रिश्चन मिशनरी व नागपुरातील सर्व थरांत त्यांनी मानाचे स्थान पटकाविले होते. कामठीला एका मंदिरात प्रवचन करीत असताना त्यांचे प्रवचन ऐकण्यास कामठीतील हिंदू पलटणीला परवानगी देण्यात आली होती. शेकडो सैनिकांनी त्यांचे प्रवचन मुकाट्याने ऐकले होते अशी काही जुनी मंडळी सांगतात. हिंदू धर्मशास्त्राचे त्यांचे ज्ञान, वादपटुता, वक्तृत्व या गुणांमुळे ज्याप्रमाणे ते सभा जिंकीत, त्याचप्रमाणे विद्वानांवरही आपली छाप पाडीत असत. त्यांच्या अल्पशिक्षणाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे व्यक्तिमत्व व कर्तृत्व विशेष उठावदार ठरते. त्या काळी छापण्याचा प्रघात फारसा नसताना या गृहस्थाने पत्रके, रिपोर्टस् वगैरे छापून काढावीत (बरीचशी नष्ट झाली असावीत असे वाटते), यावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते.

ते सामान्य जनतेसमोर उपदेशपर भाषणे देत असत. त्यांची भाषणे उत्स्फूर्त असत. त्यांनी लिहून ठेवलेल्या काही भाषणांतील उतारे उद्‌बोधक वाटतील.[१५]

'गाय पहा. आपल्या जीविकाप्रमाणे मनुष्यास मदतगारी आहे. त्यामुळे हिंदू लोक तीस देवता मानून पूजा करितात. तसेच तिचे मरणसमयी देवता मानून तीस मातीस मिळवते तर ते खरे मातृभक्त होते व तिने त्यांचेवर केलेल्या उपकारांची क्षमा होती. परंतु तसे न करता तिचे चालू काळात, तिने मदत देतपावेतो, माता मानून आता तिचे गू, मुतसुद्धा खाऊ लागले व अन्ती तिचे उपकारास उत्तीर्ण

न होता तिला शिवले देखील नाही.

हा त्यांचा मातृघातकपणा आमच्या वडिलाने पाहून जसे झारेकार दगडाचा लोहा करून लोकोपयोगास आणितात, तसे या हिंदू देवमातेचे अन्ती विदारण करून हाडे, चामडे, गोरोचन देखील लोकोपयोगास आणिली.

त्या कालापासून जिवंत गाय, देव, माता त्यांची व मरणानंतर विदारण लोकोपयोगी आम्ही करावे, हे पक्षपातास मुख्य कारण आहे. (पक्षपात म्हणजे भेद-भाव.)

पहा, त्याच हिंदू कुलात गोंड, भिल वगैरे गाय, माय व बैल बाप मानून व त्याचाच दगड देवतापुढे बलिदान करून स्वहस्ते सेवन करतात. यापुढे मातृघातक-पणा तो कायसा आहे ? (तरी त्यांचा द्वेष करीत नाहीत.)

(तसेच) अविचारीपणे कुत्रे, मांजरे, जनावरे यांचा देखील द्वेष न करिता आम्ही मनुष्यदेहाचा द्वेष मानतो.

हे आपल्या बरोबर बसण्यास योग्य आहेत व आम्ही का नाही?'

(कंसातील मजकूर माझा.)

आणखी एका भाषणाची काही पाने उपलब्ध आहेत. या भाषणाची निव्वळ ६ पाने उपलब्ध आहेत. त्यात शाहू छत्रपतींबद्दल आदरपूर्वक उल्लेख आहे. 'शाहू छत्रपति करवीर यांनी उदार बुद्धीने आमचे क्लासची उन्नती करण्याकरिता नासिक नागपूर परिषदेत १० (दहा) हजार रुपये दिले' असल्याचा उल्लेख आहे. तसेच महाभारत पुराणाचे दाखले देऊन पुढे म्हटले आहे, 'शत्रु लोकांनी आपला अंमल बसवून गारोडयाचे सर्पासारखे आम्हास दीन करून आपले दबावात ठेवले आणि आमचे सर्वस्व हरण करून हलकट धन्दे व तशीच उदनावे देऊन अन्य ओळखीचे पंथ दृढ करविले आणि आम्ही महाअरी समजून आमच्या छायास्पर्शाचा बाट होत आहे. सुदैवे, आज आमचा भाग्यचंद्र उदयास येवून दयाळू व उदार श्री शाहू छत्र-पति महाराज दाता मिळाला'

आपल्या दारुण स्थितीस इंग्रज राज्यकर्ते मुळीही कारणीभूत नाहीत अशी विठोबांची रास्त भूमिका होती. इंग्रजांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी का प्रयत्न केले नाहीत व काय करायला पाहिजे होते, हे समजण्याइतपत विद्वत्ता विठोबाच्या अंगी नव्हती. परंतु इंग्रजी राजसत्तेशी एकनिष्ठ राहूनच आपण उन्नती करून घेऊ शकू अशी त्यांची मनोमन खात्री झाली होती, वरील भाषणातच पुढे म्हटले आहे –

'राज्यकर्त्यांचे कान, डोळे म्हटले म्हणजे जास्त करून शिक्षित भट बंधू आहे. ते पार्लमेंट वगैरे वगैरे कमेटीत शिकायता (तक्रार) करीत गेले असावे. त्याच्याप्रमाणे (सांगण्यानुसार) आम्हाला फलप्राप्तीचा वाटा मिळाला असावा.' प्रस्तुत भाषण १९२० नंतरचे असावे हे स्पष्ट आहे.

विठोबा हे लोकप्रिय राजनिष्ठ पुढारी असल्याचे दिसून येते. परंतु इंग्रज राजनिष्ठेबद्दल आजच्या पिढीने त्यांना दोष देणे उचित ठरणार नाही.

तत्कालीन अस्पृश्यांची परिस्थिती पाहता राजसत्तेकडूनच काही उद्धार झाल्यास होऊ शकेल ही अस्पृश्य पुढाऱ्यांचीच नव्हे तर आगरकरांसारख्या अनेक समाजसुधारकांची धारणा होती. सामाजिक सुधारणेस पारतंत्र्यासारखा अनुकूल काल नसतो, हे आगरकरांचे उद्‌गार आजही चिंतनीय आहेत.

विठोबांच्या कार्याचे लोण रायपूरपर्यंत पसरले होते. ते गुरुपंडे समजले जात. त्यामुळे कोणत्याही धार्मिक व सामाजिक कार्याबद्दल त्यांचा सल्ला घेतला जाई. पंडित रेवाराम कवाडे सांगत की, कोणत्याही जातपंचायतीत वाद माजला की विठोबा पंडे यांना बोलावण्यात येई व त्यांचे म्हणणे ग्राह्य मानण्यात येई. पूर्वी जातपंचायती या पोटजातीच्या होत, परंतु या पंचायतींची भांडणे सोडवण्यास विठोबा पंडे व किसन फागोजी बंदसोडे ही मंडळी मिळून जात असत. पोटजातीत चालीरीती सुधारणा करण्याचे प्रयत्न १९२० पर्यंतच्या काळात विठोबा पंडे, किसन फागोजी, कालीचरण नंदागवळी, गवई प्रभृतींनी केले.

१९१५ नंतर गवईनी डिप्रेस्ड इंडिया असोसिएशन नागपूर येथे काढली व या शाखेद्वारे चोखामेळा वसतिगृह सुरू करण्यात आले. १९२० साली नागपूरला अखिल भारतीय बहिष्कृत परिषद बनसोडे–गवईनी घडवून आणली. या परिषदेत विठोबा पंडे, मुकुंदा मुरारकर अथवा १९१३ च्या महार परिषदेतील कोणतीच प्रमुख मंडळी प्रकर्षाने भाग घेताना मात्र दिसून येत नाही. गवई, बनसोडे ही मंडळी विठोबा पंडे, कालीचरण नंदागवळी, मुकुंदा शेटचा इत्यादी तत्कालीन पुढाऱ्यांपेक्षा जास्त शिक्षित होती. अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेत शिक्षित नवीन नेतृत्वास पुढे आणावे या उद्देशाने जुनी कार्यकर्ती मंडळी मागे राहून कार्य करीत होती, असे काही जुनी मंडळी सांगतात.

एवढे मात्र खरे की, १९१९-२० पासून बनसोडे-गवई यांनी नागपूरच्या सार्वजनिक चळवळीची सूत्रे हळूहळू हाती घेतली. १९२४ साली विठोबा वारल्यानंतर त्यांचे सहकारी स्वतंत्रपणे सामाजिक व राजकीय कार्य करीत होते व पुढे ते बाबासाहेबांच्या चळवळीत सामील झाले. अर्थात हा भाग पुढचा आहे. १९२० च्या परिषदेपूर्वीचा महारांच्या सार्वजनिक चळवळीचा हा असा थोडक्यात इतिहास आहे.

वरीच विवेचनावरून खालीलप्रमाणे निष्कर्ष काढता येतील-

१) तलावावरील हक्काच्या लढ्यातून व धार्मिक संस्कारांच्या गरजेतून विदर्भातील दलित चळवळ जन्म पावली. त्याच चळवळीतून शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक चळवळीचा पाया घातला गेला.

२) मध्यप्रांत वऱ्हाडातील महारांच्या आद्य चळवळीचे सूत्रधार कालीचरण नंदागवळी, विठोबा रावजी मून संत पंडे, करणुजी विठ्ठल मालगुजार, गोमा गणेश सावरकर व मुकुंदा तुकाराम शेटचे हे होते.

३) कालीचरण नंदागवळी यांना पहिली मुलींची शाळा काढण्याचा मान प्राप्त होतो.

४) अंबाळा तलावावर घाट बांधून अस्पृश्यांना स्नानाची सोय करून देण्याचे महत्कार्य विठोबा यांच्या वाटचास जाते. शिवाय धर्मगुरू, समाजसुधारक, कुशल संघटक, वक्ते व मजुर पुढारी म्हणून दलित चळवळीचे ते आद्य प्रणेते ठरतात.

५) महारांतील पोटजातीत परस्परांचा विटाळ असूनही सर्व पोटजातींचे कार्यकर्ते एकोप्याने कार्य करण्यास पुढे सरसावले व ते सर्व १९१३ च्या परिषदेत सहभागी झाले हे विशेष आहे.

दलितांची चळवळ अशा प्रकारे उभी राहिली. झोपलेल्या समाजाला जागे करण्याचे प्रयत्न या काळात झाले. परंतु त्यांची व्याप्ती फार मर्यादित होतीच, प्रादेशिक व सामाजिक मर्यादा तर होतीच, परंतु समग्र अस्पृश्य समाजाला व्यापील असे तात्त्विक अधिष्ठानही तिला नव्हते. हे अधिष्ठान नंतर बाबासाहेबांनी दिले.

विठोबा रावजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नागपूरकडे उभारलेल्या चळवळीचा व अस्पृश्यांत निर्माण झालेल्या चैतन्याचा प्रभाव १९१३ पर्यंत हिंदू समाजसुधारकांना जाणवू लागला होता. 'अस्पृश्यांची उन्नति' या विषयावर नागपूरच्या टाऊन हॉल मध्ये डिसेंबरच्या १९१३ च्या पहिल्या आठवड्यात प्रो. जी. सी. भुते यांचे व्याख्यान झाले त्या व्याख्यानाचा समारोप करताना नागपूरचे सुप्रसिद्ध विद्वान कायदेपंडित व पुरोगामी विचारवंत डॉ. हरिसिंग गौर यांनी काढलेले उद्‌गार, तत्कालीन दलित चळवळीची उग्रता व एप्रिल १९१३ मध्ये झालेल्या परिषदेचा उमटलेला ठसा स्पष्टपणे दर्शवितात. डॉ. गौर याच्या वाक्यांनीच या लेखाचा देखील समोराप करण्यास हरकत नाही. ते म्हणतात–

'The forces of progress were already at work amongst these so called unt ouchables. They will not long remain outside the gates of Hindu orthodoxy, knocking and praying pietously for admission. They were already here and there, beginning to their power.'

'Slowly come a hungry people
As a lion creeping nigher,
Glares at one that nods
And winks behind a
Slowly dying fire' (Tennyson)

The old man- the orthodox Hindu was the image of a nodding person and the untouchable prdetariat was the lion. He need not say anything more.

Let them beware.[१६]

संदर्भ :-

१) सदाशिवराव माटे नागपुरातील वयोवृद्ध नागरीक. गेल्या ६० वर्षातील सर्व आंबेडकरी चळवळींशी निकटचा संपर्क. त्यांच्या वडिलांकडून त्यांना कळलेली ही माहिती.

२) कामदार रामटेक यांस पत्र क्र. २१४ दि. २६-१०-१९०३

३) रजिस्टर फरोक्त दि. २ मार्च १९०७

४) रामटेक येथील महारांचा अर्ज दि. २०-७-१९०७

५) करारनामा दि. ४-३-१९०७

६) करारनामा दि. २२-११-१९१०

७) निमंत्रणपत्र दि. ७-१२-१९१२

८) महार सभा नागपूर यांचा व्हॉइसरायबद्दल दिनोत्साह पत्रक दि. १५४-१९१३

९) Loyal Mahar Sabha, Nagpur.
(Brief report, Dt. 15-3-1914)

१०) Certificate from Rev. W. U. Waller Dt. 1-1-1916

११) ही माहिती विठोबांचे चिरंजीव श्री. वासुदेवराव मून यांच्याकडून मिळाली.

१२) पत्रक दि. १४-१२-२२

१३) चोखामेळा सुधारक मंडळ नागपूर पत्रक दि. ५-१२-१९२३

१४) ४-१-१९२४ च्या अर्जाची नकल. (या अर्जासोबत जोडलेल्या दस्त-ऐवजांची नावे दिलेली नाहीत.)

१५) भाषणांची हस्तलिखित पाने आहेत.

१६) Hitvada dated 6-12-1913

(**टीप** : या लेखातील सर्व मूळ कागदपत्रे डॉ. आंबेडकर रिसर्च इन्स्टिटयूट, नागपूर ९ या संस्थेत पहायला मिळतील)

स्वातंत्र्यपूर्व काळातील, मध्यप्रांत वऱ्हाडातील

३ अस्पृश्यांची शैक्षणिक चळवळ

मध्यप्रांतात शिक्षणखात्याची स्थापना १८६२ साली झाली. त्यावेळी प्रमुख शिक्षणसंस्था म्हणजे सागर येथील हायस्कूल होते. त्यात इंग्रजी व संस्कृत या भाषा शिकविण्यात येत. १८६१-६२मध्ये या शाळेत ३०० विद्यार्थी होते. पण ती सारी मुले श्रीमंतांची व प्रतिष्ठितांची होती. या विद्यार्थ्यांत एकही अस्पृश्य विद्यार्थी नव्हता.

रे. हिस्लॉप यांनी नागपूरला १८४६ साली पहिली इंग्रजी शाळा स्थापन केली. तत्पूर्वी 'शिक्षण हे सरकारचे कर्तव्य आहे असे नागपूरकर भोसल्यांना कधीच वाटले नाही.' १८२६ मध्ये ४६ मराठी शाळा होत्या, त्यांत ९३६ विद्यार्थी होते. इतर निःशुल्क पाठशाळांतून ३२३ विद्यार्थी वेदशास्त्र, फारशी, अरबी व तेलगू शिक्षण घेत. अर्थात यांत एकही अस्पृश्य विद्यार्थी असणे संभव नव्हते. १८५४ च्या शैक्षणिक परिस्थितीबद्दल प्रा. डोळके म्हणतात, 'त्यावेळी शिक्षण केवळ ब्राह्मण वर्गापुरते मर्यादित होते. शेतकऱ्याला सही देखील करता येणे ही दुर्मिळ गोष्ट होती.'

मध्यप्रांतात शिक्षणखात्याची स्थापना झाली तरी शिकविण्याकरता पुण्याकडून ब्राह्मण शिक्षक बोलाविण्यात आले. 'सामान्य जनतेकरिता शिक्षण' हे तत्त्व १८५४ नंतर स्वीकारण्यात आले. ईस्ट इंडिया कंपनीने 'फक्त उच्च वर्गास प्रथम शिक्षण द्यावे म्हणजे त्या वर्गांतून खालच्या वर्गात ते रुजू होईल' असे धोरण आखले होते. या सिद्धांतास Filtration Theory म्हणतात. १८५४ मध्ये चार्लस् वुड यांनी समग्र शिक्षणपद्धती प्रायमरी ते कॉलेजपर्यंत सार्वत्रिक असावी असे निवेदन ब्रिटिश पार्लमेन्टला पाठविले परंतु यातही अस्पृश्यांकरिता खास सोय कुठेही आढळून येत नाही. स्त्रीशिक्षण व मुसलमानांच्या शिक्षणाबद्दल रिपोर्टात सहानुभूती आहे, परंतु अस्पृश्यांबद्दल उल्लेखही नाही.

१९११ च्या सी. पी. अॅन्ड बेरार सेन्सस रिपोर्टाप्रमाणे १३ जाती अस्पृश्य म्हणून गणल्या गेल्या आहेत. बलाई, बंसोड, चांभार, धोबी, गंडा, घासिया, कतिया,

कोरी, कुंभार, महार, मांग, मेहतर व पंका. यांची एकूण लोकसंख्या ३०, ६०, २३२ होती. पैकी महार ११, ६५, १७७ असून त्यांचे शिक्षणाचे प्रमाण हजारी ९ होते.

वरील जातींची लोकसंख्या व शिक्षणाचे प्रमाण दर हजारी पुढीलप्रमाणे होते.

	लोकसंख्या	शिक्षिततेचे प्रमाण दर हजारी
१) बलाही	५२,३१४	५
२) बसोड	५२,९४७	१
३) चांभार	९,०१,५९४	२
४) धोबी	१,६५,४२७	११
५) गंडा	१,५१,७८७	३
६) घासिया	४३,१४२	उपलब्ध नाही
७) कतिया	४१,३११	१४
८) कोरी	३९,६२८	१६
९) कुंभार	१,१८,५२०	१४
१०) महार	११,६५,१७७	९
११) मांग	८३,५७५	४
१२) मेहतर	२९,९१६	९
१३) पंका	२,१४,८९४	९
एकूण	३०,६०,२३२	९७

अस्पृश्यांत शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य प्रथम ख्रिश्चन मिशनरी सोसायटयांनी हाती घेतले अस्पृश्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या २२ मिशनरी संस्था १९२० च्या सुमारास मध्यप्रदेशात कार्य करीत होत्या.

१९२०–२१ मध्ये अस्पृश्यांकरिता एकूण ४२ शाळा चालविल्या जात असत, त्यांपैकी १४ खाजगी (Unaided) होत्या. उरलेल्या २८ पैकी १ सरकारतर्फे, ३ डिस्ट्रिक्ट कौन्सिलतर्फे, २ म्युनिसिपल कमेटीतर्फे व २२ मिशनतर्फे चालविल्या जात. या २८ शाळांतून १२३५ अस्पृश्य मुले व ३४ मुली शिक्षण घेत असत.

वरील शाळांव्यतिरिक्त ज्या सामान्य शाळा असत, त्या शाळांतील अस्पृश्य मुलामुलींची संख्या खालीलप्रमाणे होती:-

	हायस्कूल	मिडलस्कूल	प्रायमरी स्कूल
अस्पृश्य मुले	२०	२२४८	२४९७८
मली	—	३९	२५१८
एकूण	२०	२२८७	२७४९६

या शिवाय १२ नाईट स्कूल्स सुरू करण्यात आली होती. यांपैकी ४ डिप्रेस्ड

क्लासेस मिशनतर्फे चालविण्यात येत. सामान्य शाळांमधून अस्पृश्य मुलां-मुलींना बसण्याची कोणतीच सोय नव्हती. इतकेच नव्हे, तर सरकार अथवा लोकल बोर्डस-मार्फत अशी सोय करवून घेण्याचीही योजना नव्हती. अस्पृश्य मुलामुलींना इतरां-पासून वेगळे, चटयांवर किंवा जमिनीवर बसविण्यात येई. काही शाळांतून अस्पृश्य मुलांना वर्गाबाहेर व्हरांड्यात बसावे लागे. 'सर्व विद्यार्थ्यांना समान लेखावे' हे तत्त्व १८७० साली स्थानिक स्वराज्य संस्थांना लावण्यात आले व त्याप्रमाणे एज्यु-केशन मॅन्युअलमध्ये हे तत्त्व अनुस्यूत करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात मात्र हे तत्त्व मुळीच पाळण्यात येत नसे. १९०५ साली नागपूर जिल्ह्यात काही महार मुलांच्या प्रवेशाला इतर मुलांनी व त्यांच्या पालकांनी हरकत घेतली.

मागासवर्गीयांच्या मुलांना प्राथमिक शाळेत इतर मुलांपासून वेगळे ठेवण्यात येई व त्यांना वर्गाबाहेर पडवीत बसविले जाई. या पंक्तिप्रपंचास मागासवर्गीयांनी कडाडून विरोध केला, परंतु त्याचा काहीच परिणाम होत नाही असे दिसून येताच, शाळेत भरपूर जागा असून ही, त्यांनी वेगळी शाळा स्थापन केली.

(इंटेरिम रिपोर्ट ऑन एज्युकेशन, १९२९–३०, पृष्ठ २२०)

चांदा येथील एका सरकारी हायस्कूलमध्ये देखील अशाच प्रकारची घटना घडल्याचे सर फ्रँकस्लाय या इंग्रज गव्हर्नरने नमूद केले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वरिष्ठ वर्गाच्या लोकांनी प्रथम अस्पृश्य मुलांच्या प्रवेशास हरकत घेतली. परंतु जेव्हा त्यांना 'समान वागणुकीचे' (Equal treatment) तत्त्व सांगण्यात आले, तेव्हा त्यांनी आपली सर्व मुले त्या शाळांतून काढून घेतली नि दुसरी शाळा स्थापन केली.[१]

१९३०–३२ च्या सुमारास नागपूरच्या भिडे कन्या हायस्कूलमध्ये एका महार मुलीस प्रवेश मिळविण्याकरिता प्रयत्न केला असता शाळेच्या संचालकांनी नाकारले. परंतु म्युनिसिपल कौन्सिलर श्री. तुलाराम साखरे यांनी जेव्हा त्यांना 'प्रवेश दिला नाही तर ग्रँट बंद करू' अशी ताकीद दिली, तेव्हा त्या मुलीस प्रवेश मिळाला.

अस्पृश्य मुलांना शाळेत प्रवेश न देणे, मिळाल्यास त्यांना इतर मुलांसोबत बसू न देणे, बसू दिले तरी इतर मुलांनी त्यांच्याशी समरस न होणे, इतरांबरोबर त्यांना पाणी पिण्याची, डबा खाण्याची अथवा खेळ खेळण्याची मनाई असणे, अशा परिस्थितीत शिक्षकवर्ग या मुलांकडे लक्ष देईल, ही अपेक्षाही करवत नाही. आज सर्वत्र शिक्षणाचा प्रसार झाला असताही महाविद्यालयांतील डॉक्टरेट मिळविणारे विद्वान प्राध्यापक जातीय मनोवृत्तीचे दर्शन घडविताना दिसतात. नागपूर विद्यापीठातील एका प्राध्यापकाने जातीय विद्वेषाने एका अस्पृश्य विद्यार्थ्याला कसे झोडपले ही घटना काही फारशी जुनी नाही. परंतु प्रॅक्टिकल्सना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना मुद्दाम नाव विचारून त्यांच्या नावावरून जातीचा शोध घेणे व अस्पृश्य विद्यार्थी असल्यास त्यांना कमी मार्क्स देणे, मेडिकल-इंजिनियरिंग मध्ये वर्षानुवर्षे काही विद्यार्थ्यांना निव्वळ जातीच्या नावाखाली उत्तीर्ण होऊ न देणे, युनिव्हर्सिटीत एखादा अस्पृश्य

विद्यार्थी मेरिटमध्ये येत असेल, तर त्याच्या जातीचा शोध घेऊन, अस्पृश्य असल्यास त्यास मार्कस् कमी पडतील याची खबरदारी घेणे, वगैरे घटना आजही उच्चभ्रू म्हणविणारी मंडळी करीत असल्याची बोलवा अस्पृश्य विद्यार्थ्यांत व प्राध्यापकांत आढळते, मग त्या कट्टर जातिनिष्ठेच्या काळात अस्पृश्य विद्यार्थी आपले शिक्षण कोणत्या परिस्थितीत पूर्ण करीत असतील, याची कल्पनाच केलेली बरी.

अस्पृश्यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक दुर्दशेचे अतिशय विदारक चित्रण नानासाहेब गवई यांनी दिनांक १६ मार्च १९२१ रोजी केले होते. ते म्हणाले,

'स्वत:च्या देशबांधवांकडून व धर्मबांधवांकडून जेवढा अन्याय व अत्याचार महार, मांग आदी लोकांना सोसावा लागतो, तेवढा जगाच्या पृष्ठभागी इतर कोण्या समाजास सहन करावा लागत असेल, असे मला वाटत नाही.

'खेडचात आमच्या मुलांना महत्प्रयासाने प्रवेश मिळतो. जर प्रवेश मिळालाच तर इतर मुलांसोबत त्यांना बसू देण्यात येत नाही.त्यानंतर त्यांच्याकडे कुणीही लक्ष देत नाही. अनेकदा त्यांना शिक्षकांकडून जीवघेणी शिक्षा मिळते, जेणेकरून ही मुले शाळा सोडून निघून जातात.'

अस्पृश्य समाजाचा शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास व्हावा, अशी अंत:करणात तळमळ बांधून विठोबा रावजी मूनपंडे, किसन फागोजी बनसोडे, नानासाहेब ग. आ. गवई, कालीचरण नंदागवळी व पुढे बाबू हरदास एल्. एन्., ग. म. ठवरे आदी कार्यकर्ते कार्य करीत होते. स्टॅटचूटरी कमिशनला (सायमन कमिशन) पाठविलेल्या २४-२-२९ च्या निवेदनावर सी. पी. डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशनतर्फे महार, मांग, चांभार व भंगी या सर्व जातींच्या प्रतिनिधींच्या सह्या आहेत. यात महारांतर्फे जी. टी. मेश्राम, कि. फा. बनसोडे, कालीचरण नंदागवळी, हरदास एल्. एन् व संभाजी गोडघाटे यांची नावे कमिशनसमोर साक्ष देण्यासाठी सुचवली आहेत.

चांभारांतर्फे बिलासपूरचे एम. एल. सी. रतीराम व नागपूरचे हिरालाल पूरन राज पंडवार, मांगांतर्फे हैबती देवाजी बेहाडे व भंग्यांतर्फे साधुराम मझवी यांची निवेदनावर नावे आहेत.

या डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशनतर्फे नागपूरला १९१५ साली खलाशी लाईनमध्ये चोखामेळा वसतिगृह नावाचे होस्टेल सुरू करण्यात आले. सरकारकडे अनुदान मागण्याकरिता १९२० च्या डिसेंबरमध्ये संस्थेचे सेक्रेटरी श्री. जो. ए. उपाख्य नानासाहेब गवई यांनी अर्ज पाठवला. या अर्जातील माहिती फार बोलकी आहे. त्यावेळी वसतिगृहात एकूण १७ विद्यार्थी होते व मासिक खर्च रुपये २८० होता. हा संपूर्ण खर्च मुख्यत: अस्पृश्य समाजातून वर्गणी काढून करण्यात येत असे.

'शिक्षणानेच अपृस्श्यांना त्यांच्या पतितावस्थेची जाणीव होईल व ते त्यातून उन्नत होण्याचा प्रयत्न करतील. उच्चवर्णीय लोकांना या वर्गाबद्दल किंचितही सहानुभूती नाही. आणि म्हणून सरकारने या पवित्र कार्यास मदत करावी.' मुंबईच्या

डिप्रेस्ड क्लास मिशन सोसायटीला मुंबई सरकारने लिहिलेल्या पत्राचा उल्लेख करून अर्जदाराने संपूर्ण खर्चाच्या अर्धा खर्च सरकारने होस्टेलला द्यावा अशी मागणी केली आहे. या होस्टेलचा खर्च कोल्हापूरच्या महाराजांच्या देणगीमधून करण्यात येत असे. २२-४-१९२१ रोजी संस्थेच्या कार्यकारिणीत ७ सदस्य व एक सेक्रेटरी होते. जी. पी. डिक C. I. E, M. L. C, Bar at law हे अध्यक्ष होते. संस्थेच्या अर्जावर इन्स्पेक्टर H. S. Staley व W. N. Maw, I. C. S. कमिश्नर, नागपूर डिव्हिजन यांनी संस्थेची पाहणी केली. कमिश्नरने सरकारला पाठविलेल्या पत्रात मात्र म्हटले की, होस्टेलकरिता कोणतीच सरकारी ग्रँट देऊ नये. तसे केल्यास अस्पृश्यांकरिता कार्य करणाऱ्या मिशनरी संस्था देखील सरकारला मदतीसाठी अर्ज करतील. श्री. मेहचू, डी. पी. आय. यांनी देखील असेच मत दर्शविले आहे. ते म्हणतात,

'अनुदान त्यांच्यात फुटीरतेची भावना निर्माण करते. आपण नेहमी उच्च आदर्श बाळगायला हवेत.'

अर्थात इंग्रजांचे उच्च आदर्श या देशातील सामाजिक परिस्थितीशी जुळणे शक्यच नव्हते. १९२०-२१ च्या सुमारास मध्यप्रांत व वऱ्हाडमध्ये तीन वसतिगृहे अस्पृश्य समाजाकडून चालविली जात. त्यांपैकी नागपूरच्या वसतिगृहाची माहिती वर आलेलीच आहे. दुसरे अमरावतीलाही चोखामेळा वसतिगृह होते.तिसरे जानोजी फ्री बोर्डिंग हाऊस, अकोला हे वसतिगृह[३] १८८४ च्या सुमारास जानोजी खंडारे नावाच्या एका श्रीमंत महार जंगल ठेकेदाराने स्थापन केले होते. बाहेर गावाहून अकोल्यास शिकायला आलेल्या प्रत्येक अस्पृश्य विद्यार्थ्यास जानोजी आपल्या वसतिगृहात ठेवून घेत. त्यांच्या राहण्याची व जेवणाची सोय ते स्वत:च्या खर्चाने करीत. पुढे हे वसतिगृह त्यांची पत्नी व चिरंजीव केशव जानोजी खंडारे हे चालवीत. १९२७ नंतर केशवरावांनी ती जबाबदारी रामभाऊ मांडवधरे व नागोराव माने यांच्यावर सोपवली. विदर्भाचे दलित समाजाचे झुंजार नेते श्री. संभूजी अनसूजी खंडारे यांनी देखील वसतिगृह चालविले. या वसतिगृहात १९२७-२८ साली २९ मुले राहत. सुपरिटेंडेंट मांडवधरे हे मुलांचा अभ्यासक्रम व दिनचर्या बघत. श्री. संभूजी खंडारे पत्रव्यवहार सांभाळीत, तर श्री. लक्ष्मण वानखेडे वर्गणी व देणग्या गोळा करीत. सर्व मुलांना फुकट राहण्याची व भोजनाची व्यवस्था असे. श्री. बॅनर्जी, डेप्युटी कमिश्नर अकोला यांनी १८-२-२८ रोजी भेट दिली व म्हटले की, 'सुरुवातीपासून ३०० विद्यार्थी या वसतिगृहातून बाहेर पडलेत. या वसतिगृहाच्या दिनचर्येत लाठी-काठी वगैरे व्यायामाचा समावेश होता व ही मुले अकोल्याच्या शिवाजी व्यायामशाळेत डॉ. सोहोनी नावाच्या शिक्षकाकडून व्यायामाचे शिक्षण घेत.'

शिक्षणाच्या प्रसाराच्या दृष्टीने अस्पृश्य कार्यकर्त्यांनी प्रथम वसतिगृहाच्या स्थापनेकडे लक्ष दिले, ही विचार करण्यासारखी बाब आहे. त्या काळात महारांना चोखामेळा, चांभारांना रविदास असे संत हेच आदर्श असल्यामुळे या सर्व वसति-

गृहांची नावे संतांची आहेत. विदर्भातील प्रत्येक तालुक्यात आज एखादे तरी चोखामेळा वसतिगृह सापडते. १९२० ते ३५ च्या दरम्यान विदर्भातील बहुतेक प्रमुख तालुका अथवा जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृहे स्थापन करण्यात आली. यवतमाळ येथील वऱ्हाड महार सुधारक मंडळाने जून १९२४ पासून यवतमाळ येथे श्री. चोखामेळा फ्री बोर्डिंग स्थापन केले. या संस्थेत १९२७–२८ साली ६७ मुले व २८–२९ साली ३५ मुले होती. या वसतिगृहात वऱ्हाडच्या ४ जिल्ह्यांतून विद्यार्थी शिकायला येत. या संस्थेचे सेक्रेटरी विठ्ठल दशरथ मकेसर होते.

केदारेश्वराच्या टाक्यात गणपती बुडविण्याची मनाई असूनही, या संस्थेतर्फे १९२४ साली गणपती बसवून पहिल्यांदाच ही बंदी उठविण्याचा उपक्रम घडवून आणला. तसेच बोर्डिंगमध्ये शिकत असलेल्या एका अनाथ पोरक्या 'कौशल्याबाई' नावाच्या मुलीचे लग्न रायपूरनिवासी शंकरराव धोट नावाच्या विद्यार्थ्याशी करण्यात आले. या संस्थेच्या विद्यमान १७–१८ मे १९२८ रोजी वणी, जि. यवतमाळ येथे तालुका अस्पृश्य परिषद रा. लक्ष्मण कृष्णाजी ओगले यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या परिषदेत स्पृश्य मंडळींनीही भाग घेतला होता. सामाजिक, धार्मिक, नैतिक व शैक्षणिक बाबतीत बरेच ठराव पास करण्यात आले. वस्तीतील लोकांकरिता एक मोफत वाचनालय देखील या संस्थेने चालविले होते. अशा अनेक सामाजिक चळवळी या संस्थेमार्फत करण्यात येत. या संस्थेला महात्मा गांधींनी देखील भेट देऊन त्यातील स्वच्छतेबद्दल सहजोद्गार काढले होते.

या वसतिगृहास राव. आर. जी. मुंडले, मा. श्री. अणे, सदाशिवशास्त्री भिडे, न. चिं. केळकर आदि सुप्रसिद्ध हिंदू नेत्यांनी भेट देऊन स्वच्छता व टापटीप याबद्दल संस्थेची तारीफ केली होती. डॉ. पफर सारखे मिशनरी लिहितात...

The self respect for the community is bound to care for the improvement of its sons. The Mahars wish to arise, let them.

संस्थेच्या रिपोर्टात ४ आण्यांपासून वर्गणी देणाऱ्या सर्वांची नावे छापली आहेत. एकूण १२०० वर्गणीदारांकडून १८७३।६।६ रुपये गोळा केलेले दिसून येतात.

अपृश्यांत शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून अस्पृश्य पुढारी निरनिराळ्या ठिकाणी सभा, सम्मेलने बोलावून लोकजागृती करीत असत. अस्पृश्यांच्या दैन्यावस्थेकडे सरकारचे लक्ष वेधीत. ३० मे १९२१ रोजी बडनेरा येथे विदर्भ महार परिषदेने १३ ठराव पास केले. ही परिषद किसन गोविंद इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेली होती. यातील शिक्षणविषयक ठरावात, १) निःशुल्क व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, २) स्कॉलरशिपच्या संख्येत वाढ, ३) मॅट्रिक परीक्षेसाठी अस्पृश्य विद्यार्थ्यास वयाची मर्यादा नसावी, ४) सातवा वर्ग पास झालेल्यास नॉर्मल स्कूलमध्ये प्रवेश, ५) नॉर्मल स्कूलच्या विद्यार्थ्यांना इतरांपेक्षा जास्त स्कॉलरशिप (कारण त्यांना सार्वजनिक वसतिगृहात प्रवेश नसल्यामुळे जास्त खर्च येत असे), ६) प्रत्येक तालुक्यात अस्पृश्यांकरिता सरकारतर्फे फ्री बोर्डिंग सुरू करणे, ७) उपशाळा निरी-

क्षकांत अस्पृश्य शिक्षकांची नेमणूक हे मुद्दे होते.

१४ जून १९११ च्या सरकारी ठरावान्वये इतर मुलांच्या स्पर्धेत मार्क मिळविणाऱ्या अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी सरकारने स्कॉलरशिप्स जाहीर केल्या होत्या. परंतु १९१५ पर्यंत एकही स्कॉलरशिप दिली गेली नाही. १९१६ पासून १९२१ पर्यंत एकूण ६६ मिडलस्कूल्स व ४४ हायस्कूलसना स्कॉलरशिप्स देण्यात आल्या. या स्कॉलरशिप्स ५, ७ व १० रुपयांच्या असत. अस्पृश्य मुले ही आईवडिलांना त्यांच्या मजुरीत मदत करण्यास जातात, त्यामुळे पूर्ण वेळ शाळेत जाऊ शकत नाहीत. म्हणून त्यांना पूर्ण खर्च भागेल एवढी स्कॉलरशिप देण्यात यावी, ही अस्पृश्य कार्यकर्त्यांची मागणी शासनाने मान्य केली नाही. मात्र १९२०–२१ नंतर दरवर्षी कॉलेजला ५, हायस्कूलला ११ व मिडलस्कूलला २२ स्कॉलरशिप्स देण्यात आल्या. स्कॉलरशिपच्या संख्येत वाढ झाली, परंतु रकमेत नाही. विशिष्ट वयोमर्यादा घातल्यामुळे अनेक अस्पृश्य विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्त्यांना मुकावे लागले.

अस्पृश्यांच्या शैक्षणिक व आर्थिक दारिद्र्याकडे सरकारचे व जनतेचे लक्ष वेधावे म्हणून श्री. के. जी. (कालीचरण) नंदागवळी M. L. C. यांनी १६–३-२१ रोजी म. प्र. लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये एक ठराव मांडला. या ठरावानुसार खालील बाबींचा विचार करण्याकरिता सरकारने एक कमेटी नेमावी असे सुचविले. या ठरावास नानासाहेब गवईंनी अनुमोदन दिले.

१) अस्पृश्यांना सरकारी नोकऱ्यांत जागा देणे,

२) तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाच्या सोयी अस्पृश्यांना उपलब्ध करणे,

३) अज्ञानामुळे त्यांच्याकडून होणाऱ्या गुन्ह्यापासून व नानातऱ्हेच्या दुराचारापासून परावृत्त करणे,

४) कोतवालांची परिस्थिती सुधारणे,

५) अस्पृश्यांना अन्यायापासून मुक्त करणे,

६) अस्पृश्यांना वसाहतीकरिता जंगलरहित जमिनीची व्यवस्था करणे.

वरील सहा बाबींपैकी पहिल्या दोन बाबींवर चौकशी करण्याकरिता समिती नेमण्याचा ठराव कौन्सिलने पास केला. त्यानुसार खालील सदस्यांची एक समिती सरकारने (२१–६–१९२१) नेमली.

१) श्री. ए. ई. नेल्सन, O. B. E, I. C. S, M. L. C. अध्यक्ष,

२) श्री. जी. पी. डिक्, C. I. E, M. L. C.

३) श्री. रावबहादुर एम. जी. देशपांडे, M. L. C.

४) श्री. के. जी. नंदागवळी, M. L. C.

५) श्री. जी. ए. गवई, M. L. C.

६) श्री. इ. इ. ए. कोव्ह, इन्स्पेक्टर ऑफ इन्डस्ट्रियल स्कूल.

७) श्री. पी. जे. एच्. स्टेंट, I. C. S. सेक्रेटरी.

या कमेटीने २९–८–१९२१ रोजी श्री. आर्मस्ट्रॉंग, डी. आय. जी. पोलीस व

श्री. मेहयू, डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन्स यांना साक्षीदार म्हणून तपासले. पुढे ५–१२–२१ रोजी डायरेक्टर ऑफ इन्डस्ट्रीज आणि श्री. भवानीशंकर नियोगी, सी. पी. अॅन्ड बेरार डिप्रेस्ड क्लास मिशन सोसायटीचे प्रेसिडेंट (विदर्भ शाखा) यांच्या साक्षी झाल्या. कमेटीने आपला रिपोर्ट १८ मे १९२२ रोजी सरकारला सादर केला. सरकारने या रिपोर्टाचा विचार करून १०–११–१९२२ च्या ठरावाने काही बाबी मान्य केल्या व काही नाकारल्या. अस्पृश्यांकरिता इतरांपेक्षा वेगळ्या शिष्यवृत्त्या ठेवल्या नाहीत अथवा विद्यार्थ्यांची आयुर्मर्यादाही वाढविली नाही. तसेच वसतिगृहांना त्यांच्या खर्चाच्या निम्मे अनुदान देण्याचा सल्ला मान्य केला. कमेटीने सुचविलेले अस्पृश्यांच्या शिक्षणाकरिता सुमारे २,३५,००० रु. अनुदान तर सरकारने मंजूर केले नाहीच, परंतु वरपांगी उपदेश मात्र केलेला आढळतो. 'अस्पृश्यांची शैक्षणिक उन्नती त्यांचेच हातात आहे' असे सरकार म्हणते.

अस्पृश्य समाजाचे नैतिक आणि भौतिक जीवनमान वाढविण्यास स्वाभिमानाची शिकवण हाच एकमेव मार्ग आहे व शिक्षणाद्वारेच हे शक्य आहे.

सरकारने नोकऱ्यांतील परिस्थितीसंबंधी केलेले विधान फारच मजेदार आहे-

अस्पृश्यांना सरकारी नोकऱ्यांत अल्प प्रतिनिधित्व आहे, याला कारण शैक्षणिक प्रगतीचा लाभ त्यांनी घेतला नाही हे आहे. ही शैक्षणिक प्रगती त्यांना स्वप्रयत्नानेच साध्य करायची आहे.

पुढे म्हटले आहे की, या वर्गाची सामाजिक व धार्मिक बाबतीत होणारी कोंडी सरकार पूर्णपणे जाणते, परंतु सरकार या बाबतीत काहीच करू शकत नाही. वरिष्ठ नोकऱ्यांच्या बाबतीत अस्पृश्यांत लायक उमेदवार मिळत नाहीत व तसे मिळेपर्यंत काहीच करता येत नाही, असे सरकार म्हणत असे. खालच्या श्रेणीच्या वर्गात नोकऱ्यांत अस्पृश्यांना जागा आहेतच, परंतु नेमणुकीच्या वेळी इतरांसोबत गुणवत्तेप्रमाणेच त्यांचा विचार व्हावा, असे सरकारने स्पष्ट केले आहे. त्या काळात मध्यप्रांत सरकारमध्ये विभिन्न खात्यांत किती अस्पृश्य चतुर्थ श्रेणी (Menials) कर्मचारी होते, हे खालील आकड्यांवरून स्पष्ट होईल-

	एकूण कर्मचारी	अस्पृश्य कर्मचारी
अॅग्रिकल्चर डिपार्टमेंट	८५३	१७६
पी. डब्ल्यू. डी.	७४७	२२४
इतर सर्व खाती	५२२०	१९१
	६८२०	५९१

मिनिस्टेरियल म्हणजे कारकुनी विभागात मध्यप्रदेश सरकारमध्ये अस्पृश्यांची संख्या पुढीलप्रमाणे होती-

एकूण खाती	एकूण कर्मचारी	अस्पृश्य कर्मचारी
१९	४३६९	१९

हे १९ कर्मचारी फक्त सहा खात्यांत काम करीत होते. त्यापैकी P. W. D. व फॉरेस्टमध्ये प्रत्येकी ५ कारकून होते. ज्याला सब्‌ऑर्डिनेट सर्व्हिसेस म्हणतात अशा Executive जागांवर तर अस्पृश्य अधिकारी नावालाही नव्हता. नाही म्हणायला १५०६ शिक्षकांत ३६० शिक्षक, ९४५५ पोलिसांत २२९ पोलीस व जमादार आणि २००० माहुतांपैकी २४५ माहूत (जंगलविकास) अस्पृश्यांपैकी होते.

शिक्षणविषयक चर्चेमध्ये या आकडयांचे तसे प्रयोजन नव्हते. परंतु सरकारने या नोकऱ्यांचा संबंध शिक्षणाशी जोडला आहे व शिक्षणात अस्पृश्यांची प्रगती व्हावी अशी कोणतीही प्रभावी योजना आखलेली नाही. शिवाय पोलिसखात्याच्या नोकरीत अस्पृश्यांना मज्जाव कसा होता, जे पोलिस नोकरीवर होते त्यांना कसा त्रास होत होता वगैरे गोष्टींची चर्चा करण्याचे स्थलाभावी टाळतो. याच रिपोर्टाच्या अनुषंगाने शिक्षणविषयक जे सरकारचे धोरण होते त्याची शहानिशा करूया.

'अस्पृश्यांना सामान्य शाळांत स्पृश्य वर्ग बसू देखील देऊ इच्छित नाही, मग तो समतेची वागणूक कशी देणार ? स्वाभाविकपणे, अस्पृश्यांकरिता स्वतंत्र शाळा स्थापन करण्यात याव्यात अशी सूचना पुढे आली. परंतु या सूचनेला अस्पृश्यांनीच नाही, तर सरकारने देखील विरोध केला.

डॉ. एम. वी. नियोगी, प्रेसिडेंट, डिप्रेस्ड क्लासेस मिशन, नागपूर यांनी आपले मत नोंदताना स्पष्ट म्हटले की,

'अस्पृश्यांना स्वतंत्र शाळा नसाव्यात.'

'ज्या उद्योगधंद्यांत ते वंशपरंपरागत काम करतात त्या धंद्यांचे प्रशिक्षण देण्याकरिता त्यांना खास सवलती द्याव्यात. उदा. हातमाग, शेती, चामडी कमावणे, जोडे बनवणे, इ.'

म्हणजे वंशपरंपरा चाललेल्या, ढोरांची कातडी काढण्याच्या वगैरे धंद्यांचे ट्रेनिंग अस्पृश्य विद्यार्थ्यांना द्यावे. नाहीतरी म. गांधीही याशिवाय वेगळे काय म्हणत? डॉ. नियोगी हे सुरुवातीपासून गांधीवादी होते. सरकारतर्फे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष श्री. ए. इ. नेल्सन यांनी सरकारी धोरणाचे केलेले समर्थन फारच तर्‍हेवाईक वाटते. त्यांच्या मते –

अस्पृश्य वर्गांवर धार्मिक व सामाजिक अन्याय होतो असे म्हणतात. धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे शासनाचे अनेक वर्षांपासून धोरण आहे. सामाजिक अन्यायाबाबत कोणतेही बंधन कायद्याने लादलेले नाही.

परंतु ठरावावर बोलताना श्री. नंदागवळी यांनी स्पष्ट म्हटले होते की, माझ्या ठरावाचा धर्माशी काही संबंध नाही. पुढे त्यांनी सरकारी धोरण हे प्रत्यक्षात कसे धुडकावले जाते याची उदाहरणे दिली. ते म्हणाले –

शासनाने आपले उदार धोरण स्पष्ट केलेले नाही, परंतु शासकीय अधिकारी त्याची अंमलबजावणी करीत नाहीत. भंडारा येथील दिवाणी कोर्टात एका महाराला नोकरी नाकारण्यात आली. कामठी येथील पोस्ट ऑफिसात छळाला त्रासून एका महार कर्मचाऱ्याने राजीनामा दिला. त्याच्या भावाने पोलिस सब्-इन्पेक्टर करिता अर्ज दिला, परंतु तो रद्द करण्यात आला. गोंदिया नगरपरिषदेत मी स्वत: सहसचिवाकरिता अर्ज दिला, परंतु ते अरण्यरुदन ठरले.

सरकारने नेमलेल्या कमेटीने श्री. मेहचू यांची तपासणी केली. ते आपल्या साक्षीत म्हणाले –

अस्पृश्यांनी हक्क म्हणूनच इतरांसोबत शैक्षणिक अधिकार मागायला हवेत. त्यांनी शक्यतोवर खास सोयी व सवलतींची मागणी करण्याचे टाळावे. एखाद्या शाळेस आपण भेट दिली तर आपणास ही मुले इतर मुलांपासून खूप दूर बसलेली आढळतील. खरे पाहता, हिंदू मुलांना हे शोभून दिसत नाही. अस्पृश्यांनी स्वत:च्या हिताकरिता वेगळ्या शाळा व सवलती मागाव्यात असे मला वाटत नाही. जर त्यांना वेगळ्या शाळा व सवलती दिल्या, तर ते इतर शाळांपासून विलग होणे अपरिहार्य आहे.

मेहचूच्या वरील विधानातील विसंगती वरवर पाहणाऱ्याला देखील लक्षात येईल. 'आई जेवू घालीना व बाप भीक मागू देईना' अशी अस्पृश्यांची स्थिती होती. एकीकडे शाळेत घेणे कठीण होते, तर दुसरीकडे त्यांना स्वतंत्र शाळा काढण्यास मनाई होती. अध्यक्ष कोव्ह आणि सदस्य नानासाहेब गवई आणि मि. डिक यांनी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन्स, मध्यप्रदेश, श्री. मेहचू यांना नाना तऱ्हेने उलटसुलट प्रश्न विचारले, परंतु मेहचू आपल्या मतावर अढळ राहिले. मि. डिक यांचे प्रश्न महत्त्वाचे असल्यामुळे ते येथे देणे अस्थानी ठरणार नाही.

Mr. Dick- It seems to me that you have left over the fact that we have here to deal with a problem in which the child who is being sent to school is infected with something that makes him unfit to attend school. For a time, in the eyes of his people, as well as in the eyes of these whom he meets in the school, it is felt that he should be kept apart. The child is ill. He has to be segregated, he knows he has to be segregated and his pepole know it. The depressed classes are like this sick child. Are you going to say to them, ' you must drop altogether the idea that you are a depressed class- I am not going to give you a special school ' when you know, as a fact, that they do not consider themselves the equals of other ? If you just think for a moment like this, would you not qualify your statement? Until they reach that star-

ting point from which they might see that they can claim equal rights, would you not concede that they should receive special treatment ?

Mr. Mayhew–Your analogy of a sick child is most dangerous. It is materially and morally bad for the two classes to be segregated. I mention the child is not sick.

Mr. Dick–There are various facts staring at us in the face. The Depressed Classes do not come forward to claim their rights, they do not claim these scholarships, they are repelled by the other classes in the school. Can we get rid of these facts? It is not merely a question of dealing with a backward class. We see their intelligence. Their intelligence is the same and perhaps better in some respects. Are you still inclined to adhere absolutely to your statement that this problem is met by the common sense rule of ' Go and claim your rights ' when they themselves think that they have no claim for that right ?

Mr. Mayhew–I stick to my point.

Mr. Dick–Now, it is agreed that these students must have hostels, if they are to take advantage of collegiate education. They cannot get admission into the ordinary hostels. We have heard from the last witness that even in the Police lines where the houses have separate entrance and do not open one into the other, there would be discontent among the other classes, if the Mahars are admitted. How can we force these Mahars into the ordinary hostels? Would there not be discontent ? Must not we have special Govt. Aided hostels for these classes?

Mr. Mayhew–So far as public money is concerned, the time has come when the Govt. can perfectly say that, so far as Govt. is concerned, these instructions should not continue.

मेहचू यांचेच मत पुढे सायमन कमिशनने १९२८ साली स्वीकारलेले दिसते. सायमन कमिशनच्याही रिपोर्टात अस्पृश्यांना शिक्षणाकरिता प्रतिबंध होता, हे मान्य केले आहे.

' The existence of millions of persons who are regarded by the population as Untouchables and who, in some places, cannot even use all the public roads and wells, creates an educational

problem which it would be difficult to parallel elsewhere. In Madras, for example, large numbers of schools are situated in areas which the Hindu social systems do not permit a despressed class pupil to enter.'

जाती, धर्म व भाषाभेदांमुळे शैक्षणिक विकासात नाना प्रकारचे अडथळे येत आहेत, असे सायमन कमिशन म्हणते, परंतु अस्पृश्यांच्या स्वतंत्र शिक्षणसंस्थांना विरोध करते. या विरोधाचे एकच कारण सरकारने दाखवले आहे व ते म्हणजे अशा विभक्त शाळांमुळे अस्पृश्यांत विभक्तपणाची भावना बळावेल व भारतात एकात्मता जोपासली जाणार नाही. परंतु या म्हणण्यात मुळीच तथ्य दिसत नाही. मुसलमानांच्या बाबतीत सरकारने जे शिक्षणविषयक धोरण आखले होते, ते पाहिले म्हणजे अस्पृश्यांच्या संबंधातील इंग्रज सरकारचे मुद्दे किती लटके होते हे दिसून येईल.

सायमन कमिशन आपल्या रिपोर्टात म्हणते–

' We have paid special attention to the question of Mohammedan Education. It is clearly of the first importance that this large community, with its great historic culture and tradition, now an educationally backward community, should be brought up to the general level of advance.'

सायमन कमिशन पुढे म्हणते –

' In any case, during this period of reconstruction, and until Mohmmedans have recovered lost ground, reservations will probably be necessary.'

अखिल भारतात अशा या मागासलेल्या मुसलमान जमातीच्या स्वतंत्र शिक्षणसंस्था किती होत्या, हे खालील तक्त्यावरुन दिसून येईल.

कॉलेज	माध्यमिक अथवा मदरशा	इस्लामिया अथवा प्रायमरी	कुराण स्कूल्स	इतर शाळा	मान्यता नसलेल्या शाळा	एकूण शिक्षण संस्था
९	७३०	३२,५०७	८२७	७६	२९९२	३७१४१

नुसत्या वरील आकड्यांवरूनच मुसलमान समाज शिक्षणाच्या बाबतीत किती आघाडीवर होता हे निर्बुद्ध माणसासही समजण्यासारखे आहे. या समाजाच्या तुलनेत अस्पृश्य समाज किती मागासलेला होता याची इंग्रज सरकारला जाणीव नव्हती असेही नाही. स्पृश्य हिंदू स्वार्थाकरिता अस्पृश्यांना शैक्षणिक सवलती नाकारीत होते, तर इंग्रजांनाही काहीतरी स्वार्थ होता हे निश्चित. अस्पृश्यांना स्वतंत्र शिक्षणसंस्था नाकारल्याने हा समाज आपले कोणतेच नुकसान करू शकणार नाही, ही

निर्धास्ततेची भावना जशी होती, तशीच मुसलमानांना नाराज केल्याने चालणार नाही, हीही जाणीव इंग्रजांत होती. दुसरे असे की, अस्पृश्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार फक्त मिशनरी संस्था करीत होत्या. बेरार कमिशनरच्या रिपोर्टाप्रमाणे १९२०–२१ च्या सुमारास खालील संस्था अस्पृश्यांमध्ये शैक्षणिक कार्य करीत होत्या.

१) डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या अनुदानावर ३–४ महारशाळा चालविल्या जात.

२) एलिचपूर व दर्यापूर तालुक्यांत रोमन कॅथॉलिक मिशनने चालविलेल्या महारशाळा १२ होत्या.

३) जानुजी खंडारे वसतिगृह, अकोला हे कार्यरत होते.

४) यवतमाळ जिल्ह्यात सुमारे अर्धा डझन रात्रीच्या साक्षरता प्रसारक शाळा चालविल्या जात. यांना डिस्ट्रिक्ट बोर्डाकडून मदत मिळत असे.

मध्यप्रदेशात मिशनस्कूलसची संख्या २२ होती. या सर्व शाळा अस्पृश्यांकरिता होत्या. हे पाहिले असता अस्पृश्यांना स्वतंत्र शाळा स्थापन करू दिल्यास मिशनऱ्यांच्या कार्यात अनायासेच खंड पडला असता, ही गोष्ट चाणाक्ष इंग्रज अधिकाऱ्यांच्या लक्षात आली नसेल असे नाही. एरवी मिशनऱ्यांचे कार्य मागासलेल्या जमातीवाचून दुसरीकडे पसरण्यास वाव तरी कुठे होता ? पूर्व बंगालमधील, विशेषत: जेसोर व खुलना या जिल्ह्यांत मात्र नामशूद्रांनी स्वत:च शाळा चालविल्या होत्या. या कामी बंगाल प्रांताचे शिक्षणखाते व कलकत्ता विद्यापीठ यांनी सहकार्य केले होते.

तेव्हा अस्पृश्यांकरिता स्वतंत्र शाळा स्थापन करू दिल्यास वेगळेपणाची भावना वाढीस लागेल याही म्हणण्यात काही तथ्य होते असे नाही. सायमन कमिशनच्याच रिपोर्टात मद्रास प्रांतातील परिस्थिती वर्णिली आहे. त्यात म्हटले आहे की, 'निव्वळ अस्पृश्यांकरिता चालवलेल्या शाळांतून सुमारे ७०,००० अस्पृश्येतर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत .यावरून हे सिद्ध होते की, स्पृश्यांच्या फायद्याची वाव असेल तर ते जात–पात काहीच पाळत नाहीत.' अस्पृश्यांकरिता स्वतंत्र शाळा म्हणजे त्या शाळांत इतरांना प्रतिबंध असा अर्थ नव्हता. फक्त त्या शाळा अस्पृश्यांना सरकारी मदतीने काढण्यास परवानगी हवी होती.

काही का असेना, परंतु अस्पृश्यांकरिता स्वतंत्र शाळा उघडण्यास सरकारने प्रतिबंध केला. एरवी अस्पृश्यांच्या शैक्षणिक प्रगतीस जी गती आली असती ती आली नाही. उलट, खीळ बसली असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

आहे त्या परिस्थितीत शिक्षण घेत असताना बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ मध्यप्रांत–वऱ्हाड येथे पसरली. तिचे लोण खेड्यापाड्यांत पाहता पाहता पसरले व शिक्षणावाचून गत्यंतर नाही ही भावना वाढीस लागली. बाबासाहेबांची चळवळ स्वाभिमानाची, स्वातंत्र्याची असल्यामुळे अस्पृश्य विद्यार्थी हालअपेष्टा सोसून शिक्षण घेऊ लागला. यातूनच पुढे अस्पृश्य विद्यार्थ्यांची शेडचूल्ड कास्ट विद्यार्थी फेडरेशन १२–५–१९४५ रोजी स्थापन झाली. १९४६ च्या २५, २६ व २७ डिसेंबर

रोजी जोगेंद्रनाथ मंडल यांच्या अध्यक्षतेखाली या विद्यार्थी फेडरेशनचे दुसरे अधिवेशन झाले. एव्हापर्यंत अस्पृश्य विद्यार्थी निव्वळ संख्येनेच वाढला होता असे नाही, तर त्याला स्वत:ची व स्वत:च्या हक्कांची जाणीव व्हायला लागली होती. त्यामुळे स्वत:च्या मागण्या तो स्वत:च पुढे रेटू लागला. १९४५ साली १६ विद्यार्थी बाबासाहेबांनी भारत सरकारतर्फे उच्च शिक्षणाकरिता परदेशात पाठविले, त्यात बरेच विद्यार्थी मध्यप्रदेशातील होते.

ब्राह्मण स्त्रियांना जसे अडथळे आले तसे अस्पृश्य स्त्रियांना शिक्षणाच्या बाबतीत येण्याचे काहीच कारण नव्हते, कारण तुलनेने अस्पृश्यांत स्त्रियांना पूर्वीपासूनच समान हक्क व स्वातंत्र्य आहे. परंतु जिथे मुलांनाच शिक्षणसंस्थांतून बंदी होती, तिथे या स्त्रियांना विचारणार कोण? कर्व्यांच्या महिला युनिव्हर्सिटीत १९२७ च्या सुमारास ४० विद्यार्थिनी होत्या, त्यांत एकही अस्पृश्य स्त्री नव्हती. वि. रा. शिंदे यांच्या आठवणीतून तर हेही स्पष्ट होते की कर्व्यांच्या या संस्थेत फक्त ब्राह्मण स्त्रियांनाच प्रवेश मिळत असे, ब्राह्मणेतर स्पृश्य मुलींनाही प्रवेश नाकारला जाई. मद्रासमध्ये पाच महाविद्यालयांतून २२२ इंडियन ख्रिश्चन, १२७ हिंदू, ४ मुसलमान व २ अस्पृश्य मुली शिकत होत्या. सर्वसाधारणपणे अस्पृश्य समाज हा नेहमीच प्रागतिक विचारांचा भुकेला राहिलेला आहे. मद्रासमधील महिला अधिकाऱ्यांच्या परिषदेत महिला शिक्षणास अस्पृश्यांचा विरोध नाही असे स्पष्ट म्हटले होते. नागपूर प्रांतातही अस्पृश्य स्त्रियांनी शिक्षणक्षेत्रात पुरुषांसोबत शिक्षणास सुरवात करून बरीच आघाडी मारल्याचे दिसून येते. नागपूर येथे १९२२ साली श्री चोखामेळा समाज मुलींच्या शाळेची स्थापना ही या दृष्टीने ठळक घटना होय. तत्पूर्वी १९११ साली कालीचरण नंदागवळी यांनी गोंदिया येथे अस्पृश्य मुलींच्या शाळेची स्थापना केली होती.

शिक्षणविषयक प्रगतीचा आढावा घेणाऱ्या या लेखाचा समारोप करताना विद्यार्थ्यांना बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला संदेश उद्धृत केल्यास तो अनाठायी ठरणार नाही असे वाटते.

"Our boys should learn two things. Firstly, to prove that, given the opportunities they are inferior to none in intelligence and to capacity. Secondly, to prove that they are not merely to lead the path of personal happiness, but to lead their community to be free, to be strong and to be respected."[३]

वरील दोन बाबींपैकी दुसरी जास्त महत्त्वाची आहे हे सांगायला नको.

संदर्भ :-

१) Interim Report on Eduation, 1929–30 (Simon Commission)
२) जानोजी खंडारे फ्री बोर्डिंग हाऊस, अकोला रिपोर्ट १९२७–२८
३) Report on the 2nd Session of All India S. C. Students' Federation, 1947.

इतर संदर्भ :–

१) Interim Report:– Review of the growth of Education in British India by the Auxiliary Committee of the Indian Statutery Commission– 1928
२) Report of the Committee appointed by the C. P. & Berar Govt. to enquire into problems of the Depressed Classes under Govt. Resolution dated 29–6–1921
३) एकोणविसाव्या शतकातील मध्यप्रांताची शैक्षणिक वाटचाल– विदर्भ संशोधन मंडळ– प्रा. सुरेश म. डोळके
४) वऱ्हाड महार सुधारक मंडळ, यवतमाळ (वऱ्हाड) रिपोर्ट ४ था व ५ वा, १९२९
५) शिंदे लेखसंग्रह– संपादक: मा. प. मंगुडकर

३ प्रांतिक असेंब्लीत अस्पृश्य सदस्यांचे कार्य

१९१८ च्या माँटेग्यू, चेम्सफोर्ड सुधारणेनुसार प्रांतातून विधान मंडळे बनविली गेली. या विधान मंडळांतील प्रतिनिधी लोकांनी निवडून दिलेले असत. मतदानाचा अधिकार वरिष्ठ शैक्षणिक अथवा सांपत्तिक पात्रता असणाऱ्या व्यक्तींनाच असल्यामुळे अडाणी, अशिक्षित व गरीब लोकांना या मंडळात प्रतिनिधित्व मिळत नसे. परंतु अस्पृश्य समाजाने चालविलेल्या लढ्याचा परिणाम म्हणून अस्पृश्यांच्या प्रतिनिधींना नियुक्त करण्याचा निर्णय सरकारने घेतला.

मध्यप्रांत वऱ्हाडात निरनिराळ्या गावांतून जाहीर सभा घेऊन अथवा परिषदा भरवून अस्पृश्यांनी आपल्या मागण्या सरकार–दरबारी मांडणे सुरू करून २५ वर्षांवर काळ लोटलेला होता. याच परिषदांतून अनेक पुढाऱ्यांची नावे विधिमंडळासाठी सरकारला सुचविण्यात आली. या सभा-परिषदा प्रामुख्याने महार समाजाच्या असत. या सभासंमेलनांत गावकामगारांचे प्रश्न, शाळा व वसतिगृहांची स्थापना, सार्वजनिक पाणवठ्याची सोय, गावोगाव फिरणाऱ्या अस्पृश्यांच्या व्यापाऱ्यांना मुक्कामासाठी धर्मशाळांची स्थापना, सामाजिक रूढी व चालीरीतींची सुधारणा करण्यासंबंधी योजना आदी प्रश्नांवर चर्चा होत असे.

१) किसन फागोजी बनसोडे, २) विठोबा रावजी मूनपंडे, ३) कालीचरण नंदागवळी, ४) नानासाहेब गवई, ५) जानोबा खंडारे आदी अनेक महार कार्यकर्त्यांनी अस्पृश्यांच्या चळवळीची सूत्रे हाती घेऊन आपापल्या कुवतीप्रमाणे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सुधारणा घडविण्याचा प्रयत्न केला. बाबासाहेब आंबेडकरपूर्व विदर्भात अस्पृश्य वर्गात आत्मोन्नतीची जाणीव निर्माण करण्यास अनेक दलित कार्यकर्त्यांनी आयुष्य वेचले आहे.

५०–७५ वर्षांनंतर या कार्यकर्त्यांच्या जीवनाकडे दृष्टिक्षेप टाकला तर अचंबा वाटावा. समाजाप्रती समग्र आयुष्य वेचणाऱ्या या कार्यकर्त्यांपैकी फार थोड्यांनी लेखनाद्वारे आपले कार्य मागे ठेवले आहे. परंतु असंख्य कार्यकर्ते निव्वळ

झिजत राहिले. अशाच अनेक कार्यकर्त्यांपैकी बाबू कालीचरण नंदागवळी हे एक होते. तत्कालीन अशाच कार्यकर्त्यांनी केलेल्या कार्याचे आज विशेष महत्त्व वाटते.

कालीचरण नंदागवळी यांच्या समग्र जीवनाचा आढावा घेतला तर समाजाची चिंता वाहणाऱ्या, स्वत: तनमनधनाने राबणाऱ्या आणि निःस्वार्थी व त्यागी अशा सत्पुरुषाची प्रतिमा आपल्या डोळ्यांसमोर उभी राहावी. नंदागवळींच्या कार्याचे मूल्यमापन करून सामाजिक चळवळीच्या इतिहासात त्यांचे स्थान काय, हे इतिहासकारांनी ठरवायचे आहे.

कालीचरण नंदागवळी हे गोंदिया येथील रहिवाशी होते. त्या तालुक्यातील एका लहानशा गावाचे ते मालगुजार असल्यामुळे श्रीमंती त्यांच्या घरी पाणी भरत होती. ते लाखेचा व्यापार करीत. काही काळ ते नगरपरिषद सदस्य म्हणून गोंदिया नगरपरिषदेवर निवडून गेले होते.

मध्यप्रांत वऱ्हाडात जितक्या प्रमुख संस्था, सभासंमेलने व परिषदा झाल्या त्या सर्व संघटनांशी नंदागवळींचा संबंध आलेला दिसून येतो. १९११-१२ साली स्वत: तीन हजार रुपये खर्च करून त्यांनी गोंदियात पहिली मुलींची शाळा काढली. १९१३ साली नागपूर येथे भरलेल्या महार परिषदेचे ते उपाध्यक्ष होते. नगरपरिषदेचे सदस्य असताना त्यांनी अस्पृश्य वस्त्यांकरिताच नव्हे, तर दुर्लक्षित अशा भंगी समाजाकरिता विशेष कार्य केल्यामुळे भंगी समाजातर्फे त्यांना १९२३ साली मानपत्र अर्पण करण्यात आले. मध्यप्रांत वऱ्हाड दलित वर्ग परिषद आणि दलित विद्यार्थी परिषद यांच्यातर्फे १९२९ साली त्यांचा जाहीर सन्मान करण्यात येऊन मानपत्र देण्यात आले. १९३० पासून ते बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित वर्ग परिषदेचे अध्यक्ष होते. स्वतंत्र मजूर पक्षाच्या बिडी संघटनेचे देखील ते अध्यक्ष होते. सायमन कमिशनला इतर अस्पृश्य प्रतिनिधींसोबत नंदागवळींनी देखील अस्पृश्यांतर्फे निवेदन दिलेले आहे. त्यांना निव्वळ महारांचे पुढारी म्हणवून घेण्यात भूषण वाटत नव्हते. समग्र अस्पृश्य जातींच्या हिताकडे त्यांचे लक्ष असे. पुढे त्यांना मध्यप्रांतातील जनता 'महात्मा नंदागवळी' म्हणू लागले व तेही संन्यस्त वृत्तीने राहू लागले. १९३६ नंतर बाबासाहेबांची धर्मांतराची भूमिका न पटल्यामुळे ते चळवळीपासून अलिप्त राहिले.

त्यांच्या समग्र कार्याचा सविस्तर आढावा घेणे या ठिकाणी शक्य होणार नाही. १९१९ पासून स्थापन झालेल्या विधान मंडळावर कालीचरण नंदागवळी आणि नानासाहेब गवई यांची सरकारतर्फे नेमणूक करण्यात आली. १९२३ पर्यंत हे उभयता मध्यप्रांत बऱ्हाड लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सदस्य होते. या काळात उभयतांनी केलेल्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात करण्यात आलेला आहे. दोघांचेही कार्य ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचे आहेच, परन्तु त्यातल्या त्यात कालीचरण नंदागवळींचे कार्य विशेष डोळ्यांत भरण्यासारखे आहे असे दिसून येते.

अस्पृश्यांच्या सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीची पाहणी करणाऱ्या कमिटीची नेमणूक.

विधानमंडळात अस्पृश्यांच्या प्रश्नांवर सर्वात महत्त्वपूर्ण असा ठराव काली-चरण नंदागवळी यांनी दिनांक १६ मार्च १९२१ रोजी मांडला. या ठरावाद्वारे मध्यप्रांत सरकारने एका कमिटीची नेमणूक केली. तिच्यातर्फे खालील विषयांवर चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली.

१) अस्पृश्यांची सरकारी नोकरीतून नेमणूक करण्यात यावी.
२) तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाच्या सवलती देण्याची सोय करावी.
३) अस्वच्छ वातावरण, गुन्हेगारी प्रवृत्ती यांपासून त्यांना मुक्त करण्यासाठी विशेष प्रयत्न करून अज्ञान दूर करावे.
४) कोतवाली हक्कासंबंधी चौकशी करावी.
५) खेड्यातील अस्पृश्य वसाहतींवर टाकलेल्या बहिष्काराबद्दलची चौकशी.
६) अस्पृश्य वर्गाला स्वतंत्र वसाहती निर्माण करण्याकरिता अरण्यातील जागा राखून ठेवाव्यात.

या ठरावाच्या समर्थनार्थ नंदागवळींनी विस्तृत भाषण केलेले आहे. हे भाषण हिंदीतून केले असून सर्व मुद्दे अभ्यासू वृत्तीने त्यांनी हाताळलेले आहेत. या भाषणाचा सारांश खालीलप्रमाणे आहे –

'सभागृहाने मला पंधरा मिनिटांपेक्षा जास्त वेळ द्यावा, अशी मी विनंती करतो. इंग्रजीतून बोलणाऱ्या वक्त्यांचा वेग मोटारीप्रमाणे असतो. मराठी आणि हिंदी बोलणाऱ्या बांधवांचा वेग शर्यतीतील घोड्याप्रमाणे आहे. परंतु माझी गती एखाद्या टांग्यासारखी (व्हिक्टोरिया) आहे. म्हणून मला तुमच्याकडून सहकार्य आणि प्रोत्साहन हवे आहे.

'वरील मागण्यांपैकी क्रमांक तीन व पाच वगळायला माझी हरकत नाही. क्रमांक दोनबद्दल मी असे म्हणेन की, अस्पृश्यांना मोफत शिक्षण हवे. इतकेच नव्हे, तर त्यांना पाटी, पेन्सिल, पुस्तके, वह्या आदी आवश्यक वस्तूदेखील फुकट वाटण्यात याव्यात. अस्पृश्य कोण आहेत आणि त्यांची या मातृभूमीत सामाजिक आणि शैक्षणिक काय अवस्था आहे याची आपणा सर्वांना कल्पना आहे. जबाबदार राज्यपद्धतीचा आरंभ होत असतानाच या सभागृहाने पददलित अशा या देशबांधवांना शिक्षण देऊन मानवी हक्कांची जाणीव निर्माण करून द्यायला हवी. या वर्गाचा सामाजिक आणि नैतिक स्तर उंचावून त्यांच्यात स्वाभिमान जागृत करण्याची जबाबदारी या देशातील सुशिक्षित देशप्रेमी लोकांवर असल्याचे न्यायमूर्ती गोविंद रानडे यांनी १८९४ साली आणि श्रीमान गोखले यांनी १९०३ साली स्पष्ट केले आहे. माझ्या ठरावासारखा ठराव माननीय श्री. एम. बी. दादाभाई यांनी केंद्रातील विधानमंडळात आणला होता. त्यावेळी आजच्या अध्यक्षांनी त्याला पाठिंबा दिला होता. हा ठराव नंतर मागे घेण्यात आला. परंतु डिप्रेस्ड क्लासेस मिशनकडून त्या-

संबंधी आवश्यक असलेली माहिती भारत सरकारने मागवलेली होती. सध्या स्वावलंबनाचे युग आपल्या देशात सुरू झाले आहे व ऑगस्ट १९१७ च्या जाहीर नाम्यानुसार स्वतंत्रतेने आणि न्यायी अशा आपल्या सत्ताधाऱ्यांनी आपल्या देशात होमरूल सुरू केले आहे. तेव्हा आपण सर्व सदस्यांनी आपली जबाबदारी ओळखायला हवी. गेल्या १५–१६ वर्षांपासून आमच्या बऱ्याच वडील बांधवांनी अस्पृश्यतेचा कलंक धुवून काढण्यास सुरवात केली आहे. राष्ट्रीय काँग्रेस आणि सामाजिक परिषद यांनीही या कार्यास पाठिंबा दिलेला आहे. अस्पृश्यांची अस्पृश्यता नष्ट करण्याच्या प्रयत्नात माझे आदरणीय गुरू कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांचे स्थान अगदी वरचे आहे. अस्पृश्य आणि उच्चवर्गीय याचे कार्यात निर्माण झालेले धार्मिक तंटे आपसात मिटवले जात आहेत. या सभागृहाला यावर मत देण्याचा प्रसंग यणार नाही असे दिसते. माझ्या ठरावाचा धार्मिक बाबींशी काहीही संबंध नाही. अस्पृश्य वर्गाची परिस्थिता सुधारण्याच्या दृष्टीने उपाय म्हणून वरील मार्ग सांगितलेले आहेत.

'माननीय एम. बी. दादाभाई यांच्या ठरावानंतर पाच वर्षांनी हा ठराव मांडण्याची माझ्यासारख्या अस्पृश्यांच्या एका लहानशा सेवकास संधी मिळाली याबद्दल मी स्वतःस धन्य समजतो. या ठरावातील पाहिला मुद्दा स्पष्ट करू इच्छितो. माझ्याकडे सरकारी नोकरीत असलेल्या अस्पृश्य कर्मचाऱ्याची आकडवारी नाही. रेव्हन्यू, शिक्षण आणि लोककर्मविभाग (पी. डब्ल्यू. डी) या खात्यात आमचे फार थोडे लोक नमलेले आहेत श्री. सी. बी. पारेख यांनी ५ मार्च १९२१ राजा विचारलेल्या प्रश्नाला श्री. नेल्सन यांनी उत्तर दिले की, महाराना सरकारी नोकरीत कोणताच प्रतिबंध नाही. सरकारचे हे उदार धोरण प्रत्यक्षात सरकारी आधकारी त्याच उदारतेने अंमलात आणताना दिसत नाहीत. भंडारा येथे सिव्हिल कार्टात एका महाराला नोकरी मिळाली नाही. कामठी येथे पोस्ट ऑफिसात काम करणाऱ्या एका महार कारकुनास जाच झाल्यामुळे राजीनामा द्यावा लागला. त्याच कर्मचाऱ्याच्या भावाने पोलिस सब इन्स्पेक्टरचे प्रशिक्षण मिळाव म्हणून अर्ज केला, परंतु तो रद्द करण्यात आला. मी स्वतः गोंदिया नगरपरिषदेत ऑनररी असिस्टंट सेक्रेटरीचा जागा मिळावा म्हणून अर्ज केला, परंतु ते अरण्यरुदन ठरले.

'सरकारी नोकऱ्या मागून आम्ही सरकारची निष्ठा दाखवावी किंवा लोकमताविरुद्ध जावे असा आमचा मुळीच हेतू नाही. आम्हाला आमच्या मातृभूमीची प्रामाणिकपणे सेवा करायची आहे आमची अशी आशा की, अस्पृश्यांना नोकरीत जागा देताना कोणताही पक्षपात करण्यात यणार नाही.

'क्रमांक २ च्या मागणीनुसार तांत्रिक आणि औद्योगिक शिक्षण घेऊन त्यांना स्वतःची आर्थिक उन्नती करणे शक्य व्हावे असा हेतू आहे. गेल्या महायुद्धात औद्योगिक शिक्षणाचे महत्त्व पटलेले आहे. नागपूर येथील ॲंग्लो-व्हर्नाक्युलर स्कूलमध्ये किती अस्पृश्यांची मुले औद्योगिक शिक्षण घेत आहेत हे माहीत आहे? इंजिनिअरिंग स्कूल-

मध्ये मात्र एक अस्पृश्य विद्यार्थी आहे.

'मध्यप्रांतातील कोतवालांच्या हक्कावद्दलही चौकशी होणे आवश्यक आहे. सामान्य रयतेपासून श्रीमंतापर्यंत सर्वजण कबूल करतील की, कोतवाल हा जबाबदार असा ग्रामअधिकारी आहे. पोलिस अधिकाऱ्याप्रमाणे त्यांची कर्तव्ये (या ठिकाणी ही सर्व कामे नंदागवळींनी त्यांची अनेक कर्तव्ये म्हणून दाखविली) असून देखील त्यांचा दर्जा सामान्य मजुरापेक्षा खालचा समजण्यात येतो. दुष्काळात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा पगार वाढविण्यात आला, परंतु कोतवालांना दुष्काळाचा बळी ठरविला गेला. कोतवालांनी वेळोवेळी केलेल्या मागण्यांचा विचार व्हायला हवा.

'माझी सहावी मागणी महारांच्या वसाहतीकरता आहे. मालगुजारी आणि जमीनदारी गावांतून अनेक जमिनी पडीक आहेत, तेथे त्यांना वसाहती करण्यास मुभा द्यावी. चांदा जिल्ह्यात अशी योजना सरकारच्या विचाराधीन होती, परंतु युद्धामुळे ती मागे पडली.

'या कमिटीवर दोन युरोपियन, दोन उच्चवर्गीय लोक, दोन अस्पृश्यांचे प्रतिनिधी असावेत. हिंदी आणि मराठी जाणणारा सरकारी अधिकारी याचा अध्यक्ष असावा.'

नानासाहेब गवई यांनी ठरावास पाठिंबा दिला. ते म्हणाले की, 'अशाच तऱ्हेचा ठराव १९१८ साली मुंबई येथे भरलेल्या अस्पृश्यताविरोधी परिषदेत संमत झाला होता. त्याचे अध्यक्ष सयाजीराव गायकवाड होते. याला श्री. दादासाहेब खापर्डे यांनी पाठिंबा दिला होता.

'हिंदू धर्माला लागलेला सगळ्यात मोठा कलंक म्हणजे अस्पृश्यता होय. या देशातील महार, मांग आदी अस्पृश्यांनी ज्या तऱ्हेची दडपशाही आणि अन्याय आपल्याच धर्मबांधवांकडून सहन केला, तसा जगाच्या पाठीवर कोठे असेल, असे मला वाटत नाही. मला अस्पृश्यांच्या परिस्थितीचे वर्णन करणे जेवढे दुःखद वाटते तितकेच इथे बसलेल्या सदस्यांनाही वाटेल.

'जपान सरकारने सामुराई आणि इटा या दोन अस्पृश्य जातींची अस्पृश्यता १८७१ साली एका हुकमासरशी नष्ट केली, परंतु या देशातील अस्पृश्यांचे मित्र म्हणवणारे लोक सरकारने कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्यास देखील विरोध करतात. असले मित्र जपानमध्ये नव्हते हे तेथील अस्पृश्यांचे भाग्यच समजले पाहिजे.

'लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी अस्पृश्यांची धार्मिक आणि सामाजिक उन्नती करणे सरकारला शक्य नाही. परंतु अस्पृश्यांचा शैक्षणिक विकास करून उच्च हिंदूंच्याबरोबर आणणे हे सरकारला अशक्य नाही. ब्रिटिश राज्य या प्रांतात येऊन १०० वर्षे लोटली आहेत. या काळात अस्पृश्यांची शैक्षणिक प्रगती फारच अल्प झालेली दिसून येईल. १७५४ साली ब्रिटिश पार्लमेंटने जाहीरनामा काढून 'कुणालाही जातीमुळे सार्वजनिक शाळेत प्रवेश नाकारला जाणार नाही' अशी

3288
निषेध्यक २५५२३
9131CC

घोषणा केली. परंतु सार्वजनिक शाळेत अस्पृश्य मुलांना प्रवेश नाकारलेली उदाहरणे आढळत नाहीत काय? खेडोपाडीदेखील शाळेत प्रवेश मिळविणे कठीण असते. प्रवेश मिळालाच तर त्यांना इतरांसोबत बसू देण्यात येत नाही. त्यांच्याकडे दुर्लक्ष होते. इतकेच नव्हे, तर त्यांना कठीण शिक्षा देण्यात येते. अस्पृश्यांच्या शिक्षणाच्या बाबतीत आलेल्या अडचणी सरकारने दूर करायला हव्यात. सरकार तांत्रिक शिक्षण अस्पृश्यांना देण्याचे योजत आहे, परंतु त्यामुळे सामान्य शिक्षणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अस्पृश्यांची निरक्षरता प्रथम नष्ट व्हावयाला हवी.' पाश्चात्य विचार त्यांना कळायला हवेत, म्हणून या ठरावावर मिस्टर श्री. नेल्सन आणि बी. बी. स्ट्रॅन्डन यांनी भाषण केले व ठरावातील तीन ते सहा मुद्दे वगळून पहिल्या दोन मुद्यांवर चौकशी करण्याकरिता समिती नेमण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

या ठरावानुसार सरकारतर्फे सहा सदस्यांची एक समिती नेमण्यात आली. चीफ सेक्रेटरी श्री. नेल्सन या समितीचे अध्यक्ष होते.

श्री. डिक व श्री. करेब हे दोन सदस्य युरोपियन होते. श्री. रावबहादूर एम. जी. देशपांडे हे हिंदू समाजाचे व श्री. नंदागवळी आणि गवई हे अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून कमिटीवर होते.

कमिटीवर निरनिराळ्या सदस्यांकडून अस्पृश्य वर्गासंबंधी सविस्तर माहिती मागविली. तसेच डी. आय. जी. पोलीस, शिक्षण विभागाचे डायरेक्टर, तसेच डायरेक्टर ऑफ इंडस्ट्री आण डिप्रेस्ड क्लास मिशनचे प्रांतिक अध्यक्ष श्री. भवानीशंकर नियोगी यांची साक्ष घेतली. २९ जून १९२१ च्या ठरावानुसार निर्माण झालेल्या समितीने १८ मे १९२२ रोजी आपला सविस्तर अहवाल सादर केला. या अहवालात अस्पृश्यांच्या नोकरीत प्रतिनिधित्वाचे प्रमाण, नोकरीत त्यांना होणारा जाच, संपूर्ण अस्पृश्य समाजाच्या शैक्षणिक आणि सामाजिक परिस्थितीचा थोडक्यात आढावा, शालेय शिक्षणात अस्पृश्य मुलामुलींचे प्रमाण आदी अनेक प्रश्नांची उद्बोधक माहिती या कमिटीने एकत्र करून प्रसिद्ध केली. सरकारने विचार करून या रिपोर्टातील काही शिफारशी मान्य केल्या, परंतु सर्वच मागण्या स्वीकारल्या नाहीत. नंदागवळी आणि गवई या दोघांनीही सदरहू रिपोर्टस् सरकारच्या अथवा हिंदू-समाजाच्या रोषाची पर्वा न करता आपली भिन्न, विरोधी मतपत्रिका जोडलेली आहे. हा सविस्तर रिपोर्ट[1] थोडक्यात चर्चिणे शक्य नसल्यामुळे विधान परिषदेतील अस्पृश्य सदस्यांच्या पुढील कार्याकडे मी वळतो.

स्थानिक स्वराज्य संस्थांत अस्पृश्यांना प्रतिनिधित्व

कालीचरण नंदागवळी यांनी १०-८-१९२१ रोजी अस्पृश्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नियुक्त करण्याबद्दलचा ठराव विधान परिषदेत मांडला. ठराव मांडताना ते म्हणाले,[2] 'जर अस्पृश्य वर्गातील माणसे लोकल बोर्ड, डिस्ट्रिक्ट कौन्सिल, सॅनिटेशन कमिटी, स्कूल कमिटी, डिस्पेन्सरी कमेटी, म्युनिसिपल कमिटी आणि धान्य पंचायती यातील निवडणुकीत मध्यप्रांताच्या जिल्ह्यात निवडून आले नाहीत तर त्यांना शास-

नाने वरील कमिटयांवर नियुक्त करावे.' आपल्या ठरावाच्या समर्थनार्थ भाषण करताना नंदागवळी म्हणाले की, 'नगरपालिका आणि जिल्हा बोर्ड या संस्था १८६९ साली लॉर्ड मेयोच्या कारकीर्दीत भारतात निर्माण झाल्या, परंतु त्यांना लोकानुवर्ती करण्याचे श्रेय लॉर्ड रिपन यांना आहे. या संस्थांमधून नागरिकांना त्यांची लोकांप्रती असलेली कर्तव्ये आणि राज्याबद्दल असलेल्या जबाबदाऱ्या याची जाणीव करून देण्याकरिता व त्यांच्याकडून सामाजिक कामे करविण्याकरिता या संस्थांची निर्मिती झालेली आहे. या संस्थांवर अस्पृश्यांचे किती प्रतिनिधी आहेत, याबद्दल या सदनात प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळी एकही अस्पृश्य व्यक्ती या संस्थांचा सदस्य नसल्याचे शासनाने सांगितले. यावरून अस्पृश्यांना या संस्थांवर निवडून येणे किती अशक्य आहे हे दिसून येईल. निवडणुकांचे नियम अस्पृश्य- समाज- विरोधी आहेत. गरिबीमुळे ठराविक कर ते भरू शकत नाहीत, म्हणून मतदानास ते अपात्र ठरतात. दुसरे असे की, करआकारणीस आवश्यक असणारे उत्पन्न जाहीर करण्यास अस्पृश्य व्यक्ती घाबरतात, हे देखील १९१६ सालच्या मार्चमध्ये दिसून आले. गोंदिया नगरकमेटीवर माझी नेमणूक करावी म्हणून मी डेप्युटी कमिशनर, भंडाऱ्याकडे अर्ज दिला होता. तेथे जागा नाही म्हणून मला कळविण्यात आले. एक मारवाडी सदस्य तेवढ्यातच मरण पावला. परंतु त्या जागेवर दुसऱ्या माणसाची नेमणूक करण्यात आली. १९१८ साली माननीय बी. पी. स्ट्रॅन्डन यांनी अस्पृश्यांना या संस्थांवर नेमण्यात यावे म्हणून एक नोटिफिकेशन काढले होते व ते सर्व नगरपरिषदांना वाटण्यात आले. डेप्युटी कमिशनरांना या बाबतीत विचारण्यातही आले होते. परंतु पुढे चालून काहीही निष्पन्न झाले नाही. भारतीय व युरोपियन अधिकाऱ्यांच्या उदासीन वृत्तीमुळे अस्पृश्यांचे भवितव्य आशादायक दिसत नाही. सबब अस्पृश्य व्यक्तींनाच सामाजिक कार्याकरिता खालच्या स्तरापासूनच प्रशिक्षित करणे उचित ठरेल.

'स्थानिक संस्थांमध्ये अस्पृश्यांचे प्रतिनिधी नसल्यामुळे आमच्या वस्त्यांत पिण्याचे पाणी, शौचालये, दिवे, रस्ते आणि आरोग्य याकडे बिलकुल दुर्लक्ष करण्यात येते. याची साक्ष माझे मानसपिता मिस्टर डिक हे देऊ शकतील. पाचपावली येथील महार वस्तीत इतर लोक नेहमी गोंधळ घालीत असतात. जर प्रांताच्या राजधानीत अशी स्थिती आहे तर खेडचात काय परिस्थिती असेल? गोंदिया येथे महारांच्या वस्तीशेजारी खड्डे आहेत. पावसाळचात तेथे पाणी साचते व त्याला तलावाचे स्वरूप प्राप्त होते. त्यामुळे शेजारपाजारच्या छोटी मुले त्यांत पडण्याचा धोका निर्माण होतो. शिवाय तेथे नेहमी डासांची निर्मिती होत असते. नगरपालिकेला अनेक विनंतीअर्ज केल्यावर त्यांनी हे खड्डे बुजवणे सुरू केले, परंतु याला किती वेळ लागेल सांगता येत नाही. उच्चवर्णीय लोकांना स्वतःच्या गरजा व अडचणी निवारण करण्यास फारसा वेळ लागत नाही. (कारण त्यांचे सदस्य अधिकाऱ्याकडून कामे करून घेतात.) अस्पृश्यांचे प्रतिनिधी असल्यास या अडचणी दूर होण्यास विलंब लागणार नाही.

'या संस्थांतून काम केल्यामुळे सार्वजनिक सेवेचे शिक्षण प्राप्त होते यावद्दल कोणाचेही दुमत असू नये. परंतु या सर्व जागा मालगुजार आणि वकील लोक बळकावतात व आम्हाला कुठेही स्थान मिळत नाही. वर्धा जिल्ह्यात जिल्हा बोर्डावर फक्त एक महार मालगुजार सदस्य होता. परंतु हा अपवाद वगळता दुसरीकडे कुठेही अस्पृश्यांना स्थान नाही.

'अस्पृश्यांचे प्रतिनिधी शैक्षणिक कमिट्यांवर नेमल्याशिवाय अस्पृश्यांच्या शैक्षणिक अडचणी व मागासलेपणा दूर होणार नाही. हीच बाब सॅनिटेशन आणि ग्रामपंचायतींनादेखील लागू आहे. मी सर्व युरोपियन अधिकाऱ्यांना विनंती करतो की, त्यांनी या नवीन युगात न्यायाच्या भूमिकेतून सर्वांनाच समान वागणूक द्यावी व कोणत्याही जमातीवर अत्याचार करू नये. तसेच माझ्या देशबांधवांना विनंती करतो की, आम्हाला तुमच्या सोबत काम करण्यास आणि समतेने वागण्यास संधी द्या. किंबहुना, हे तुमचे कर्तव्यच आहे. माझा ठराव सर्वांनी संमत करावा.'

रावबहादुर एन. के. केळकर यांनी नंदागवळींच्या ठरावाला पाठिंबा दिला. परंतु ते म्हणाले, 'एखादी व्यक्ती निवडणूक लढविण्यास अपात्र ठरण्याचे काही कारण नाही. ग्रामपंचायती आणि ग्रामीण सॅनिटेशन कमेटी या वगळता इतर संस्थांवर अस्पृश्यांचे लायक प्रतिनिधी नेमण्यास हरकत नाही.'

रावबहादुर रावसाहेब खडतकर :– यांनी ठरावाला विरोध करताना असा मुद्दा मांडला की, 'कोणत्याही मागासवर्गीयाच्या नेमणुकीने सामान्य जनतेत असंतोष निर्माण होतो. ऑनररी बेंच मॅजिस्ट्रेट म्हणून एखादा अस्पृश्य, लोकल बोर्डावर एखादा तेली किंवा स्कूल कमेटीवर एखादा कोष्टी नेमल्यामुळे संपूर्ण काम कसे ठप्प झाले यासंबंधी काही घटना त्यांनी नमूद केल्या व ते म्हणाले की, वरिष्ठ वर्ग या जातींना स्वतःसोबत काम करू देण्यास तयार नाही. विदर्भामध्ये धोब्यांना स्वतःच्या बैलगाडीवर धुरकरी म्हणून देखील नेमायला वरिष्ठ वर्गाचे लोक तयार नाहीत. देशात जर अशांतता माजवावयाची नसेल तर नंदागवळींच्या ठरावासारखे ठराव या सभागृहाने फेटाळून लावावे, असे त्यांचे म्हणणे होते.

खडतकरांना श्री. सी. वी. पारेख यांनी सडेतोड उत्तर दिले ते म्हणाले की, जे लोक अस्पृश्यवर्गीय सदस्यांना स्वतःसोबत स्थानिक स्वराज्य संस्थांतून बसू द्यायला तयार नाहीत, त्यांना त्या संस्थांवर स्वतः काम करण्याचा मुळीच अधिकार नाही.

रावसाहेब महाजनी यांनी विदर्भाच्या चार जिल्ह्यांना या ठरावातून वगळल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. त्यांनी म्हटले की, 'अकोला नगर परिषदेत १८९९ साली एक महार सदस्य होता.[३] त्यांचा मुलगा माझ्यासोबत हायस्कूलमध्ये शिकत होता. इतकेच नव्हे तर अकोला येथे महिला मंडळाच्या एका संस्थेत एका महार मुलीस प्रवेश देण्यात आलेला आहे. ही उदाहरणे लक्षात घेऊन इतरांनी त्यांचे' अनुकरण करावे आणि लायक महारांना सार्वजनिक संस्थांवर प्रतिनिधित्व द्यावे.

श्री. के. पी. पांडे यांनी नंदागवळींच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून ठरावास पाठिंबा दिला. ते म्हणाले, 'नंदागवळी यांना दलितांची सेवा करण्याची आत्यंतिक तळमळ आहे व ते त्यांचे खरे प्रतिनिधी शोभतात. या वर्गातून उच्च कोटीची माणसे मिळणे कठीण जाईल, परंतु विशिष्ट पात्रता प्राप्त केलेले लोक मिळणे अशक्य नाही. स्थानिक संस्थांतून प्रतिनिधित्व दिल्यानेच सामाजिक आणि शैक्षणिक दर्जा उंचावण्यास त्यांना प्रोत्साहन मिळेल. इतर भारतीयांप्रमाणे त्यांनाही उज्ज्वल भवितव्य आहे. देशातील कोणतेही स्थान ते हस्तगत करू शकतात, ह्याची त्यांना जाणीव होऊ द्या. सध्या त्याना भवितव्यच नाही असे वाटते. हिंदू समाजाने त्यांना आपल्या टाचेखाली दडपून ठेवले आहे. जणू काही ती देवाची लेकरे नाहीतच या भावनेने हिंदू समाज त्यांना अस्पृश्य म्हणतो.' श्री. खडतकर यांच्या विधानावर हल्ला चढविताना पांडे म्हणाले, 'या सभागृहात देखील अस्पृश्य वर्गासंबंधीची कलुषित दृष्टी व्यक्त व्हावी ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे. उच्च आणि नीच अशी भावना इथं देखील दृष्टीस पडते जर उच्च वर्गाचे प्रतिनिधी अस्पृश्यांच्या सोबत बसायला तयार नसतील तर त्यांनी आपल्या पदाचे राजीनामे देऊन स्वतःला भ्रष्ट होण्यापासून मुक्त करावे. आम्ही स्वराज्याकरिता ओरड करतो, परंतु अशा प्रकारे लोकशाहीविरोधी वर्तनाने आपण आपली नालायकी सिद्ध करीत आहोत. आमच्या मतानुसार आम्हाला वाटते, ब्राह्मण आणि शूद्र हे समान आहेत. जर उच्चवर्गीयांकरिताच स्वराज्य असेल, तर हे स्वराज्य निव्वळ फसवणूक आहे. स्वराज्यात ब्राह्मण आणि शूद्र, गरीब आणि श्रीमंत हे सर्व समान लेखले जातात.'

श्री. आनंदीप्रसाद यांनी देखील नंदागवळी ह्यांच्या ठरावास पाठिंबा दिला. 'उच्च वर्गीय आणि मागासवर्गीय हा फरक उभयतांच्या बौद्धिक पातळीवर व्यक्त होतो. जर मागासवर्गीयांपैकी बुद्धिमान व लायक व्यक्ती सापडत असतील, तर त्यांना इतर उच्चवर्गीय सदस्यांसोबत स्थानिक संस्थांत बसू देण्यास हरकत नसावी व त्यांना आपली योग्यता आपल्या कर्तृत्वाने सिद्ध करण्यास संधी द्यावी,' असे ते म्हणाले.

नानासाहेब गवई यांनीही नंदागवळींना पाठिंबा देताना म्हटले की, 'जे लोकल बोर्डातील सदस्य महार सदस्यांना स्वतःसोबत बसू देण्यास विरोध करतील, ते सदस्य म्हणून अपात्र ठरविता यावे त्यांच्या मतानुसार लायक आणि कार्यक्षम हे शब्द अस्पृश्य व्यक्तींच्या बाबतीत फार मोठे अडसर आहेत. ते कुणाही व्यक्तीस अकार्यक्षम किंवा नालायक ठरवतात. योग्य व लायक या शब्दांची व्याख्या करायला हवी.'

श्री. एन. ए. द्रवीड यांनी रावसाहेब खडतकर यांच्या भाषणाचा उल्लेख करून म्हटले की, 'सनातनी वर्गाकडून विरोध होणे ही बाब अशक्य नाही, परंतु नवीन लोकशाही व्यवस्थेत या सनातनी मताना स्थान द्यायला नको. विधान परिषदेचा धडा सर्व स्थानिक संस्था आणि इतर लोकशाहीवादी संस्थांतून गिरवायला

हवा. नियुक्त केल्या जाणाऱ्या सदस्यांची योग्यता ठरविण्याकरिता कोणतेही बांधीव नियम करणें वरोबर नाही. स्थानिक अधिकाऱ्यांनी योग्य निर्णय घेऊन हे ठरवावयाचे आहे.'

रावबहादुर देशपांडे यांनी ठरावाला विरोध केला आणि रावसाहेब खडतकर यांना पाठिंबा दिला. सेठ शिवलाल यांनीदेखील ठरावाला विरोध केला. ते म्हणाले, 'योग्य महार व्यक्तीस मतदार निवडूनच देतील. जर ते नियुक्त सदस्य म्हणून या संस्थांतून लोकांवर लादले गेले, तर खेडोपाडी त्यांच्यात भांडणे होतील.'

चर्चेला उत्तर देताना श्री. नंदागवळी यांनी सर्व मुद्यांचा परामर्श घेतला. ते म्हणाले, 'या संस्थांवर ठोंब्या व्यक्तींना आणावे हा माझ्या ठरावाचा काही उद्देश नाही. लायक व्यक्तीच यावर नेमण्यात याव्यात. आमच्या लोकांना सार्वजनिक कामे करण्याकरिता आणि स्वतःची उन्नती साधण्याकरिता संधी मिळावी म्हणून हे प्रतिनिधित्व हवे आहे. माननीय मंत्र्यांच्या निवेदनानुसार पंचायत व सॅनिटेशन कमेटयात सदस्य नियुक्त करण्याची सोय नाही. अशा संस्थांवर नियमबाह्य नेमणुका करण्याचा माझा हट्ट नाही. माझे एवढेच म्हणणे आहे की, आम्हाला या संस्थांचा अनुभव घेण्याकरिता थोडीशी सूट देण्यात यावी. रावसाहेब महाजन यांची सूचना स्वीकारार्ह आहे. या ठरावात मध्यप्रदेशासोबत वऱ्हाडातील जिल्ह्यांचाही समावेश व्हावा. रावसाहेब खडतकर यांची मते पुरातन व अव्यवहार्य आहेत. जुन्या कल्पना झटकून टाकल्याशिवाय आपण नवीन राजकीय सुधारणा अंमलात आणू शकत नाही. खेडोपाडी लोकमत जागृत करण्याचे व आम्हाला सहानुभूतीची वागणूक देण्याचे काम सुधारलेल्या पुढाऱ्यांचे आहे. सावकारी आणि इतर धंद्यांमध्ये, इतर लोकांचा आमच्याशी व्यवहार पाहता, अस्पृश्यतेची जाणीव आम्हाला फारशी होत नाही. सबब माझा ठराव स्वीकृत करून आम्हाला लोकांची सेवा करण्याची संधी द्यावी.'

माननीय रावबहादुर एन. के. केळकर यांनी समारोप करताना ठरावात थोडाफार बदल करून सभागृहाची संमती घेतली. या सर्व चर्चेत सर्व सदस्य हिंदीतून बोलले. नंदागवळी हे हिंदीतील एक उत्कृष्ट वक्ते समजले जात. विधानपरिषदेतील सर्व भाषणे त्यांनी हिंदीतूनच केलेली आहेत.

वरील सर्व चर्चेतून एक गोष्ट लक्षात येते की, नंदागवळी यांनी मॉन्टेग्यू चेम्सफोर्ड सुधारणांद्वारे आलेल्या सवलतींचा जो फायदा इतर समाजाला मिळणार होता त्यात दलित समाजाला वाटा मिळावा म्हणून, सांसदीय मार्गाने, पहिलाच प्रयत्न केला. अस्पृश्य समाजाबद्दल कोणत्याही प्रकारचा आकस न दाखवता आपली मते विधान परिषदेच्या व्यासपीठावरून ते सातत्याने मांडत राहिले. याबाबतीत इतर सदस्यांची मने वळविण्याचे कौशल्यही त्यांना अवगत होते, हे इतरांच्या भाषणांतून व्यक्त होते.

श्री. नंदागवळी :– 'मी अस्पृश्य वर्गाचा वकील म्हणून स्वतःला समजत

नाही. कारण मी तुमच्यासारखा निवडून आलेला नाही. युक्तिवाद मला जमत नाही. त्यामुळे माझ्या विधानाच्या समर्थनार्थ मी पुरावे अथवा आधार देऊ शकणार नाही. मी निवडून न येता नियुक्त केलेला प्रतिनिधी म्हणून आलो. त्यामुळे मला अस्पृश्यांचा मुकादम (पाटील) अथवा कोतवाल वा बिगाऱ्या म्हणून समजण्यात येईल याची मला जाणीव आहे. परंतु माझ्या दाव्याचा निकाल लावायचा असेल तर माननीय अध्यक्षांनी न्यायाधीशाची भूमिका स्वीकारावी व निवडून आलेल्या आणि नियुक्त केलेल्या सदस्यांनी प्रस्तुत प्रश्नाचा सांगोपांग विचार करावा आणि निःपक्षपाती भूमिकेतून निणय द्यावा– अशी माझी विनंती आहे.'

'माझा ठराव खालीलप्रमाणे आहे–

'विहिरी, धर्मशाळा (सराई), तलावावरील घाट आणि नळ, जे मध्यप्रांतात व वऱ्हाडमध्ये सार्वजनिक पैशाने बांधण्यात आलेत किंवा पुढे बांधण्यात येतील, त्यांचा उपभोग इतर कोणत्याही जातीजमातीप्रमाणे अस्पृश्यांनी घ्यावा, असे या परिषदेचे मत आहे.

'या सभागृहातील आमच्या अनेक बंधूंच्या मनात माझ्या ठरावाने अस्वस्थता निर्माण होण्याचा संभव आहे. परंतु त्यानी शांत चित्ताने व न्यायाच्या भूमिकेतून विचार केला तर त्यांच्या शंका दूर होतील. माझा ठराव कोण्या एका धर्माविरुद्ध नाही. तो माणुसकीच्या सर्वसामान्य हक्कांसाठी आहे. सार्वजनिक पैशातून निर्माण झालेल्या बाबींचा उपभोग हिंदू मुसलमान, पारशी व ख्रिश्चन लोक जर सरसकट घेऊ शकतात, तर अस्पृश्य वर्गालाच, हिंदू असूनही, त्याचा उपभोग घेण्यास प्रतिबंध का? स्वराज्य मिळाल्यानंतरही अस्पृश्यांना आपण असेच वेगळे ठेवणार आहात काय? सरकारच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिजोरीतील सार्वजनिक पैशात काय अस्पृश्य समाज योगदान करीत नाही? इंडियन पिनल कोडच्या सेक्शन २२७ मध्ये (रावसाहेब मथुराप्रसादकृत हिंदी आवृत्ती पृ. ६२०) स्पष्ट म्हटलेले आहे –

'कनिष्ठ जातीतील कोणत्याही व्यक्तीने सार्वजनिक विहिरीतून पाणी काढले म्हणून ती विहीर विटाळली, असे समजले जाणार नाही. कारण जातीपातीचा विचार न करता सर्व जातींच्या लोकांकरिता ती बांधलेली आहे आणि कोणत्याही व्यक्तीस त्या विहिरीचे पाणी भरण्यास अधिकार आहे. सन १९०० साली मध्यप्रांताचे ज्युडिशिअल कमिशनर श्री. इस्मे यांनी महाराणी विरुद्ध पांडया महार या केसमध्ये निर्णय देताना सेक्शन २७७ मधील 'विटाळणे' या शब्दाचे स्पष्टीकरण केलेले आहे.

(या ठिकाणी श्री. गवई यांनी हा निर्णय वाचून दाखवला.)

'माझ्या प्रश्नाला २ मार्च १९२१ रोजी उत्तर देताना जी माहिती मिळाली ती पुढीलप्रमाणे–

	एकूण	अस्पृश्यांच्या वापरातील	अस्पृश्यांना प्रतिबंध असलेल्या
विहिरी	४९४७	११३८	३८०९
सराई	५४३	५००	४३

अस्पृश्य समाजाचे जे थोडे फार हक्क आहेत, तिकडे सर्वांनी लक्ष देणे आवश्यक आहे आपण एकीकडे राजकीय हक्कांसाठी भांडत आहोत व दुसरीकडे हेच अधिकार इतरांना लाभू न देण्याची सत्ताही आपल्याला मिळत आहे पिढिजात चालत आलेल्या दृष्टिकोणात या नव्या युगात आपण बदल करायला हवा. प्रत्येक जण स्वतःच्या हक्कांबद्दल जागरूक होत आहे. अशा वेळी आपल्याच बांधवांच्या मानवी हक्काला गिळंकृत करण्याचे धोरण स्वराज्यात तरी बोधप्रद ठरणार नाही. याउलट पुढारलेल्या वर्गाचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी आपल्या हक्कांचा उपयोग अस्पृश्य वर्गास होऊ द्यावा, जेणेकरून राष्ट्रीय कार्यात ते समान पातळीवर सहभागी होऊन प्रगतीस हातभार लावतील.' नंतर आवाज थोडासा चढवून ते म्हणाले –

'हिंदू, पारशी, मुसलमान आणि ख्रिश्चन यांच्याकरिता राखून ठेवलेल्या विहिरी, तलाव आणि नळ हे अस्पृश्यांच्या स्पर्शाने बाटतात, हे तुमच्या बुद्धीला पटते काय ? हिंदूंव्यतिरिक्त, तसे पाहाता, इतर सर्वजण अस्पृश्यांच्या हातचे खातात व पितात. ही अस्पृश्यतेची खोडच हिंदू धर्मास पोखरून टाकीत आहे. या अस्पृश्यतेने हिंदू धर्मालाच नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राला कलंकित केले आहे. न्यायाच्या नावावर हे अन्याय व विषमतेचे ढोंग कुठपर्यंत चालणार ? म्हणून माझे या सभागृहातील सर्व बांधवांना आवाहन आहे की, त्यांनी निःपक्षपाती बुद्धीने माझ्या ठरावावर मत द्यावे व तो स्वीकारावा.'

रावबहादुर एम. जी. देशपांडे म्हणाले, 'महार हे आपल्या विहिरीवर मांग, चांभार आदी अस्पृश्यांना पाणी भरू देतील काय? देत नसतील तर त्यांनी स्पृश्यांकडून तसा अधिकार मागू नये व शिक्षणाने सर्वांची सुधारणा होईपर्यंत वाट पाहावी. कालौघात सर्व भेद नष्ट होतील.' त्यांनी उदाहरण देऊन सांगितले की, एका गावात महार लोक इतर अस्पृश्यांना पाणी भरू देत नाहीत.

अस्पृश्यांच्या प्रश्नासंबंधी नेमलेल्या कमिटीत श्री. नेल्सन यांनी केलेल्या विधानाचा आधार घेऊन ते म्हणाले, 'धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे सरकारचे धोरण आहे व ते सरकारने पाळावे. हा प्रश्न पूर्णतः धार्मिक आहे, म्हणून धर्मपरिषदेकडे तो नेण्यात यावा. येत्या डिसेंबरात ही धर्मपरिषद आहे.'

सरकारवर दोषारोपण करताना देशपांडे म्हणाले, 'अस्पृश्यांबद्दल सरकारला अनुकंपा असून देखील व अस्पृश्यांत लायक माणसे उपलब्ध असताना पोलीसखात्यात अस्पृश्यांची भरती सरकार करू शकले नाही. सामाजिक पूर्वग्रह दूर करणे

सरकारलाही कठीण जाते.'

वरील कमेटीसमोर श्री. आर्मस्ट्रॉंग यांनी म्हटले की, 'वऱ्हाडात जेथे अस्पृश्यांपैकी बरेच लोक पोलिसात भरती केलेत, तेथे फारशी अडचण नाही, परंतु नागपूर व मध्यप्रांतातील जिल्ह्यांतून बरेचसे परदेशी ब्राह्मण पोलीस कॉन्स्टेबल आहेत. या विभागात महारांना पोलीस म्हणून नेमले तर या खात्यात असंतोष पसरण्याचा संभव आहे. मी यांना नेमावे या मताचा आहे. परंतु त्यांना नेमून अशांतता विकत घेण्याची ही वेळ नव्हे.'

देशपांडेंनी शेवटी या ठरावास विरोध दर्शविला. श्री. एल. जी. कटरेंनी सुरवातीलाच नंदागवळींचे मोकळ्या अंतःकरणाने अभिनंदन केले. ते म्हणाले, 'नंदागवळींनी हा ठराव आणून फार मोठे धैर्य दाखवले आहे. अस्पृश्यांना समान हक्क देऊन सामाजिक, औद्योगिक व राजकीय बाबतीत स्पृश्यांच्या पातळीवर आणावे याबद्दल दुमत असायला नको. परंतु हे करताना त्यांनी सामाजिक रूढी व हिंदू धर्म यांवर कायद्याच्या माध्यमातून आघात करू नये. हिंदूंच्या रूढींवर टीका करणे निरर्थक आहे. कारण स्वतः अस्पृश्यच जातीयता पाळतात. जर नंदागवळींचा ठराव संमत झाला तर सतत तक्रारी, आंदोलने, अर्ज यांना सरकारला तोंड द्यावे लागेल व हिंदू धर्माचीही प्रगती रुद्ध होईल.

'हिंदू लोक तयार असल्याशिवाय त्याच्या धार्मिक भावना दुखावू नये. धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करण्याची वेळ अजून यायची आहे. सबब, कायदा करून त्यांचा विरोध घेण्यापेक्षा त्यांचे मनपरिवर्तन करून, सहकार्याने नंदागवळींनी सुधारणा घडवून आणावी. सध्या स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका वगैरेंनी अस्पृश्यांकरिता स्वतंत्र घाट, नळ, वगैरे बांधलेले आहेतच. हा ठराव अंमलात आणल्यास सर्वसामान्य समाजातील सद्भाव नाहीसा होऊन भांडणे होतील. शिवाय अशा ठरावाचा अर्थ असा आहे की, हिंदू व मारवाडी समाजाच्या पवित्र देवालयांत प्रवेश मिळविण्याकरिता अस्पृश्य समाज पूर्वतयारी करीत आहे अशी लोकांची समजूत होईल. म्हणून हा ठराव दुर्दैवी म्हणावा लागेल.'

श्री. जी. पी. डिक म्हणाले, 'श्री. नंदागवळींनी आणलेला ठराव दुर्दैवी म्हणावा लागेल. या ठरावाचे दोन भाग पडतात. एक म्हणजे विहिरी, व दुसरा म्हणजे तलाव नळ आदी पाणी मिळण्याची इतर स्थळे. खरे पाहाता आपणास विहिरीशीच कर्तव्य आहे. या परिषदेत व इथे गॅलरीत जमलेल्या मंडळींस, त्यात पुष्कळसे कोतवाल देखील आहेत, कल्पना आहे की, मला महार समाजाबद्दल किती आस्था व कळकळ आहे. आणि त्यांच्या प्रश्नात मी नेहमी करून सहभागी असतो. आणि ते अनायासे हजर आहेत म्हणून मला विशेष आनंद वाटतो. मला स्पष्ट जाणीव करून द्यावीशी वाटते की, हिंदू धर्माप्रमाणे ते उचित नाही. या ठरावात श्री. नंदागवळींनी म्हटले आहे की, विहिरी आदींचा उपभोग घेण्याच्या सोयी इतर जातीजमातींप्रमाणेच आम्हाला पाहिजेत. आता या सोयी कोणत्या? (त्यांनी यादी वाचून

दाखविली) कोणत्या जिल्ह्यात किती विहिरींवर सर्व समाज पाणी भरतो अथवा किती विहिरींवर अस्पृश्यांना मनाई आहे, हे त्यांनी दाखवले. या यादीवरून दिसून येते की, महारांना ज्या सार्वजनिक विहिरींवर पाणी भरण्याची मनाई आहे, त्या विहिरींची संख्या अगदी अल्प आहे. जर महारांच्या तक्रारीचे निवारण केले, तर ते या विहिरींवर, इतरांच्या मनाविरुद्ध जाऊन, सहज पाणी भरू शकतील. परंतु लोकभावना दुखावून पाणी भरणे महार देखील मान्य करणार नाहीत, असे मला वाटते.

'मी अनेकांनकडे विचारपूस केली, तेव्हा बहुसंख्य महार समाज हिंदू धर्मातच राहू इच्छितो. (म्हणजे धर्मांतराची प्रक्रिया सुरू झाली होती असे दिसते.) मी त्यांना स्पष्ट सांगितले की, जर हिंदू धर्माच्या अन्यायातून आणि विषमतेच्या वागणुकीतून सोडवणूक करून घ्यावयाची असेल, तर त्यांनी इस्लाम अथवा ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करावा किंवा हिंदू धर्मातीलच ब्राह्मो समाजासारख्या पंथात जावे. माझ्या मते हिंदू म्हणून अस्पृश्यांना कोणताच अधिकार नाही. महार समाज सध्या ज्या सोयींची मागणी करीत आहे, त्या सोयी अनादी कालापासून त्यांना नाकारण्यात आल्या आहेत. जोपर्यंत हिंदू समाजाच्या गळघाशी एखादे संकट येऊन ठेपत नाही, तोपर्यंत तो समाज रूढी-परंपरेचे पालन करील आणि महारांना पाणी देणार नाही. 'आपण सर्व माणसे आहोत, या पाणपोईचे गार पाणी पिऊन आपण आपली तहान भागवूया' असे आपल्याला एखादा ब्राह्मण म्हणेल याची मला खात्री आहे. परंतु हिंदू समाजाचे हक्क अस्पृश्यांना नाकारले त्याबद्दल महारांना ते पाणी द्यावे, असे म्हणणे योग्य नव्हे. या सभागृहातील सर्व ब्राह्मण– ब्राह्मणेतर सदस्य परस्परांच्या भावनांचा आदर करतात व परस्परांच्या हक्कांवर अतिक्रमण करावे, असे कुणालाही वाटत नाही.'

श्री. ग. आ. गवई:- 'माझा पाठिंबा स्वाभाविक आहे. मला वाटत होते की या सुधारपरिषदेतील सदस्य जातीय पूर्वग्रहाच्या पलिकडे विचार करतील आणि मानवतेच्या मूलभूत व सर्वसामान्य हक्काच्या मागणीला जोराचा नैतिक पाठिंबा देतील. सार्वजनिक विहिरी या लोकांच्या पैशांतून बांधलेल्या आहेत व त्यात अस्पृश्यवर्गाचा मोठा वाटा आहे. या विहिरींवर पाणी भरण्याचा त्यांचा नैसर्गिक हक्क आहे व न्याय आणि माणुसकीच्या दृष्टिकोणातून त्यांना या हक्कापासून वंचित ठेवता येत नाही आपल्या जन्मगत अधिकारांची मागणी करणारा अस्पृश्य समाज संपूर्ण समाजात जातीय तणाव वाढवतो, भांडणे निर्माण करतो अथवा राष्ट्रीय प्रगतीच्या आड येतो, हा भिकारडा युक्तिवाद आहे. महात्मा गांधी आणि टिळकांनी अस्पृश्यतेच्या प्रश्नांना धार्मिक प्रश्न मानले नाही. तर या दोन प्रश्नांची सांगड घालण्याचा प्रयत्न होत असेल तर मला असे म्हणावे लागेल की, जे दुसऱ्याचे मानवी हक्क हिरावून घेतात ते धर्मकृत्य होऊ शकत नाही. ईश्वराने प्रत्यक्ष येऊन जरी मला सांगितले की, अस्पृश्यतेला धर्माची मान्यता आहे, तरी मी त्याचा

अव्हेर करेन. कारण अशा मानवी हक्कावर सर्वांचा सारखा अधिकार आहे. हे बुद्धीला पटले म्हणून धर्माच्या नावावर विरोध करणे अनुचित होय. निव्वळ प्राचीन काळापासून ही प्रथा चालत आली म्हणून ती टिकावी, हा काही युक्तिवाद नव्हे. रूढी जर तर्काच्या कसोटीवर टिकत नसेल, तर ती जुनी असो वा नवी, तिचा विमोड केला पाहिजे. तथाकथित धर्मशास्त्रे जर या मानवी हक्काविरुद्ध निर्णय देत असतील, तर अशा शास्त्रांना मी बांधलेला नाही. ब्राह्मणांचे सर्वश्रेष्ठ स्थान देखील मान्य नाही. जर रावबहादुर देशपांडे हे ब्राह्मणांना मांग, चांभार व भंग्याच्या पंक्तीस आणू शकत असतील, तर या पंक्तीला महारांना आणण्याची मी हमी घेतो. सामान्य अज्ञ समाजास काय आवडते याचा विचार करण्याकरिता आपण इथे जमलेलो नाही. लोकप्रतिनिधी, जे सुसंस्कृत व कर्तृत्ववान आहेत, त्यांचे हे कर्तव्य आहे की, जे न्याय्य व लोकोपयोगी, मनास पटणारे कार्य असेल, त्यासंबंधी निर्णय घेणे. या ठरावास प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना ज्या अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे, त्यांची मला पूर्ण जाणीव आहे. परंतु हा तत्त्वाचा प्रश्न आहे. या वैचारिक चर्चेत प्रत्येक सुज्ञ माणसाने सत्याच्या बाजूने निर्णय द्यायला हवा.'

सर बिपिन कृष्ण बोस- 'सार्वजनिक पैशाने निर्माण झालेल्या वास्तू अथवा संस्था, ज्या निर्मितीच्या वेळेस विशिष्ट जातीकरिता राखून ठेवल्या नसतील, त्यांचा सर्व लोकांना उपभोग घेता यायला हवा, हा एक सर्वसामान्य सिद्धांत आहे व यात दुमत होण्याचे कारण नाही. ज्याअर्थी हा ठराव आला त्याअर्थी अतिशय क्रूर अशा विषमतेची प्रथा सुरू असून त्याला या ठरावाद्वारे वाचा फोडण्यात आलेली आहे, हे सिद्ध होते. आणि जर आपणा सर्वांना संघटित भारतीय राष्ट्र निर्माण करण्याचे ध्येय गाठायचे असेल, तर ही विषमता नाहीशी करणे भाग आहे. वांशिक, धार्मिक व जातीय भेद आणि परस्परांतील विषमता अशीच कायम राहील, तर आपले एकसंध भारताचे स्वप्न साकार होणे अशक्य आहे. त्याच वेळी विषमतानिर्मूलन तातडीने होणेही आवश्यक आहे. सर्व राष्ट्र आज जागे आहे. झाले प्रत्येकजण जाणतो की, आपल्या जनतेच्या सर्व वर्गात याच बाबतीत नव्हे, तर सर्वच बाबतीत समभाव निर्माण व्हायला हवा. परंतु ही प्रगती कुणावरही लादायला नको. जर तसे केले तर आपल्याला माघार घ्यावी लागेल. म्हणून, माझी ठराव मांडणाऱ्यास विनंती आहे की, त्यांनी आपला ठराव मागे घ्यावा. या बाबतीत लोकमत दिवसेंदिवस अनुकूल होत आहे. तेव्हा त्यांनी योग्य वेळ येण्याची वाट पहावी. आज, उद्या किंवा परवा अशी वेळ येईल ज्यावेळी संपूर्ण लोकमत या बाजूचे राहील. सर्व तऱ्हेच्या विषमतेचे आणि अस्पृश्यतेचे लवकरच निर्मूलन होणार आहे.'

रावसाहेब आर. व्ही. महाजन- 'अस्पृश्य समाजाच्या उन्नतीकरिता जे प्रयत्न होत आहेत त्याला माझी नेहमी सहानुभूती राहिलेली आहे, याची साक्ष गवई आणि नंदागवळी देऊ शकतील. अकोला येथे महारांची खाजगी शाळा सुरू करण्यास व ती चार वर्षे चालविण्यास मी सतत मदत दिली आहे. मी स्वत: माझ्या घरी ४०

महारांना भोजन दिले आहे. माझी भूमिका पूर्णतः अस्पृश्य समाजास अनुकूल असूनही मला असे वाटत की, सध्या श्री. नंदागवळींनी मांडलेला ठराव हा कालविसंगत आहे. या ठरावामागील तत्त्व जरी ग्राह्य असले, तरी महत्त्वाचा प्रश्न असा की, 'मांजराच्या गळ्यात घाट कोणी बांधावी?' अस्पृश्यतेची भावना समाजात अनादी कालापासून खोलवर रुजलेली आहे. अशा प्रकारचे कठोर, आक्रमक उपाय आपल्याला उद्दिष्टापर्यंत पोहचू देणार नाहीत. सत्याच्या प्रस्थापनेकरिता नेहमी सामोपचाराचे धोरण स्वीकारायला हवे. अस्पृश्यतानिवारणाच्या असल्या प्रयत्नानी खेडोपाडी उसळणारा जाताय तणाव व तंटे आपण दुर्लक्षू शकत नाही. व्यावहारिक दृष्टीने काही पदरात पाडून घ्यायचे असेल, तर गवईसारख्यांनी हिंदू धर्मविरुद्ध कठोर उद्‌गार काढायला नको होते. वऱ्हाडातील स्थानिक स्वराज्य संस्था, जेथे मागणी असेल तेथ, महारांकरिता शाळा व विहिरी बांधण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. सर्वसामान्य इतर शाळांतदेखील महारांना शाळांतून प्रवेश मिळण्याची वऱ्हाडात तरी फारशी अडचण नाही. सुमारे ३० वर्षांपूर्वी, मी जेव्हा शाळेत जात होतो तेव्हा, माझ्या वर्गात एक महाराचा मुलगा शिकत होता व आम्ही, अस्पृश्यतची भावना न ठेवता, एकत्र खेळत होतो. कायद्यान महारांना या बाबतीत समानता दिली आहे हे खरे आहे. बिपिन यानी जे म्हटले की या ठरावाची गरज नाही, ते योग्य आहे. या ठरावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींची जाणीव गवईंनादेखील आहे. मी गवईंना विनंती करतो की, त्यांनी ज्या प्रकारचे आक्रमक स्वरूपाचे भाषण आज केले, तसे भाषण करू नये, त्यामुळे सुधारणेचे सगळे प्रयत्न खच्ची होतात. नंदागवळींनी ठराव मागे घ्यावा.'

आनदीप्रसाद:- 'माझे मित्र श्री. नदागवळी यांचा ठराव सरकारने स्वीकारायला हवा. कारण सरकारने पूर्वीच अस्पृश्यांना खास हक्क आणि सवलती दिलेल्या आहेतच. माझे मत असे आहे की, सार्वजनिक विहिरी व नळांचा अस्पृश्यांना उपयोग करू द्यावा. अथवा त्यांच्याकरिता वेगळी सोय या दृष्टीने निर्माण करण्यात यावी. हा प्रश्न धर्माला हात घालणारा आहे, याची मला जाणीव आहे. त्यामुळे अस्पृश्यांना स्पृश्य हिंदूंच्या विहिरींवर व नळांवर पाणी भरायला परवानगी देण्यास सरकार कचरेल. लोकांचे सर्व ग्रह लक्षात घेऊनही माझे स्पष्ट मत आहे की, अस्पृश्य लोकांची पात्रता वाढल्यावाचून या देशाची प्रगती होणे अशक्य आहे. म्हणून त्यांचा उद्धार करा. त्यांना इतरांत मिसळू द्या. प्रत्यक माणूस हा जन्माने शूद्र असतो व कर्माने वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण होत असतो. जर एखादा शूद्र आपल्या कर्माने हे सिद्ध करीत असेल की तो वर्णीयापैकी एका वर्णास पात्र आहे, तर त्याला त्या वर्णाप्रमाणे वागणूक देण्यास हरकत कोणती?'

सेठ मोतीलाल (हिंदी):- 'सार्वजनिक पैशातून तयार केलेल्या विहिरी व नळांवर अस्पृश्यांना पाणी भरण्यास सम्मती दिली तर सार्वजनिक पैशांनाच उभारलेल्या देवळांमध्ये उद्या त्यांना प्रवेश देण्याचा प्रश्न आपल्यासमोर उभा राहील.

मला माहीत आहे, नेमाड जिल्ह्यात लोकल बोर्डाने मांग व मेहतर जातींकरिता स्वतंत्र विहिरी व सराई बांधलेल्या आहत. आणि पाण्याबद्दल अथवा धर्मशाळेबद्दलच्या तक्रारी कुठेही नाहीत. अस्पृश्यता नष्ट करण्याची कल्पना काही वाईट नाही. परंतु जीमुळे अस्पृश्यता पाळली जाते ती कारणे प्रथम हुडकून काढून नष्ट करायला पाहिजेत. स्पृश्य समाज ज्या मुख्य कारणामुळे अस्पृश्यांना आपल्यात मिसळू देत नाही ते म्हणजे अस्पृश्य लोकांच्या सवयी घाण आहत. मुख्य म्हणजे ते मेलेल्या ढोराचे मास खातात. आपल्या घाण सवयी अस्पृश्यांनी जर सोडल्या आणि ढोराचे मांस खाणे बंद केले आणि ते स्पृश्यांसारखे स्वच्छ राहू लागले तर त्यांच्यावरील अन्याय आपाआप नष्ट होतील. उदाहरण द्यायचे झाले तर पुराणातील देता येईल. घोर तपश्चर्या करून देखील विश्वामित्राला ब्रह्मर्षी हे पद वासिष्ठाने लाभू दिले नाही, कारण क्षमा, शांती व मानवतेचा त्याच्यात अभाव होता. तद्वतच, अशा प्रकारचे ठराव मंजूर केल्यास जातीजमातीत वैमनस्य वाढीस लागेल व जे अस्पृश्य 'परिया' बहुसंख्य समाजाच्या आसऱ्याने राहात आहेत त्यांना त्यांच्या दैनदिन शांत जीवनास मुकावे लागले. म्हणून माझी विनंती आहे की ठराव परत घेण्यात यावा.'

रायसाहेब मथुराप्रसाद (हिंदी)– 'महाराज, मांडण्यात आलेल्या या ठरावाचे विशेष महत्त्व काय हेच मला कळत नाही. माझ्या जिल्ह्याचा विचार केला तर त्यावरून असे दिसून येते की, महारांची संख्या फार थोडी आहे आणि पाण्याच्या तक्रारी कुठेही नाहीत. जरी हा ठराव पास झाला तरी त्याचा फारसा परिणाम होणार नाही. अस्पृश्यांना पाण्याची टंचाई असती तर अशा ठरावाचा काही उपयोग झाला असता. कायद्यासमोर सर्व व्यक्ती, मग त्या कोणत्याही जातीच्या असोत, समान आहत ना.सशय, परतु कायदा केला तर सर्व लोकांना त्याच्याविरुद्ध वागता येणे अशक्य आह. म्हणून अस्पृश्यांचा सुधारणा घडवून आणण्याकरिता अथवा त्यांचे हक्क त्यांना मिळवून दण्याकारता प्रथम त्यानी राहणी सुधारावी लागेल. स्वच्छतमुळ त्यांना उच्चवर्णीयांकडून आपोआप समानता प्राप्त हाईल. म्हणून मी माझ्या मित्राला त्यान ठराव परत घ्यावा अशा विनंती करतो.'

श्री. बा. वाय. देशमुख– 'समाजसुधारकच नव्ह, तर सुमारे २५ टक्के लोक अस्पृश्यतला मानात नाहात. अशा लोकात पाटील, पटवारी, दशमुख आणि देशपाडे याचा समावेश करावा लागतो. नंदागवळींच्या ठरावाद्वार जातीपाटजातीतील दुरावा कमा हाण्यास सहाय्य होईल. परधमात गेलल्या अस्पृश्य व्यक्तीस सार्वजनिक विहिरा वगैरेवर प्रतिबंध तर नाहाच, परंतु इतर सामाजिक समारभात देखील त्याना मुक्तपणे वावरता यते. उलट, अस्पृश्य ह हिंदूचे धमबांधव असून देखील त्याना दूर सारण्यात यावे ही खेदाची बाब आहे. नंदागवळींच्या ठरावाला संपूण सभागृहान पाठिंबा द्यायला हवा.'

श्री. नल्सन यांनी सरकारची बाजू समजावून सांगितली. ते म्हणाले की,

'अशा ठरावाच्या बाबतीत सरकारचे धोरण तटस्थतेचे राहील. हा ठराव सामाजिक रूढी व परंपरेशी निगडीत असल्यामुळे भिन्न जमातींनी आपसात यासंबंधीचे तंटे मिटवायचे असतात. ठरावाचे प्रवर्तक थंड डोक्याने विचार करतील तर त्यांना जाणवेल की, सामाजिक चालीरीतींत हस्तक्षेप केल्याने सरकार अडचणीत आल्याबाचून राहाणार नाही. असे धोरण सरकारच्या अंगलट येऊन नाना तऱ्हेचे प्रश्न सरकारसमोर निर्माण होतील. या बाबतीत सरकार तटस्थतेचे धोरण स्वीकारील, जेथे कायद्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न असेल तेथे तो निःपक्षपातीपणे अंमलात आणील, सार्वजनिक वाहनांचा उपयोग करताना अस्पृश्यांना कोणताच प्रतिबंध नाही. सरकारच्या तटस्थ धोरणाचा असा अर्थ नव्हे की, अस्पृश्यांबद्दल सरकारला सहानुभूती नाही. कोणताही सुज्ञ माणूस कबूल करेल की, या देशातील परिस्थितीत सरकारचे तटस्थ धोरणच योग्य आहे. शेवटी या सभागृहाच्या गैरसरकारी सदस्यांनी याबाबत काय तो निर्णय घ्यावा व तो सरकारला कळवावा, असे मला वाटते.'

चर्चेचा समारोप करताना कालीचरण नंदागवळी यांनी विस्तृत भाषण केले. या भाषणाचा सारांश असा–'माझ्या अंगी असलेले सर्व बळ एकवटून मी आपणास सांगू इच्छतो की, माझ्या ठरावाचा धार्मिक बाबींशी मुळीच संबंध नाही. विभिन्न वर्गांत तंटे निर्माण व्हावे हा माझा मुळीच हेतू नाही. अवर्षणाच्या गेल्या वर्षी अस्पृश्य वर्गाला किती हाल सोसावे लागले, याचा मला चांगला अनुभव आहे. गोंदिया शहरात अनेक अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही त्याचा कोणताच परिणाम निष्पन्न झाला नाही. या पार्श्वभूमीवरच मला हा ठराव मांडणे भाग पडले. धार्मिक प्रश्नांचे वाद उकरून काढून इतरांच्या धार्मिक हक्कांत हस्तक्षेप करण्याचा माझा मुळीच हेतू नाही, हे मी पुन्हा स्पष्ट करतो. आपल्या विद्वत्तापूर्ण निकालात न्यायमूर्ती दस्तूर यांनी महारांना हिंदू कायदा लागू होतो, असा निर्णय दिलेला आहे. जर महार हे हिंदूधर्मीय समजले जातात व हिंदूकायद्याने बद्ध आहेत, तर त्याना हिंदूंनी मानवी समाजाचा अतिसामान्य असा अधिकार का नाकारावा याचे मला नवल वाटते. जे वकील लोक महारांकडून प्रचंड पैसा उकळतात ते देखील अशा प्रश्नांवर त्यांच्या सहाय्यास येत नाहीत, हे पाहून तर मला विशेष आश्चर्य वाटते. या तऱ्हेचे कायदे महारांकरिता लागू होत नसतील अथवा अंमलात येत नसतील, तर मुसलमान आणि ख्रिश्चन लोकांकरिता ज्याप्रमाणे वेगळे कायदे आहेत, त्या तऱ्हेचे कायदे महारांकरिता निर्माण करणें यथोचित व न्याय्य ठरेल. होमरूलच्या प्रारंभीच्याच काळात माणुसकीचे सामान्य अधिकार महारांकरिता मिळावेत म्हणून आग्रह धरणे हे मी माझे कर्तव्य समजतो. काँग्रेसच्या अधिवेशनात देखील मी या विषयांचा पाठपुरावा केला होता. मी ज्याअर्थी नवीन सुधारणा मागीत आहे. त्याअर्थी ती कायदेशीर नाही म्हणून डावलून चालणार नाही. आम्ही तुमचे घाकटे बंधू म्हणून समजले जातो, तर आम्हाला कायमचे गुलाम ठेवून अथवा प्रगती नाकारून चालणार नाही. आमचे राहणीमान स्वच्छ नाही, असा एक मुद्दा मांडण्यात

आला. आमच्यातील काही लोक मृत ढोरांचे मांस भक्षण करतात, हे मी मान्य करतो. परंतु असे अनेक लोक आहेत की ज्यांच्या कुटुंबात अनेक पिढ्यांपासून मृतमांस भक्षणच नव्हे, तर साधा मांसाहार देखील बंद आहे. तसेच राहणीमानदेखील अत्यंतिक स्वच्छ व शुद्ध आहे. परंतु उच्चवर्णीयांच्या दृष्टीने हेही लोक तुच्छ आहेत. देवळात प्रवेश मिळावा असा आमचा आग्रह नाही. माझी मागणी साधी आहे. सार्वजनिक पैशांवर बांधण्यात आलेल्या विहिरी आणि सराईचा आम्हाला उपयोग घेता यावा. माझे मित्र सर बिपिन आणि रावसाहेब महाजनी यांनी म्हटल्याप्रमाणे हा ठराव संमत करण्यात अथवा त्याची अंमलबजावणी करण्यात मला मनाई झालेली नाही. परंतु माझे बांधव डबक्यातील गढूळ व घाणेरडे पाणी पीत आहेत आणि दुसरीकडे समग्र भारतात सत्ता आणि अधिकारात जास्त वाटा हवा म्हणून ओरड करण्यात येत आहे. एकीकडे अस्पृश्य वर्गाला माणुसकीचे अधिकार नाकारून दुसरीकडे सत्तेत वाटा मागणे याचा अर्थ असा की, सध्याच्या सत्ताधारी सरकारला आपल्या अधिकाराचा न्याय्य व समतोल बुद्धीने वापर करण्याला प्रतिबंध करणे होय. माझ्या अस्पृश्य बांधवांच्या हक्कांची मागणी करण्यामुळे आमचे थोरले बांधव अस्वस्थ होत असतील, तर त्याला माझा इलाज नाही. परंतु मी माझा ठराव मागे घेऊ शकत नाही. या सभागृहाला मी स्पष्ट सांगू इच्छितो की, घाईगर्दीत आणि व्यावहारिक अडथळे असताना याची अंमलबजावणी करण्याकरिता हा ठराव मला पुढे रेटायचा नाही- मला माहीत आहे की मराठी भाषिक प्रदेशात पैसे देऊनही महाराना पाणी मिळत नाही. पददलित आणि असहाय्य समाजाच्या हक्कांचा प्रश्न उद्भवला की 'तुम्ही थोडी वाट पहा, सामोपचाराने वागा' असा उपदेश करणे, हे सोपे असते. संपूर्ण रामटेकचे तलाव, उच्चवर्णीयांचे पाप धुण्याकरिता राखून ठेवलेले आहेत, परंतु अस्पृश्य वर्गांना स्मशानाची जागा श्राद्धाकरिता देण्यात आली आहे. या गोष्टी सामान्य वाटत असल्या तरी वारा कोणत्या दिशेने वाहत आहे हे दिसून येते. इतराना संयमाचा उपदेश करणे फार सोपे आहे.'

यानंतर, नदागवळी यांच्या आग्रहाविरुद्ध मतदान घेण्यात आले व ठराव दहा विरुद्ध तेवीस मतांनी नामंजूर करण्यात आला.

सार्वजनिक पाणवठ्याचा अधिकार *

सार्वजनिक विहिरी, बावडी, तीर्थक्षेत्रातील घाट आणि सराई यांचा वापर करण्यास अस्पृश्यांना मज्जाव करण्यात येऊ नये, याबद्दलचा ठराव श्री. नंदागवळीनी पुन्हा दोन वर्षांनी म्हणजे ता. १३-८-१९२३ राजी सभागृहात माडला आणि त्यावर पुन्हा चर्चा घडवून आणली. ही समग्र चर्चा ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाची असल्यामुळे ती सविस्तर स्वरूपात देण्यात येत आहे.

सभागृहासमोर ठराव माडताना श्री. नंदागवळी म्हणाले– 'अशाच प्रकारचा

---

*) I bid- Dt. 13-8-1923, pp 421-33

ठराव मी नोव्हेंबर १९२१ रोजी मांडलेला होता. परंतु तो धुडकावून लावण्यात आला होता. हा ठराव कोणत्याही दुष्ट हेतूने पुन्हा मांडलेला नाही, असे मी सभागृहास आश्वासन देतो. अस्पृश्य वर्ग हिंदू समाजपुरुषाचेच पाय आहेत, असे समजले जाते. सबब, संपूर्ण शरीराचे वजन पेलण्याची ताकद त्यांच्यात निर्माण व्हायला हवी. माझ्या जमातीचे लोक ज्या तऱ्हेचा अन्याय व अडचणी सहन करीत आहेत, त्याची मी सभागृहास जाणीव करून देऊ इच्छितो. ज्या विहिरींवर इतर सर्वजण पाणी भरतात तिथून, तृषाक्रांत असतानादेखील, अस्पृश्य समाजास पाण्याचा थेंब मिळत नाही. काही ठिकाणी अस्पृश्यांच्या स्वतंत्र विहिरी आहेत. त्या जेव्हा आटतात तेव्हा एखाद्या लहानशा ओहळातून ते खड्डा करून त्यातील गढूळ पाणी पीत असतात. एके दिवशी मी भंडारा जिल्ह्यातील आमगाव या गावी डाक बंगल्यावर थांबलो होतो. तेथे एक महार चौकीदार होता. मी त्याला पाणी मागितले, परंतु कंपाऊंडमधील विहिरीतून तो पाणी भरू शकला नाही. तेवढ्यात एक ख्रिश्चन स्त्री आणि मुस्लिम स्त्री तेथे येऊन पाणी भरून गेल्या. ह्या दोघीही पूर्वाश्रमीच्या महारच असल्याचे कळले. आमच्या धर्माचा अभिमान बाळगून देखील, अशा प्रकारे अस्पृश्य म्हणून आम्हाला वागणूक देण्यात येते हे पाहून मला दुःख झाले. आम्हाला गलिच्छ सवयी आहेत आणि आम्ही अभक्ष्य भक्षण करतो, असा आमच्यावर आरोप करण्यात येतो. परंतु उच्च जातीचे लोक आमच्याहीपेक्षा घाणरडे राहतात, हे मी दाखवून देऊ शकेन. अनेक महारांच्या कित्येक पिढ्या मांसाहारदेखील करीत नाहीत, हेही मला दाखविता येईल. स्वराज्याकरिता आपल्या देशबांधवांनी जे अविश्रांत श्रम घेतले, त्यास अनुलक्षून श्रीमान गांधी, गोपाळकृष्ण गोखले आणि लोकमान्य टिळक यांच्या विचारांचे मी सभागृहाला स्मरण करून देऊ इच्छितो. अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लासेस परिषदेत लोकमान्य टिळक हे हजर होते आणि त्यांनी, राष्ट्रीय काँग्रेसने अस्पृश्यता निर्मूलनाचा घेतलेला निर्णय सर्वांनी स्वीकारावा, असा ठराव या परिषदेत मांडला. अस्पृश्यतेला शास्त्रात आधार नाही, असे त्यांनी स्पष्टपणे दाखवून दिले. अस्पृश्यता ही पिढ्यान् पिढ्या चालत आलेली पुरातन परंपरा आहे. एकदा पुण्यामध्ये एका चांभाराने गणपतीची स्थापना केली. त्याच्या शेजाऱ्याने समारंभात भाग घेण्यास नकार दिला. टिळकांनी त्याला स्वतःच्या गणपतीच्या शेजारी त्याचा गणपती मांडण्यास परवानगी दिली. गांधी, टिळक आणि गोखले यांचे अनेक भक्त या सभागृहात आहेत. तसेच बरेच समाजसुधारकही आहेत. या सर्वांनी माझ्या ठरावाला पाठिंबा द्यावा आणि अस्पृश्य समाजाच्या प्रगतीचा मार्ग मोकळा करावा.'

श्री. एल. जी. कटरे यांनी हिंदीतून भाषण केले. ते म्हणाले–'मागे एकदा या तऱ्हेचा ठराव फेटाळण्यात आला. सामाजिक आणि धार्मिक सुधारणांचा प्रश्न हा फार नाजुक असतो. स्त्रियांची भांडणे आणि लोंबाझोंबी हे खेड्यातील विहिरीवरील एक सामान्य दृश्य आहे. माणसे अशी भांडताना दिसत नाहीत. जर अस्पृश्य वर्गाला गावातील विहिरींवर पाणी भरण्यास मुभा दिली तर सर्वत्र अशांतता व अंदाधुंदी

माजेल. सबब मी त्याला विरोध करतो.'

माननीय रावबहादूर एन. के. केळकर–'या ठरावाद्वारे सभागृहाचे मत अजमावण्याचा नंदागवळींचा उद्देश दिसतो. नोव्हेंबर १९२१ मध्ये जेव्हा असलाच ठराव आला, तेव्हा सरकारतर्फे असे सांगण्यात आले की, सरकारचे धोरण तटस्थतेचे राहील. ही पूर्णतः सामाजिक अथवा धार्मिक बाब आहे. आणि असल्या सामाजिक आणि धार्मिक बाबीत सरकार हस्तक्षेप करीत नाही. तसेच सार्वजनिक पैशाने बांधलेल्या विहिरी अथवा धर्मशाळा, सराई यांचा उपयोग करण्याला सरकारने कोणत्याही प्रकारे प्रतिबंध केलेला नाही. स्थानिक लोकल बोर्डांनी देखील प्रतिबंध करणारे नियम केलेले नाहीत असे मला वाटते. या गोष्टी लक्षात घेता, सार्वजनिक पैशातून बांधलेल्या विहिरींच्या आणि सराईच्या वापराचा सर्वांना समान अधिकार आहे, या श्री. नंदागवळींच्या विचारांशी सरकार तत्त्वतः पूर्ण सहमत आहे. देवळांचा प्रश्न या प्रश्नांशी निगडीत नाही. कोणतेही देऊळ, माझ्या माहितीप्रमाणे, सार्वजनिक उत्पन्नातून बांधण्यात येत नाही, सार्वजनिक वर्गणीतून कदाचित बांधले जात असेल. म्हणून सार्वजनिक विहिरी आणि सराई यांच्याशी देवळांची सांगड घालण्यात येऊ नये. लोकमताचा पाठिंबा असणाऱ्या या सभागृहातील प्रतिनिधींची सहानुभूती मिळवून अस्पृश्यांच्या प्रश्नावर लोकमत तयार करावे असा हेतू या ठरावामागे असावा असे मला वाटते.

'येथे श्री. नंदागवळींनी अस्पृश्य वर्गावरील अन्यायाचे जे वर्णन केले त्याबद्दल या सभागृहातील कोणाही सदस्याचे दुमत होणार नाही. अस्पृश्यांना भयंकर जाच, त्रास सहन करावा लागतो, ही वस्तुस्थिती आहे. आता प्रश्न असा आहे, अस्पृश्यांना त्यांच्या गुलामी अवस्थेत आपण, जे स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणवून स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते समजतो, कुठपर्यंत खितपत ठेवणार? या सभागृहाने या प्रश्नाचा निर्णय करायलाच हवा. माझी खात्री आहे की, या गृहाचे सदस्य निव्वळ तोंडी सहानुभूतीच नव्हे, तर व्यवहारात देखील या ठरावाची अंमलबजावणी करतील. हा ठराव संमत केल्याने त्याचा व्यवहारात फारसा उपयोग होईल असे नाही. परंतु त्याला लोकशिक्षणाच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. सार्वजनिक विहिरी व सराई अस्पृश्यांनी वापरण्याविरुद्ध ज्यांच्या मनात धार्मिक आणि सामाजिक पूर्वग्रह आहेत, त्यांची सहानुभूती मिळविण्यास या ठरावाने मदत होईल. मला या ठरावास वैयक्तिक पाठिंबा देण्यास मुळीच हरकत वाटत नाही आणि येथील सर्व सदस्य याला पाठिंबा देतील, अशी मी अपेक्षा करतो.'

अध्यक्ष महाराज... 'या ठरावावर सरकारी सदस्य मतदान करणार नाही असे आपले म्हणणे आहे काय?'

माननीय रावबहादुर एन. के. केळकर... 'प्रत्येक सदस्यास मतदानाचा अधिकार नाही.'

अध्यक्ष महाराज... 'परंतु तुम्ही म्हणालात, तुम्ही वैयक्तिक मत देत आहात.'

माननीय रावबहादुर एन. के. केळकर... 'या ठरावामागील तत्त्व सरकारला मान्य आहे आणि ठरावकर्त्यालादेखील वैयक्तिक मत हवे आहे.'

अध्यक्ष महाराज...'तुम्ही ठराव स्वीकारता असे तुमचे मत आहे काय?'

माननीय श्री. केळकर... 'होय.'

रावबहादुर महाजनी– 'मला वाटते, प्रस्तुत ठराव हा लेजिस्लेटिव्ह कौन्सिल नियमांमध्ये बसत नाही. नियम २ अनुसार ठरावामधून सरकारला उद्देशून काही शिफारस करावी लागते. तशी कोणतीच शिफारस या ठरावात नाही. या ठरावाद्वारे फक्त धार्मिक आणि सामाजिक विषयावर मत मागितलेले आहे. आपण कोणत्या एका सामाजिक विषयाची चर्चा करण्यासाठी इथे जमलो आहोत, असे मला वाटत नाही.'

अध्यक्ष...कोणताही ठराव स्वीकारणे वा नाकारणें हे अध्यक्षाच्या अधिकारात आहे. हा ठराव अध्यक्षाने स्वीकारलेला आहे. अध्यक्षाने एकदा निर्णय दिल्यावर कोणत्याही सदस्याला त्या निर्णयाला आव्हान देता येईल, असे मला वाटत नाही.'

रावबहादुर महाजनी– 'एखादा ठराव अध्यक्षांनीच नाकारला तर त्याविरुद्ध कोणत्याही सदस्याला भांडण्याचा अधिकार नाही असा नियम आहे. परंतु सभा-गृहासमोर एखादा ठराव पहिल्या प्रथमच आला आणि हा ठराव नियमात बसत नाही असे काही सदस्यांना वाटले, तर त्या सदस्यांना त्या ठरावाला आव्हान देता येते, असे मला वाटते.'

अध्यक्ष–'नंदागवळींनी मांडलेला हा एखादा प्रश्न नसून ठराव आहे. तो गव्हर्नरांनी स्वीकारलेला आहे. हे स्वीकारणे योग्य की अयोग्य असा प्रश्नच उद्भवत नाही.'

रावबहादुर श्री. एन. के. केळकर – 'शाब्दिक चकमकीत आपण स्वतःला गुंतवून घेणे योग्य नाही. या ठरावाद्वारे या सभागृहातील प्रत्येक सदस्याची सहानुभूती प्राप्त करणे हा मुख्य हेतू आहे. आणि शक्य झाल्यास हे अन्याय दूर करावेत हाही यामागे हेतू आहे.'

अध्यक्ष–'ठरावाचा हेतू काय आहे, हे मला माहीत नाही. परंतु ठरावावर सरकारची भूमिका अनुकूल आहे की प्रतिकूल, हे स्पष्ट व्हायला हवे. सभागृहाने हा ठराव संमत करायचा अथवा नाही, हा नंतरचा प्रश्न आहे.'

रावबहादुर श्री. एन. के. केळकर– 'अध्यक्ष महाराज, सदस्यांना आपली मते व्यक्त करण्याची संधी न देता हे सभागृह हा ठराव स्वीकारू शकेल काय?'

अध्यक्ष– 'सरकारचे मत व्यक्त झालेले आहे. आता सदस्यांनी आपले मत काय द्यायचे हे ठरवायचे.'

सी. बी. पारेख– 'सभागृहाला आपले मत व्यक्त करण्यास पूर्ण स्वातंत्र्य आहे.'

श्री. जी. पी. डिक– 'अस्पृश्यांना प्रतिबंधित आहेत अशा काही विहिरी, बावडी, घाट अथवा सराई आहेत काय?'

अध्यक्ष– 'हा मुद्दा आपल्याला चर्चिण्याचे कारण नाही.'

श्री. डिक–'अस्पृश्य वर्गाला विहिरी, बावडी आदी सार्वजनिक स्थानांचा उपयोग करण्याचा अधिकार आहे, असे मत या सभागृहाने व्यक्त करावे ही मागणी या ठरावाद्वारे करण्यात आली आहे. याचा अर्थ असा की, या सार्वजनिक स्थळांवर ज्या मंत्र्याची अधिसत्ता असेल, त्याने अस्पृश्यांना या स्थळांचा वापर करण्यास मुभा आहे, असा आदेश काढायला हवा.'

अध्यक्ष– 'सरकारने हे स्वीकारावे हेच अर्थात नंदागवळींना आपल्या ठरावाद्वारे अभिप्रेत आहे आणि त्याप्रमाणे त्यांनी निवेदनही दिलेले आहे.'

रावबहादुर एम. जी. देशपांडे–'मला या विषयावर बोलायची इच्छा नव्हती. परंतु मंत्र्यांनी या ठरावाचा स्वीकार केला आहे, असे मी ऐकले. म्हणून मला त्यावर बोलावेसे वाटले. नंदागवळी यांनी हा प्रश्न काही वर्षांपूर्वी उपस्थित केला होता. त्यावेळी चीफ सेक्रेटरी श्री. नेल्सन यांनी आपले मत देताना स्वत: म्हटले होते की, असल्या प्रकारच्या धार्मिक अथवा सामाजिक बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याचा सरकारचा विचार नसून सरकारचे धोरण पूर्णत: अलिप्ततेचे आहे. अशा परिस्थितीत सरकारतर्फे हा ठराव या क्षणी कसा स्वीकारला जातो, हे मला कळत नाही. माझा ठरावाला विरोध आहे.'

नानासाहेब गवई–'या ठरावाचा विषय माझ्या मते धार्मिक मुळीच नाही. जर एखादा सदस्य ही धार्मिक बाब आहे, असा आग्रह धरीत असेल तर मी त्याला असे स्पष्ट बजावतो की, जो धर्म इतरांच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण करतो, तो धर्म त्या सदस्याने आपल्या घराच्या चार भितींत पालन करावा. या ठरावाच्या अनुषंगाने माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या ठरावाचा विषय हा अस्पृश्य समाजाच्या अधिकाराचा आणि स्वातंत्र्याचा आहे. हा धार्मिक प्रश्न नाही. सार्वजनिक पैशातून बांधलेल्या विहिरी, सराई आदी स्थळांचा अस्पृश्य लोकांना मुक्त उपभोग घेता यायला हवा आणि त्याविरुद्ध कोणतीही बायकी मुक्ताफळे लक्षात घ्यायला नकोत. ज्यांना विरोध करावयाचा आहे त्यांनी धैर्याने पुढे यावे, उगाच शिखंडीसारखे धोरण स्वीकारू नये. इतर देशांत देखील या प्रश्नांवर चर्चा होत आहे. केनयातील भारतीयांच्या छळणुकीबद्दल पुळका असणाऱ्या भारतीय पुढाऱ्यांनी प्रथम स्वत:चे घर सुधारावे आणि येथील अस्पृश्य आणि उच्चवर्णातील भेद प्रथम नष्ट करावा. आफ्रिकेमध्ये एका वृत्तपत्रात श्री. गोखले यांच्यासंबंधी एक व्यंगचित्र छापलेले होते. त्यात (आफ्रिकन जनतेच्या स्वातंत्र्याची मागणी करणारे) गोखले हे स्वत:च घाणीने बरबटलेले दाखवलेले होते. या व्यंगचित्राचा अर्थ अधिक स्पष्ट करुन सांगण्याची गरज नाही.

'सरकारतर्फे असे सांगण्यात आले की, त्याचे धोरण अलिप्ततेचे आहे. परंतु या धोरणास तडा जाईल असे उदाहरण मी दाखवू शकतो. मेहेकर (जिल्हा बुलढाणा) येथील तलावावर काही अस्पृश्यांनी पाणी भरण्याचा प्रयत्न केला तेव्हा

तेथील डेप्युटी कमिशनरकडे याविरुद्ध तक्रार करण्यात आली. जिल्हा अधिकाऱ्याने ही बाब सॅनिटेशन कमिटीला कळवून त्या अस्पृश्य लोकांना तलावावर प्रतिबंध केला. बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव तालुक्यातील एका महाराने सार्वजनिक पैशातून तालुका बोर्डाने बांधलेल्या विहिरीवर पाणी भरल्यामुळे त्याला शंभर रुपये दंड करण्यात आला. सरकारतर्फे असे सांगण्यात येते की, सार्वजनिक विहिरी, सराई, आदींचा उपयोग करणाऱ्या अस्पृश्यांना कुठेही बंदी नाही. परंतु कायद्याचा दुरुपयोग होत नाही, सरकारी अधिकारी हे अस्पृश्यांचा छळ करणार नाहीत, याबद्दल प्रथम सरकारने बंदोबस्त करायला हवा. सार्वजनिक पाणवठ्यावर अस्पृश्यांनी पाणी भरल्याबद्दल आलेल्या तक्रारीचे विरुद्ध ज्यावेळी कोर्टात आलेले अर्ज नाकारण्यात येतील, त्यावेळी सरकारचे धोरण अलिप्ततेचे आहे, असे मी समजेन.

'आम्ही फक्त आमच्या हक्काची मागणी करीत आहोत. सार्वजनिक पैशावर बांधलेल्या पाणवठ्यांच्या जागांचा उपयोग करण्याचा आम्हाला पूर्ण अधिकार आहे. मुंबई सरकारने अशा प्रकारचा ठराव पूर्वीच स्वीकारला आहे. मुंबई इलाख्यापेक्षा आमचा प्रांत कोणत्याही प्रकारे जास्त सनातनी नाही. रावबहादुर महाजनी, सर एम्. व्ही. जोशी आणि कितीतरी समाजसुधारक या प्रांतात आहेत. ते सर्व अस्पृश्यांच्या हिताकरिता आपले मत देतील, अशी आशा आहे.'

रावबहादुर महाजनी– 'या चर्चेत भाग घेण्याची मला इच्छा नव्हती, परंतु गवई यांनी 'अस्पृश्यांचे मित्र' म्हणून माझा उल्लेख केल्यामुळे मला माझे मत मांडणे भाग आहे. माझी अस्पृश्यतेच्या कार्यात नेहमीच सहानुभूती राहिली आहे. या सहानुभूतीमुळेच मी नंदागवळींना विनंती करतो की, या ठरावात अंतर्भूत असलेल्या उद्दिष्टाला जोपर्यंत लोकमत अनुकूल होत नाही, तोपर्यंत हा ठराव मांडू नये. निव्वळ ठराव मंजूर करून काहीही साध्य होणार नाही. जरी ठराव मंजूर झाला तरी खेड्यातील परिस्थिती लक्षात घेता त्याचा काही उपयोग होईल असे मला वाटत नाही. एक–दोन समाजसुधारकांनी अस्पृश्यांना सहानुभूती दाखवून अथवा त्यांच्या शाळांना वर्गणी देऊन किंवा त्यांच्यासह भोजन करून सहानुभूती दाखविली तरी हा प्रश्न सुटण्यासारखा नाही. अस्पृश्यांपैकी काहींनी क्रांतिकारी भूमिका स्वीकारली आणि त्यांनी इतरांना जरी सांगितले की- 'तुमचा हिंदू धर्म गुंडाळून ठेवा' तरी हा प्रश्न सुटण्यासारखा नाही. या प्रश्नात सहकार्याची जास्त गरज आहे. हा सामाजिक प्रश्न असल्यामुळे लोकांशी तो विशेष निगडीत आहे. म्हणून लोकमत जागृत करणे आणि खेड्यातील जनतेची सहानुभूती मिळविणे प्रथम आवश्यक आहे. ग्रामीण जनतेस बाजूस सारून श्री. गवई हे जर सरकारकडे धाव घेत असतील, तर माझा त्यांना मुळीच पाठिंबा नाही. सभागृहातील काही लोकांची सहानुभूती मिळून एखादा ठराव संमत करून घेतला तर त्याला माझा विरोध राहील, पण त्या लोकांना सोबत घेऊन तो संमत करीत असतील, तर मी त्यांचेसोबत आहे. सध्याच्या ठरावाला माझा विरोध आहे.'

श्री. जी. पी. जयस्वाल–'काही लोक या ठरावाचा चुकीचा अर्थ लावत आहेत याचे मला दुःख होते. (टाळचा) काही सदस्य त्याचा निव्वळ सामाजिक दृष्टीने विचार करीत आहेत. परंतु हे बरोबर नाही. आपण या ठरावाचा बारकाईने विचार केला तर असे आढळून येईल की, या ठरावात लोकशाही तत्त्वे अंतभूत असून या सुधारणेच्या काळात अशा ठरावाला सर्वत्र पाठिंबा मिळायला हवा. नागरी तत्त्वाचे समान हक्क या ठरावाद्वारे मागितलेले आहेत. सार्वजनिक पैशाने बांधण्यात आलेल्या विहिरी, धर्मशाळा आदी बाबी या सर्व जातीधर्मांच्या लोकांच्या मालकीच्या आहेत आणि त्यांचा उपभोग घेण्याचा अधिकार सर्वांना आहे. मग या लोकांची जात, धर्म कोणतेही असो. या ठरावाकडे व्यापक लोकशाही तत्त्वाला अनुलक्षून पाहिले तर त्याला सरकारने अथवा या सभागृहाने पाठिंबा दिल्याने कोणाचेही चुकत नाही. माझ्या दुर्दैवी अस्पृश्य बांधवांना निव्वळ सहानुभूतीचे चार शब्द न सांगता मी या ठरावाला अंतःकरणापासून पाठिंबा देतो.'

सी. बी. पारेख– 'माझे मित्र रावबहादुर श्री. देशपांडे यांनी असे निदर्शनास आणले की, चीफ सेक्रेटरी नेल्सन यांनी काही दिवसांपूर्वी दिलेल्या उत्तराशी माननीय मंत्र्यांनी आज दिलेले उत्तर विसंगत आहे. माझ्या मते मला कुठेही विसंगती दिसत नाही. आजही सरकार सामाजिक आणि धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करण्यास उत्सुक नाही. श्री. गवई यांनी जे उदाहरण दिले त्यावरून हे स्पष्ट होते की, अस्पृश्यांना सार्वजनिक विहिरी वापरण्यास प्रतिबंध असून सरकारची त्याला अनुमती आहे. प्रस्तुत ठराव सरकारने स्वीकारला तर सरकारचे हात मोकळे होतील आणि लोकांमध्ये गैरसमज राहणार नाही.

'लोकांच्या भावना बदलायला हव्यात, या रावबहादुर महाजनी यांच्या मताशी मी सहमत आहे. परंतु मी एक प्रश्न विचारतो. लोकमताचे परिवर्तन करण्याचे ज्यांचे कर्तव्य आहे, ते या सदनातील सदस्य या बाबतीत काय करीत आहेत? त्यांनी कधी या दृष्टीने प्रयत्न केला काय? व परिवर्तन हे उद्दिष्ट असेल तर या ठरावाद्वारे येथील सदस्यांचे हात बळकट होतील. लोकांकडे गेल्यानंतर ते म्हणू शकतील, 'नागपूर येथे जमलेल्या बहुसंख्य सदस्यांनी एकमताने आपले मत नोंदविले आहे व ही त्यांची इच्छा आहे. तरीही तुम्ही लोक महारादी अस्पृश्यांना सार्वजनिक जागांचा वापर करू देणार नाही काय?

'रावबहादुर महाजनी म्हणतात की, त्यांना अस्पृश्यांबद्दल सहानुभूती आहे. परंतु त्यांच्या वागणुकीने त्यांच्याबद्दल गैरसमज होण्याची जास्त शक्यता आहे. निव्वळ शाब्दिक सहानुभूती उपयोगाची नाही. त्याला कर्तव्याची जोड हवी. (टाळचा) लोक म्हणतील आम्हाला सहानुभूती नको, आम्हाला कृती हवी. या सभागृहातील प्रत्येक सदस्य जे बोलतो ते आचरणात आणीत असतो. रावबहादुर महाजनी यांनी ठरावाचा हेतू ओळखलेला दिसत नाही या ठरावाला स्वीकारून आपली खरी सहानुभूती आपल्या कृतीने आम्ही व्यक्त करणार आहोत.'

रावसाहेब एन. टी. खडतकर– 'अस्पृश्यांना सार्वजनिक विहिरी वगैरेंचा उपयोग करण्यास सध्या कुठेही मज्जाव नाही असे मला वाटते. नागपूर जिल्हाकचेरीच्या आवारातील विहीर सर्वांना खुली असून तिचे पाणी सर्व जाती वापरतात. नंदागवळी यांना अस्पृश्यांवरील अन्यायाबाबत तक्रार करण्याचे काहीच कारण नाही, कारण अस्पृश्य लोक हे आपसातच परस्परांवर अन्याय करीत असतात. अस्पृश्यांमध्ये अनेक जाती आहेत. अशाच जाती युरोपियन समाजात देखील आढळतात. विहिरी बांधताना स्थानिक लोकल बोर्डे या निरनिराळ्या जातींना विचारतातच. आम्ही शहरातील लोक अस्पृश्यता पाळीत नाही, परंतु खेड्यातील लोक पाळतात. त्याला आमचा इलाज नाही. हा ठराव संमत झाला तरी व्यवहारात त्याचा कोणताच उपयोग होणार नाही. सबब हा ठराव मागे घेण्यात यावा.'

माननीय सर एम. व्ही. जोशी–'या ठरावाचा उद्देश श्री. जैस्वाल यांनी म्हटल्याप्रमाणे या सभागृहाचे मत अजमावणे असा आहे. याचा लोकमतावर दूरगामी परिणाम होणार आहे. या प्रांतातील बुद्धिमान लोकांनी या ठरावाच्या बाजूने मत दिले तर सामाजिक सुधारणा घडवून आणण्यास बाहेरच्या जगात या ठरावाची मदत होणार आहे. वैयक्तिकरीत्या काही सदस्य अस्पृश्यांना मदत करण्यास तयार असले, तरी संपूर्ण जग त्यांच्या सोबत यायला तयार नाही, असे सांगण्यात येते. असे असेल तर सामाजिक परिषदांचे आणि त्यांत मंजूर होणाऱ्या समाजसुधारणेच्या ठरावांचे, जर त्यामुळे लोकमत तयार होत नसेल तर, प्रयोजन तरी काय?

'श्रीमान कटरे, खडतकर आणि महाजनी यांनी, हा ठराव निरुपयोगी आहे, असे दाखविण्याचा प्रयत्न केला, परंतु ठरावाच्या प्रवर्तकाने, तुमचे मत अनुकूल अथवा प्रतिकूल, काहीही असेल, असे स्पष्ट नमूद केलेले आहे. ठरावाची तुमच्या दृष्टीने योग्यायोग्यता तुमच्या मताने सिद्ध होणार आहे. म्हणून सभागृहाचे स्पष्ट मत हवे आहे, शब्दांची सरमिसळ नको. सार्वजनिक पैशावर बांधल्या गेलेल्या विहिरी वगैरेंचा वापर अस्पृश्य समाजास हवा आहे. कोणत्याही खाजगी संपत्तीवर अधिकार गाजविण्याची त्यांची इच्छा नाही. ब्रिटिश साम्राज्यात राहायचे अथवा नाही, हे केनयात राहणाऱ्या भारतीयांना मिळणाऱ्या वागणुकीवर ठरवण्यात येईल, असे काँग्रेसचे पुढारी कंठशोष करून सांगत आहेत. त्याचप्रमाणे भारतीय लोक हे स्वराज्यास लायक आहेत की नाहीत हेदेखील ते अस्पृश्यांना कशा प्रकारची वागणूक देतात यावर अवलंबून आहे. गेल्या वर्षी नामंजूर केलेल्या ठरावाने अस्पृश्य वर्गाच्या मनात भावी स्वराज्यात आपल्याला मिळणाऱ्या वागणुकीबद्दल संदेह निर्माण झाला आहे. या सभागृहाने अस्पृश्यतेचा कलंक ताबडतोब धुवून काढण्याचा प्रयत्न करायला हवा.'

श्री. आनंदीप्रसाद–'श्री. नंदागवळी यांना विरोध करण्यास मला दुःख होते. सामान्य जनतेच्या पिढचान् पिढ्या चालत आलेल्या समजुती आणि चालीरीतींना धक्का देण्याइतपत नवीन सुधारणेची मुळे खोल गेलेली नाहीत. अस्पृश्यतेला धार्मिक आधार आहे, अशी समजूत जनमानसात आहे. या सभागृहाने घिसाडघाईने या-

संबंधी निर्णय घेतले, तर १८५७ साली उद्‌भवलेल्या बंडाप्रमाणे सनातनी लोकांच्या उठावाला सरकारला तोंड द्यावे लागेल. हा ठराव दहा वर्षांनंतर आला असता, तर बरे होते, असे मला वाटते. अस्पृश्यांपैकी काही लोक मांस, मदिरा आणि वाईट सवयींपासून मुक्त आहेत, ही अभिनंदनाची गोष्ट आहे. परंतु त्यांच्याबद्दल लोकांतून अस्पृश्यतेच्या भावना नष्ट झालेल्या नाहीत. इतर धर्मांप्रमाणे हिंदू धर्मातही शारीरिक तसेच आंतरिक शुद्धता सांगितलेली आहे. व जोपर्यंत अस्पृश्यांसंबंधी सामान्य भावना बदलत नाहीत, तोपर्यंत असे ठराव सभागृहात आणणे निरुपयोगी आहे. उच्चवर्णीय आणि अस्पृश्यवर्ग यांच्यात सद्‌भाव निर्माण करून हे प्रश्न सोडवणे चांगले. सभागृहातून निर्णय मिळविणे उचित नाही. हा ठराव मागे घेण्यात यावा.'

श्री. एम. आर. दीक्षित–'अस्पृश्यांच्या वागणुकीबद्दल इतरांचे मतपरिवर्तन करता–करता लोकांना शिक्षण द्यावे, अशाप्रकारचे विचार नागपूरचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पार्शी सदस्याने व्यक्त करावे याचे मला नवल वाटते. मतदारांना लोकशिक्षण देण्याचा या ठरावाशी कोणताही संबंध दिसून येत नाही. निरनिराळचा जमातींत या ठरावाद्वारे एकात्मता निर्माण होईल असे नाही. पार्शी समाज पुरोगामी आहे, राहणीमानात युरोपियन लोकांच्याही पुढे आहे. इतके असून जर पार्शी माणूस जातीबाहेर जात असेल अथवा जातीबाहेर लग्न करत असेल, तर ही संपूर्ण जमात त्याचे विरुद्ध उभी राहील.'

अध्यक्ष– 'आपण पार्श्यांवर बोलत आहात, ठरावावर नाही. ठरावाशी संबंधितच बोललेले बरे.'

श्री. दीक्षित–'होय. माझे म्हणणे असे की, लोकशिक्षणाचा प्रस्तुत ठरावाशी काहीही संबंध नाही.

'दुसरा मुद्दा असा की, स्वराज्याकरिता आपण पात्र आहोत हे दाखविण्या–करिता अस्पृश्यता नष्ट व्हावी असे म्हटले. स्वराज्याचे क्षितिज अजून खूप लांब आहे. ते क्रमाक्रमाने येणार आहे. तरीही शतकानुशतके चालत आलेली ही रूढी एखाद्या सामाजिक परिषदेच्या ठरावाने नष्ट व्हावी अशी अपेक्षा करण्यात येते. समाजाचे सहस्रावधी वर्षांचे रोग दुरुस्त करण्याकरिता या सभागृहाने निव्वळ ठराव पास करून भागणार नाही. स्वराज्याची स्वप्ने पाहून देखील ही सुधारणा घडणे शक्य नाही. या सभागृहाने पास केलेले अनेक ठराव सरकारला अंमलात आणणे शक्य नाही. एका सरकारी सदस्याने याबाबतीत मात्र 'आपण ठराव मंजूर करून स्वराज्यास पात्र ठरावे' असे म्हटलेले ऐकून मला नवल वाटले. स्वराज्याचे क्षितिज खूप लांब आहे. ते आपणास केव्हा प्राप्त होईल हे सांगता येत नाही.

'माझ्या अस्पृश्य बांधवांना मी आश्वासन देऊ इच्छितो की, आम्हाला व्यक्तिशः त्यांचेविरुद्ध कोणतीही अढी नाही. आम्ही त्यांची मागणी मान्य करायला तयार आहोत. परंतु आपला समाज मात्र या गोष्टीस तयार होणार नाही. हिंदू समाजमनातच हे ग्रह खोलवर रुजलेले आहेत. एखादी व्यक्ती तयार होऊन चालणार नाही. खेड्या

पाड्यांतून विखुरलेल्या लक्षावधी लोकांचा हा प्रश्न आहे. अशा या ठरावाने गावोगावी दंगे उद्‌भवतील आणि त्यामुळे पोलिसांची संख्या वाढवावी लागेल. आणि शवटी सरकारला पुन्हा पैशाची मागणी करावी लागेल. म्हणून नंदागवळींना माझी विनंती आहे की, त्यांनी घाई करू नये. आपण परस्परांशी देवघेव वाढवावी. परंतु तुम्ही जर आमच्या मुली मागू लागलात तर श्री. पाठक, साठे हे लोक देखील स्वतःच्या मुली द्यायला तयार होणार नाहीत.'

माननीय रावबहादुर एन. के. केळकर–'महोदय, रोटीव्यवहार आणि बेटीव्यवहाराचा प्रस्तुत चर्चेशी काहीही संबंध नाही.'

माननीय श्री. बी. पी. स्ट्रेंडन–'सभागृहाने दर्शविलेल्या एका मुद्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. मागील व्यक्तींनी म्हटले आहे की, अस्पृश्य वर्गासंबंधी उच्चवर्णीयांचे पूर्वग्रह बराच काळपर्यंत नष्ट होण्याची चिन्हे दिसत नाहीत. मला सभागृहाला स्मरण द्यावेसे वाटते की, लोकांनी स्वतःचे पूर्वग्रह दूर सारल्याची अशी एक जागा आहे ती म्हणजे रेल्वे. रेल्वे लोकांना म्हणते, 'जर तुम्हाला प्रवास करायचा असेल, तर कोणत्याही वर्गातून प्रवास करा. कोणीही तुम्हाला आक्षेप घेणार नाही.'

'जर सरकारने सार्वजनिक विहिरीचे बाबतीत असे म्हटले की, आम्ही बांधलेल्या विहिरीवर इतर जातींसोबत तुम्हाला पाणी भरावे लागेल, तर त्यात हरकत कोणती? रेल्वेप्रमाणेच याही बाबतीत धोरण का ठेवण्यात येऊ नये? तिसऱ्या वर्गाच्या वेटिंगरूममध्ये अथवा रेल्वेच्या डब्यात महार-मांगांसोबत प्रवास करण्यापेक्षा एखाद्या धर्मशाळेत मुक्काम करणे शेतकऱ्याला का जड जावे? मला वाटते, या दृष्टीने विचार केल्यास हा ठराव काही लोक समजतात तितका उद्वेगजनक नाही.'

ठाकूर रतनसिंग– 'उत्तर, मध्यप्रदेशात विहिरी आणि सराई सर्व लोकांना मोकळी आहेत. दक्षिण मध्यप्रदेश आणि वऱ्हाडात काय स्थिती आहे याची मला जाणीव नाही. हा ठराव मुख्यतः धार्मिक प्रश्नाशी निगडीत आहे. सबब, या सभागृहाने तो संमत करणे मुळीच उपयोगाचे नाही. अस्पृश्यांत भिन्न जाती नाहीत काय? यांच्यात परस्परविवाह होतात काय? अर्थात नाही. उच्चवर्णीयांनादेखील रूढी, परंपरा व आपल्या चालीरीती पाळाव्या लागतात. लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी अथवा विधानसभने ठराव करून निर्णय लादणे बरोबर नाही. यातून जर दंगे उद्‌भवले तर त्याला कोण जबाबदार राहणार? मी माझा वैयक्तिक अनुभव सांगतो. अस्पृश्यांच्या घाणेरड्या सवयींमुळे लोकांचे आरोग्य असे धोक्यात येते, हे यावरून दिसून येईल. माझ्या गावात माझीच स्वतःचीच एक विहीर आहे. ती मी चांभारांकरिता खुली केली, तेव्हा त्यातील पाणी घाण झालेले मला आढळले. मी त्यात जंतुनाशक द्रव्य टाकून शुद्ध केले, परंतु पाणी पुन्हा गढूळ झाले. त्यानंतर मी चांभारांना पाणी भरण्यास मनाई केली, तेव्हापासून विहिरीतील पाणी स्वच्छ व शुद्ध आहे. अशा परिस्थितीत सभागृहाने हा ठराव गेल्या वर्षीप्रमाणेच फेटाळून लावावा.'

रावसाहेब व्ही. जी. कुलकर्णी–'ग्रामीण जनतेचा प्रतिनिधी म्हणून खेडया तील वस्तुस्थिती सभागृहासमोर मांडणे माझे कर्तव्य आहे. खेडयापाडयात ही कल्पना स्वीकारली जाणार नाही. अस्पृश्य लोक आगगाडीतून प्रवास करतात आणि आम्ही देखील त्यांचे सोबत जावे, हे खरे आहे. परंतु तिथून बाहेर पडताच घरी गेल्याबरोबर आम्हाला स्नान करून शुद्ध व्हावे लागते व आमचे कपडेही धुवावे लागतात, ही वस्तुस्थिती आहे.

'ब्रम्हाडात अस्पृश्य लोकांना सराईमध्ये थांबण्याकरिता किंवा तलावाचे पाणी घेण्याकरिता कोणीही हरकत घेत नाहीत, परंतु विहिरीचे पाणी घेण्याकरिता मात्र लोक आक्षेप घेतात. अकोला जिल्हयात सर्व गावांत विहिरी नाहीत. परंतु काही भागात लोकल बोर्डांनी महारांकरिता स्वतंत्र विहिरी बांधून दिल्या आहेत. त्यांना तेथे कोणतीच गैरसोय नाही. पाचशे लोकसंख्या अथवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांतून अशा विहिरी बांधण्यात आलेल्या आहेत.

'आपल्या लोकप्रिय मंत्र्यांनी या ठरावात अंतर्भूत असलेले तत्त्व मान्य केले आहे. परंतु हे तत्त्व व्यवहारात आणण्याचा प्रयत्न झाल्यास अनेक जातींत असंतोष निर्माण होईल. स्थानिक संस्थांना आणि नगरपालिकांना विचारल्याशिवाय त्यांनी हा ठराव स्वीकारायला नको होता. अस्पृश्यांना सार्वजनिक विहिरींवर पाणी भरू द्यावे अथवा नाही, अथवा त्यांना स्वतंत्र विहिरी द्याव्या, हे ठरवण्याचा अधिकार मुख्यतः लोकल बोर्ड व नगरपालिकांचा आहे. कारण, सार्वजनिक पैसा या संस्थांच्याजवळ असून त्यांनाच तो वापरण्याचा अधिकार आहे.

'श्री. नंदागवळी यांनी या बाबतीत लोकांची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करायला हवा होता. प्रमुख व्यक्तीने त्यांना सहानुभूती दाखवायला हवी. सरकारकडून अशा प्रकारचा ठराव मंजूर करून घेण्यात त्यांचा उद्देश साध्य होईल, असे मला वाटत नाही.'

श्री. नंदागवळी यांनी चर्चेचा समारोप करताना केलेला युक्तिवाद महत्त्वाचा आहे. 'माननीय श्री. एम. व्ही. जोशी आणि माननीय रावबहादुर एन. के. केळकर यांचे मी अंतःकरणपूर्वक आभार मानतो. त्यांनी माझ्या ठरावाला समजून घेतले आणि त्यामागील भूमिका स्पष्टपणे विशद केली. अस्पृश्य वर्गाच्या मनात आपल्याबद्दल विश्वास वृद्धिगत व्हावा, हा माझ्या ठरावामागील हेतू आहे. दंगेधोपे उद्भवण्याची भीती बाळगण्याचे काही कारण नाही. तुमच्याकरिता आम्ही स्वतःचे हक्क सोडण्यास तयार आहोत. कोणत्याही प्रकारचा तंटाबखेडा होणार नाही याची आम्ही तुम्हाला खात्री देतो- आम्ही मागितलेली सवलत तुम्ही देत असाल तर असहकाराच्या नावाखाली होणाऱ्या गडबडीच्या एक लक्षांश देखील अशांतता या देशात तुम्हाला आढळून येणार नाही. स्वराज्य हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे असे जर तुम्ही म्हणता, मग तर तुमच्या अस्पृश्य बांधवांवरील अन्याय का दूर करीत नाही? काँग्रेस आणि सामाजिक परिषदांचे एकमत आहे. तुम्ही सर्व हिंदू आहात.

तुमच्या मतांना माझ्या दृष्टीने जास्त महत्त्व आहे. श्री. नेल्सन हे तर परकीय युरोपियन आहेत. स्वर्गवासी श्री. मुधोळकर यांनी बंकीमपूर काँग्रेस अधिवेशनात म्हटले होते की, सर्व सामाजिक आणि धार्मिक प्रश्न राजकीय प्रश्नात समाविष्ट आहेत. कित्येकांनी म्हटल्याप्रमाणे हे प्रश्न न्यायमंदिरात सुटणारे नाहीत. माझा मागील ठराव नामंजूर झाला, त्याला माझे मित्र आनंदीप्रसाद यांनी पाठिंबा दिलेला होता. परंतु आता त्यांनी भूमिका बदललेली दिसते. त्यांनी धोरण बदलल्याबद्दल मला विशष आश्चर्य वाटत नाही. आम्हा हिंदू लोकांत कधीही सुसंगती आढळत नाही. आमच्या समाजाला गलिच्छ सवयी आहेत, असे सांगण्यात आले. हा आरोप कसा निराधार आहे, हे या बाबत जर आपण एखादी चौकशी समिती नेमली तर सहज सिद्ध होईल. उलट, उच्चवर्णीय म्हणणारे अनेक लोक किती गलिच्छ राहतात, हेही त्यात दिसून येईल. व्यक्तीच्या उत्पन्नाशी स्वच्छतेचा संबंध आहे. मी पूर्वीच म्हटल्याप्रमाणे अनेक महारांनी गेल्या कित्येक पिढ्यांपासून मांसाहार, मदिरापान आणि मतमांसभक्षण वर्ज्य केले आहे. अस्पृश्यांना विहिरी, सराई यांचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे काय, असा मी प्रश्न विचारला असता, सरकारतर्फे 'त्यांना हा अधिकार आहे' असे सांगण्यात आले.'

ठाकूर रतनसिंग– डिस्प्रेस्ड क्लासेसमध्ये कोणाचा अंतर्भाव होतो?

नंदागवळी– सेन्सस रिपोर्टप्रमाणे एकवीस जाती डिप्रेस्ड क्लासेस म्हणून गणल्या गेलेल्या आहेत.

ठाकूर रतनसिंग– चांभार आणि मेहतर या जाती समाविष्ट आहेत काय?

नंदागवळी– होय. जर आम्ही आपले धाकटे बांधव मानले जातो, तर त्याच तऱ्हेची वागणूक देऊन आमच्या अडचणींचे तुम्ही निवारण का करत नाही? मानवी दृष्टिकोणातून अथवा काँग्रेसच्या धोरणास अनुसरून देखील तुम्ही या ठरावास पाठिंबा द्यायला हवा होता. मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून मी हां ठराव आणलेला नाही. आम्ही अजून त्याकरिता सिद्ध नाही आणि माझा त्या मागणीचा आग्रहही नाही. सार्वजनिक विहिरी आणि धर्मशाळांसंबंधी आम्हाला नैसर्गिक असा हक्क हवा आहे. मी अथवा गवई यांनी एखादा अनुचित शब्द वापरला असल्यास आपण क्षमा करावी आणि या ठराबावर अनुकूल मत द्यावे.

माननीय रावबहादुर केळकर– काही सदस्यांनी उगीच कंटाळवाणे भाषण करून चर्चा वाढविलेली आहे. काही व्यक्ती चिडखोर असल्या म्हणून सर्व वर्गाला दोष देणे उचित ठरणार नाही. लोकांच्या पैशातून बांधण्यात येणाऱ्या विहिरी आणि धर्मशाळांचा उपभोग घेण्यास अस्पृश्य वर्गाला मज्जाव करण्यात मला कोणतेच सयुक्तिक कारण दिसत नाही. अस्पृश्यतेची निर्मिती ब्राह्मणांनी केलेली आहे. स्वत: ब्राह्मणांनी अस्पृश्यता पाळणे बंद केले तर लक्षावधी लोक त्यांचे अनुकरण करतील. गलिच्छ सवयींबद्दल बोलायचे झाल्यास अनेक उच्चवर्णीय जाती या आरोपातून सुटणार नाहीत. उलट गढवाळ महार स्वच्छ राह-

ण्याचे बाबतीत इतरांना आदर्श वाटतील. भंगीकामाची सेवा ही सामाजिक गरज आहे. एवढ्या एका कारणावरून त्यांना दोन हजार वर्षांपासून चालत आलेल्या अवस्थेत तळागाळाशी ठेवणे, हे अन्यायकारक आहे. परस्परसहकार्याची तुम्ही गोष्ट करता. अस्पृश्यांना अक्षरशः गुलामीत ठेवून त्यांचेशी परस्परसामंजस्य कसे साधणार? रावसाहेब कुळकर्णी म्हणतात की, मी सरकारतर्फे निर्णय देण्यापूर्वी लोकल बॉडीकडून मत मागवायला हवे होते. माझे असे स्पष्ट मत आहे की, कोणत्याही वर्गाला सार्वजनिक जागा आणि विहिरी यांचा उपयोग करण्यास कोणत्याही कायद्यात प्रतिबंध नाही. कोणत्याही वर्गाला या बाबतीत खास सूट मिळणार नाही, याची सरकार काळजी घेईल. अस्पृश्यतेच्या प्रश्नावर ज्यांना मळमळ सुटते, त्यांनी इतरत्र कुठेही निघून जावे.'

. केळकरांच्या भाषणानंतर ठराव संमत करण्यात आला आणि पाण्याकरिता दोन वर्षांपासून चाललेला संवैधानिक लढा संपुष्टात आला.

श्री. नंदागवळी यांचा दुसरा एक महत्त्वाचा ठराव दि. १ डिसेंबर १९२१ रोजी मध्यप्रांत वऱ्हाडच्या विधान परिषदेसमोर चर्चेसाठी आला. श्री. नंदागवळी यांनी मांडलेला ठराव खालीलप्रमाणे होता –

'ही परिषद शासनास शिफारस करते की, मध्यप्रांत वऱ्हाडात अस्तित्वात आलेल्या व पुढे निर्माण होणाऱ्या न्यायपीठावर नेमणूक करण्यात येणाऱ्या न्यायाधीशांच्या जागेकरिता अस्पृश्यांतील उत्साही आणि लायक व्यक्तीची नेमणूक करावी व त्यांना न्यायदानाचे योग्य प्रशिक्षण देण्यात यावे.'

१९१८ च्या कायद्यानुसार बेंच मॅजिस्ट्रेटच्या पदावर शासनातर्फे नेमणुका करण्यात येत असत. या जागांवर अस्पृश्यांची नेमणूक होणे अशक्य होते. न्यायदानात अस्पृश्यांशिवाय अस्पृश्य समाजाला न्याय मिळणे कठीण जात असे. ठरावाच्या समर्थनार्थ भाषण करताना नंदागवळी यांनी म्हटले, 'नवीन सुधारणेनुसार अस्पृश्यांनी उच्चवर्णीय लोकांसोबत नागरीकत्वाच्या जबाबदाऱ्यांत वाटा उचलण्याकरिता अस्पृश्य वर्गाला प्रोत्साहन मिळायला हवे. ही संधी आमच्या वडीलधाऱ्या मंडळींनी आम्हाला मिळवून द्यायला हवी. त्याच्यासोबत काम केल्याशिवाय हा अनुभव आम्हाला येणार नाही.' १८५८ च्या महाराणी व्हिक्टोरियाच्या जाहीरनाम्यातील काही परिच्छेद उद्धृत करून नंदागवळी पुढे म्हणतात, 'या सभागृहाने जर सहकार्य दिले, तर आम्हाला उन्नती करण्यास वाव मिळेल. आम्हाला कुणाच्याही धार्मिक क्षेत्रात ढवळाढवळ करायची नाही. माझी एवढीच इच्छा आहे की, या मातृभूमीची सेवा करण्याची आम्हाला संधी मिळावी. अस्पृश्यवर्गाचा स्तर उंचावल्याने इतर समाजासोबत प्रेम आणि सद्भाव वाढेल आणि ही बाब, ज्या लोकांना फौजदारी न्यायदानाचा अनुभव व ज्ञान आहे त्यांचेसोबत आमच्या मंडळींना काम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याने, प्राप्त होईल. शासनाचे धोरण अलिप्ततेचे आहे. त्यामुळे याबाबतीत सरकार ढवळाढवळ करू इच्छित नाही. म्हणून इथे जमलेल्या माझ्या

उच्चवर्णीय बांधवांना माझी विनंती आहे की, त्यांनी स्पृश्यास्पृश्यांतील ही दरी बुजवावी व अस्पृश्यांना प्रगतीकरिता मदतीचा हात द्यावा.'

नंदागवळी यांच्या ठरावाला अनुमोदन देताना श्री. जी. पी. डिक म्हणाले, 'हा ठराव पंचायत बिलात अंतर्भूत असलेल्या तत्त्वांना अनुलक्षून केलेला दिसतो. पंचायत बिलाला ज्याअर्थी या सभागृहाने मान्यता दिलेली आहे, त्याअर्थी या ठरावास कोणीही विरोध करणार नाही. अशा जागांवर लायक आणि कार्यक्षम अशा अस्पृश्य व्यक्तींना नेमणे ही काळाची गरज आहे. वर्धा येथील एका महार सदस्याने युद्धकाळात उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे त्याचा सुवर्णपदक देऊन गौरव करण्यात आला होता, ही घटना आठवून माझे हृदय भरून येते. त्या गृहस्थाला ऑनररी मॅजिस्ट्रेटची जागा देऊ केली गेली होती, परंतु त्याने ती स्वीकारली अथवा नाही, ह्याची मला कल्पना नाही. यावरून दलित समाजात लायक माणसांची वाण नाही हे स्पष्ट होते आणि शिक्षणाच्या प्रसारासोबत अशा लायक व्यक्तींची वाढ होणार हेही निश्चित. मला खात्री आहे की, बडा भाई छोट्या भाईस मदतीचा हात देईल आणि खाजगी जीवनात ही जातिबंधने कितीही कडक असली, तरी सार्वजनिक जीवनात आपल्या शेजारी अस्पृश्यांना बसविण्यास ते प्रतिबंध करणार नाहीत. या देशातील मजूरवर्ग इतर राष्ट्रांप्रमाणेच राज्यसूत्रे हाती घेण्यास लवकरच समोर येईल, याबद्दल मला बिलकुल संदेह वाटत नाही. परंतु मला वाटते– या देशातील पुढाऱ्यांनी म्हणजे शेटच्या लोकांनी मजूरवर्गास मार्गदर्शन करायला हवे. माझी अशी इच्छा आहे की, नंदागवळी हे काही दिवसांनी स्वतःला अस्पृश्य समजणार नाहीत आणि त्यांच्या मनातून अस्पृश्यतेची भावना गळून पडेल. एका लहान खेडघात ते मालगुजार आहेत. याही दृष्टीने समाजात त्यांना मानाचे स्थान मिळणे क्रमप्राप्त आहे. माझी खात्री आहे– या ठरावास कोणीही विरोध करणार नाही आणि हा राव एकमताने मंजूर होईल.'

श्री. आनंदीप्रसाद यांनीदेखील ठरावास पाठिंबा देणारे असेच भाषण केले. ते म्हणाले, 'अस्पृश्यांसंबंधी सहानुभूती असणाऱ्यांनी अस्पृश्यांना इतर उच्चवर्णीय बांधवांसोबत या प्रांताच्या प्रशासनात वाटा द्यायला हवा. माझे बंधू कालीचरण ह्यांच्या ठरावास सर्वांनी संमती द्यायला हवी. कारण, महारांना जर आपण विधान परिषदेत प्रवेश दिलेला आहे, तर शासनाच्या प्रत्येक विभागात त्यांना प्रवेश मिळायला हवा. मात्र ज्या पदावर त्यांना नेमायचे त्या पदाकरता नेमली जाणारी व्यक्ती ही लायक असेल, ह्याची खबरदारी घेण्यात यावी. श्री. कालीचरण आणि श्री. गवई हे दोघेही तल्लख बुद्धिमत्तेचे असल्याचे अनुभवाने सिद्ध झाले आहे आणि या सभागृहाच्या चर्चेत भाग घेण्याकरिता शासनाने केलेली त्यांची निवड अयोग्य नव्हती, हे स्पष्ट झालेले आहे. अस्पृश्य लोक हे आमचे बांधव आहेत. आमच्या बौद्धिक विकसनात त्यांना समाविष्ट करण्यास आम्ही तयार आहोत. उच्च आणि नीच हा भेद बुद्धिमत्तेवर अवलंबून आहे. कालीचरण आणि गवई यांच्या तोडीचे

महार मध्यप्रांत वऱ्हाडात असल्यास त्यांना उन्नती करण्यास योग्य ती संधी द्यायला हवा. एक दिवस महार हे या जगातील राज्यकर्ते राष्ट्र म्हणून मानले जातील, असे मी भाकित वर्तवितो. म्हणून त्यांना उज्ज्वल भविष्याकडे नेण्यासाठी मदत करा, जेणेकरून त्याच्या आधिपत्याखाली तुम्हाला ते सुख आणि शांती प्रदान करतील. परस्परसहकार्य ही सुखाची गुरुकिल्ली आहे. सबब मी या ठरावाला संमती देतो.'

श्री. एल. जी. कटरे यानीही नंदागवळींच्या ठरावाला पाठिंबा दिला. ते म्हणाले, ' अस्पृश्यवर्गांपैकी लायक असलेल्या व्यक्तींना प्रशासनात योग्य वाटा उचलण्याकरता भरपूर संधी देण्यात यावी. लोकाच्या धार्मिक भावना यामुळे दुखावल्या जाणार नाहीत. राजकीय जीवनात समान वागणूक मिळावी अशी त्यांची मागणी आहे. त्यामुळे कुणीही त्याला विरोध करू नये व सद्भावाने हा ठराव मंजूर करावा.'

रावसाहब आर. व्ही. महाजनी यांनी ठरावाचे सहर्ष स्वागत करून, नंदागवळी यांनी समर्थपणे प्रतिपादन केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, 'ठरावाद्वारे केलेली मागणी ही अगदी माफक आहे. कारण बेंच मॅजिस्ट्रटकरिता योग्य असणाऱ्या व्यक्तीसच नेमण्यात यावे असे त्यात म्हटले आहे. कधी कधी असे आढळते की, लोकत्वाची मर्यादा सरकारदेखील पाळीत नाही. काही मॅजिस्ट्रेट्स हे खरोखरी शिक्षित आहेत काय, याची दखील शंका येते. या पार्श्वभूमीवर नदागवळी यांची मागणी अगदी माफक असून, ही स्वीकारायला सरकारतर्फे कोणतीच हरकत नसावी. मला आनंद वाटतो की, सरकारने या (अस्पृश्य) जमातींपैकी एका जातीचे लोक बेंच मॅजिस्ट्रेट म्हणून नेमण्यास सुरवात केलली आहे. मला सांगावेसे वाटते की, आमच्या लोकशाहीवादी वऱ्हाडात या दृष्टीने सुरवात झालेलीच आहे. कारण महार आणि इतर जातींच्या लोकांनी मिळून निर्माण केलेल्या सहकारी सोसायटयांमध्ये अनेक महार सेक्रेटरी व अध्यक्ष देखील आहेत, आणि विशेष म्हणजे हे लोक तेथील सदस्यांनी निवडलेले आहेत. वऱ्हाडातील लोकांचा दृष्टिकोण लक्षात घेता मध्यप्रांतातील माझे सदस्य बंधू महारांना इतरांसोबत बेंच मॅजिस्ट्रेट म्हणून बसू देण्यास कुरबूर करणार नाहीत असे वाटते. ही परिषद देखील या ठरावास मनःपूर्वक संमती देईल अशी आशा आहे.'

ठरावावर बोलताना ठाकूर रतनसिंग म्हणाले, 'ऑनररी मॅजिस्ट्रेट किंवा तत्सम जागावर मागासवर्गीयांची नेमणूक करावी असा कोणता नियम आहे, असे मला वाटत नाही. रावसाहब महाजनी यानी म्हटल्याप्रमाणे, जर अशा जागांवर काही मागासवर्गीय सदस्य असतील, तर सरकारतर्फे अशी नेमणूक करण्यास काणतीच हरकत नाही हे स्पष्ट होते. अशा जागांवर माणसे नेमण्यापूर्वी काही बाबींचा विचार व्हायला हवा. उदा– सामाजिक प्रतिष्ठा, शैक्षणिक पात्रता, नैतिक चारित्र्य आणि इतर बाबी. त्या जर मागासवर्गीय उमेदवारात असतील, तर त्या व्यक्तीस अशा जागांवर नेमण्यास कुणाचीही हरकत असू नये. परंतु या बाबी नसतील, तर तो माणूस या जागेसाठी पात्र ठरणार नाही. माझे मित्र नदागवळी यांनी मांडलेल्या

ठरावानुसार मागासवर्गीय व्यक्ती, लायक असो वा नसो, नेमल्या जाव्यात असे म्हटले आहे. जर हा ठराव मंजूर करण्यात आला तर, लायक व्यक्ती मिळो वा न मिळो, अस्पृश्यवर्गातील माणसे नेमणे भाग पडेल. म्हणून माझे असे मत आहे की, हा ठराव अनावश्यक आहे. जर सध्या कोणत्याही परिस्थितीत अस्पृश्य व्यक्तीला या जागांवर नेमणूक करण्यास प्रतिबंध नाही, तर अशा ठरावाचे प्रयोजनच नाही. या ठरावाद्वारे सरकारला अयोग्य व्यक्तीची देखील निवड करण्याचे बंधन येईल. सबब मी ठरावाला विरोध करतो.'

रावसाहेब एन. टी. खडतकर–

यांनीही ठरावावर भाषण केले. ते म्हणाले, 'हा ठराव आणण्याची गरज नव्हती. सद्यःस्थितीत ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून अस्पृश्य व्यक्तींना नेमण्यास कोणताच प्रतिबंध नाही. मला एक घटना आठवते. कारंजा येथे सीताराम सोनबा महार या नावाच्या व्यक्तीस बेंच मॅजिस्ट्रेट नेमण्यात आले होते. परंतु त्याचेकडे कोणीही तक्रार घेऊन जात नसे (अस्पृश्य असल्यामुळे). गेल्या जुलैमध्य जी सिव्हिल लिस्ट प्रसिद्ध करण्यात आली तीत ते नाव आहे, परंतु सध्याच्या यादीत नाही. मला असे वाटते की, नियुक्त करण्यात येणाऱ्या व्यक्तीची शैक्षणिक पात्रता व सामाजिक प्रतिष्ठा, तसेच नमणुकीचेवेळी लोकमत विचारात घेण्यात यावे. योग्य व्यक्ती सापडल्यास स्पेशल मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक करण्यासाठी हरकत नसावी. परंतु लोकांनी नाकारलेल्या व्यक्तीच्या नमणुकीमुळे न्यायदानाचा दारे बंद व्हावी अशी परिस्थिती येऊ देऊ नये. ऑनररी मॅजिस्ट्रटचे कार्य व जबाबदाऱ्या महत्त्वाच्या आहेत. निव्वळ नमणुकीने त्या पार पाडता येत नाहीत, हे कारंजा येथील नेमणुकीने सिद्ध झाले आहे. सबब मी या ठरावास विरोध करतो.'

नानासाहेब गवई–

यांनी फक्त चार मिनिटे भाषण दिले. ते म्हणाले, 'मी या ठरावावर बोलणार नव्हतो. परंतु ठाकुर रतनसिंग यांनी संधी दिल्यामुळे मी बोलत आहे. रावसाहेब खडतकर यानी दिलेले उदाहरण हे अपवादात्मक आहे. परतु जर ठराव संमत झाला, तर सरकार पुष्कळ व्यक्तींची नेमणूक करू शकेल. ऑनररी मॅजिस्ट्रेटची न्यायालये चालू रहावी, ही रावसाहेब खडतकरांची इच्छा स्तुत्य आहे. अस्पृश्यवर्गाच्या व्यक्तीची नेमणूक केल्याने गुन्ह्याच्या प्रमाणात घट झाली. माही दृष्टीने अस्पृश्य उमेदवारांची नेमणूक होणे आवश्यक आहे.'

श्री. जी. पी. जयस्वाल–

यांनी ठरावास पाठिंबा दिला. ते म्हणाले, 'सद्हेतूने आणलेल्या इतक्या उपयुक्त ठरावाचे विरुद्ध येथील काही सदस्यांनी विरोध नोंदवावा, ही बाब मला दुःखदायक वाटते. एका अस्पृश्याच्या प्रतिनिधीने अशा प्रकारचा ठराव मांडावा ही बाब येथील प्रत्येक सदस्याला व शासनाला विशेष अभिमानाची वाटायला हवी. अस्पृश्यवर्गाच्या मनात असलेल्या आकांक्षेला या ठरावात स्वाभाविकपणे व्यक्त

केले गेले आहे. या भारतातील प्रत्येक नागरीक हा स्वराज्यामागे लागलेला आहे. प्रत्येकाला स्वराज्याचे शिक्षण द्यायला हवे. या ठरावाच्या कर्त्याला काय हवे आहे? तर त्यांच्या वर्गातील लायक व्यक्तींस न्यायदान पद्धतीचे प्रशिक्षण हवे आहे. माझ्या उजवीकडे बसलेल्या माझ्या मित्राने बरेच अनावश्यक ताशेरे झाडलेले आहेत. ठरावात स्पष्टपणे नमूद केले आहे की, अस्पृश्यवर्गातील उत्साही व लायक व्यक्तीसच बेंच मॅजिस्ट्रेट म्हणून नियुक्त करण्यात यावे. ठरावातील 'लायक' हा शब्द ठरावकर्त्याने स्पष्ट नमूद केला असूनदेखील माझ्या उजवीकडील मित्राने असे म्हणावे की, सरकारला कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करावी लागेल, मग तो लायक असो अथवा नसो–हे अगदी हास्यास्पद आहे. रावसाहेब खडतकर यांनी वेगळ्या कारणासाठी विरोध केला आहे. एका अस्पृश्य व्यक्तीस न्यायाधीश नेमल्यानंतर तिचेसमोर कुणीही अर्ज आणला नाही अथवा तिने कोणतेच काम केले नाही. सबब नेमणुकीसच यांचा विरोध आहे. अध्यक्ष महाराज, जर ही घटना खरी असेल, तर ती ठरावाला सहाय्यच करते. कारण न्यायदानाकरिता अस्पृश्य व्यक्तीची नेमणूक झाल्यास अनायासेच दाव्यांची संख्या कमी होईल आणि शांतता विनासायास निर्माण होईल सरकारने त्यामुळेच अस्पृश्य माणसाची नेमणूक करावी. ठरावाचे प्रत्येकाने कौतुक करून याला पाठिंबा द्यावा व हा ठराव एकमताने संमत करावा.'

सेठ शिवलाल–

हे ठरावास विरोध करताना म्हणाले, 'जर अस्पृश्यांतील योग्य व्यक्तीस बेंच मॅजिस्ट्रेट म्हणून नेमण्याची सरकारची प्रथा असेल, तर या ठरावाची काहीही आवश्यकता नाही. सबब हा ठराव मागे घेण्यात यावा.'

श्री. बी. वाय. देशमुख–

यांनी मराठीतून भाषण करताना सांगितले की, 'मागासवर्गीय लोक प्रगती करू इच्छित असले तरी त्यांचे पुढारलेले बांधव त्यांच्या प्रगतीत अडथळे आणीत आहेत. जर वरिष्ठ लोकांना अस्पृश्यांची सुधारणा आणि प्रगती सहन होत नसेल, तर त्यांना नवीन राजकीय सुधारणेत वाटा मागण्याचा काडीमात्र अधिकार नाही. आपणच जर त्यांच्या नरडीला नख लावायला सिद्ध असलो, तर त्यांचेकडून निःपक्षपाती न्यायाची अपेक्षा आपण करू नये. त्यांना न्यायव्यवस्थेचे प्रशिक्षण घेण्याची संधी मिळावी, म्हणून हा ठराव मंजूर व्हायलाच हवा.'

सेठ मोतीलाल–

'गेल्या ऑगस्ट महिन्यात या परिषदेने अस्पृश्य वर्गाचे लायक प्रतिनिधी नगरपरिषदेवर, जिल्हा व लोकल बोर्डे यांचेवर नेमावेत असा ठराव केलेला होता. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांकडून माहिती मागविण्यात आली होती. याबद्दल डेप्युटी कमिशनर आणि कमिशनर यांना नियुक्त्या करण्याचे पुरेसे अधिकार असल्यामुळे, सरकारने त्यात ढवळाढवळ करू नये व याबाबतीत कडक बंधने टाकू नयेत. आमच्या छत्तीसगड डिव्हिजनमध्ये बेंच मॅजिस्ट्रेटकरिता अनेक लायक व्यक्ती

आढळतात. त्यांची या पदावर नियुक्ती करावी.' सेठ मोतीलाल यांनी ठरावाबद्दल त्रयस्थाची भूमिका स्वीकारलेली दिसते.

रावसाहेब व्ही. जी. कुलकर्णी–

यांनी नंदागवळींच्या ठरावास पाठिंबा दिला. ते म्हणाले, 'कोणत्याही व्यक्तीची बेंच मॅजिस्ट्रेट म्हणून नियुक्ती करताना ती व्यक्ती लोकांच्या विश्वासास व आदरास पात्र आहे काय, हीच बाब लक्षात घ्यावी लागते. याव्यतिरिक्त इतर पात्रता गौण असते. कोणतीही व्यक्ती, मग ती कोणत्याही जातीची असो, जर त्या विभागात प्रतिष्ठा आणि विश्वास यास पात्र असेल तर शासनाने तिची नेमणूक करायला हवी. म्हणून या ठरावास पाठिंबा देण्यापूर्वी माझे मित्र श्री. नंदागवळी यांना विनंती करेन की, त्यांच्या समाजास या जागा हव्या असतील, तर त्यांनी प्रथम लोकांत मान व विश्वास प्राप्त करायला हवा. रावसाहेब महाजनी यांनी जे उदाहरण दिले ते माझ्याच गावचे होते. तेथे एका युनियनचा मी अध्यक्ष आहे आणि त्याचा सेक्रेटरी एक महार गृहस्थ आहे. अर्थात या व्यक्तीस गावात प्रतिष्ठा आहे. लोकांचा त्याच्यावर विश्वास आहे आणि तो निवडून देखील आलेला आहे. श्री. गवई आणि नंदागवळी हे या सभागृहात आलेले आहेत. परंतु याच प्रकारच्या दुसऱ्या संस्थांवर त्यांना जायचे असल्यास त्यांनी प्रथम लोकादरास पात्र व्हायला हवे. एवढे सांगून नंदागवळींच्या ठरावास पाठिंबा देतो.'

शासनातर्फे श्री. ए. ई. नेल्सन – यांनी शासनाची बाजू स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, 'श्री. आनंदीप्रसाद यांनी गेल्या मार्चमध्ये विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना ऑनरेरी मॅजिस्ट्रेट यांच्या नेमणुकीच्या बाबतीत जी तत्त्वे गृहीत धरण्यात येतात ती मी विशद केलेली होती. ती मी इथे वाचून दाखवितो–

'जिल्हा मॅजिस्ट्रेट आणि कमिशनर यांच्या शिफारशीनुसार काही प्रतिष्ठित व्यक्तींची ऑनरेरी मॅजिस्ट्रेट म्हणून सरकार नेमणूक करते. ज्या व्यक्तींस मानसन्मान व प्रतिष्ठा आहे व त्यांना दिलेली कर्तव्ये पार पाडण्यास ते समर्थ आहेत व ज्यांचेबद्दल वरील अधिकाऱ्यांना व्यक्तिशः माहिती आहे, त्यांची हे अधिकारी शिफारस करतात. या शिफारशीकरिता कोणत्याही तऱ्हेचे विशिष्ट निकष ठरलेले नाहीत, कारण ही निवड पूर्णतः अधिकाऱ्यांच्या व्यक्तिगत माहितीवर आधारलेली असते. वरील मार्गदर्शक तत्त्वात आजपर्यंत कोणताही बदल केलेला नाही. अस्पृश्य वर्गातील सदस्यांबाबत मला असे सांगावेसे वाटते की, त्यांच्या नेमणुकीस वरील तत्त्वात कोणताही प्रतिबंध नाही. काही सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे, अस्पृश्य वर्गाचा एक सदस्य बेंच मॅजिस्ट्रेट म्हणून नेमला गेला होता. सुयोग्य व्यक्तीची, जात, धर्म वगैरे विचारात न घेता, नेमणूक करण्याचे धोरण सरकार यापुढेही चालू ठेवील. हा ठराव मांडणाऱ्या श्री. नंदागवळी यांना शासनातर्फे मी असे आश्वासन देतो की, या जागांवर नेमणूक करताना अस्पृश्य जातीतील लायक व्यक्ती मिळाल्यास, इतर जातीं-

प्रमाणेच, विचार करण्यात येईल. याशिवाय मी जास्त काहीही सांगू शकत नाही.'

सी. बी. पारीख–

'श्री. नंदागवळी यांनी आणलेल्या ठरावापेक्षा नेल्सन यांनी दिलेले आश्वासन फारसे वेगळे नाही. ठरावानुसार उत्साही व लायक व्यक्तींचीच नेमणूक करण्यात यावी. नेल्सन यांच्या म्हणण्यानुसार सरकार अस्पृश्य व्यक्तींची नियुक्ती करण्यास उत्सुक आहे. मग हा ठराव मंजूर करण्यास हरकत कोणती?'

चर्चेचा समारोप करताना श्री. नंदागवळी यांनी प्रतिपक्षाच्या सर्व मुद्यांचे खंडन केले. ते म्हणाले, 'माझ्या ठरावाचे समर्थक, विरोधक आणि सरकार या सर्वांचा मी ऋणी आहे. त्यांनी या ठरावाचा सर्व बाजूंनी विचार केलेला आहे. माझा ठराव स्वीकारण्याने कुणावर अन्याय होईल असे माझ्या विरोधकांना वाटते काय? असे असेल तर या देशात आपण राजकीय सुधारणा कशी आणणार? विभाजन आणि विघटन हे आमच्या देशाचे व्यवच्छेदक लक्षण मानले गेलेले आहे. जगात दुसऱ्या कोणत्याही देशातील लोक असे विघटित आढळत नाहीत. इतर राष्ट्रांच्या सोबत आपल्या देशास प्रतिष्ठा प्राप्त व्हावी अशी इच्छा असेल, तर आपण आपसातील मतभेद विसरून परस्परांना सहकार्य आणि मदतीचा हात द्यायला हवा. आमच्या वर्गास सार्वजनिक जीवनाचे व न्यायदानाचे प्रशिक्षण देऊन हे उद्दिष्ट साधण्यासारखे आहे. माझे मित्र मिस्टर डिक यांनी या ठरावाचे महत्त्व स्पष्टपणे विशद केलेले आहे. रावसाहेब कुलकर्णी यांनी असे म्हटले आहे की, आपण सरकारवर विसंबून राहाण्यापेक्षा लोकमत आणि लोकांचा विश्वास लक्षात घ्यायला हवा. त्यांचे विधान वाखाणण्यासारखे आहे. परंतु आम्हाला निवडणुकीद्वारे निवडून देखील येण्याचा अधिकार नाही, मग लोकांचा आमच्यावर विश्वास आहे, हे कसे दाखवता येईल? उदारमतवादी आणि जहाल पक्षाची वृत्तपत्रे जगाला ओरडून सांगत आहेत की, भारतीय लोक हे एक आहेत, त्यांच्यात कोणताच भेद नाही. परंतु वस्तुस्थिती अगदी वेगळी आहे. अस्पृश्यांना ही लहानशी सवलत देण्याकरिता देखील या सभागृहात मतभेद असावा ही बाब विघटनाचीच निदर्शक आहे. श्री. नेल्सन यांनी शासनातर्फे असे आश्वासन दिले आहे की, निरनिराळचा नेमणुकांच्या बाबतीत ते जात अथवा वर्गभेद लक्षात घेत नाहीत. मग माझा ठराव का स्वीकारला जाऊ नये? शासनाच्या धोरणांचाच या ठरावात पुरस्कार करण्यात आला आहे. असे सांगण्यात आले की, डेप्युटी कमिशनरांना बेंच मॅजिस्ट्रेटची शिफारस करताना या ठरावाद्वारे अडथळा येईल व त्यांचे हात बांधले जातील. परंतु मला वाटते, या ठरावाने त्यांच्या अधिकारवापरास बळकटी येईल. सेठ मोतीलाल हे छत्तीसगड डिव्हिजनमध्ये अशा नेमणुका करण्याची आवश्यकता प्रतिपादन करतात. इतर डिव्हिजनमध्ये अस्पृश्य वर्गात लायक व्यक्ती नाहीत असे ते समजतात काय? गेल्या वेळेस एका भाषणात त्यांनी अस्पृश्य वर्ग हे मृतमांस भक्षण करतात असे म्हटले होते. कदाचित याच कारणाकरिता अस्पृश्यांना छत्तीसगडव्यतिरिक्त इतर विभागात सवलत द्यायला ते

तयार नसावेत. या बाबतीत मी असे म्हणेन की, एक चौकशी समिती नेमण्यात येऊन सविस्तर माहिती मिळविण्यात यावी. मला पक्के माहीत आहे की अस्पृश्यांपैकी बहुसंख्य लोकांनी मेलेल्या ढोराचे मांस आणि दारू यांचा, अनेक पिढ्यांपासून, त्याग केलेला आहे. कुत्र्याचे शेपूट ज्याप्रमाणे नेहमी वाकडे असते, त्याचप्रमाणे आमच्या भारताची स्थिती आहे, असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. मी माझा ठराव मतास टाकीत आहे.'

यानंतर श्री. नेल्सन यांनी डेप्युटी कमिशनराचे लक्ष संपूर्ण चर्चेकडे वेधण्यात येईल, असे आश्वासन दिले व अध्यक्षांनी ठराव मतास टाकला. १९ विरुद्ध १७ मतांनी ठराव मंजूर करण्यात आला.

श्री. कालीचरण नंदागवळी आणि नानासाहेब गवई हे दोघेही अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून विधान परिषदेत अस्पृश्यांच्या हिताकडे लक्ष देत असले तरी ठरावावर मत नोंदविताना ते स्वतंत्रपणे मतदान करीत असत. अस्पृश्यांच्या हितकारक ठरावावर अर्थात दोघांचेही एकमत असे, तरी काही ठरावांवर उभयतांनी परस्परविरोधी मत नोंदविलेले आढळून येते. त्यावेळी स्वातंत्र्याच्या चळवळीस उधाण आले होते. राजकीय पुढाऱ्यांची धरपकड सुरू होती. या पुढाऱ्यांना सवलती देण्यात येऊन अधिकाऱ्यांनी त्यांना चांगली वागणूक द्यावी, अशा तऱ्हेचा एक ठराव ३० नोव्हेंबर १९२१ रोजी सभागृहात मांडण्यात आला. ठरावाला पाठिंबा देताना नंदागवळींनी केलेले विवरण महत्त्वाचे आहे. ते म्हणाले... 'जर लोकांनी आपली जबाबदारी ओळखली असती तर हा ठराव आणण्याचे प्रयोजनच नव्हते. 'राजकीय कैद्यांना युरोपियन कैद्यांप्रमाणे सुखसोयी द्याव्या' अशी मागणी या ठरावाद्वारे करण्यात आली आहे. एकीकडे आपले पुढारी आपल्या जुन्या चालीरीती सोडू नका आणि पाश्चात्यांची नक्कल करू नका, असा उपदेश भाषणांतून आणि वृत्तपत्रांतून करीत असताना त्याच पाश्चात्यांसारख्या सवलती का मागण्यात येतात, हे मला कळत नाही. हे पूर्णतः दंडाधिकाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून आहे. या दंडाधिकाऱ्यांत जास्तीतजास्त लोक भारतीय असून थोडेफार युरोपियन आहेत. हे भारतीय दंडाधिकारी स्वतःच्या देशबांधवांचा विश्वास प्रकट करण्याकरिता आपल्या बुद्धीचा वापर का करीत नाहीत?

'ठरावाचे प्रवर्तक श्री. आनंदीप्रसाद यांची कल्पना अशी आहे की, युरोपियन आणि इंडियन ही एकाच सरकारची दोन लेकरे आहेत. सबब दोघांपैकी एकाला पक्षपाती वागणूक देणे उचित नाही. परंतु आनंदीप्रसादांचा हा मुद्दा अगदी भोंगळ आहे. भारतीय जनतेची मुळातच गटागटांत विभागणी झाली असून काही वर्गांना जन्मतःच उच्चत्व प्राप्त झाले असून त्यांना सवलती मिळत आहेत. उलट, जन्मतः नीच गणल्या गेलेल्या वर्गास मरेपर्यंत निकृष्टावस्थेत राहावे लागत आहे. चतुर्वेदी मनमोहन पांडे यांनी असे म्हटले आहे की, सरकारच्या मताला विरोध केल्यामुळे आमच्या काही बांधवांना राजकीय तुरुंगवास भोगावा लागतो. मी त्यांना स्मरण देऊ इच्छितो की;

आमचेच पुढारी सार्वजनिक हक्क मिळवण्याकरिता ब्रिटिश पार्लमेंटपर्यंत प्रतिनिधी म्हणून पाठवले होते, त्याचेच एक फलित म्हणून आज आपणास थोडेफार अधिकार प्राप्त झाले आहेत. या अधिकाराविरुद्ध आज पुन्हा टीका केली जात आहे. मिळालेल्या अधिकारास आपण पात्र आहो हे सिद्ध झाल्याशिवाय जास्त अधिकार आपण कोणत्या तोंडाने मागणार? सरकारने आपल्या मागण्या मान्य करून जे आपल्या पदरात दिले, ते वापरण्यास आपण लायक आहोत असे सिद्ध करायला हवे. सरकारचा दृष्टिकोण बदलला हा आरोप खरा मानला, तरी आपल्यालाच मिळालेल्या अधिकारास आपण पात्र आहोत हे सिद्ध करायला हवे. हजारो वर्षे अस्पृश्यांना दडपून ठेवण्यात कोणती न्यायबुद्धी आहे, असा मी प्रश्न विचारतो. श्री. काणे यांच्या म्हणण्यानुसार राजकीय पुढाऱ्यांना गुन्हेगाराप्रमाणे वागवण्यात येऊ नये. मी म्हणतो, कायदे कशाकरिता करतात? कायद्याचे पालन होत नसेल तर कायद्याचा उपयोग काय? कायदे लोकहिताकरिता आहेत, व लोकहित हेच सरकारचे धोरण आहे. जर कायद्याचे उल्लंघन होत असेल तर गुन्हेगारास तुरुंगवास व्हायलाच हवा.

'समान सवलतींबद्दल मला असे वाटते की, तुरुंगातील राजकीय कैद्यांना चहा पाव व लोणी या बाबी आहेत काय याची विचारणा करण्यात यावी. सरकारने या कैद्यांना चांगली वागणूक द्यावी या मताशी मी सहमत आहे, म्हणून ठरावास मी पाठिंबा देतो.'

ठरावाला नानासाहेब गवई यांनी मात्र विरोध केला. त्यांनी म्हटले, 'ज्यांच्या अंतःकरणात राष्ट्रप्रेम वसत आहे अशा राजकीय कैद्यांना वाईट वागणूक मिळावी असा माझा हेतू नाही. राजकीय कैद्यांची जर वर्गवारी करण्यात आली असती तर या ठरावाला मी पाठिंबा दिला असता. राजकारणावर बोलणारी प्रत्येक व्यक्ती ही जाणकार आणि निष्ठावान कार्यकर्ता आहे असे मी मुळीच देखील समजत नाही. अशा तऱ्हेच्या सवलती व सुखसोयी दिल्यास तुरुंगाच्या कोठड्या या ऐषआरामाने राहण्यासाठी बांधलेल्या बंगल्या ठरतील. आणि जे लोक ऐषआराम करू शकत नाहीत, ते जेलमध्ये जाण्याकरिता राजकीय पुढारी बनतील. हा दुरुपयोग टाळावा या हेतूने मी या ठरावाला विरोध करतो.'

दि. १३ ऑगस्ट १९२१ रोजी मध्यप्रांत वऱ्हाड विधान परिषदेत सभापतीने एका ठरावाद्वारे प्रिन्स ऑफ वेल्स या इंग्लंडच्या राजपुत्राचा सत्कार करावा असे सुचविले . या ठरावास राष्ट्रीय सभेच्या अनेक पुढाऱ्यांनी विरोध केला. परंतु सत्कार– समारंभ करावा या मताचेही बरेचसे सदस्य होते. कालीचरण नंदागवळी व नानासाहेब गवई या दोघांनीही ठरावास पाठिंबा दिला. श्री. नंदागवळींनी हिंदीतून ठरावाचे समर्थन करणारे भाषण दिले. ते म्हणाले,–'नवाब मीर मेहंदीअली खान यांनी वेल्सच्या राजपुत्राचा सत्कार करण्याच्या मांडलेल्या ठरावास माझे अनुमोदन आहे. हे राजपुत्र इंग्लंडचे भावी बादशहा आहेत. जेव्हा राजघराण्यातील लोक सामान्य जनतेची विचारपूस करतात, तेव्हा हजारो गोरगरीब लोकांची दुःखे,

अडीअडचणी नाहीशी करण्याकरिता ते प्रयत्न करताना दिसतात. या बाबतीतली अनेक उदाहरणे दाखवता येतील. राजपुत्राची सध्याची भेट ही भारताला अनेक दृष्टींनी लाभदायक ठरण्यासारखी आहे. १९११ साली इंग्लंडचे पंचम जॉर्ज बादशहा भारताला भेट देऊन गेले, त्यावेळी त्यांनी भारताला बऱ्याच गोष्टी प्रदान केल्या.

१) बंगालची फाळणी रद्द केली.
२) भारताची राजधानी दिल्लीला हलवली.
३) शिक्षणप्रसाराकरिता अर्थसहाय्य केले.
४) कैद्यांना शिक्षेत सूट देण्यात आली.
५) अस्पृश्यवर्गाच्या शैक्षणिक उन्नतीकरिता पन्नास हजार रुपयांची तरतूद करण्यात आली.'

नानासाहेब गवई आपल्या भाषणात म्हणाले, 'आपल्यापैकी दोन सदस्यांनी या ठरावास विरोध करावा ही खेदाची बाब आहे. दोन भिन्न राजकीय विचारप्रणालींत मतभेद असतो, हे मला मान्य आहे. परंतु राजा हा त्यापासून अलिप्त असतो, त्यामुळे त्याच्या सत्कारास विरोध करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. असल्या प्रवृत्तीने देशाच्या इभ्रतीस धक्का पोहोचतो. निव्वळ राजपुत्रच नव्हे, तर कोणत्याही पाहुण्याचे स्वागत करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. कोणत्याही स्वार्थी हेतूने नव्हे, तर पाहुणे म्हणून आपण त्यांचा सत्कार करायला हवा.'

श्री नंदागवळी हे स्वतः मालगुजार होते. मालगुजाराजवळ गावच्या बऱ्याच पडीक जमिनी वहितीकरिता असत. या जमिनी भूमिहीन मजुरांस देण्यात याव्यात, परंतु त्यांना कुळाचे हक्क देण्यात येऊ नये असा एक ठराव दिनांक २९–११–१९२१ रोजी विधानपरिषदेत मांडण्यात आला. हया ठरावावर नंदागवळी यांचे जे भाषण झाले, त्यावरून सामान्य मजूर अथवा गरीब शेतकऱ्यासंबंधी त्यांच्या अंतःकरणात किती जिव्हाळा होता हे दिसते- 'यात झालेला बदल हा कुळाच्या मुळावरच घाव घालणारा आहे. या पुस्तीमुळे मालगुजारांना गावातील सर्व जमिनींचे मालकीहक्क प्राप्त होतील आणि सध्या कुळांना मिळणारे कायद्याचे संरक्षण नष्ट होईल. नवीन राजकीय सुधारणेचा हा अर्थ आहे, असे मला वाटत नाही. मालगुजारांनी सर्व जमीन आपल्या पायाखाली ठेवण्याची लालसा धरू नये. जी जमीन मालगुजार वहीत करू शकत नाही, ती कुळांना देऊन या जमिनीवर कुळाचे मालकी हक्क निर्माण होतील अशी सोय राहिल्यास त्या जमिनीची सुधारणा करण्यास वहीतदार प्रयत्न करतील. विधवा आणि अज्ञान व्यक्ती यांना सध्याच्या कायद्यामुळे काय अडचणी निर्माण होतात याची मला विशेष माहिती नाही. परंतु मेलेल्या कुळांच्या निराधार वारसांची जमीन आणि पैसा मालगुजार लोक हिसकावून घेतात ही गोष्ट खरी आहे. मालगुजारांना याची किंचित जरी जाणीव असती तरी या ठरावावर इतकी कठोर प्रतिक्रिया उमटली नसती. १९२० चा टेनन्सी ॲक्ट (कुळकायदा) हा

नुकताच अंमलात आलेला आहे. त्याचा पुरेसा अनुभव आल्याशिवाय त्यात कोणताही बदल घाईने घडवून आणणे उचित नाही. यामुळे सरकारी कायद्याची अंमलबजावणी 'बहुजनहिताय, बहुजनसुखाय' नाही असा समज निर्माण होतो. या संदर्भात मुक्या कुळाचे प्रतिनिधित्व करणारा एकही सदस्य नाही हे पाहून मला हळहळ वाटते. परंतु त्याची मला पर्वा नाही. न्याय निर्भीड असतो. आणि मी जरी एकाकी असलो, तरी या मूकबधिर अशा कुळांच्या हक्काकरिता, माझ्या सर्व शक्तीनिशी, लढत राहीन. या ठरावास माझा कडकडून विरोध आहे.' हा ठराव ११ विरुद्ध २७ मतांनी नामंजूर झाला व नंदागवळींचा विजय झाला.

एकदा विधानपरिषदेतील सर्व सदस्यांना स्थायी समितीचे सदस्य नेमावे असा ठराव मांडण्यात आला. हा ठराव नंदागवळी यांचे मित्र श्री. आनंदीप्रसाद यांनी आणला होता. सदर ठरावात 'विधानपरिषद सदस्य स्थायी समितीचे सदस्य नसणे हा त्यांचा अवमान आहे.' असे शब्द होते. श्री. नंदागवळी यांनी या शब्दाला हरकत घेतली आणि विधानपरिषद ही स्थायी समितीची आई असल्यामुळे अवमान वाटण्याचे कारण नाही असे मत व्यक्त केले. ते पुढे म्हणाले, 'मी तीन स्थायी समित्यांचा सदस्य आहे. त्यांपैकी एक जागा श्री. आनंदीप्रसाद यांचेकरिता खाली करून देत आहे.'

नंदागवळी आणि नानासाहेब गवई यांच्यात आणखी एके प्रसंगी संघर्ष घडलेला दिसून येतो. १९२३-२४ चे अंदाजपत्रक कौन्सिलसमोर चर्चेसाठी आले असताना त्यातील अस्पृश्यांच्या वसतिगृहांवरच्या विकासांवर आणि शैक्षणिक बाबींवर २८, ६६४ रुपयांची तरतूद करण्यात आली होती. खरे पाहाता 'ही तरतूद अपुरी आहे' अशी सबब सांगून त्यात वाढ करण्याकरिता अस्पृश्यांच्या प्रतिनिधींनी मागणी करायला हवी होती. परंतु कालीचरण नंदागवळी यांनी या मागणीच्या विरोधी पवित्रा घेतला व वसतिगृहावर होणारा खर्च रद्द करावा अशी भूमिका घेतली. या मागणीसंबंधी उभयतांनी जी भूमिका घेतली, त्यावरून या दोन्ही अस्पृश्यांच्या प्रतिनिधींना अस्पृश्यांच्या हिताची किती तळमळ होती हे दिसून येते. नंदागवळींचे भाषण याप्रसंगी वरपांगी विरोधी वाटत असले तरी त्यांना अभिप्रेत असलेले अस्पृश्यांचे हित जास्त व्यापक होते, हे दिसून येईल. अस्पृश्यांचे प्रतिनिधी हे महार समाजातून आले असले, तरी ते समग्र अस्पृश्य जमातीचा साकल्याने विचार करीत होते हेही यावरून स्पष्ट होईल. उभयतांची मते लक्षात घेण्याच्या दृष्टीने त्यांची भाषणे सविस्तर स्वरूपात मांडणे उचित होईल.

श्री. नंदागवळी :-

'अस्पृश्य वर्गाच्या विकासाकरिता केलेली तरतूद १९२३-२४ च्या अंदाजपत्रकातून रद्द करावी, अशी दुरुस्ती मी सुचवितो. गेल्या अधिवेशनात अस्पृश्यांच्या शिष्यवृत्त्या वाढविण्याकरिता, तसेच निराधार मुलांच्या प्रायमरी शिक्षणाकरिता खास मदत देण्याच्या दृष्टीने मी स्वत: यापूर्वी अटोकाट प्रयत्न केले होते. असे अस-

ताना माझ्यासारख्या अस्पृश्यांच्या प्रतिनिधीने वसतिगृहांवरील रक्कम कमी करण्याची मागणी करावी याचे अनेकांना आश्चर्य वाटेल.

चालू अंदाजपत्रकात अस्पृश्यांच्या शैक्षणिक बाबींस २८,६६४ रुपयांची तरतूद केलेली असून ही खालीलप्रमाणे विभागलेली आहे.

१) रु. ४,१०० – वसतिगृहांची सुधारणा
२) रु. ९,००० – मुख्याध्यापकांना पारितोषिके
३) रु. ५६४ – खास शिष्यवृत्त्या
४) रु. १५,००० – इमारतीकरिता.

रु. २८,६६४

गेल्या वर्षी इमारतीकरिता १५,००० रुपये राखून ठेवले होते. ही रक्कम कशी खर्च करण्यात आली याची सरकारने सभागृहास माहिती द्यावी. माझी उपसूचना स्पष्ट करण्यापूर्वी मी काही प्रश्न विचारू इच्छितो.

१) वरील ४१०० रुपयांचा लाभ किती वसतिगृहांना व कोणत्या कार्याकरिता मिळणार आहे? तसेच प्रत्येकी किती रक्कम देण्यात येणार आहे?

२) अस्पृश्य वर्गातील विभिन्न जातींचे प्रत्येक वसतिगृहात किती विद्यार्थी आहेत?

३) अस्पृश्यांतील निरनिराळ्या जातींचे विद्यार्थी एकाच वसतिगृहात ठेवण्याची मुंबई सरकारप्रमाणे व्यवस्था केलेली आहे काय? नसल्यास, का नाही?

४) विभिन्न जातींतील अस्पृश्य मुले एकाच वसतिगृहात एकत्र राहू शकत नाहीत अशी धास्ती सरकारला वाटते काय?

५) अस्पृश्यांतील एकाच जातीची मुले असलेल्या वसतिगृहाला अनुदान देणे फायद्याचे आहे काय?

अध्यक्ष –

आपले प्रश्न या क्षणी स्वीकारता येत नाहीत. उपसूचना मांडण्यापूर्वी या प्रश्नांची उत्तरे आपण मिळवायला हवी होती.

श्री. नंदागवळी –

ही उपसूचना मांडण्यात माझा हेतू असा आहे की, ज्याप्रमाणे ब्राह्मणाने स्वत:च्या अधिकारात शिक्षणाची मक्तेदारी निर्माण केली असा त्याचेवर आरोप करण्यात येतो, तसा सरकारवर आळ येऊ नये.

आमच्याच जातिहिताकडे आम्ही लक्ष देतो असा आमच्यावर आरोप येऊ शकेल. म्हणून माझी अशी सूचना आहे की, पहिल्या प्रथम अस्पृश्यांतील सर्व जातींच्या मुलांना वसतिगृहात प्रवेश द्यावा व नंतरच त्यांना अनुदान द्यावे. संपूर्ण अनुदान महारांनीच गिळंकृत करण्याच्या योजनेस माझा विरोध आहे.

वरील भाष्यानंतर मंत्रिमहोदय रावबहादुर केळकर यांनी ४१०० रु. हे वसति-

गृहाच्या दिवाबत्ती, व्यवस्थापन आणि भंगीकाम यांवरील खर्चाच्या १/३ मदत म्हणून देण्यात येते व अशी वसतिगृहे फक्त नागपूर, अकोला आणि चिखली येथे असून तेथे सर्व अस्पृश्य जातींच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो असे सांगितले. नंदागवळी यांनी पुन्हा आपला मुद्दा पुढे रेटला.

ते म्हणाले, 'मंत्रिमहोदयांच्या उत्तराने माझे समाधान झालेले नाही. मला वाटते की, वसतिगृहे फक्त महारांच्या फायद्याकरिता चालविण्यात येतात. भंगी, घेड आणि चांभार यांना योग्य तो वाटा मिळत नाही. ब्राह्मणांविरुद्ध स्वार्थीपणाचा जसा आरोप करण्यात येतो तसाच आरोप आमच्यावरही करण्यात येईल. म्हणून प्रत्येक जातीला त्याचा वाटा मिळावा अशी माझी इच्छा आहे. सरकारला माझी विनंती आहे की त्यांनी या वसतिगृहांची पाहणी करून या वसतिगृहांचा लाभ सर्व जातींना मिळेल याची खबरदारी घ्यावी.'

रावबहादुर केळकर –

वसतिगृहाचे अनुदानवाटप करण्याकरिता एक सल्लागार समिती नेमलेली आहेच व त्या समितीच्या मार्गदर्शनाखाली अनुदान देण्यात येत असते. कोणत्याही एका जातीकरिता चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहास अनुदानाचा लाभ मिळू नये अशी अट असून ती कटाक्षाने पाळण्यात येते.

नंदागवळींच्या भूमिकेचा नानासाहेब गवई यांनी खरपूस समाचार घेतला. त्यांच्या उपसूचनेला विरोध करताना नानासाहेब म्हणाले...

'या सभागृहाने निर्माण केलेल्या अस्पृश्यवर्गाच्या समितीने केलेल्या शिफारशीनुसारच अंदाजपत्रकात या अनुदानाची तरतूद करण्यात आलेली आहे. इतर बाबींसोबतच खाजगी वसतिगृहांच्या व्यवस्थापनातील सुधारणा करण्याचा प्रश्न समितीसमोर होता. श्री. नंदागवळी हे स्वत: या समितीचे सदस्य होते व त्यांनी समितीच्या रिपोर्टास अनुमती दिलेली आहे. समितीची एक बैठक ९ जुलै १९२२ रोजी सचिवालय इमारतीत घेण्यात आली. त्यात गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकातील रकमेच्या वापरासंबंधी चर्चा करण्यात आली. या सभेत माननीय मंत्री, डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन, श्रीमान डिक, श्री. भवानीशंकर नियोगी, श्री. नंदागवळी आणि नागपुरातील अनेक प्रमुख महार मंडळी उपस्थित होती. या सर्वांनी एकमताने वसतिगृहांना अनुदान देण्याचे मान्य केले. काही दिवसांपूर्वी श्री. नंदागवळी यांनी स्वत:च 'अस्पृश्यांच्या वसतिगृहाकरिता अनुदान मिळावे' अशा तऱ्हेचा ठराव करून शासनाकडे पाठविला होता. श्री. नंदागवळी यांनी ३ ऑगस्ट १९२१ रोजी नागपूर युनिव्हर्सिटी बिलावर भाषण करताना असे स्पष्ट म्हटले होते की, 'अस्पृश्यांच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे उच्च शिक्षण घेणे त्यांना दुरापास्त झाले आहे. स्वाभाविकपणे शिष्यवृत्त्या, सवलती आणि राहण्याची सोय असलेल्या वसतिगृहांवर त्यांना अवलंबून राहावे लागते.

'महाराज, या बाबी सभागृहाच्या नजरेस आणण्याचे कारण असे की, या

ठरावाच्या जनकांचे भाषण, त्यांनी पाठवलेले ठराव आणि कमिटीने घेतलेले निर्णय या सर्वांशी सध्या मांडलेली उपसूचना कशी विसंगत आहे हे दिसून येईल. अस्पृश्य विद्यार्थ्यांना सरकारी वसतिगृहातून प्रवेश मिळत नाही. ज्यांना प्रवेश मिळतो त्यांना त्या वसतिगृहाचा खर्च सोसवत नाही. अस्पृश्यांची वसतिगृहे कमी खर्चात चालवण्यात येतात. खेड्यापाड्यातून आलेली मुले शहरात एकटी राहिल्यास ती बिघडतात असे दिसून येते. गेल्या वर्षी एका मुख्याध्यापकाने नागपुरातील एका वसतिगृहाच्या व्यवस्थापकास असे कळविले होते की, एक विद्यार्थी योग्य पालका-अभावी दुर्व्यसनी झालेला आहे. सबब त्यास वसतिगृहास प्रवेश द्यावा. अन्यथा, त्यास शाळेतून काढून टाकण्यात येईल.' यावरून अस्पृश्यांच्या स्वतंत्र वसतिगृहाची अपरिहार्यता सभागृहाच्या लक्षात येईल. मुंबई सरकारला अस्पृश्यांच्या स्वतंत्र वसतिगृहांची आवश्यकता पटलेली आहे. डिप्रेस्ड क्लासेस मिशन, सोसायटी ऑफ इंडियाच्या जनरल सेक्रेटरीला लिहिलेल्या पत्रात त्यांनी ही बाब स्पष्ट केली आहे. पत्रात म्हटले आहे, अस्पृश्यांच्या मुलांना त्यांच्या परंपरागत वातावरणातून बाहेर काढून त्यांचे अद्ययावत वसतिगृहांतून संगोपन केल्याशिवाय त्यांच्यात नैतिक आणि सामाजिक असे कायमचे परिवर्तन घडून येणे अशक्य आहे. अशी वसतिगृहे पूर्णतः लोकांच्या मदतीवर आणि काही नि.स्वार्थी कार्यकर्त्यांच्या सेवेवर अवलंबून असल्यामुळे सरकार या वसतिगृहांच्या खर्चाचा अर्धा वाटा अनुदानाद्वारे उचलीत आहे.

'असल्या ठरावाद्वारे श्री. नंदागवळी हे स्वतःच्या समाजाचे प्रतिधिनित्व करीत नाहीत असे दिसून येते. माझ्या माहितीप्रमाणे अस्पृश्यांच्या एकूणएक प्रांतिक आणि जिल्हयांच्या परिषदांतून, तसेच प्रत्येक सभेतून वसतिगृहांना सरकारने अनुदान द्यावे अशा तऱ्हेच्या मागणीचे ठराव मंजूर करण्यात आले आहेत. गेल्या नोव्हेंबर-मध्ये काटोल येथे झालेल्या नागपूर जिल्हा महार परिषदेत श्री. नंदागवळी हे हजर होते. त्यांनी या ठरावाविरुद्ध एक शब्दही उच्चारलेला नाही.

'शिष्यवृत्त्यांची संख्या वाढल्याने विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होते असे नाही. अस्पृश्यांकरिता शिष्यवृत्त्या राखून ठेवण्यात येतात. परंतु पात्र विद्यार्थी मिळत नाहीत, या सबबीवर त्यांचे पूर्णतः वाटप केले जात नाहीत. शिष्यवृत्त्यांची संख्या वाढल्याने, तसे पाहता, वसतिगृहांचा कोणताच लाभ नाही.

'श्री. नंदागवळी यांची मानहानी केल्याबद्दल मला बोलणी खावी लागतील, याची मला जाणीव आहे. परंतु ही उपसूचना आणण्याचा त्यांचा काय हेतू होता ते कळत नाही. इतर वसतिगृहांना देखील अनुदानाची सोय करण्यात आलेली आहे, परंतु त्याविरुद्ध नंदागवळींनी अवाक्षरानेदेखील विरोध केलेला नाही.

'मंत्र्यांनी म्हटल्याप्रमाणे ही वसतिगृहे सर्व अस्पृश्य जातींकरिता मोकळी आहेत. एखाद्या शाळेमध्ये अस्पृश्य मुले जात नाहीत, म्हणून त्या शाळेचे अनुदान रोखून धरणे जसे न्यायसंगत होणार नाही, तसेच काही अस्पृश्य जातींना वसतिगृहांचा लाभ होत नाही म्हणून त्या वसतिगृहांचे अनुदान रद्द करणे न्यायोचित

ठरणार नाही.'

अध्यक्ष –

'वसतिगृहांच्या अनुदान रकमेत या उपसूचनेला अनुलक्षून जर कपात करण्यात आली तर या सभागृहातील प्रत्येक लोकप्रतिनिधी हा अस्पृश्यांची वसतिगृहे चालविण्याकरिता नैतिकदृष्ट्या स्वतः जबाबदार राहील, अशी याप्रंसगी सक्त ताकीद मी देत आहे.'

रावसाहेब महाजनी :–

'अस्पृश्यांच्या दोन प्रतिनिधींनी या प्रश्नावर भांडावे ही फार खेदाची बाब आहे. श्री. नंदागवळी यांच्या भावनेशी मी सहमत आहे. माननीय मंत्र्याने कोणत्याही प्रकारचा पक्षपात इतर जमातींवर होणार नाही व त्यांना प्रवेश नाकारला जाणार नाही असे आश्वासन दिल्यानंतर श्री. नंदागवळी यांनी आपली उपसूचना मागे घ्यावी असे मला वाटते.'

यानंतर नंदागवळी यांनी समारोपाचे भाषण केले. ते म्हणाले, 'सरकारचे आश्वासन मी ग्राह्य धरतो. सर्व जातींचे प्रतिनिधी असलेल्या कमिटीच्या सल्ल्याने सदरहू पैशांचा विनियोग व्हावा. गवई ह्यांनी ज्या परिषदेच्या उल्लेख केला, ती, परिषद निव्वळ महारांची नव्हती, तर ती सर्वच अस्पृश्य जातींची होती, म्हणून मी तेथील ठरावांना संमती दिली. ते ठराव निव्वळ महारांकरिता होते असे गवईंनी मला दाखवून द्यावे. काटोल येथे देखील माझ्या वागणुकीत कोणतीही विसंगती नाही. अस्पृश्य समजल्या गेलेल्या सर्वच जातींच्या हिताकरिता होणाऱ्या खर्चास माझी संमती आहे.'

यानंतर माननीय मंत्री श्री. केळकर यांनी पुन्हा एकदा आश्वासन दिल्यानंतर नंदागवळी यांनी उपसूचना मागे घेतली.

या सर्व चर्चेतून नानासाहेब गवई आणि नंदागवळी यांचा स्वतंत्र बाणा स्पष्ट होतो.

नानासाहेब गवई आणि कालीचरण नंदागवळी यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांवर सरकारला वारंवार नाना तऱ्हेचे प्रश्न विचारून सभागृहाचे लक्ष वेधून घेतले होते.

नंदागवळी यांनी वेळोवेळी जे प्रश्न विचारले त्यांचे स्वरूप खालीलप्रमाणे होते.

१) अस्पृश्य जातींना डिप्रेस्ड क्लासेस म्हणून संबोधण्याचे कारण काय? अस्पृश्य जातींनाच वेगळे वर्ग म्हणून येत्या जनगणनेत नमूद करण्याची काळजी सरकार घेईल काय? (९.८.१९२१)

२) मध्यप्रांतात अस्पृश्य वर्गातील किती बेंच मॅजिस्ट्रेट नेमले गेलेले आहेत व ते कोणत्या जिल्ह्यांत? (९.८.१९२१)

३) मध्यप्रांतात एकूण किती कोतवाल आहेत व कोतवाली हक्क म्हणून वसूल करण्याची किती रक्कम बाकी आहे? (२८-११-१९२१)

महाराष्ट्र शासन संग्रहालय ठाणे
दा. क्र. .....
प्रवेश शाखा (स्थळप्रत)

४) कळमेश्वर येथे १९२० साली झालेल्या कोतवाल परिषदेतील ठरावानुसार कोतवालांची पगारवाढ करण्यात आली काय? तसेच पचमढी येथे १९२१ साली कमिशनरांच्या परिषदेत कोतवालांच्या पगारावद्दल घेतलेले निर्णय अंमलात आणले गेले काय ? (२८.११.१९२१)

५) शासनाच्या विभिन्न खात्यांत– १) ब्राह्मण, २) मुसलमान, ३) ख्रिश्चन, ४) अस्पृश्य, ५) मागासवर्गीय, ६) पार्शी यांची प्रत्येकी संख्या काय आहे? (२८-११-२१)

६) बालाघाट येथे मार्च १९२० मध्ये झालेल्या नगरपालिका निवडणुकीत एक चांभार, सदस्य म्हणून, निवडून आला, परंतु त्याची निवडणूक डेप्युटी कमिशनरने रद्द केली व त्याविरुद्ध केलेले अपील कमिशनरनेही फेटाळले, हे खरे आहे काय ?

७) अ) डिप्रेस्ड क्लासेस चौकशी समिती मार्च १९२१ मध्ये स्थापन करण्यात आली, त्याची अंमलबजावणी झाली काय ? ब) सार्वजनिक संस्थांमध्ये अस्पृश्यांचे प्रतिनिधी नियुक्त करण्याचा ठराव ऑगस्ट १९२१ मध्ये झाला. तसेच डिसेंबर २१ मध्ये बेंच मॅजिस्ट्रेट पदावर अस्पृश्यांची नियुक्ती करावी असाही ठराव झाला. त्याची अंमलबजावणी झाली काय ? (२-३-१९२२)

८) पोलीस खाते आणि शासनाच्या इतर खात्यांत अस्पृश्य कर्मचाऱ्यांची संख्या किती व त्यांची पदे काय आहेत? (२४-१२-१९२१)

९) अस्पृश्य समाजाची आर्थिक स्थिती लक्षात घेता त्यांना वसतिगृहे स्थापन करण्यास शासन आर्थिक सहाय्य करेल काय? (७.३.१९२२)

१०) डिप्रेस्ड क्लासेस चौकशी समितीच्या अस्पृश्य सदस्यांनी किती रक्कम दैनिक भत्ता आणि प्रवासावर मिळविली ?

या प्रश्नांच्या उत्तरात मिळालेल्या माहितीवरून असे दिसते की, नंदागवळींनी फक्त ८९ रुपये प्रवासखर्च घेतला असून नानासाहेब गवई यांनी १२९ रुपये प्रवासखर्च घेतला होता. दैनिक भत्ता नानासाहेब गवईंनी फक्त १० रुपये घेतला, तर नंदागवळींनी तोही घेतलेला नाही. (ता. ८.३.१९२२)

अशाच तऱ्हेचे प्रश्न दिनांक १७.३.१९२२ रोजी देखील विधान परिषदेतील मीटिंगांसंबंधी आणि स्टँडिंग कमिटीच्या बैठकांसंबंधीही विचारण्यात आलेला आहे.

११) मध्यप्रांत वऱ्हाडातील अस्पृश्य समाज अजूनही बेंच मॅजिस्ट्रेटच्या पदाकरिता लायक नाहीत असे सरकारचे मत आहे काय ? (ता. २०.११.१९२२)

१२) या सभागृहाने सक्तीचे मोफत शिक्षण संपूर्ण प्रांतात येत्या १० वर्षांत प्रसृत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ही योजना सरकार कधी सुरू करणार व राबवणार ? (ता. २०.११.१९२२)

१३) खालील स्थानिक संस्थांमधील अस्पृश्यांचे किती प्रतिनिधी १) ऑगस्ट १९२१ पूर्वी, २) ऑगस्ट १९२१ नंतर निवडून आलेत अथवा नियुक्त केले गेलेत

हे सरकार सांगेल काय? नगरपरिषदा, डिस्ट्रिक्ट कौन्सिल आणि लोकल बोर्ड (ता. २१.११.१९२२)

१४) मध्यप्रांत वऱ्हाडात १९१२ ते १९२२ च्या दरम्यान मॅट्रिक व इंटर आणि बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे व राहण्याचे ठिकाण सरकार सांगेल काय? (ता. २१.११.१९२२)

या प्रश्नांच्या उत्तरातील माहितीनुसार १९२१ साली दोन विद्यार्थी व १९२२ साली दोन विद्यार्थी पहिल्या प्रथम बी. ए. झाल्याचे दिसून येते. धनजी देवमन धुवे व जयराम गणपत सोनावणे हे दोघे नागपूरहून बी. ए. झालेले पहिले अस्पृश्य विद्यार्थी ठरतात. या काळात तेरा विद्यार्थी मॅट्रिक झाले. त्यावेळी जी. टी. मेश्राम हे १९१५ साली सर्वप्रथम मॅट्रिक झाल्याचे दिसून येते.

१५) सक्तीचे मोफत शिक्षण कोणत्या प्रांतामध्ये, कोणत्या शाळांनी अंमलात आणलेले आहे? (ता. ६-८-१९२३)

१६) अस्पृश्य वर्गापैकी किती बेंच मॅजिस्ट्रेट नोव्हेंबर १९२१ च्या ठरावानुसार नेमण्यात आलेत? किती जिल्हा अधिकाऱ्यांनी योग्य व्यक्ती निवडण्याकरिता चौकशी केली आणि प्रतिनिधी पाठविले?

गोंदिया नगरातील जनतेने श्री. नंदागवळी यांची बेंच मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक व्हावी, असा एक अर्ज शासनास पाठविला. या अर्जाचे काय झाले? (ता. ९.८.१९२३)

नंदागवळींनी वरील प्रश्नांव्यतिरिक्त गोंदिया नगरपरिषद, स्टॅम्प ॲक्टचे प्रश्न आदी अनेक विषयांवर व सार्वजनिक बाबींवर सरकारला प्रश्न विचारून धारेवर धरले होते.

नानासाहेब गवई यांनी अस्पृश्यांसंबंधी विचारलेले प्रश्न थोडक्यात खालीलप्रमाणे होते-

१) चाळीस महार विद्यार्थ्यांनी पटवर्धन शाळेत प्रवेश मिळावा म्हणून अर्ज केला. पैकी एकालाच प्रवेश मिळाला व इतरांना नाकारण्यात आला, हे खरे आहे काय? (ता. ९.८.२१)

२) अ) कोणत्या जाती डिप्रेस्ड क्लासेस म्हणून संबोधण्यात येतात?

ब) शिक्षणविषयक वार्षिक रिपोर्टात अस्पृश्यांसंबंधी स्वतंत्रपणे दखल घेतली जाईल काय? (ता. ९.८.१९२१)

३) (ता. १०.८.१९२१) अ) सरकारी शाळेत प्रवेश देताना सरकारी कर्मचाऱ्यांच्या मुलांना प्राधान्य देण्यात येते काय?

ब) कोतवाल आणि कामदार महार हे सरकारी नोकर आहेत काय? असल्यास त्यांच्या मुलांना सरकारी शाळांतून प्रवेश मिळण्यास प्राधान्य दिले जाते काय?

सरकारने कोतवाल हे सरकारी कर्मचारी आहेत हे मान्य केले, परंतु त्यांच्या

मुलांना सरकारी शाळेतून प्रवेश देताना अग्रक्रम देण्याचे अमान्य केले. (ता. १०-८-१९२१)

४) बेला (उमरेड तहसील, जिल्हा नागपूर) येथील प्रायमरी शाळेत इतर जातींच्या मुलांसोबत बसू दिले जात नाही म्हणून सर्व वर्गातील चाळीस महार विद्यार्थ्यांनी शाळेत जाणे बंद केले, हे खरे आहे काय? (ता. १०-८-१९२१)

५) कोतवाल महाराचे सरासरी उत्पन्न काय? व साडेआठशे शेर धान्य वसुलीचे उत्पन्न सरकारने कमी करण्याचे कारण काय? (ता. ३.३.१९२२)

६) बलुता कमिटीने महारांचा मेहनताना वाढविण्याची शिफारस केली आहे काय? असल्यास किती? (ता. ३.३.१९२२)

७) कोतवाल महारांचा १० रुपये पगार हा धान्याच्या किंमतीशी निगडीत आहे काय? जर असेल तर धान्य किंमतीची वाढ होताच कोतवालांचा पगार वाढविण्यात येईल काय? (ता. ३.३.१९२२)

(ता. १० जानेवारी १९२३ रोजी देखील गवईंनी वरील प्रश्नांचीच पुनरावृत्ती केलेली आहे.)

८) सरकार कामदार महारांचा पगार कमी करणार आहे काय? याबद्दल त्यांना पूर्वसूचना देण्यात येईल काय? (ता. ६-८-१९२३)

९) एका महाराने सार्वजनिक विहिरीतून पाणी ओढल्याबद्दल त्याचेवर दोनशे पंच्याण्णव कलमाखाली फौजदारी केस केली आणि ती बुलढाणा जिल्ह्यातील जळगावच्या तहसीलदारासमोर दाखल करण्यात आली, ही बाब खरी आहे काय?

१०) त्या महाराला तहसीलदाराने १०० रु. दंड केला, हे खरे आहे काय? का तहसीलदाराची जात कोणती?

या प्रश्नाच्या उत्तरात त्या महाराला १०० रुपये दंड झाल्याचे व तहसीलदार हा ब्राह्मण असल्याचे कळल्यावर नानासाहेबांनी पुढील प्रश्न विचारला– 'ही घटना ब्रिटिश पार्लमेंट, ब्रिटिश लोक आणि ब्रिटिश वसाहतीतील लोक या सर्वांना सरकारमार्फत कळविण्यात येईल काय. जेणेकरून तेथील भारतीयांना देखील इतर लोक याच तऱ्हेची वागणूक देतील? (ता. ७-८-१९२३)

११) पटवर्धन हायस्कूलच्या आठव्या वर्गात जागा असूनही एका महार विद्यार्थ्याला प्रवेश नाकारण्यात आला व त्याच्याऐवजी ब्राह्मण मुलाला घेण्यात आले, ही गोष्ट खरी आहे काय? (ता. ९-८-१९२३)

१२) मॉरीस कॉलेज होस्टेलमध्ये जागा असून एका महार विद्यार्थ्याला प्रवेश नाकारण्यात आला, हे खरे आहे काय? तेथील विद्यार्थ्यांनी त्याच्या प्रवेशाबाबत आक्षेप घेतला काय? (ता. ९.८.१९२३)

(१३-८-२१) कालीचरण नंदागवळी आणि नानासाहेब गवई यांनी अस्पृश्यांच्या हिताव्यतिरिक्त सार्वजनिक प्रश्नांसंबंधी देखील अनेकदा सभागृहात निर्भीड-

पणें आपले मत मांडलेले आहे. वकिलांना इतर उद्योग करण्यास प्रतिबंध करणारा नियम रद्द करण्यासंबंधी आलेल्या ठरावास नंदागवळींनी जोरात विरोध दर्शविला. प्रांतातील (१ डिसेंबर १९२१) नागपूर, जबलपूर, सागर, अमरावती आणि रायपूर या जिल्ह्यांत, इतर जिल्ह्यांप्रमाणे, ज्युरी पद्धती न्यायदानात सुरू करावी या ठरावास, नंदागवळींनी शासकीय खर्चाचा बोझ वाढेल म्हणून विरोध केला.

उच्च पदावर इंग्रज अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येत असे. या जागांवर कमी पगार देऊन भारतीय अधिकारी नेमावे असा एक ठराव विधानपरिषदेत आला. त्यावेळी नानासाहेब गवई यांनी या ठरावास विरोध केला. ते म्हणाले, 'जर ब्रिटिश लोक भारत सोडून गेले तर अस्पृश्य वर्गाला सुटकेचा कोणताच मार्ग राहणार नाही.' नंदागवळींनी याच ठरावावर अनुकूल मत दिले, परंतु भारतीय अधिकारी हे कमी पगार घेणार नाहीत अशी धास्ती त्यांनी व्यक्त केली. गवईंच्या विधानावर बोलताना ते म्हणाले की, 'जर ब्रिटिश गेले तर अस्पृश्य लोक स्थानांतर करतील हे म्हणणे मला मान्य नाही. हा भारत आमचा देश आहे. या देशात उच्चवर्णीय म्हणविणारे भारतीय अथवा ब्रिटिश येण्यापूर्वी आम्हीच या देशाचे रहिवासी होतो. अत्युच्च पदे मिळविण्याकरता आमच्या समाजातील व्यक्तींनी का प्रयत्न करू नये? माझे बांधव या पदांना पात्र ठरतील तेव्हा उच्चवर्णीय लोक आम्हाला तुच्छतेने वागवणार नाहीत.'

रावसाहेब आर. व्ही. महाजन यांनी इंडियन फॅक्टरी ॲक्टला दुरुस्ती सुचविली. या दुरुस्तीनुसार कारखान्यांच्या मालकाविरुद्ध पोलिसाने केस करण्यापूर्वी त्यास संधी द्यावी व तांत्रिक दोष असेल तर निव्वळ ताकीद देऊन सोडून द्यावे अशी तरतूद होती. श्री. द्रवीड हे भारतसेवक समाजाचे सदस्य होते व त्याचे प्रतिनिधी श्री. एन. एम. जोशी हे भारतातर्फे आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेला हजर झाले. मजुरांसंबंधी कळकळ बाळगणाऱ्या एका संस्थेच्या सदस्याने कारखानदारांच्या फायद्याचा व मजुरांच्या हितास नख लावणारा ठराव आणावा याबद्दल नानासाहेब गवई यांनी कडाडून विरोध केला व ही उपसूचना हाणून पाडली.

कोर्ट फी बिलावर कालीचरण नंदागवळी यांनी प्रदीर्घ भाषण करून सामान्य जनतेच्या व शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने ते बिल घातक कसे आहे याचे विश्लेषण केले व सिलेक्ट कमिटीकडे हे बिल पाठवावे असा आग्रह धरला. या चर्चेद्वारे तसेच बजेटवरील भाषणांद्वारे नंदागवळी आणि नानासाहेब गवई यांच्या अंदाजपत्रकावरील ज्ञानाची चुणूक दिसून येते.

बजेटवरील भाषणात (ता. ६ मार्च १९२३) नंदागवळी म्हणाले, 'शासनातील उच्च अधिकारी कमी करण्याच्या दृष्टीने व खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने चौकशी करण्याकरिता नेमलेल्या रिट्रेंचमेंट कमिटीचा रिपोर्ट म्हणजे डोंगर पोखरून उंदीर निघालेला आहे. खर्च कमी करण्याचे कोणतेच प्रयत्न शासनातर्फे केले गेलेले दिसत नाहीत. सुधारणेच्या दृष्टीने खालील तीन बाबींचा विचार प्रामुख्याने

व्हायला हवा.

१) प्राथामिक शिक्षणाचा विकास, २)सार्वजनिक आरोग्यात सुधारणा, ३)औद्योगिक कर्ज. या तीनही बाबींवर अंदाजपत्रकात योग्य ती पुरेशी सोय केलेली नाही. १९२१ साली नेल्टान यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्य वर्गांना सरकारी नोकऱ्यांत प्रवेश मिळविण्याचे बाबतीत व तांत्रिक व औद्योगिक शिक्षण मिळविण्याच्या दृष्टीने विचार करण्याकरिता एक समिती नेमलेली होती. या समितीने केलेल्या शिफारशींना अंमलात आणण्याच्या दृष्टीने कोणतीही तरतूद अंदाजपत्रकात दिसत नाही. यावरून कमिटीचा रिपोर्ट ही निव्वळ बनवाबनवी होती असे मला वाटते.

ता. ९-३-१९२३ रोजी रिट्रेंचमेंट कमिटीच्या रिपोर्टातील काही सुधारणांची ताबडतोब अंमलबजावणी व्हावी याबद्दल नंदागवळींनी एक ठराव सभागृहात मांडला व ठरावाच्या समर्थनार्थ सडेतोड भाषण दिले. सरकारी अधिकारी दौऱ्याचे भत्ता-बिल बनविताना जास्त रकमा सरकारकडून कसे उकळतात व त्यामुळे शासनाचे कसे नुकसान होते यावर त्यांनी सडेतोड विवेचन केले. इतकेच नव्हे, तर विधान परिषदेतील सदस्य देखील स्वतःच कायदे कसे मोडतात आणि खोटी बिले कशी काढतात यावरही त्यांनी प्रकाश टाकला. सभागृहाच्या अध्यक्षांसंबंधी बोलताना नंदागवळी म्हणाले, 'स्वतःच्या पगाराबद्दल अध्यक्षांनी अवलंबिलेले धोरण निव्वळ आपल्या भाषणाबद्दलच आहे असे नाही, तर ते अनुकरणीय आहे. पहिल्या वर्षी त्यांनी पगारातून छत्तीस हजार रुपयाला तिलांजली दिली. दुसऱ्या वर्षी त्यांनी फक्त दोन हजार रुपये मासिक पगार घेतला. आणि यावर्षी त्यांनी फक्त दहा हजार रुपये वार्षिक पगार घेण्याचे ठरविले आहे. अध्यक्षांनी अशाप्रकारे सर्वांचे मनात आदराचे स्थान मिळविलेले आहे.' पुढे त्यांनी सर्व सरकारी अधिकाऱ्यांना लोकहिताकडे लक्ष द्यावे असे आवाहन केले.

५ दलित चळवळ
१९२१ ते १९२५

१ प्रास्ताविक

१९०९ साली हिंदुस्थानच्या सेन्सस कमिशनरने असे परिपत्रक काढले होते की, महार, मांग वगैरे अत्यंत हीन जातींची गणना हिंदू म्हणून करू नये. त्याच वर्षी डिसेंबरमध्ये हिंदुधर्म परिषदेची दुसरी बैठक अलाहाबादमध्ये झाली. त्यात जातीयतेचे समर्थन करण्यात आले व वरील सर्क्युलरचा मोतीलाल नेहरूंनी तीव्र निषेध केला.

याचवर्षी श्री. गरूड नावाच्या सदस्याने मुंबई विधान मंडळात अस्पृश्यांना शिपायाच्या जागा द्याव्यात असा ठराव आणला. परंतु मोतीलाल नेहरू व मनमोहनराय हे विरुद्ध होते. शफी व कुपुस्वामी मुदलियार वगैरे मंडळी 'ही सुधारणा कालमानाने होऊ द्यावी, कायदा नको' या मताची होती. सरकारलाही तेच हवे होते. ठराव नापास झाला.

सार्वजनिक विहिरी, नळ वगैरे अंत्यजांसुद्धा सर्वांना खुले असावे असा ठराव ना. बेलवी यांनी मुंबई विधिमंडळात १९१८ साली आणला व तो बहुमताने नापास झाला.मध्यप्रांत विधिमंडळात अशाच प्रकारचा ठराव १९२१च्या सुमारास कालीचरण नंदागवळी या अस्पृश्य सदस्याने आणला. तो प्रदीर्घ चर्चा होऊन १० विरुद्ध २३ मतांनी नापास झाला. हाच ठराव पुढे नंदागवळींनी १३-८-२३ रोजी विधिमंडळात मांडला व आपल्या मुत्सद्देगिरीने सदस्यांची मने वळवून तो मंजूर करवून घेतला. मध्यप्रांत वऱ्हाडातील कौन्सिलमध्ये दलित कार्यकर्त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा पूर्वीच्या प्रकरणात आहे, त्यामुळे येथे पुनरुक्ती करीत नाही.

समग्र भारतात अनेक मंडळी गेल्या शतकाच्या उत्तरार्धात दलितोद्धाराच्या कार्यास लागलेली होती. कुण्या एखाद्या व्यक्तीने अमुक एका कार्याची पहिल्यांदा सुरुवात केली असे म्हणतो न म्हणतो तोच दूर कुठेतरी अज्ञातवासात, प्रसिद्धिपरा-

ङ्मुख राहून, निष्ठेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे कार्य समोर उभे ठाकते. श्री. रा. सी. रंगराव नावाचा गृहस्थ १८९६ पासून मंगळूर येथे अस्पृश्योद्धाराचे कार्य करीत होता. हे कार्य करणारी इलाख्यातील ही एकमेव संस्था होती व पश्चिम किना-याच्या भागात या संस्थेमार्फत रंगरावांनी अस्पृश्यांकरिता शाळा व वसतिगृहे तर स्थापन केलीच, परंतु त्यांच्या स्वतंत्र वसाहती स्थापन करण्याचेही प्रयत्न या गृहस्थाने केले. या संस्थेला सरकारकडून मिळालेल्या ७५ एकर जमिनीपैकी ३५ एकर जमीन अस्पृश्यांची वसाहत करण्याकरिता राखून ठेवण्यात आली व उरलेली शेती करण्याकरिता ठेवली. १९२२ च्या सुमारास ही संस्था शिद्यांच्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनला, आर्थिक अडचणीमुळे, जोडण्यात आली. १९२३ च्या सुमारास मिशनच्या शाळेत ३५० विद्यार्थी होते. धंदेशिक्षण व शेतीकरिता आर्थिक मदतही अस्पृश्यांना देण्यात येत असे.

समग्र दलित चळवळीचा आढावा घेणे स्थलाभावी शक्य होईल असे वाटत नाही. संपूर्ण कालपटाचा ढोबळमानाने विचार करण्यापेक्षा, एका छोटयाशा कालावधीत चळवळीची किती विविध अंगे असू शकतात, हे आपण पहायला लागलो तर आश्चर्य वाटेल. १९२१ ते २५ या कालावधीत महार समाजाने काही चळवळी केल्या काय, केल्या असल्यास त्यांचे स्वरूप काय होते, महारांच्या चळवळींना स्पृश्यांची सहानुभूती होती काय, स्पृश्यांनी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी काही कार्य केले काय, केले असल्यास त्याचा अस्पृश्यांवर काय परिणाम झाला, महारांशिवाय मांग, चांभार या अन्य अस्पृश्य जाती आपल्या उन्नतीसाठी प्रयत्न करीत होत्या की नाही, असल्यास त्यांचे पुढारी कोण, त्यांच्या चळवळीचे स्वरूप काय, असे नाना तऱ्हेचे प्रश्न आपल्यासमोर उभे राहतात. या प्रश्नांना उत्तरे देण्याचा अल्पसा प्रयत्न मी या ठिकाणी करणार आहे. पहिल्याप्रथम स्पृश्य समाजातले अस्पृश्योद्धाराचे जे प्रयत्न सुरू होते, त्यांचा आढावा घेऊया.

२ स्पृश्यांच्या सभा

काँग्रेसच्या अस्पृश्यता निवारण कमेटीतर्फे डॉ. जयकरांच्या अध्यक्षतेखाली मुंबईस १९२२ ऑगस्टमध्ये सभा झाली. सर्व वक्ते स्पृश्य हिंदू होते. डॉ. सावरकर, त्रिवेदी, कुलकर्णी आदींची भाषणे झाली.[1]

दि. ३१-१०-२२ रोजी ल. ब. भोपटकर यांचे 'अस्पृश्यतानिवारणाची पहिली पायरी' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी श्री. म. माटे होते. आपल्या भाषणात भोपटकर म्हणाले की, 'मद्रास इलाख्यात एका सेकंदाला १०० माणसे परधर्मात जात आहेत. हिंदू समाजाचा ऱ्हास अशा रीतीने होऊ लागला तर काही दिवसांनी प्रत्यक्ष हिंदुस्थानात हिंदू मनुष्य ही अजब चीज होईल. अस्पृश्यांच्या

कर्तृत्वशक्तीस वाव मिळाला म्हणजे कदाचित महारांच्या वंशात स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराज जन्म घेणार नाहीत, असे कोणी सांगावे? सर्वसाधारण कुणब्यापेक्षा महार अधिक बुद्धिमान आहे, असे मी अनुभवाने सांगतो.' भोपटकरांचे भाषण सुमारे १–१॥ तास झाले. त्यानंतर भाऊसाहेब लवाटे यांनी या सभेत अस्पृश्यतेच्या रूढीचे समर्थन करताना म्हटले की, 'एखादे शौचपात्र शास्त्रीय दृष्टीने २५ वेळा धुतले व सव्वीस वेळा सुगंधी द्रव्यात खळबळले म्हणून त्याला काय भोजनपात्राची सर येणार आहे?'[२]

लवाटे यांच्या वरील विधानामुळे अस्पृश्य समाजात संतापाची लाट उसळली. निरनिराळ्या ठिकाणी सभा भरवून त्यांचा निषेध करण्यात आला. या अनुषंगाने अण्णाराव पुंजाजी फाटक यांनी ज्ञानप्रकाश दि. २१.११.२२ च्या अंकात लिहिलेल्या पत्रातील मजकूर फार बोलका आहे. 'अशा तऱ्हेची उपमर्द करणारी असभ्य भाषा वापरल्यामुळे बहिष्कृत समाजात एकच खळबळ उडून जाऊन त्यांचे पुढारी ठिकठिकाणी सभा भरवून लवाटे यांचा जोराने निषेध करीत आहेत. अस्पृश्य पुढाऱ्यांनी लवाटे यांजकडून माफीची अपेक्षा केली. त्याप्रमाणे लवाटे यांनी अस्पृश्यांची माफी ज्ञानप्रकाशातून मागितली. हे लोक भर सभेत संभावितांना मारणारे व घरी आल्यावर त्यांची क्षमा मागणारे अशा मनोवृत्तीचे आहेत.

'एकूण एक जहाल पत्रकार अस्पृश्यतानिवारणाच्या विरुद्ध आहेत, हे उघड आहे. कै. टिळकांनी सयाजीराव महाराजांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अस्पृश्यांच्या परिषदेत स्पष्ट सांगितले की, अस्पृश्यता हिंदू धर्मास संमत नाही. परंतु हे वाक्य केसरीत न छापण्याची त्यांनी खबरदारी घेतली.'[३]

२५-११-२२ रोजी गोविंद चिमणाजी भाटे यांच्या अध्यक्षतेखाली 'अस्पृश्य जातींचा उद्धार' या विषयावर पुणे येथे व्याख्यान झाले. अशी व्याख्याने निरनिराळ्या ठिकाणी स्पृश्यमंडळी घडवून आणीत असत. शिवाय श. द. जावडेकरांसारखे गांधीवादी काही प्रत्यक्ष कार्य करीत असत. त्यांनी मार्च १९२३ रोजी पठ, जि. सातारा येथे महार मुलींना इंग्रजी व संस्कृत शिक्षणाचे वर्ग सुरू केले होते. अर्थात याचा किती जणींनी लाभ घेतला हे कळणे कठीण आहे.[४] शिवदासबुवा जांभके 'अस्पृश्यांना धर्मशिक्षण देण्यात यावे' असा प्रचार करीत होते.

दि. ३-४-२३ रोजी पुणे नगरपरिषदेची खास सभा बोलावण्यात आली. श्री. भोपटकर यांनी दिलेला अस्पृश्यांच्या पाणवठ्यावरील हक्कासंबंधीचा ठराव चर्चिला जाणार होता. सभेचे अध्यक्षस्थान श्री. न. चिं. केळकर यांनी भूषविले होते. गावातून नागरिकांची मते मागविण्यात आली होती. व्यापारी संघ, आरोग्य मंडळ, सत्यशोधक समाज, मातंग समाज, आर्यसमाज अशा अनेक संस्थांचे अभिप्राय आले होते. प्रतिकूल मतांच्या १७७० सह्यांचा एक अर्जही आला होता. ठराव असा होता– 'पुणे म्युनिसिपालिटीने अस्तित्वात आणलेले व म्युनि. च्या अर्थाने चाललेले सर्व हौद, मोऱ्या आहेत त्या सर्वांवर ब्राह्मण, अब्राह्मण, स्पृश्य, अस्पृश्य, हिंदु–

हिंद्वेतर असा भेदभाव मानण्यात येऊ नये व सर्वांना सारखा फायदा मिळावा. या ठरावावर खूप चर्चा व वादंग झाले. नगरपरिषदेतील चर्चेचा सूर हा प्रतिकूलच होता. ठराव मतास टाकला तेव्हा तो ९ विरुद्ध २७ मतांनी नापास झाला.[५]

या घटनेसंबंधी लिहिलेल्या स्फुटात 'जागृति' पत्राने म्हटले की, 'विशेष गोष्ट ही की महात्मा गांधींचे कट्टर भक्त म्हणविणाऱ्या असहकारितावाद्यांनी सदरील ठरावास म्यु. च्या सभेमध्ये विरोध केला. गांधीपक्षाची पत्रेही पूर्वीपासून विरोध करीत होती. रा. लवाटे हे तर ठरावाला तिलांजली देण्यास टपलेले होते (हे बहुधा गांधीवादी होते.) रा. नरसोपंत केळकर यांनी सभेत ठरावाच्या बाजूने आपले मत दिले, तथापि त्यांच्या केसरी पत्रातून त्याबाबतीत लोकांना सूत्रबद्ध करण्याचे काहीच प्रयत्न झाले नाहीत व आता मात्र लोकांच्या अप्रियतेस भिणारा हा नामधारी केसरी असहकारितावाद्यांवर दुगाण्या झाडण्याची संधी घेत आहे. ज्या ब्राह्मणेतर सभासदांनी ठरावाला विरोध केला ते सभासद ब्राह्मणी गुलामगिरीचे चाहते व लवाटे प्रभृती ब्राह्मण सभासदांचे बगलबच्चे आहेत.'[६]

'प्रागतिक' पत्राने म्हटले की, 'या ठरावामुळे जी जागृती झाली ती फार महत्त्वाची आहे.'[७]

काही का असेना, ठराव नापास करून पुणेकरांनी आपले अंतरंग स्पष्ट केले. त्यामुळे अस्पृश्यांना अनायासेच कोण आपला व कोण परका हे तपासण्यास संधी मिळाली.

अस्पृश्योद्धाराचे कार्य भाऊसाहेब भोपटकर हे पतितपरावर्तन संस्थेतर्फे करीत असत. १९२३ च्या गणेशोत्सवात महार, मांग चांभारादी समाजाच्या गणपतीचे मेळे व खेळ यांत स्पृश्यास्पृश्य मंडळी सामील झाली होती. या मिरवणुकांना भाऊसाहेब भोपटकर, लक्ष्मणराव भोपटकर, माटे, हिंगणेकर, शिंत्रे आदी मंडळी अस्पृश्यांसोबत फिरली. माटे यांच्या अस्पृश्योद्धार मंडळाचा गणपती बॅ. गाडगीळांच्या बखळीत बसला. रोज अस्पृश्योद्धाराच्या विषयावर व्याख्याने घेण्यात येत. गणपतीचे कार्यक्रमात व्याख्यानांना अस्पृश्य लोकही हजर राहत.[८] हिंदुसमाजातले सार्वजनिक पानसुपारीचेही कार्यक्रम दसऱ्याला ठेवण्यात येत व त्यात महार, मांग, चांभारांचे पुढारी हजर रहात.[९] असाच समारंभ १९.१०.२३ रोजी प्रथमवर्ष दिनानिमित्त हिंदु समाज सभेने साजरा केला. या सभेत श्री. के. के. सकट (मातंग), छत्रपती रामजी थोरात (महार), वायदंडे (मातंग), सुभेदार घाटगे (महार) यांची भाषणे झाली. स्पृश्य हिंदूंनी समान वागणूक देताक्षणी या अस्पृश्य पुढाऱ्यांना किती आनंद झाला, तो त्यांच्या भाषणांवरून दिसून येतो. या सभेत माटे व शिंदे यांचीही भाषणे झाली.

सार्वजनिक गणपती उत्सवात जरी अस्पृश्यांना गणपती बसवू देण्यात आला, तरी त्यांना मेळ्याचे वेळी अपमान सहन करावा लागला. अस्पृश्यता निवारणाच्या मोहिमेतील घोरपडे पेठेतील चांभार वस्तीत फर्ग्युसनचे प्रिं. कानिटकर यांचे अध्यक्षते-

खाली सभा झाली. तीत भाषण करताना चांभार समाजाचे पुढारी तात्याबा नारायण शिंदे म्हणाले, 'रा. श्री. म. माटे मास्तर यांनी यंदाच्या गणेशोत्सवात आम्हाला भाग घेऊ देण्यासंबंधाने खटपट केली. आम्ही आमचा मेळा तयार केला. पण आवदे गणेशोत्सव कमेटीने व इतर गणपतीवाल्यांनी आम्हास मज्जाव केला. रा. माटे यांचाही काही इलाज चालला नाही.'[१०]

३ वि. रा. शिंदे व अस्पृश्य कार्यकर्ते

विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यता निवारणासंबंधीचे कार्य सर्वपरिचित आहे. तेव्हा त्यांनी आयोजिलेल्या सभासंमेलनांची पुनरुक्ती या लेखात करण्याचे प्रयोजन नाही. मात्र एक- दोन घटना, दलितांचा शिंद्यांसंबंधी दृष्टिकोन व शिंद्यांची मनोभूमिका समजावून घेण्याच्या दृष्टीने, उद्‌बोधक ठराव्यात.

दि. २९.३.२३ रोजी रा. शिंद्यांनी जाहीर आमंत्रण दिल्यावरून दि. १५.४.२३ रोजी भोकरवाडी, पुणे येथील डी. सी. मिशनमध्ये भरणाऱ्या सभेस हजर रहाण्याकरिता बहिष्कृत जातींचे बरेच पुढारी आपापल्या अनुयायांसह आले होते. परंतु या पुढाऱ्यांना शिंद्यांच्या हस्तकांनी आत प्रवेश करण्यास मज्जाव केला व मिशनची सभा कुलुपात घेण्यात आली. तेव्हा ही सर्व मंडळी मिशनसमोरील सर पदमजीच्या मळ्यात मैदानात जमा झाली व तेथे बहिष्कृतांची प्रचंड सभा भरविण्यात आली. या सभेचे अध्यक्ष श्री. घोलप हे होते.

या सभेने मंजूर केलेले ठराव महत्त्वाचे आहेत :-

१) डी. सी. मिशन, पुणे शाखेची पुनर्घटना, रा. शिंदे व पाताडे यांनी बहिष्कृत वर्गाच्या नावावर व बहिष्कृत वर्गाच्या खऱ्या लोकमतास धिक्कारून, पास करून जो धुडगूस चालविला त्याबद्दल सबंध बहिष्कृत वर्गाची ही जाहीर सभा तीव्र निषेध व्यक्त करते. आणि यापुढे रा. शिंदे व पाताडे यांनी डी. सी. मिशनतर्फे बहिष्कृत वर्गाच्या नावावर कोणतेही बरेवाईट कृत्य केले तर त्यास बहिष्कृत वर्गाच्या खऱ्या लोकमताचा पाठिंबा नाही व शिंदे यांनी भरविलेली सभा बेकायदेशीर आहे असे सरकारने व बहिष्कृत वर्गाच्या हितचिंतकांनी समजावे.

मांडणार- तात्याबा नारायण शिंदे (चांभार)

अनुमोदक- के. के. सकट (मातंग)

पुस्ती देणार- पांडुरंग सटवाजी वाघमारे (महार).

२) मागील सभेतील आमंत्रणावरून डी. सी. मिशन शाखांच्या आजच्या सभेस हजर राहण्याकरिता रा. घोलप, ऐदाळे सत्तूर, पोवार, अनंता भांदेकर वगैरे अस्पृश्य पुढारी आपापल्या जातीबंधूंसह आले असता त्यांस आत येऊ न देता रा. शिंदे व त्यांच्या हस्तकांनी जाणूनबुजून उपमर्द केला व सभेच्या वेळेपूर्वी कुलुपे

निवेदन 3248
दि. 24/5/23
913/CC

वगैरे लावून मज्जाव केला, याबद्दल ही सभा त्यांचा तीव्र निषेध करते.

मांडणार– आर. के. कदम (महार)

अनुमोदक– पी. आर. पोवार (चांभार)

पुष्टी देणार– तात्याराम सादुजी गायकवाड (मांग)

तिसऱ्या ठरावाद्वारे १९.३.२३ च्या मिशनच्या सभेत पास झालेल्या चौथ्या ठरावास अंमलात आणण्यास सुचविले आहे.

रा. घोलप आणि इतर मंडळींचा वरीलप्रमाणे अपमान केल्याबद्दल निषेध व्यक्त करण्याकरिता, डी. सी. मिशनचे आगाऊ झालेले सभासद भोसले, कांबळे, आर. के. कदम, एन के. कदम, वाघमारे, सकट व डी. एस. गायकवाड यांनी मिशनच्या चालू सभेतून उठून येऊन आपल्या पुढाऱ्यांबद्दल आदर व्यक्त करण्याकरिता राजीनामे पाठवून दिले. या धैर्याबद्दल व सामाजिक तत्परतेबद्दल चौथ्या ठरावाद्वारे अभिनंदन करण्यात आले आहे. ठराव ऐदाळे (महार) यांनी मांडला, टी. एस. कांदडे यांनी त्यास अनुमोदन दिले, तर टी. आर. लोंढे यांनी पुष्टी दिली.

वरील घटनेवरून डी. सी. मिशनच्या कार्यात अस्पृश्य वर्गाचा सहभाग कितपत होता, शिद्यांबद्दल काय भावना होत्या हे जसे स्पष्ट होते, तसेच अस्पृश्यांच्या हिताच्या प्रश्नावर महार, मांग व चांभार एकत्र येऊन कशी भूमिका घेत हेही दिसून येते. रा. शिद्यांच्या मिशनमधील कार्याच्या धोरणामुळेच डॉ. आंबेडकरांशी त्यांचे पटले नाही.

श्री. म. माटे यांचा अस्पृश्योद्धार

शिंदे यांच्या सद्हेतूबद्दल अस्पृश्यांच्या मनात ज्याप्रमाणे शंका निर्माण झाली त्याचप्रमाणे श्री. म. माटे यांच्याबद्दलही संदेह निर्माण झाला होता. याबद्दलचे एक पत्र रंगनाथ गंगाधर सोनवळे नावाच्या गृहस्थाने ज्ञानप्रकाशला पाठविले. (दि. ८.१२.२३) त्यात म्हटले आहे, 'बुधवारी (दिनांक १३.११.२३) रा. माटे व त्यांचे कोणी स्नेही रात्री ३॥ चे सुमारास येऊन फक्त ४–२ मंडळी बोलावून त्यांना म्हणाले, 'आमची इच्छा ज्यांना आईबाप नाहीत त्यांना आंघोळ घालावी. (परंतु) आमच्या एका आंघोळीने का तुमची शुद्धता होईल ?' असे बोलून आंघोळीचा बेत रहित करून त्यांनी स्वत: रात्री महारवाडघातील प्रमुख दोन रस्ते व १–२ गल्ल्या झाडल्या व ते काळोखातून परत निघाले. तोच एक इसम हातात दिवा घेऊन त्यांना रस्ता दाखवू लागला. त्याला ते म्हणाले, 'उजेड दाखवू नकोस.' मग हातातील खराटा उपरण्यात गुंडाळून रा. माटे व त्यांचे मित्र अंधारातच परत गेले. माझे मत असे की अस्पृश्योद्धार करावयाचा तर त्याने असा अंधारात का करावा? अशा अंधारातील सेवेवर संतुष्ट राहील असा अस्पृश्य समाज आता कुठे अंध राहिला आहे ? अस्पृश्यांनी सर्वांगीण सुधारणा आपणच आपली करून घेणे आपले पवित्र कर्तव्य आहे.'

श्री. माटे यांच्या मनात सद्हेतू असेल अथवा आपल्या कार्यास प्रसिद्धी नको

असा विनयही कदाचित असेल, परंतु ज्यांच्याकरिता कार्य करावे त्यांच्या मनात संदेह निर्माण होईल असे कार्यकर्त्यांनी वागल्यास त्याचे किती दूरगामी परिणाम होतात हे दिसून येते. (यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाकरणीयं नाचरणीयम्! यातील लोक म्हणजे ज्यांच्यात आपल्याला कार्य करायचे आहे ते लोक असा समजला पाहिजे.) माटघांसारख्याच्या सद्हेतूबद्दल शंका घेऊ नये असेही मत काही वृत्तपत्रांनी प्रकट केले.

आणखी एक उद्बोधक घटना याच सुमारास घडली. नागपूरच्या सामाजिक परिषदेत मुंबईचे शिक्षणमंत्री डॉ. परांजपे यांनी आपल्या भाषणात पुण्यात अस्पृश्यांच्या विद्यार्थ्यांकरिता जे मोफत वसतिगृह आहे त्यात अस्पृश्य विद्यार्थी आपसात जातिभेद कसा मानतात याचे उदाहरण दिले. ते म्हणाले, चांभार जातीच्या विद्यार्थ्यांकडून तक्रार आली की, 'आम्ही महारांहून उच्च जातीचे आहोत, अर्थात महार जातीच्या विद्यार्थ्यांबरोबर आम्ही भोजन करणार नाही. व महार जातीच्या स्वयंपाक्याने तयार केलेले अन्न तर आम्ही मुळीच खाणार नाही!' या घटनेचा उल्लेख करून परांजप्यांनी म्हटले की, वर्णश्रेष्ठत्व नाहीसे करावयाचे तर सर्वांनी समतेचे तत्त्व स्वीकारले पाहिजे.[११]

या घटनेवर नागपूरहून निघणाऱ्या, बाबासाहेब गवई यांनी संपादित केलेल्या, 'बहिष्कृत भारत' पत्रात दि. १३.१.२३ रोजी अग्रलेख लिहिण्यात आला. त्यात या घटनेवर कडाडून टीका केली आहे. गवई म्हणतात, 'अस्पृश्यता निघून गेली पाहिजे. इतकेच नव्हे, तर हिंदुसमाजातील जाती मोडून एकमेकांशी रोटीबेटी व्यवहाराचाही प्रघात सर्रास सुरू झाला पाहिजे. परंतु कनिष्ठ मानलेले बंधू वरिष्ठ जातींना 'आमची अस्पृश्यता नाहीशी करा' असे जेव्हा म्हणतात तेव्हा त्यांनी आपआपसातील अस्पृश्यता नाहीशी करावयास तयार असले पाहिजे. जे महार मांगांना अथवा मांग– चांभार महाराला अस्पृश्य लेखतात त्यांना आपली अस्पृश्यता ब्राह्मणांनी किंवा ब्राह्मणेतरांनी काढून टाकावी असे म्हणायला बिलकूल तोंड नाही.' अग्रलेख बराच दीर्घ असून जातीयतेमुळे अस्पृश्यांच्या चळवळीवर कसा प्रतिकूल परिणाम होतो हे दाखविणारा आहे. यावरून महार समाजाची वृत्तपत्रे व पुढारी पूर्वीपासून जाती मोडायला कसे कटिबद्ध होते हे दिसून येईल.

४ चांभार समाजातील चळवळी

रोहिदास ज्ञानदेव समाज, मुंबई यांच्यातर्फे आग्रीपाडयात दि. २९.४.२३ रोजी सभा झाली, त्यात अनेक वक्त्यांची घाणेरड्या चाली सोडण्याबद्दल व शिक्षण-विषयक भाषणे झाली.[१२]

दि. १३.५.२३ रोजी कल्याण येथे रोहिदास समाजातर्फे व. मु. काळमोरे

यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. बाबुराव जगताप वगैरे मराठे मंडळींनीही भाग घेतला. सुमारे ५०० लोक हजर होते. सभेत खालील ठराव पास झाले- (१) मोफत सक्तीचे शिक्षण (२) खर्डी येथील वसतिगृहाचा फायदा चांभारांना योग्य तऱ्हेने मिळावा (३) चांभारवाडचात संडास बांधणे, झाडण्याची व्यवस्था करणे इ.

रोहिदास ज्ञानदेव समाज शाखा नं. २ माणिकपूरच्या विद्यमाने ७.७.२३ रोजी नालासोपारा येथे देशभक्त बुऱ्हाणसाहेब हरीष यांच्या अध्यक्षतेखाली चांभार समाजाची सभा झाली. सुमारे ५०० लोक हजर होते. या सभेत (१) बहिष्कृत मुलांना इतर मुलांसोबत बसण्याची सोय केल्याबद्दल परांजपे यांचे अभिनंदन व (२) सरकारी अधिकाऱ्यांनी या ठरावाची अंमलबजावणी करावी, असे ठराव संमत झाले. सभेला मुसलमान हजर होते, परंतु ब्राह्मणेतर मात्र सभेला हजर नसल्याबद्दल राघोबा नारायण वनमाळी यांनी आश्चर्य व्यक्त केले. ते म्हणाले, 'आम्ही दोघेही पूर्वी एक होतो. परंतु ते दूर राहिले व अजूनही त्यांना काहीच वाटत नाही. यावरून, काँग्रेसकडून अस्पृश्यता दूर होण्याची गोष्टच नको.'

इतर ठरावांत म्हटले आहे,

(३) अस्पृश्य मुलांना इतरांबरोबर शाळेत बसण्यास विरोध होतो तिकडे काँग्रेसने लक्ष द्यावे. (४) बहिष्कृत वर्गाच्या मुलांना तिसरीपासून स्कॉलरशिप मिळावी. (५) सोपारा हद्दीत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. (६) सरकारी विहिरीस पाणी खारे आहे. त्यामुळे तळचाचे पाणी पैशाला एक हंडा या भावाने घ्यावे लागते. महार व चांभार मिळून ५ कुटुंबे आहेत. रोज ३ रु. २ आण्याचे पाणी या हिशोबाने गेल्या १० वर्षांत ११,४०६ रु. ४ आणे आमचे गेले. म्हणून सरकारने तावडतोब दुसरी सोय करावी.[१३]

मुंबईच्या रोहिदास ज्ञानदेव समाजाने चांभार समाजात जागृती करण्याचा प्रयत्न केला. सी. के. बोले यांच्या अध्यक्षतेखाली डिलाईल रोडवरील चाळीत दि. १०.१०.२३ रोजी सभा झाली. त्यात चांदोरकर, शिरोडकर, राघोबा वनमाळी, पिराजी मोरे आदी गृहस्थांनी भाषणे देऊन खालील ठराव संमत केले. (१) मुंबई डेव्हलपमेंट बोर्डामार्फत अस्पृश्यांच्या चाळींना दिवे, संडास आदी सोयी उपलब्ध करून द्याव्या. (२) इतर मुलांसोबत अस्पृश्य मुलांना बसू देण्याच्या सरकारी ठरावाची अंमलबजावणी करावी. (३) सोलापूर येथे गणपतिविसर्जनाच्या वेळी अस्पृश्यांच्या गणपतीस राष्ट्रीय पक्षाच्या लोकांनी अडथळा आणला त्यांचा निषेध. (४) निराश्रित मुलांच्या शाळेकडे दुर्लक्ष झाले, त्यामुळे अस्पृश्य मुले शाळेस जात नाहीत. सबब शिक्षकांची नेमणूक करावी. (५) अस्पृश्य ट्रेंड शिक्षकांची संख्या कमी आहे. सबब ट्रेनिंग कॉलेजमध्ये त्यांची संख्या वाढविणे.

रोहिदास ज्ञानदेव समाजातर्फे कुलाबा जिल्ह्यात स्वकीयांच्या परिस्थितीची पहाणी करण्याकरिता दौरा काढण्यात आला. ही मंडळी श्रीवर्धन येथे २७.४.२४

रोजी सकाळी पोचली. तेथील परिस्थितीची पहाणी करताना त्यांना असे आढळून आले की, तेथे मराठ्यांच्या शाळेत अस्पृश्य मुलांना घेत नाहीत. अस्पृश्यांनी वेगळ्या शाळेची मागणी केली तर अधिकारी म्हणाले, '३० मुले आणा, मग शाळा काढू व पुढे मुले आली नाहीत तर खर्च तुमचेकडून वसूल करू.' म्युनि. कर घेते, परंतु सोयी करीत नाही. स्पृश्य मंडळी पाणी काढून देतात, विहिरीतून घेता येत नाही. गावात नगरपालिकेचा एक दिवा अस्पृश्य वस्तीत होता. दोन दिवस मंडळी तिथे असतानाही दिवा लावण्यात आला नाही. अस्पृश्यांच्या ६ विहिरी आहेत, परंतु त्या सर्व कोरड्या होत्या. उंचावर वस्ती असल्यामुळे व विहिरीत खडक असल्यामुळे खोदूनही फायदा नाही. श्रीवर्धन येथे २५० अस्पृश्यांची वस्ती आहे. शाळेत जाणाऱ्या वयाची ५० मुले आहेत, परंतु कोणीही शाळेत जात नाहीत. हीच स्थिती सायगाव, माडसूर, बाळपड येथे आढळली.

ही मंडळी २९.४.२४ रोजी पंचेनन वोहती येथे पोचली. येथील शाळेत ८ अस्पृश्य मुले शिकत होती, त्यांपैकी एक चौथ्या वर्गात शिकत होता. अस्पृश्य मुले शाळेबाहेर झाडाखाली बसून शिकताना आढळली. शाळेत जाऊन मंडळाने आपल्या येण्याचा हेतू कळविला, तर हेडमास्तरने शाळा सोडून दिली व स्वत: निघून गेले. या गावात ५१ अस्पृश्य मुले शाळेत जाण्याच्या वयाची असूनही फक्त ८ च मुले शाळेत जातात असे दिसून आले. या गावात मंडळाने सभा घेऊन खालील ठराव पास केले.

१) जंजीरा सरकार व इंग्रज सरकार यांचेशी राजनिष्ठा.

२) प्राथमिक शिक्षण या भागात सक्तीचे करण्यास जंजीरा संस्थानास मागणी.

३) अस्पृश्य मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून स्कॉलरशिप्स सुरू कराव्या.

४) सार्वजनिक स्थळासंबंधी बोले यांच्या ठरावाची अंमलबजावणी याही हद्दीत व्हावी.[१४]

यानंतर सायगाव, माडसूर, बाळपड मुक्कामीही समाजमंडळीने जाऊन सभा घेतल्या.

५ मातंगांच्या चळवळी

मातंग समाज हा स्वतंत्रपणाने आपली चळवळ उभारीत होता. महारांच्या संस्था 'सोमवंशीय' या वांशिक अभिमान दर्शविणाऱ्या नावाने अथवा संत चोखामेळ्याच्या नावाने कार्य करत, तर चांभार समाज संत रोहिदासांचा आपल्या नावासाठी उपयोग करी. परंतु मातंग समाजासमोर आदर्श ठेवण्यासाठी कोणताही संत अथवा वीरपुरुष नव्हता. त्यामुळे त्यांच्या संस्था 'मातंग समाज' याच नावाने

कार्य करीत.

मातंग समाजात के. के. सकट, तात्या साधु गायकवाड आदी कार्यकर्त्यांनी समाजसुधारणेकरिता खूप कार्य केल्याचे दिसून येते. मातंग समाजाची सुधारणा घडवून आणावी म्हणून हे कार्यकर्ते वारंवार सभा– संमेलने भरवून स्वजातीत जागृती करण्याचा प्रयत्न करीत. या कार्यकर्त्यांनी पुण्यापासून मुंबईपर्यंत प्रचारदौरे करून सामाजिक जागृती केली.

ज्ञानप्रकाशकडे आलेल्या काही प्रश्नांची के. के. सकट यांनी दिलेली उत्तरे त्यांच्या समाजहितैषी वृत्तीची द्योतक आहेत. ते म्हणतात:–

१) धार्मिक बाबतीत महार मांगांचा, मांग भंग्यांचा विटाळ मानतात, परंतु सामाजिक बाबतीत विटाळ मानत नाहीत. मिळून– मिसळून वागतात.

२) मेलेली गुरे पूर्वी महार लोकच खात होते. अलिकडे त्यांनी ते खाण्याचे सोडून दिले, पण ते आता मांग बंधूंच्या गळचात आले आहे. पुणे शहरात महार लोक मेलेली जनावरे गाडीत घालून मांगवाडचात आणून ५–१० रुपयांत विकतात.

तात्याबा साधुजी गायकवाड व बाबू धोंडी वायदंडे मास्तर हे मातंग समाजाचे सेक्रेटरी होते. जातवार प्रतिनिधी सभेच्या सेक्रेटरीला पाठवलेल्या उत्तरात म्हटले की, हिंदूंच्या वस्तीत अस्पृश्यांना राहण्यास अभय होवो. चामडी कमावणे, हाडे गोळा करणे, वगैरेंचे कारखाने गावाबाहेर असावेत, कारण त्या घाणीचा त्रास होतो. सार्वजनिक हौद, नळ वगैरेंवर, स्वच्छतेकडे लक्ष ठेवून, सर्वांना पाणी घेण्यास मुभा असावी. स्वतंत्र नळ व हौद अस्पृश्यांकरिता बांधल्यास हिंदूंपासून अस्पृश्य ओघानेच अलग होतील व वेळप्रसंगी त्यांचेकडून पाणी मिळणार नाही. स्पृश्य हिंदूंनी प्रत्यक्ष आचरणाने अस्पृश्यता नष्ट करावी.[१५]

मातंग समाजाचे पुढारी स्पृश्य हिंदूंशी सहकार्य करून, इतर समाजाप्रमाणेच, स्वत:ची सुधारणा घडवून आणू पहात होते. २५ मार्च १९२३ रोजी भोकरवाडीत तात्याबा साधू गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली मांगांची सभा झाली. तीत 'सार्वजनिक हौद, नळ, तळी कायद्याने मोकळी आहेत, त्याची नगरपरिषदेने अंमलबजावणी करावी' असा ठराव करण्यात आला.

मातंगांच्या वस्तीत प्लेगची लस टोचण्याकरिता नगरपालिकेचे व खाजगी डॉक्टर गेले होते, श्री. प. ह. भट हे कार्यकर्तेही लोकांना समजावीत होते. परंतु लस टोचण्यास महार, मांग वा भंगी यांपैकी कोणीही तयार झाला नाही, असे भट यांनी आपल्या पाहणीच्या निष्कर्षात लिहून ठेवले आहे.[१६]

नारायणराव चंदावरकर यांनी अस्पृश्यांसंबंधी केलेल्या कार्याबद्दल त्यांच्या मृत्यूनंतर मातंग समाजाने दुखवटा व्यक्त करून कृतज्ञता प्रदर्शित केली. भोकरवाडी, पुणे येथे संभाजी पिराजी साळवे यांच्या अध्यक्षतेखाली जी सभा दिनांक २७.५.१९२३ रोजी झाली, तीत के. के. सकट, स. स. शेडगे, गणपतराव लोखंडे, वगैरेंनी चंदावरकरांच्या गुणवर्णनपर भाषणे केली.[१७]

मुंबई शहरात भायखळा येथे मातंग समाजाचे सेक्रेटरी तात्या साधुजी गायकवाड यांनी १४.२.२३ रोजी मातंग समाज शाखा स्थापन केली (२५.२.२३). या संस्थेतर्फे २३.५.२३ शनिवार रोजी जाहीर सभा घेण्यात आली. मातंग समाजातील एक गायक नारायण सावळाराम कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत चंदावरकरांच्या दुखवटयाचा ठराव वाघमारे यांनी मांडला. वाघमारे व भिंगारदिवे यांनी समयोचित भाषणे करून चंदावरकरांना श्रद्धांजली वाहिली. साधू गरीबदास बुवा यांनी अस्पृश्य समाजास धर्ममार्गास लावल्याबद्दल त्यांच्याही मृत्यूबद्दल दुखवटा व्यक्त करण्यात आला. त्यानंतर एक ठराव सामाजिक प्रश्नावर पारित करण्यात आला. मुंबईत राहणाऱ्या मांग लोकांकरिता काही थोडया चाळी राखून ठेवण्यासंबंधी ही सभा इंप्रूव्हमेंट ट्रस्टच्या अध्यक्षास विनंती करते, असा ठराव श्री. सकट यांनी मांडला व नेटके यांनी त्यास अनुमोदन दिले.[१८]

मातंग परिषदेचे दुसरे अधिवेशन १२ व १३ मे १९२३ रोजी कांडवे ता. जि. सातारा येथे भरले. अध्यक्षस्थानी सीताराम बाबाजी लांडगे हे होते. या परिषदेत पास झालेले ठराव साधारणपणे सर्वच मातंग सभांतून प्रातिनिधिक रीत्या आलेले आहेत असे म्हणावे लागेल. १) इंग्रज सरकारशी राजनिष्ठा. २) शिक्षणमंत्री डॉ. परांजपे यांनी सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केल्याबद्दल अभिनंदन ३) पुणे येथे अस्पृश्य वर्गीयांचे बोर्डिंग स्थापल्याबद्दल सरकारचे आभार. ४) अस्पृश्यांनीच सातारा येथे बोर्डिंग काढल्याबद्दलही आभार. ५) मांग– रामोशी यांच्या स्वतंत्र वसाहती काढण्याबद्दलच्या योजनेस नापसंती व ती योजना रद्द करण्याबद्दल सरकारला विनंती. ६) मांग लोकांची रोजची हजेरी रद्द करण्याची मागणी. ७) मुंबई इंप्रूव्हमेंट ट्रस्ट चाळीत काही चाळी मांगांकरिता राखून ठेवाव्यात अशी विनंती. ८) कायदेकौन्सिलात एक प्रतिनिधी मांगांचा नियुक्त करण्यात यावा अशी मागणी. ९) लोकल बोर्डाच्या जमिनी मांगांना एक चतुर्थांश किंमतीत मिळाव्या अशी विनंती.

समाजाला उपदेश करताना परिषदेने म्हटले की, मांगांनी मृतमांस खाऊ नये. महारांनी मृतमांस खाण्याचे नाकारले व त्याबद्दल त्यांना वरिष्ठ जातींनी त्रास दिला तर मांगांनी महारांशी सहकारिता करावी व महारांच्या बदली त्यांचे काम करण्यास तयार होऊ नये.

वरील ठरावातून महार– मांगांतील परस्परसंबंधावरही प्रकाश पडतो.[१९]

कोंडीराम काशीराम सकट या मांग गृहस्थाने ज्ञानप्रकाशला पत्र पाठवून सर्व अस्पृश्य बांधवांना रात्रीच्या शाळा व वाचनालये काढून स्वजातीयांत जागृती करण्याचे आवाहन केले होते.[२०] १० डिसेंबर १९२२ रोजी तादगाव येथे मुंबई इलाख्यातील मांगांची एक परिषद भरलेली होती. यासंबंधी बाबू धोंडी वायदंडे यांनी एक पत्र २२–२–२३ च्या ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी उद्विग्न होऊन लिहिले आहे की, 'सक्तीचे प्राथमिक शिक्षण असूनही मी रहात असलेल्या

भोकरवाडीतील मांगांच्या वस्तीवर त्याचा काहीही परिणाम होत नाही. सुमारे २०० मुले उनाड्क्या करताना दिसतात. बोलवावयास गेले तर लहान- थोर सर्वच टवाळकी करतात. शाळेत येणारी मुले एक-दीड मैलांवरची आहेत, पण शाळेच्या शेजारची मुले शाळेत बसायला तयार नाहीत.' शेवटी ते लिहितात, 'सक्तीशिवाय दुसरा उपाय नाही. पैसा, शिकलेले मास्तर, स्वजातीयांची कळकळ, प्रशस्त इमारती, शिक्षणाची उपकरणे इत्यादी जय्यत तयारी असूनही मांग लोकांत कोडगेपणा शिरला आहे.'

मांग जातीच्या हिताकडे श्री. सकट, वायदंडे, गायकवाड, रणदिवे आदी मंडळी बारकाईने लक्ष देत असत. भांबुर्डी येथील काही मांग कुटुंबे मुसलमान झाल्याचा बोभाटा झाला. तेव्हा अप्पासाहेब भोपटकरांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली. या बैठकीत भोपटकरांव्यतिरिक्त श्री. माटे, घोलप (महार), तात्या (चांभार), सकट (मांग), थोरात (महार) अशा मंडळींनी याला आळा कसा घालता येईल यावर भाषणे दिली,[३१] परंतु प्रत्यक्षात ही कुटुंबे परत हिंदुधर्मात आल्याचे कळले नाही.

याच अनुषंगाने पुन्हा एकदा सभेत ठराव पास करण्यात आले. २२.९.२३ रोजी भारतीय निराश्रित मंडळी, पुणे यांचे सेक्रेटरी श्री. पाताडे यांच्या अध्यक्षतेखाली खडकी येथे सभा भरली होती. तीत रा. तु. भिंगारदिवे, तुकाराम महापुरे, शिवा ज्ञानबा कांबडे, सीताराम बाबाजी लांडगे यांनी धर्मनीती, धंदा आदी बाबींचा उपदेश केला व आत्मपरीक्षण करण्यास सांगितले. सभेत जे ठराव पास झाले त्यात पुढील ठराव होते–

१) ५ ते १२ वयाच्या मुलांना शिक्षण देण्यास पालकांना विनंती करणे. २) परधर्मात गेलेले लोक परत स्वधर्मात न आल्यास बहिष्कार टाकणे. ३) मैल–मोऱ्या साफ करणाऱ्यांनी धंद्यात सुधारणा करणे. ४) मातंग समाज परिषदेला मदत करणे. ५) 'मातंगविजय' नावाचे मासिक सुरू करणें. ६) मृतमांसाहार, दारूबाजी, व्यभिचार व गोमांसभक्षण करणाऱ्याचा निषेध करणे. या सभेत शिवराम ज्ञानबा कांबळे नावाच्या मातंग गृहस्थाने २०० मंडळींस भोजन दिले.[३२] अर्थात महार समाजाच्या शि. जा. कांबळे या सुप्रसिद्ध कार्यकर्त्यास, स्वतःबद्दल गैरसमज होऊ नये म्हणून, 'मी तो नव्हे' असा खुलासा १३.१०.२३ च्या ज्ञानप्रकाश पत्रात प्रसिद्ध करावा लागला.

सासवड, जि. पुणे येथे पांडुरंगराव भोंडे या श्रीमंत गृहस्थाच्या अध्यक्षतेखाली दि. ४.१०.२३ रोजी सभा भरली. पुण्याच्या तात्याबा गायकवाड, मु. बी. इंगळे वगैरे मंडळींची भाषणे झाली. या सभेत सार्वजनिक नळ, हौद, पाणवठे आदी सरकारी स्थळांचा उपयोग मातंगांस मिळाल्याबद्दल सरकारचे अभिनंदन. २) आळंदी नगरपालिकेने धर्मशाळा बांधण्यास मोफत जागा दिल्याबद्दल अभिनंदन. ३) ज्यांना मतदानाचा हक्क आहे त्यांनी प्रागतिक पक्षाच्या उमेदवारांना

मते द्यावी. ४) सोमवंशीय महार लोकांशी रोटीव्यवहार पूर्वीप्रमाणे बंद असावा इ. ठराव संमत झाले.[२३]

काही दिवसांपूर्वी मातंग समाजाच्या एका सभेत महारांच्या पाठीशी उभे राहण्याचा ठराव झाला होता. त्या पार्श्वभूमीवर महारांशी रोटीव्यवहार पूर्ण बंद ठेवावा ही मातंग समाजाची भूमिका आश्चर्यकारक वाटेल. यावरून मातंगांची भूमिका हळूहळू समग्र अस्पृश्यांच्या हितापेक्षा स्वजातीय हिताकडे कशी वळू लगली होती हे दिसून येईल.

दि. ९.१२.२३ च्या ज्ञानप्रकाशात मांग समाजाचे पुढारी के. के. सकट व टी. एस. गायकवाड यांनी सरकारी नोकऱ्यांत लायकी असलेल्या ब्राह्मणेतर उमेदवारांना शेकडा ५० जागा मिळतील अशा सरकारी आदेशाचे स्वागत करताना म्हटले आहे की, 'महार– मांग या अस्पृश्य जातींना शिक्षणाच्या अभावी वरील जागांवर जाता येणार नाही. सबब, पट्टेवाल्यांच्या ५० टक्के जागा देण्यात याव्यात. त्यामुळे अस्पृश्यता जाण्यासाठी मदत होईल.'

मांग– गारुडी जमातीच्या लोकांना गुन्हेगार ठरवून त्यांना विशिष्ट ठिकाणी ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाविरुद्ध मातंग लोकांनी आवाज उठवला. सातारा येथील परिषदेपुढे या वसाहती बंद करण्याचा मांग पुढाऱ्यांनी ठराव आणला, तो भास्करराव जाधवांनी हाणून पाडला. या सर्व गोष्टी उद्धृत करून, भास्करराव जाधवांनी शिक्षणमंत्री झाल्यावर तरी या वसाहती बंद कराव्या, अशी अपेक्षा व्यक्त करणारे एक पत्र मातंग पुढाऱ्यांनी २६.१.२४ च्या ज्ञानप्रकाशमध्ये प्रसिद्ध केले. या पत्रावर सकट, गायकवाड, रामचंद्र कवळ, आ. ज्ञा. इंगळे वगैरे मातंगांनी सह्या केल्या होत्या.

दि. १.३.२४ रोजी पुणे- कोथरूड गावी मातंग लोकांची एक मोठी सभा भरली. श्री. राणूजी विठूजी मोंडवे हे या सभेचे अध्यक्ष होते. सोलापूरहून देखील मातंग लोक सभेसाठी आले होते. या सभेतही काही महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले. ते ठराव पुढीलप्रमाणे– १) मांग लोकांस फॉरेस्ट जमिनी द्याव्यात. २) ना. परांजपे यांनी सक्तीच्या शिक्षणाचे बिल आणले, सबब अभिनंदन. ना. जाधवांनी त्याची अंमलबजावणी करावी. ३) पट्टेवाल्याच्या शेकडा ५० जागा अस्पृश्यांना द्याव्या. ४) 'आदि हिंदु' हे नाव देण्याचा पुण्यातील काही अस्पृश्य व्यक्तींचा प्रयत्न सभेस नापसंत आहे. ५) शिक्षणाचे महत्त्व मातंग लोकांना समजावून सांगण्यासाठी सुमारे १५० गावांचा दौरा केलेले मातंग पुढारी कोंडीबा दाजिराम रणदिवे यांचे अभिनंदन. या विषयावर सकट, साळवे, कवळे, इंगळे, खिरनेर, कौंडव आदींनी भाषणे केली.[२४] आदि हिंदु या नामांतरातील फोलपणा पुढे बाबासाहेब आंबेडकरांनी देखील बार्शी येथील परिषदेत दाखवून दिलेला आहे.

सामाजिक सुधारणा निव्वळ उपदेशांनी होत नसते, त्याकरिता कृतीची गरज असते. मातंग पुढारी आपल्या समाजाची रूढी- परंपरेतून सुटका करण्याकरिता

देखील प्रयत्नशील होते असे दिसते. यादृष्टीने १९२५ सालच्या ग्रहणाच्या वेळी मांग पुढाऱ्यांनी दाखवलेले धैर्य प्रशंसनीय म्हणावे लागेल.

'ग्रहणाचे वेळी, 'दे दान, सुटे गिराण' अशा आरोळ्या मारीत, विशेषतः मांग व तत्सम जातीचे कित्येक लोक आपल्या बायकामुलांसह गावातून फिरत असतात व त्यांना जुनी वस्त्रे, तेल, शिळेपाके अन्न, धान्य, वगैरे उतारा म्हणून देण्यात येते. गेल्या चंद्रग्रहणाच्या वेळी भांबुर्डा येथील लोक अशा रीतीने भिक्षा मागण्यासाठी बाहेर पडत होते. पण रा. सकट व आणखी २०– २५ मातंग गृहस्थांनी स्वयंसेवक होऊन भोकरवाडीच्या बाहेर पडण्याचे चारही रस्ते अडवले. लोकांची समजूत घालून त्यांना बाहेर जाऊ दिले नाही. त्यामुळे भोकरवाडीतील एकही मनुष्य ग्रहणाची भिक्षा मागण्यास बाहेर पडला नाही.'[२५] या प्रतिबंधाचा पाठपुरावा झाल्याचे आढळत नाही. परंतु वाईट सामाजिक चालीरीती बंद करण्याचा प्रयत्न तत्काली धाडसाचा होता यात संशय नाही.

१६.३.२४ रोजी भांबुर्डे येथे झालेल्या मातंगांच्या सभेमध्ये अनेक ठराव पास झाले. रा. बाबा आबाजी इंगळे हे अध्यक्ष होते. काही ठराव असे होते– १) मंगळवार पेठेतील वतनदार महार मेलेली जनावरे भोकरवाडी, नवी पेठ व सारा येथील मांगांना नेऊन विकतात, त्याचा निषेध. २) पुणे नगरपरिषदेने मेलेली जनावरे पुरण्याची व्यवस्था करावी. ३) वऱ्हाड प्रांत निझाम सरकारला देऊ नये. ४) हिंदुसभेचे सेक्रेटरी गोविंदराव हिंगणेकर यांनी केलेल्या अस्पृश्योद्धार कार्याबद्दल अभिनंदन. ५) आदि हिंदु नाव नापसंत ६) शिक्षणात कोणीही धूळमातीचा खेळ करू नये.

याच ठिकाणी पुन्हा ५.४.२४ रोजी बहिर्जी केंजळकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेऊन जे ठराव पास करण्यात आले, त्यांत मांगांना नगरपरिषदेने घरे बांधून द्यावी, मेलेल्या जनावरांचे मांस मांगांनी खाऊ नये व न. प. ने ही जनावरे गाडण्याची व्यवस्था करावी असे महत्त्वाचे ठराव होते.[२६]

मातंग समाजाच्या मृतमांस भक्षणविरोधी चळवळीस लवकरच यश आल्याचे दिसते. के. के. सकट यांच्या २.८.१९२४ च्या ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध झालेल्या पत्रात म्हटलेले आहे, 'मुर्दाड मांस खाण्याचा जो प्रघात महार, मांग या दोन जातीत जारीने परवा, म्हणजे दोन महिन्यांपूर्वीपर्यंत, चालू होता, तो आता कायमचा बंद करण्यात आला आहे. भोकरवाडी साऱ्याचा मांगवाडा, घाडचाचा महारवाडा, नव्या पेठेतील मांगवाडा, वगैरे भागात मिळून हमेशा दररोज ८– १० जनावरांची पड येत असे व ते मांस खाण्याकरिता चामडी काढून विकली जात असे. पण आता हा घाणेरडेपणाचा प्रकार बंद झाला आहे. या कामी म्युनिसिपालिटीची आम्हास फारच मोठी मदत मिळाली, कारण त्यांचे इन्स्पेक्टर या कामावर सक्त नजर ठेवीत आहेत, व कोणी तसा घाणेरडा धंदा करीत असल्यास हे इन्स्पेक्टर खटला भरतील व दंड करतील या भीतीनेही कित्येक अडाणी लोक या घातुक सवयीपासून

दूर रहात आहेत. पुणे म्युनिसिपालिटीच्या या मदतीबद्दल सबंध अस्पृश्य समाज त्यांचा ऋणी आहे, कारण अस्पृश्यतानिवारणाला ही घातुक वहिवाट बराच मोठा अडथळा आणीत होती.'

मातंग समाजाच्या कार्यकर्त्यांनी एक कमेटी नेमून मांग जातीचा पूर्वेतिहास लिहिण्याचे ठरवले व त्याकरिता समाजबांधवांकडून माहिती मागविली.[२७] परंतु हा इतिहास लिहिला गेल्याचे दिसत नाही. मातंग समाजाच्या पुढाऱ्यांनी विद्याप्रसाराच्या दृष्टीने आणखी एक उपक्रम केला. ' भांबुर्डे येथील काही सुधारणावादी व कळकळीच्या मातंग गृहस्थांनी वार पत्करून काही गरीब विद्यार्थ्यांना विद्येचा लाभ देण्याची सोय करण्याचा उपक्रम केला आहे. सकट, वायदंडे, सपकाळ, सातपुडे, शेंडगे, लोखंडे, बाबाजी इंगळे इत्यादी गृहस्थांनी वार पत्करून गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्याचे पुण्यकार्य चालविले आहे. नगर जिल्ह्यातून आलेल्या सरकराम काशिनाथ नावाच्या विद्यार्थ्याची अशी भोजनाची सोय करण्यात आली.[२८]

१७.२.२५ रोजी मातंग समाजातील कार्यकर्त्यांनी भांबुर्ड्यातील मांगवाड्यात घरोघर फिरून, समाजशास्त्रीय माहिती गोळा करून, पुढे रा. हिंगणेकर यांना ही माहिती दिली व सुधारणेचे उपाय सुचविले. मांग पुढारी तात्याबा गायकवाड, मल्हारी आवडे, बाबा इंगळे, गणपत आडळमे, राजा कवळे वगैरे मंडळींनी ही माहिती गोळा केली. या भागात ४ शाळा आहेत. मिशनरी शाळेत महार, मांग, चांभार व मुसलमानांची मुले चौथ्या वर्गापर्यंत शिकत. या मुलांना मिशनकडून पुस्तके, पाटच्या, पेन्सिल व कपडे फुकट मिळत. शिवाय १ ते ३ रु. शिष्यवृत्ती मिळे. माटेंच्या रात्रीच्या शाळेत १५–२० वर्षांवरची मुले शिकत. मांगांची सुमारे ३० मुले शाळा शिकत, पैकी २ मुली होत्या. ८ ते १६ वर्षांची १४– १५ मुले शाळेत जात नाहीत. ती उनाडक्या करतात.[२९]

मातंग समाजात वृत्तपत्र सुरू करण्याचा उद्योगही याच सुमारास झालेला दिसतो. कोंडबा दाजिबा रणदिवे रा. माळशिरस यांच्या संपादकत्वाखाली ' मातंग तलवार' नावाचे ' त्रैमासिक काढण्याचे ठरले होते. परंतु तत्पूर्वीच सकट आणि वायदंडे यांनी ' मातंग बंधु ' नावाचे मासिक पत्र सुरू केले.[३०]

श्री. के. के. सकट हे डि. क्ला. मोफत वसतिगृहाचे सल्लागार व व्हिजिटर्स कमेटीचे सदस्य होते. त्यांनी वसतिगृहाला भेट देऊन त्या वसतिगृहाच्या सुधारणेसाठी १२० सूचना पाठविल्या. त्यात विद्यार्थ्यांनी उच्चनीचपणा बाळगू नये, इन्स्पेक्टर म्हणून पदवीधर महार अथवा ब्राह्मण असावा अशा सूचना केल्या.[३१]

पुणे, पेठ मंगळवार येथे २०.९.२५ रोजी सभा झाली. तीत १) वनविभागाच्या जमिनी मांगांना मिळाव्या. २) मातंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या मिळाव्या ३) मातंग वस्ती असलेल्या प्रत्येक जिल्ह्यात मातंगांकरिता एक फ्री बोर्डिंग काढावे. ४) मांगवाड्यात सकट, आवडे, वगैरे मंडळींनी सुरू केलेल्या रात्रीच्या शाळेला सरकारने व लोकांनी मदत करावी. ५) ' मातंग बंधु ' पत्राचे वर्गणीदार व्हावे

असे ठराव पास करण्यात आले.[१२]

२६.९.२५ रोजी अहमदनगर जिल्हा मातंगांची पहिली परिषद झाली. सकट व इतर पुढाऱ्यांची चालू परिस्थितीवर भाषणे झाली. या परिषदेत सकट व वायदंडे यांचा सत्कार करण्यात आला. येथील ठरावात काही महत्त्वाचे ठराव झाले ते असे- १) मातंगांनी राजनिष्ठ असावे. २) नगर जिल्ह्यात मोफत वसतिगृह सरकारने काढावे. ३) पडीक फॉरेस्ट जमिनी मातंगांस द्याव्या. ४) नगरच्या राखीव जागेवर मातंग माणूस नेमावा. ५) 'मातंग बंधु' पत्राचे वर्गणीदार व्हावे. ६) मातंगांच्या वस्तीत नगरपरिषदेने सुखसोयी कराव्या. ७) सरकारी खात्यात कारकून, पट्टेवाला, शिपाई इ. नोकऱ्यांत २५ टक्के जागा मातंगांना द्याव्यात. ८) उष्टे खाऊ नये. महारांनी सोडलेली कामे मांगांनी करू नये. अमावास्या, ग्रहण मागणाऱ्यास जातीबाहेर ठेवावे. ९) मातंगांस मदत करणाऱ्या स्पृश्यांचे आभार. या सभेत पाच- सहाशे मंडळी हजर होती.[१३]

मांस न खाण्याबद्दल सूर्यवंशी मातंग समाजाचे पुढारी तुकाराम काळोखे सोलापूरहून आले व त्यांनी समाजाकडून पुणे येथे कुळदैवताच्या शपथा घेववल्या.[१४]

श्री. के. के. सकट यांनी पुण्यातील फ्री वसतिगृहास भेट देऊन जी माहिती मिळविली, ती तत्कालीन अस्पृश्यांच्या शैक्षणिक स्थितीवर प्रकाश टाकणारी आहे.

वसतिगृहात एकूण विद्यार्थी	– ५० (महार, मांग, चांभार इ.)
पुणे ट्रेनिंग कॉलेज	– २० मुले
सेवासदन संस्था	– ३ मुली
एम. ए.	– १ (एम. के. जाधव)
बी. ए.	– १ (गाडेकर)
६ वी च्या आत	– २५ विद्यार्थी
शिक्षक	– १०

मारवाडी व पठाण लोकांकडून अस्पृश्यांइतका अन्य कुणासही त्रास होत नाही. अस्पृश्यांच्या वस्त्या घाणेरड्या आहेत. भंग्यांची घरे व राहणी त्याहून अधिक स्वच्छ आहे. इतर जातींची माहिती इथे अनावश्यक आहे.[१५]

मातंग समाजाच्या जागृतीचे दृश्य दिसू लागले होते. कसबापेठ मांगवाडा येथे मातंग स्त्रियांची सभा के. के. सकट यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत श्रीमती वीणाबाई भोसले या सेवासदनमध्ये शिकणाऱ्या बाईंचे एक तासपर्यंत भाषण झाले. त्यांनी सेवासदनातील व्यवस्थेची तरफदारी केली, व पुढे मातंग स्त्रियांना मृतमांसाहार, वाईट चालीरीती वगैरे सोडण्यास सांगितले. सर्व अस्पृश्य स्त्रियांनी सेवासदनचा फायदा घ्यावा असेही त्यांनी सुचविले.[१६]

अशा प्रकारे मातंग समाज स्वकीयांची सुधारणा करण्याचा प्रयत्न करी.

महारांच्या चळवळी

महार समाजाच्या काही परिषदांची आता आपण थोडक्यात माहिती करून घेऊ या.

सोलापूर जिल्ह्याची पहिली वतनदार महार परिषद सोलापूर येथे १६.१२.२१ रोजी श्री. केदारे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या परिषदेतून जे ठराव मंजूर झाले, त्यांवरून त्या जिल्ह्यातील प्रश्न समजून घेणे सोपे होईल. या परिषदेपूर्वी मराठ्यांची परिषद झाली. परंतु त्या परिषदेत तत्पूर्वी काही महारांवर मराठ्यांकडून झालेल्या अत्याचाराचा निषेध नोंदवला नाही, म्हणून मराठा परिषदेचा निषेध अस्पृश्यांच्या परिषदेत करण्यात आला. महारांना शिपायाइतका पगार देण्यात यावा म्हणून मागणी करण्यात आली. परंतु एक महत्त्वाचा ठराव महारांची जागरूकता दर्शविण्यास पुरेसा आहे. या ठरावात म्हटले आहे, 'बहिष्कृत वर्गाने आर्यसमाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज अथवा ब्राह्मणेतर संघासारख्या बहिष्कृत धर्माचे सोंग घेतलेल्या कोणत्याही संघाशी न मिळता जीवन म्हणजे सक्रिय सहानुभूती दाखविणाऱ्या पक्षाशी साफ दिलाने दिलजमाई करावी. दुसऱ्या एका ठरावाद्वारे महार– मांगांना परस्परांविरुद्ध चिथावणाऱ्या लोकांपासून सावध रहावे असा इशारा दिला आहे. एकूण २४ ठराव या सभेत पास केले ते संपूर्ण ठराव देणे स्थलाअभावी शक्य नाही.

पुणे येथे भोकरवाडीत महार– मांगांच्या वस्तीत समाजसुधारकांनी सातत्याने सुधारणेसाठी प्रयत्न केले. निराश्रित साह्यकारी मंडळीतर्फे २३.१.२२ रोजी महार– मांगांची सभा झाली. या सभेत श्रीमती पार्वतीबाई जाधव नावाच्या महार बाईने सरकारने पिकेटिंग बंद केल्याबद्दल सरकारचा निषेध करणारा ठराव पुढे मांडला. दारूचे गुत्ते बंद करून शाळा काढाव्या, असाही ठराव करण्यात आला.[३७]

पश्चिम महाराष्ट्रात महारांच्या अनेक परिषदा व सभा झाल्यास, नाशिक जिल्ह्यातील अस्पृश्यांची एक सभा १२.३.२२ रोजी देवळाली येथे भरली. या सभेत अस्पृश्यांत शिक्षणप्रसार करण्याच्या हेतूने महत्त्वाचे ठराव पास झाले. १) अस्पृश्य मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण २) तालुक्याला १०० मुलांचे सोयीचे वसतिगृह बांधणे. ३) स्कॉलरशिपमध्ये वाढ ४) मॅट्रिक अथवा थर्ड इअर झालेल्या अस्पृश्य विद्यार्थ्यांना डेप्युटी इन्स्पेक्टरची जागा द्यावी. इतर ठरावांत पोलीस व मुलकी खात्यात नोकऱ्या व वतनदार महारांची कामे निश्चित करणे, व अस्पृश्यांनी मृतमांस खाणे सोडून देणे असे ठराव होते. या सभेचे अध्यक्ष भारत सेवक समाजाचे उपाध्यक्ष गोपाळ कृष्ण देवधर हे होते. ही सभा सोमवंशीय निराश्रित शिक्षण समाजाने आयोजित केलेली होती.[३८]

सांगली इलाखा बहिष्कृत परिषदेचे पहिले अधिवेशन ११.४.२२ रोजी झाले. सुमारे २००० लोक हजर होते. जिवाप्पा ऐदाळे हे अध्यक्ष होते. परिषदेत

१) राजनिष्ठा २) सांगली सरकारचे अभिनंदन ३) वतनदार महारांच्या कामाची निश्चिती ४) मोफत मध्यवर्ती बोर्डिंग सांगलीत स्थापण्याची मागणी ५) मोफत सक्तीचे शिक्षण ६) सरकारी जमिनीची मागणी, वगैरे ठराव झाले. विशेष म्हणजे महार वतनदारांच्या हिश्शासोबतच पो. स्टे. मध्ये 'मांग लोकांची हजेरी' बंद व्हावी असेही ठराव करण्यात आलेत.[३९]

१४ व १५ एप्रिल २२ रोजी बारामती येथील अस्पृश्य परिषदेत मालेगावचे युवराज श्रीमंत राजे रतनसिंग जाधव, राजे शंभूसिंगराव अमरसिंग जाधव व श्री. गोपाळराव देवधर हे हजर होते. परिषदेचे अध्यक्ष घोलप होते. अनेक स्पृश्यास्पृश्य वक्त्यांची भाषणे झाली.[४०] या परिषदेनंतर मालेगावचे राजे शंभूसिंगराव जाधव यांनी सोमवंशीय सन्मार्गदर्शक समाजाचे अध्यक्ष धाकूजी विठ्ठलराव गायकवाड व सेक्रेटरी जनार्दन सदाशिवराव रणपिसे यांना राजवाड्यात चहाचे निमंत्रण दिले होते व मदतीचेही आश्वासन दिले होते. या कार्यकर्त्यांनी पुढे महारवाड्यात जाऊन समाजबांधवांस उपदेश केला. पुढे पाणदर, कमळेश्वरी व फलटण येथील स्पृश्य व अस्पृश्य पुढाऱ्यांशी त्यांनी चर्चा केल्या. फलटणच्या महाराजांनी सोमवंशीय समाजास मदत करण्याचे आश्वासन दिले. फलटण येथे स्पृश्यांकडून 'सर्व अस्पृश्यांशी समानतेने वागू' अशा शपथा घेण्यात आल्या. येथे महारांची परीक्षा पाहण्याच्या हेतूने मांगवाड्यात त्यांना आमंत्रण देण्यात आले. तेव्हा 'जी मंडळी समाजहितासाठी भंग्याला देखील ताटात घेऊन जेवली, ती भंग्यांच्या घरी चहापानास मागेपुढे पहाणार काय,' असे म्हणून त्यांनी गावातील महार तरुणांना घेऊन मांगवाड्यात चहापान व रसपान केले. याच मंडळीने पुढे त्र्यंबक पिंपरे येथे जाऊन समाजस्थितीची पाहणी केली. पिंपरे हे लहान खेडे असूनही महारांनी स्वखर्चाने ३५ मुलांची शाळा चालवल्याचे आढळते.[४१]

सोमवंशीय गुरुदत्त प्रासादिक भजन मंडळीच्या विद्यमाने मोल्याड रोड येथे २४.९.२२ रोजी चिमणलाल सेटलवाड यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली होती. याच संस्थेतर्फे १९.१०.२२ रोजी दुसरी सभा म्युनिसिपल कमिशनर, मुंबई श्री. क्लेटन यांच्या अध्यक्षतेखाली भरली. वरील सभांतून श्री. बोले, समाजसेवा संघाचे श्री. कुलकर्णी आदी अस्पृश्य मंडळी हजर होती. या दोन्ही सभांतून मंजूर झालेले ठराव सारख्याच स्वरूपाचे होते. १) अस्पृश्यांच्या वस्तीतून प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याच्या सरकारी धोरणाची अंमलबजावणी. २) फोरास रोडवर चार चाळी अस्पृश्यांकरिता राखून ठेवाव्या. ३) अस्पृश्यांच्या वस्तीत स्वच्छतेकरिता जास्त कामगार ठेवावे. ४) सार्वजनिक स्थळी अस्पृश्यांना मज्जाव नसावा, वगैरे.[४२] अशाच प्रकारची सभा ४.११.२२ रोजी कामाठीपुरा येथे चुनीलाल सेटलवाड यांच्या अध्यक्षतेखाली भरली. या सभेस सुमारे तीन हजार लोक हजर होते. या सभेत बोलणाऱ्या वक्त्यांत अस्पृश्यांपैकी आर. डी. डोळस, जे. ए. वाघमारे, ओझरकर, के. एम. रोकडे, एम. एस. गायकवाड, बी. एस. खरात,

गंगावले, एस. ए. उपशाम, ही मंडळी प्रमुख होती. राहण्याकरिता महारांसाठी चाळी राखून ठेवण्यावर सर्व वक्त्यांनी विशेष भर दिला.[४३] २.११.२२ रोजी देखील सोमवंशीय गुरुदत्त प्रासादिक मंडळीतर्फे औचितपाडा येथे जंगी जाहीर सभा झाली. एक हजारावर लोक हजर होते. ठराव वरीलप्रमाणेच होते. नोकरीत प्रतिनिधित्व मिळावे ही मागणी एका ठरावाद्वारे करण्यात आली होती. अध्यक्ष म्हणून संदेश पत्राचे संपादक अ. ब. कोल्हटकर हे होते.[४४] सोमवंशीय समाजातर्फे श्री. आर. एस. निकाळगे यांच्या अध्यक्षतेखाली दि. ६.१२.२२ रोजी भायखळा येथे व दामोदर गणेश पाध्ये यांच्या अध्यक्षतेखाली १०.१२.२२ रोजी कामाठीपुरा येथे सभा झाल्या. दोन्ही सभांतून ठरावांचे स्वरूप सारखेच होते. सक्तीचे मोफत शिक्षण, चाळीचे भाडे कमी करणे, अस्पृश्यांच्या शाळांवर शक्यतो अस्पृश्य शिक्षक नेमणे, कॉर्पोरेशनमध्ये अस्पृश्यांचे प्रतिनिधी नेमणे अशा मागण्या होत्या.

पुण्याच्या सोमवशीय सन्मार्गदर्शक समाजाने २९.३.२३ रोजी पाचवा वार्षिकोत्सव साजरा केला. अध्यक्षस्थानी बॅरिस्टर जी. के. गाडगीळ होते. या प्रसंगी जोग, गुप्ते, ठक्कर आदी हिंदू मंडळींचे, तर रणदिवे, गायकवाड, जांभेकर आदी अस्पृश्य मंडळींची भाषणे झाली. या संस्थेचे सेक्रेटरी श्री. रणपिसे यांनी सांगितले की, रात्रीच्या शाळा, शारीरिक शिक्षणास प्रोत्साहन, मद्यपानापासून अस्पृश्यांस प्रतिबंध, धार्मिक शिक्षणासाठी भजने व दिंडचा आदी प्रकारांनी हा समाज अस्पृश्यांच्या सर्वांगीण उन्नतीकरिता प्रयत्न करीत आहे. पुढे भाषणात त्यांनी अस्पृश्यांना जहाल पक्षापासून व गांधीवादापासून सावध रहाण्याचा इशारा दिला. भारत सेवक समाजाचे श्री. ठक्कर यांनी अस्पृश्यांनी स्वावलंबी झाल्याशिवाय त्यांचा उद्धार होणे शक्य नाही असे सांगितले. इतर वक्त्यांनी अस्पृश्यांना स्वच्छता व शिक्षणाचा उपदेश केला.

वरील समाजाव्यतिरिक्त पुणे येथीलच 'नूतन सोमवंशीय हितचिंतक समाजा'चा वार्षिकोत्सव दि. ६.४.२३ रोजी साजरा केला गेला. ही संस्था एक वर्षापूर्वी म्हणजे १९२२ साली स्थापन झाली होती. सेक्रेटरी व प्रमुख संस्थापक श्री. पां. रा. कांबळ यांच्या अहवालावरून असे दिसून येते की समाजामार्फत मुलामुलींकरिता दिवसाची शाळा, रात्रीची शाळा, एक वाचनालय आणि एक डिबेटिंग क्लब स्थापन करण्यात आले. दिवसाच्या शाळेला सरकारी मान्यताही मिळाली व सरकारकडून १२० रु. ग्रँटही सुरू झाली. ५० मुले व १० मुली होत्या. वर्गणीद्वारे ५०० रु. गोळा करण्यात आले व ते सर्व स्वावलंबनाच्या तत्त्वावर अस्पृश्य समाजाकडून गोळा करण्यात आले. वार्षिक रिपोर्टात म्हटले होते की, अस्पृश्यांच्या सुधारणेस ब्राह्मण, ब्राह्मणेतर व जैन या सर्वांकडून विरोध होतो. या समारंभात भारत सेवक समाजाचे कृ. ग. लिमये, सत्तूर, भट, डॉ. एस. गुरु, यांची भाषणे झाली. शेवटी समारंभाचे अध्यक्ष गाडगीळ यांचे भाषण झाले. डी. एस. सावंत व सत्तूर यांनी स्वतःच्या भाषणात डॉ. आंबेडकरांचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला दिसून येतो.[४५]

मंचर जि. पुणे येथे ९.४.२३ रोजी गेनुजी जयराम पेठे यांच्या अध्यक्षतेखाली बहिष्कृत लोकांची जाहीर सभा झाली. या सभेत १) राजनिष्ठा २) सरकारने अस्पृश्य मुलांना वर्गात बसू देण्याबाबत काढलेल्या प्रेसनोटबद्दल अभिनंदन ३) सरकारच्या फ्री बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांची संख्यावाढ करावी. ४) अस्पृश्यांचे शिक्षक नेमण्यात यावे. ५) शैक्षणिक सवलती वाढवाव्यात ६) स्कॉलरशिप्स देण्यात याव्यात अशा प्रकारचे ठराव करण्यात आले.[४६]

महार विद्यार्थी संस्था नावाची संस्था २४.१२.२२ रोजी शिवराम जानबा कांबळे यांनी पुणे येथे स्थापन केली. 'शिक्षण घेण्याची तीव्र लालसा असूनही मदतीचे अभावी शिक्षण घेणे दुरापास्त असलेल्या विद्यार्थ्यांना मदत करण्याकरिता ही संस्था काढण्यात आली.' या संस्थेत ज. स. रणपिसे, खोडे, गायकवाड, कांबळे, मा. का. जाधव व थोरात ही मंडळी कार्यकारिणीत होती. अशाच प्रकारचे विद्यादानाचे कार्य श्री. बालचंद्र रामचंद कोठारी हे कार्यकर्ते देखील करीत होते. त्यांनी सोलापूर जिल्ह्यात बावी या गावी एक अस्पृश्य विद्यार्थी वसतिगृह काढले. याच्या कार्यकारी मंडळात न. चि. केळकरांसह अनेक स्पृश्य मंडळी होती. त्यामुळे देणग्यांद्वारे १९२३ साली इमारतीकरिता ६३५७ रु. सहज मिळाले. महार विद्यार्थी संस्थेच्या विद्यमाने दुसरे वार्षिक अधिवेशन २१.१०.२३ रोजी पुणे कँप एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कुलात झाले. या प्रसंगी ल. ब. भोपटकर अध्यक्ष होते. अस्पृश्यांचे कोणते पुढारी हजर होते याचा उल्लेख वृत्तात नाही.[४८] मात्र या संस्थेचे १९२४–२५ करिता तीन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या मंजूर केल्या. श्री. दुंडप्पा घटकांबळे यांनी अथणी जि. बेळगाव येथे काही सहकाऱ्यांसोबत अस्पृश्य मुलांकरिता रात्रीची शाळा सुरू केली, तीत ३० मुले शिकत होती. (घटकांबळे हे त्या भागातील महार पुढारी होते.) मुंबई इलाख्यातील शाळाखात्याचा १९१७ ते १९२२ चा पंचवार्षिक रिपोर्ट डायरेक्टरने प्रसिद्ध केला. त्यात अस्पृश्य विद्यार्थ्यांची संख्या ५ वर्षांत ३०५६८ वरून ३८२६६ पर्यंत, म्हणजे २५ टक्क्यांनी वाढली असे म्हटले आहे.

७ विदर्भातील चळवळी

१९२० साली अखिल भारतीय अस्पृश्य परिषद नागपुरात भरविण्यात आली. तेथे बाबासाहेब आंबेडकर हजर होते. सर्वसाधारणपणे ही परिषद अखिल भारतीय म्हणून संबोधण्यात आली असली, तरी त्यात उपस्थित असलेले कार्यकर्ते बहुतांशी महाराष्ट्रातीलच होते. या कार्यकर्त्यांत ब्राह्मणेतर कार्यकर्त्यांचा विशेष भरणा होता. परिषदेचे अध्यक्षस्थान राजर्षी शाहू छत्रपती यांनी भूषविले होते, व शाहू महाराजांसोबत आपल्यालाही अस्पृश्यांच्या पंक्तीस बसावे लागणार म्हणून

नागपूरकर भोसले राजवाडा सोडून निघून गेले होते. नागपूरकर भोसले हे खालच्या पातीचे, म्हणून वरच्या पातीच्या शाहू महाराजांचे म्हणणे त्यांनी अमान्य करणे शिष्टाचारास सोडून दिसले असते, म्हणून त्यांनी ही पळवाट काढली. ही घटना सर्वपरिचित आहेच.

परंतु १९२० ची परिषद ही काही पहिली परिषद नव्हती. तत्पूर्वी अनेक परिषदांचे पडघम महाराष्ट्रात झडले होते. १९१२ च्या डिसेंबरमध्ये मागासलेल्या जातींची परिषद मुंबईत झाली होती. या परिषदेत ४० विभिन्न जातींनी भाग घेतल्याचे नमूद आहे.[५] १९१३ साली नागपुरात झालेल्या महार परिषदेत व अन्यत्र ज्या कालीचरण नंदागवळी या कार्यकर्त्याचा मी उल्लेख केलेला आहे, त्यांच्या अध्यक्षतेखाली १९१७ साली अमरावती येथे मध्यप्रांत वऱ्हाड महार परिषदेची सातवी परिषद झाली. ही बैठक १८,१९, व २० मार्च १९१७ रोजी झाली. यावेळी विदर्भात सर्वत्र प्लेगची साथ असूनही २०० प्रतिनिधी सभेस हजर झाले. मा. ना. भटकर हे स्वागताध्यक्ष होते. पाहिल्या दिवशी नामदार जोशी यांनी अस्पृश्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा उपदेश केला. दुसऱ्या दिवशी विठ्ठल रामजी शिंदे यांचे भाषण झाले. अस्पृश्यांनी राजकीय चळवळीत पडू नये असा त्यांनी सल्ला दिला. अनेक ठराव परिषदेत पास झाले. त्यात ग्रामपंचायतीत फौजदारी खटले चालवू दऊ नये, अमरावती येथील शाळेत अस्पृश्य मुलांस प्रवेश नाकारल्याबद्दल निषेध व वतनदारी सोडणाऱ्या महारांना कमी लेखू नये हे मुख्य ठराव होते. तिसऱ्या दिवशी कालीचरण नंदागवळी यांनी रा. काणे याच्या बंगल्यावर बॅ. रामराव, बॅ. नगरकर, जयवंत व मोडक पती– पत्नी, डॉ. भट, आदी अमरावतीतील प्रमुख नागरिकांना चहापार्टी दिली. स्पृश्यास्पृश्यांनी एकत्र चहापार्टी घेण्याचे त्या भागातील हे पहिलेच उदाहरण असल्याचे सांगतले जाते.[५०]

महाराष्ट्राच्या विभिन्न भागातून महार, मांग व चांभार समाज परिषदा घेऊ लागले होते. काही सभांतून सर्वच अस्पृश्य भाग घेत, तर काही परिषदा जातिनिहाय होत. १९२० ते १९२५ च्या दरम्यान अस्पृश्यांच्या ज्या चळवळी झाल्या व विकासाचे ज प्रयत्न झाले ते बहुविध स्वरूपाचे दिसून येतात. काही परिषदांचे संयोजक महार, काहींचे मातंग, तर काहींचे चांभार होते. काही परिषदा हिंदु संघटनांसारख्या संस्था घडवून आणीत, तर काही स्पृश्य हिंदूंच्या सामाजिक संघटना आयोजित करीत असत.

चांभार आणि मातंग समाजातील पुढारी मुंबई व पुणे भागात स्वजातीच्या उन्नतीकरिता झटत होते. परंतु महार समाज संपूर्ण महाराष्ट्रात जागृत झालेला होता. महारांचे पुढारी निरनिराळ्या नावांनी संघटना स्थापन करीत होते. महाराष्ट्रातील सोमवंशीय लोकांनी पश्चिम महाराष्ट्रात स्वजातीची संघटना निर्माण केली, तर सोमवंशेतर महार लोकांनी चोखामेळ्याच्या नावावर संघटना स्थापन केल्या. परंतु सर्वांच्या कार्याचे स्वरूप मात्र सर्व अस्पृश्यांची उन्नती करणे हेच

असल्याचे दिसून येते. महारांच्या काही सभा स्वजातीची उन्नती करण्याच्या हेतूने सुरवातीस घेण्यात आल्या असल्या, तरी त्यातील मागण्या, ठराव व भाषणे पाहिली असता समग्र अस्पृश्यांच्या उन्नतीचे लक्ष्य त्यांच्या मनात होते हे स्पष्ट होते. परिषदा व सभा या बहिष्कृतांच्या अथवा अस्पृश्यांच्या नावाने आयोजित करण्यात येत.

मध्यप्रांत वऱ्हाड महार परिषदेच्या अकराव्या अधिवेशनास नागपूर येथे दि. २९-१-२२ रोजी दुपारी ३ वाजता सुरवात झाली. ही परिषद तीन दिवस चालली. महार परिषद १९०७ च्या सुमारास निर्माण झाली होती व १९१३ ला या सभेची पहिली परिषद नागपूर येथेच भरलेली होती. तीही परिषद तीन दिवसपर्यंत चालली होती. त्या परिषदेचे अध्यक्ष रेव्हरंड जी. डी. फिलीप व सेक्रेटरी विठोबा रावजी मूनपंडे हे होते. १९२२ च्या परिषदेचे संयोजक नानासाहेब गवई व कि. फा. बनसोडे हे होते. परिषदेचे अध्यक्षस्थान बॅरिस्टर जॉर्ज डिक, एम. एल. सी. यांनी स्वीकारले होते. बॅरिस्टर डिक हे इंग्रज वकील अस्पृश्यांची बाजू मध्यप्रांत वऱ्हाड विधानपरिषदेत नेहमी मांडीत असत. या परिषदेला प्रिन्स ऑफ वेल्स यांनी भेट दिली होती. नागपुरातील श्रीमंत सर गंगाधरराव चिटणीस, नरेश आपाजी द्रविड, नबाब मीर मेहंदी अलीखान, वगैरे विभिन्न थरातील मंडळी हजर होती. रघुनाथराव शंभरकर हे स्वागताध्यक्ष होते. युवराजाच्या या सभेतील स्वागताचा पुढे मिस मेयोनेही आपल्या 'मदर इंडिया' पुस्तकात उल्लेख केला आहे. पहिल्या दिवशी सभेला महात्मा गांधींच्या सत्याग्रहाश्रमातील ५-५० लोकांनी अडथळा आणण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना स्वयंसेवकांनी हाकलून लावले. या लोकांनी मंडपाबाहेर आल्यावर महात्मा गांधींच्या जयजयकारात विजेचे दिवे फोडले. या परिषदेत दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी जे प्रमुख ठराव पास झाले ते पढीलप्रमाणे– १) जातवार प्रतिनिधित्व २) सार्वजनिक स्थळांमध्ये मोकळीक ३) मुलांमुलींना सक्तीचे शिक्षण ४) फ्री बोर्डिंगची ठिकठिकाणी स्थापना ५) शिष्यवृत्तीची वाढ ६) नॉन- को- ऑपरेशनवाल्यांच्या त्रासापासून मुक्तता. ७) महारांचे बलुते ८) मद्यपानबंदी ९) मृतमांस न खाणे १०) पोलीस, लष्कर व डेहराडून लष्करी कॉलेजात अस्पृश्यांची भरती. या परिषदेच्या बातमीच्या शेवटी म्हटले आहे की, नॉन-को-ऑपरेशन म्हणजे काँग्रेसच्या लोकांनी गाडीच्या डब्याडब्यातून लोकांना येण्यास प्रतिबंध केला, परंतु तरीही युवराजाच्या स्वागतासाठी १७-१८ हजार महार व परिषदेस १० हजार महार लोक हजर होते.[५१]

महारांच्या परिषदा मध्यप्रांत वऱ्हाडकडे वारंवार होऊ लागल्या. १ एप्रिल १९२२ रोजी एक सभा अचलपूर जि. अमरावती येथे श्री. भटकर, रा. चिखली यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या सभेत जिल्ह्यातील बनसोडे, वानखडे, आठवले, तावडे, आदींनी बलुते व सामाजिक सुधारणेसंबंधी भाषणे दिली.[५२]

जुलै १९२३ मध्ये 'नागपूर येथील महार मंदिरप्रवेश करणार' अशी अफवा पसरली होती. राजकीय स्वातंत्र्यापूर्वी धार्मिक स्वातंत्र्य मिळायला हवे, या हेतूने

नागपुरात ठिकठिकाणी हिंदू देवालयांवर धार्मिक स्वातंत्र्याचे चोखामेळा निशाण किंवा धर्मझेंडा फडकविण्यात यावा अशा आशयाच्या छापलेल्या जाहिराती सर्वत्र वाटण्यात आल्या. त्यावर खाली 'सेनापती, चोखामेळा धर्मफौज' असे लिहिले होते.[५१]

२९– ३० डिसेंबर १९२३ रोजी नागपूर येथे राष्ट्रीय सामाजिक परिषद झाली. या परिषदेत दि. ३० रोजी दुपारी अस्पृश्यतानिवारणाचा ठराव सर बिपिन कृष्ण बोस यांनी मांडला. त्यावर श्री. बोस व माधवराव यांची भाषणे झाली. या ठरावास पुष्टी देण्यासाठी सौ. भटकर या उभ्या राहिल्या. त्यांचे भाषण छोटेसे, परंतु सडेतोड होते. दलित समाजातील सुरवातीच्या महिला कार्यकर्त्यांमध्ये सौ. भटकर यांचे धैर्य वाखाणण्यासारखे आहे. त्या म्हणाल्या, 'ठराव पुष्कळ पास होतील, परंतु उपयोग काय? शाळेत एक मुलगी गेली, 'तू कोण?' म्हणून विचारले. 'महार' ती उद्‌गारली. 'अरे बापरे, कोण हा अनर्थ!' अशी नागपुरात स्थिती आहे.

'तुम्हाला हे ब्राह्मण लोक मारतील असेही मला सांगण्यात आले. महारांची स्थिती फार वाईट आहे. गावात पाटील त्यांचा नवरा! मी महार नर्स आहे. मला काही काम मिळत नाही. 'ख्रिश्चन व्हा' म्हणूनही सांगण्यात आले. परंतु मी जात सोडणार नाही. नाव चोरायचे, जात चोरायची या गोष्टी मी मुळीच करणार नाही. जातीत राहून जात सुधारण्यास मी झटेन.' ज्या काळात पांढरपेशा स्त्रिया-देखील सार्वजनिक कार्यात पडायला भीत असत, त्या काळात राष्ट्रीय परिषदेच्या व्यासपीठावरून स्वजातीचे गाऱ्हाणे बेधडक मांडणाऱ्या सौ. भटकरांचे कौतुकच करायला हवे.[५४]

मध्यप्रांत वऱ्हाड परिषदेचे तेरावे अधिवेशन मोहपा येथे २३ व २४ फेब्रुबारी १९२४ रोजी दामोदर मनीराम पुराणिक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. परिषदेत महार जातीचे बहुतेक सर्व पुढारी हजर होते. या लहानशा खेड्यात देखील त्याकाळी दोन हजारावर लोक परिषदेस हजर होते. यात शे–सव्वाशे स्त्रियाही होत्या. नानासाहेब गवई यांनी प्रास्ताविक केल्यानंतर स्वागताध्यक्ष पी. एन. भटकर यांचे भाषण झाले. या सभेत भीष्म नावाचे ब्राह्मण वक्ते बोलताना म्हणाले, 'महारांनी कसायाचे कापलेले मांस खाऊ नये, मृतमांस खायला हरकत नाही.' यावर किसन फागोजी बनसोडे व भटकर यांनी त्यांचा चांगलाच समाचार घेतला. या तेराव्या महार परिषदेचे संयोजक अर्थात मोहपा निवासी सुप्रसिद्ध पुढारी किसन फागोजी बनसोडे होते, यात शंका नाही. अनेक वक्त्यांची भाषणे झाली, त्यात सौ. बेणूताई भटकर व सौ. रंगूबाई शंभरकर यांनीही सुंदर भाषणे दिली. भाषणे कडक झाली व ठरावही कडक होते. ठरावांत म्हटले आहे– १) अस्पृश्य लोकांनी हिंदू लोकांवर विसंबून न राहता आपला उद्धार आपणच करावा. २) हिंदुस्थान देशाला राजकीय हक्क देण्यापूर्वी इंग्रज सरकारने अस्पृश्यांची परि-

स्थिती पहावी व त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता एक रॉयल कमिशन नेमावे. ३) अस्पृश्य वर्गाची इतर जातींबरोबर शिक्षणात प्रगती झाल्याशिवाय या देशाला राजकीय हक्क देण्यात आले तर त्याचा उपयोग अस्पृश्य लोकांना दडपून टाकण्याकरिताच करण्यात येईल, असा निरोप ब्रिटिश पंतप्रधानाकडे बॅ. डिक यांच्यामार्फत पाठवावा. ४) ज्या शाळेत अस्पृश्यांना वेगळे बसवण्यात येते त्यांची ग्रँट सरकारने बंद करावी. ५) वऱ्हाड प्रांत इंग्रजांनी निजामला देऊ नये. ६) राउंड टेबल कॉन्फरन्सचा सध्याचा हेतू परिषदेस मान्य नाही. परंतु ती जर घेण्यात आलीच, तर त्यात ब्राह्मण- ब्राह्मणेतर, अस्पृश्य व मुसलमान यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी घेण्यात यावेत.[५५]

परिषदेतील ठरावांवर मध्यप्रांत विधानमंडळातील चर्चेची स्पष्ट छाप दिसून येते. नानासाहेब गवई आणि कालीचरण नंदागवळी या दोन्ही सदस्यांनी राजकीय हक्कांबद्दलची आपली प्रगल्भता विधानमंडळात सिद्ध केली होती. परंतु या परिषदेत असे ठराव मांडणाऱ्या नानासाहेब गवई यांनी पुढे हिंदुसभेशी सहकार्य करून गोलमेज परिषदेत आंबेडकरांना विरोध केलेला दिसून येतो. तेव्हा हे परिवर्तन कसे घडले याचा अभ्यासकांनी विचार करायला हवा.

विदर्भात सर्वत्र महार पुढारी सभा- परिषदा घेऊन अज्ञानी व गरीब महारांत जागृती करीत होते व राजकीय हक्कांबद्दल प्रत्येक सभासंमेलनातून मागणी करण्यात येत होती. अमरावती जिल्हा महार परिषदेत काही महत्त्वाचे ठराव पास झाले. त्यात १) वऱ्हाड निजामाकडे देऊ नये. २) जबाबदार राज्यपद्धती देण्यापूर्वी अस्पृश्यांच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करण्याकरिता कमिशन नेमावे. ३) गावकामगारास १० टक्के पगार द्यावा, हे मुख्य ठराव होते.[५६]

वर्धा जिल्हा महार परिषद यवतमाळ येथे दि. ९.४.२४ रोजी भरली. तीतही वऱ्हाड निजामकडे जाऊ नये हा व इतर ठराव वरीलप्रमाणेच करण्यात आले.

मध्यप्रांतातील अस्पृश्य पुढाऱ्यांच्या राजकीय परिपक्वतेची प्रचीती या सभासंमेलनांतून येत होती.

८ डॉ. आंबेडकरांची सर्वस्पर्शी चळवळ

या काळात डॉ. आंबेडकरांचे नाव सर्वत्र पसरले होते. अपुरा राहिलेला विद्याभ्यास पूर्ण करण्याकरिता बाबासाहेब ५. ७. २० रोजी लंडनला गेले, ते ६ एप्रिल १९२६ ला परत आले. सर्वत्र सभासंमेलने होत असलेली त्यांना दिसत होती. परंतु ते सभांतून भाग घेत नसत. स्पृश्य हिंदूंच्या सभांनाही ते फारसे हजर असल्याचे दिसत नाही. परंतु समाजात घडत असलेल्या घडामोडींकडे त्यांचे बारीक लक्ष होते. समग्र अस्पृश्य समाजात संजीवनी कशी निर्माण करता येईल याचा ते

विचार करीत होते. समग्र भारतातील दलितांचे नेतृत्व करील असा त्यांच्यासारखा बुद्धिमान, विद्वान व कल्पक नेता त्या काळात कुणीच नव्हता. १९२३ ते १९२५ च्या दरम्यान बाबासाहेबांच्या चळवळीस व्यापक स्वरूप प्राप्त झाले नसले, तरी त्याची बीजे पेरण्याच्या कामास सुरुवात झाली होती.

दि. २२ व २३ ऑक्टोबर १९२३ रोजी फलटण संस्थानात महार परिषदेचे अधिवेशन भरले. याच्या जाहिरातीत डॉ. आंबेडकर हे परिषदेस हजर राहणार असे म्हटले होते, परंतु ते हजर राहिले नाहीत.

खैरमोडे यांच्या आंबेडकर चरित्रातील माहितीप्रमाणे ऑक्टोबर १९२२ पासून एप्रिल १९२३ पर्यंत मुंबईत ठिकठिकाणी सभा भरवून बाबासाहेबांना थैली व मानपत्र अर्पण करण्याकरिता पैसा गोळा करण्याचे प्रयत्न झाले. तरीही १२५ रुपयांपेक्षा जास्त पैसे गोळा झाले नाहीत. तेव्हा थैली व मानपत्र अर्पण करण्याचे रद्द करण्यात आले.[५७]

बाबासाहेबांना मानपत्र वगैरे स्वीकारणे पसंत नव्हते. पुण्याला शि. जा. कांबळे यांच्या नेतृत्वाखाली एक सभा भरून त्यात असे ठरले की, अखिल भारतीय अस्पृश्यांची एक परिषद डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली भरवून मानपत्र देऊन त्यांचा गौरव करावा. परंतु हा मान स्वीकारण्याचे नाकारून डॉ. आंबेडकरांनी कळविले की, 'यात भाग न घेण्यानेच मी अस्पृश्य जातीचे हित अधिक चांगल्या प्रकारे करू शकेन.' यानिमित्त जमा झालेली २०५ रुपयांची रक्कम कांबळेंनी काही परत व काही देणगी म्हणून वाटून दिली.[५८]

१९२४ सालात मुंबईला डॉ. आंबेडकरांच्या मानपत्रासंबंधी गोळा झालेल्या फंडाबाबत जो वाद निर्माण झाला व 'मूकनायक' पत्रासंबंधी घोलप–आंबेडकर यांच्यात जो जाहीर पत्रव्यवहार झाला त्याची सविस्तर हकीगत श्री. खैरेमोडेंनी दिलेलीच आहे.

अस्पृश्यता निवारक परिषदेचे चौथे अधिवेशन पुणे येथे २९–३० डिसेंबर १९२३ रोजी पार पडले.[५९] याचे अध्यक्षस्थान डॉ. आंबेडकरांना देण्यात आले होते, परंतु त्याही परिषदेत ते हजर झाले नाहीत.

दि.१५.१२.२३ रोजी मुंबईत दत्तजयंतीचा उत्सव साजरा झाला. तो एकंदर ९ दिवस चालला. पहिल्याच दिवशी डॉ. आंबेडकरांनी धर्मभोळेपणापासून परावृत्त करण्यासाठी अस्पृश्यांना कळकळीचा उपदेश केला.[६०]

मुंबई इलाखा प्रांतिक बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन निपाणी येथे ११ व १२ एप्रिल रोजी पार पडले. याठिकाणी अध्यक्षपदावरून डॉ. आंबेडकरांनी वैकोम सत्याग्रहासंबंधी सविस्तर चर्चा केली. ज्याप्रमाणे काँग्रेसमध्ये सुतावाचून मत नाही, त्याप्रमाणे अस्पृश्यतानिवारणाची अट गांधींनी टाकायला हवी होती. तरीही गांधींनी अस्पृश्यांसंबंधी दर्शविलेली सहानुभूती काही कमी नाही, असे प्रशंसोद्गार आंबेडकरांनी काढले.[६१]

या काळातील बाबासाहेब आंबेडकरांचे प्रमुख भाषण म्हणजे बार्शी येथे भरलेल्या प्रांतिक बहिष्कृत परिषदेत दिलेले मे १९२४ चे भाषण होय. हे भाषण म्हणजे १९३६ साली 'मुक्ती कोण पथे' म्हणून दिलेल्या भाषणाची पूर्ववृत्ती होय. या भाषणातील काही उतान्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होईल.

'गुलाम लोक गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वतंत्र प्रजाजनांच्या स्थितीला जाऊन पोहचल्याची साक्ष रोमचा इतिहास देत आहे. पण हिंदुस्थान देशाच्या इतिहासात अस्पृश्याचा स्पृश्य झाल्याचा एकही दाखला देता येत नाही. रोमन लोकांतील गुलामगिरी ही कालिक स्थिती असे व त्यातून सुटका होण्यास अनेक मार्ग मोकळे असत. याच्या उलट भारतातील अस्पृश्यता त्रिकालाबाधित स्थिती आहे. त्यापासून सुटका होण्यास कोणताच मार्ग नाही.

'समाजातील पिढ्या मरून जातात, परंतु पुढची पिढी आपले सर्व संप्रदाय, चालीरीती, धर्मभावना, संस्कृती आपल्या मागच्या पिढीपासून शिकून घेते, तेणेकरून समाज अव्याहत चालू राहतो... आमच्यातीलच भूदेव, त्यांचा आमचा संबंध कधीच येत नाही. मग त्यांच्या चालीरीती याव्या कशा? उपनिषदातील तत्त्वे जर आमच्या कानी घालण्यास ते तयार नाहीत, तर आमची मरीआईची पूजा कधी जाणार? –सारांश, आमच्यात वाइटाचा संचार झाला असा ते आरोप लादतात, तर आम्हाला चांगल्याची शिकवणूक कोणी का नाही दिली?

'अस्पृश्य लोकांनी देशांतर करावे म्हणजे अस्पृश्यता जाईल, असे काही लोक म्हणतात ... लोकहिताचे दृष्टीने या सूचनेत पुष्कळ हित साठवलेले आहे. चतकोर भाकरीच्या तुकड्यासाठी गावातील साऱ्या लहानथोरांच्या लाथा खाण्यापेक्षा फिजी, ईस्ट आफ्रिका वगैरे देशांत जाऊन नशीब काढणे केव्हाही हितावह होणार आहे... मात्र, सर्वच लोकांस देशांतर करणे शक्य होणार नाही.

'दुसरा मार्ग म्हणजे धर्मांतर. हिंदू धर्मात 'सर्वांभूती एक आत्मा' असे मूलतत्त्व आहे. या उदात्त तत्त्वाप्रमाणे जर समाजघटना झाली असती तर? ज्याप्रमाणे घरच्यावर तेवढा उजेड करावा व परक्यांवर अंधार करावा असे दिवा करीत नाही, किंवा पाणी ज्याप्रमाणे गाईची तृषा हरवून वाघाला विष होऊन मारून टाकीत नाही, तशी हिंदूंची समबुद्धी असती तर? आचार-विचारांचा कोठे मेळ आहे काय? ...आश्चर्य म्हणजे जे लोक हिंदूधर्मावर श्रद्धा ठेवत नाहीत त्यांना मात्र वरिष्ठ हिंदू समदृष्टीने लेखतात.

'जो धर्म त्यांच्या अनुयायांना ऐहिक व पारलौकिक सुखाची दारे मोकळी करण्याऐवजी त्यांना अधोगतीत खितपत पडावयास लावतो त्या धर्माला चिकटून राहण्यात काय अर्थ?'

लक्षात घ्या, हे भाषण १९३६ चे नाही. १९२४ साली दिलेले हे भाषण आहे. पुढे धर्मांतराप्रमाणेच नामांतर करण्याचेही फायदेतोटे त्यांनी सांगितले. याच भाषणात त्यांनी पुढे म्हटले आहे,

'हिंदुस्थानास स्वराज्य मिळण्याचा योग आला आहे की मोठीच आनंदाची गोष्ट आहे असे मी समजतो. कारण ब्रिटिशांचा राजदंड हा 'असून अडचण, नसून खोळंबा' आहे... स्वराज्य म्हणजे पेशवाई असे विचार कोतेपणाचे आहेत... भावी स्वराज्यात राज्यसरकार प्रजेच्या संमतीने चालणारे असून त्यात कायमचे राजे असे कोणीच असू शकणार नाहीत. अशा प्रकारच्या स्वराज्यात जर प्रजेच्या हिताची हेळसांड झाली तर तिचे संवर्धन दुसऱ्या कोणत्याच राजकारणात होणार नाही. स्वराज्य ही सर्वोत्तम अशी राज्यव्यवस्था आहे.'

पुढे, स्वराज्य म्हणजे सर्वसंमतीने चालणारे राज्य, याकरिता मतदानाचा हक्क आपण मिळवायला पाहिजे, मतदान म्हणजे वर्णाश्रम धर्मावर हल्ला आहे, वगैरे विवेचन यात केले आहे. हे सारे घडवून आणण्यासाठी संघटनेची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. पुढे ते जातिभेद व गुणभेद यांचे विश्लेषण करताना म्हणतात,

'इतर लोक आपल्यापेक्षा जातीने श्रेष्ठ आहेत तसे ते व्यावहारिक गुणांनीही श्रेष्ठ आहेत. म्हणून आपल्या लोकांच्या अंगी व्यावहारिक गुणांची अभिवृद्धी करण्यास दीर्घ प्रयत्न केला पाहिजे... आपल्यावरील अन्याय दूर करण्यास आपले लोक धिंगा घालीत नाहीत यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. अमुक गोष्ट करता येत नाही वगैरे आवेशयुक्त बोलून त्वेष येत नाही, कारण त्यांना अन्यायाची जाणीवच होत नाही... जातिभेदाची चर्चा करा वा न करा, तो आहे तेथेच राहणार. म्हणून आपल्या लोकांची लायकी वाढविण्याची आपण काळजी घेतली पाहिजे.'

भाषणाच्या शेवटी अस्पृश्यांना उद्देशून ते म्हणाले, 'यासाठी आपल्यापेक्षा ज्यांना ही स्थिती स्पष्टपणे कळत असेल व ज्यांच्या मनात कर्तव्यबुद्धी व परोपकारबुद्धी पूर्णपणे जागृत झाली असेल त्यांनी, आपल्या समाजाचा जीवनार्थ–कलहात टिकाव लागण्यासाठी, रात्रंदिवस, निरपेक्ष बुद्धीने झटले पाहिजे. जर ते स्तब्ध राहतील तर त्यांच्या माथ्यावर आपल्या दडपल्या गेलेल्या बांधवांस विपद्दशा आणल्याची आणि त्यांचा नाश केल्याची भयंकर जबाबदारी येणार आहे. म्हणून सुशिक्षित बांधवहो,... ज्या दुर्गुणांनी व दुराचारांनी आपल्या लोकांच्या बुद्धीचा, कीर्तीचा व परिस्थितीचा घात चालवला आहे त्यांचे यथाशक्ती निर्मूलन करणे आपले कर्तव्य आहे व ते आपण केले पाहिजे.' [१२]

आंबेडकरांचे हे भाषण द्रष्टचाचे नव्हते असे कोण म्हणेल? येत्या ५० वर्षांत काय घडेल व त्याकरिता आम्ही काय करणार याचा स्पष्ट आराखडा त्यांच्या डोळचांसमोर होता.

डॉ. आंबेडकरांचे हे भाषण मृतप्राय समाजास संजीवनी देण्यास समर्थ होते. त्यानंतर अस्पृश्य समाजातील विभिन्न गट बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली एकत्र आले. महार, मांग, चांभार आदी सर्वच मंडळी या लढचात प्रथम समाविष्ट झाली आणि बहिष्कृत हितकारिणी सभेचा जन्म झाला.

डॉ. आंबेडकरांकडे अस्पृश्यांचे नेतृत्व आल्यानंतर महार-चांभारांतील जुन्या पुढाऱ्यांच्या अस्तित्वास धक्का पोचला असल्यास नवल नाही. म्हणूनच स्पृश्य समाजाविरुद्ध तत्पूर्वी जहाल भाषणे देणारे गवई, निकाळगे, शिवनरकर, सकट आदी मंडळी पुढे डॉ. आंबेडकरांविरुद्ध व पर्यायाने अस्पृश्यांच्या हिताच्या विरोधात उभी ठाकल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे १९२१ ते १९२५ दरम्यान या महाराष्ट्रात दलित चळवळ आकार घेत होती, असा निष्कर्ष आपणास थोडक्यात काढता येईल.

९ समालोचन

अस्पृश्यांबद्दल सहानुभूती असणाऱ्या पुरोगामी स्पृश्यांना अस्पृश्यांच्या परिषदांना निमंत्रित करण्यात येई. अनेक ठिकाणी या परिषदांचे अध्यक्षस्थानही त्यांना मिळे. अस्पृश्यांच्या सुधारणेस ब्राह्मणेतर पुढारी अनुकूल असले, तरी मराठा वर्ग हा प्रातिगामी आहे व त्यांच्याकडून अस्पृश्यांचा छळ होतो व त्यांच्यावर अन्याय होतो ही भावना अस्पृश्यांची होती. भाटचांसारखे ब्राह्मण लोक अस्पृश्यांच्या सुधारणेसाठी कार्य करीत, परंतु त्यांच्याही हेतूबद्दल अस्पृश्यांना शंका वाटू लागली. श्री. म. माटे, भोपटकरादी मंडळींनी गणपतीचे मेळे वगैरे ठिकाणी अस्पृश्यांना सहभागी करवून घेतले, परंतु ही भूमिका तकलुपी असल्याचे अस्पृश्य पुढाऱ्यांना वाटत होते. विठ्ठल रामजी शिंदे अस्पृश्यांकरिता शाळा, वसतिगृहे, वगैरे उभारून त्यांच्या उन्नतीचे प्रयत्न करीत होते, परंतु त्यांच्या डिप्रेस्ड क्लासेस कार्यकारिणीत अस्पृश्य पुढाऱ्यांना शिद्यांची संस्था ही खास त्यांच्याच समाजाच्या हिताकरिता आहे अशी शंका आल्यास नवल नाही. एका सभेतून महार, मांग, चांभार या सर्व प्रमुख जातींनी शिद्यांच्या या धोरणाचा निषेध केलेला दिसून येतो.

श्री. ल. ब. भोपटकरांनी सार्वजनिक विहिरी, हौद, इ. अस्पृश्यांना मुक्त करण्याचा पुणे नगरपालिकेत आणलेला ठराव नामंजूर करण्यात आला. त्यात ठरावाविरुद्ध मतदान करणाऱ्यांत ब्राह्मणेतरही होते. परंतु ब्राह्मणेतर पक्षाच्या पत्रांनी म्हटले की, ठरावाविरुद्ध मतदान करणारे लोक हे भटाळलेले होते. अशा प्रकारच्या चर्चा वृत्तपत्रांतून रंगत होत्या व स्पृश्यांचे अंतरंग उघडे पडत होते. महारादी अस्पृश्य आपल्या समाजात जागृतीसाठी रात्रंदिवस खपत होते. सभा,संमेलने, परिषदा यांचा सर्वत्र महापूर आला होता.

परंतु सर्व अस्पृश्यांना एका सूत्रात बांधणारे नेतृत्व या एकाही संघटनेत वा पुढाऱ्यात नव्हते. अस्पृश्यांत जागृती होऊनही ते दिशाहीन आहेत, त्यांच्या मनात फुललेल्या स्वाभिमानाच्या स्फुल्लिंगात प्रचंड सामर्थ्य आहे हे बाबासाहेबांनी ओळखले. आणि म्हणूनच, कोणत्याही सामाजिक, धार्मिक वा राजकीय संघटनेचा

अथवा नेतृत्वाचा आधार न घेता, त्यांनी दलितांची संघटना बांधली व अस्पृश्यांच्या संघटनांना बहर आणला.

१९२५ नंतर दलित चळवळी या निव्वळ सामाजिक प्रश्नांवर लढत न बसता व्यापक राष्ट्रीय प्रवाहात समाविष्ट होताना दिसून येतात, याचे श्रेय बाबासाहेबांच्या सर्वस्पर्शी नेतृत्वाला द्यावे लागेल.

१९२१ ते १९२५ या पाच वर्षांच्या काळात सामाजिक परिषदा, हिंदुसभा, काँग्रेस, प्रजा-परिषद आदी संघटनांतर्फे ज्या अस्पृश्य निवारणाच्या सभा होत त्यांचा मी या लेखात समावेश केलेला नाही. तसेच अस्पृश्यांच्याही सर्वंच सभा-संमेलनांचा व चळवळींचा परामर्श घेतलेला नाही. त्या काळातील दलित चळवळींची दिशा फळण्याच्या दृष्टीने वेचक प्रसंग आपणासमोर सादर केले आहेत. या विवेचनातून दलित चळवळीच्या छोटयाशा कालखंडावर प्रकाश टाकण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

संदर्भ :-

१) केसरी १५.८.२२
२) ज्ञानप्रकाश २.११.२२
३) " २१.११.२२
४) " ५.४.२२
५) " ५.४.२३
६) " २५.४.२३
७) " २६.४.२३
८) " २३.१०.२३
९) " २१.१०.२३
१०) " ७.१२.२३
११) " ७.१.२३
१२) " ४.५.२३
१३) " २०.७.२३
१४) " १७.५.२४
१५) " १९.११.२२
१६) " १७.४.२३
१७) " ३०.५.२३
१८) " ६.६.२३
१९) " १२.६.२३
२०) " १८.१.२३
२१) " १४.८.२३
२२) " २.१०.२४
२३) " १३.१०.२३
२४) " ८.३.२४
२५) " ८.३.२४
२६) " १२.४.२४
२७) " १४.८.२४
२८) " १३.२.२५
२९) " २७.२.२५
३०) " २७.२.२४
३१) " २९.९.२५
३२) " २५.९.२४
३३) ज्ञानप्रकाश २९.९.२४
३४) " ९.१०.२५
३५) " २१.९.२५
३६) " १२.१०.२५
३७) " २५.१.२३
३८) " २४.३.२२
३९) " २३.४.२२
४०) " २८.४.२२
४१) " ३.५.२२
४२) " २७.१.२२
४३) " १०.११.२२
४४) " १५.११.२२
४५) " १०.४.२३
४६) " २४.४.२३
४७) केसरी १८.९.२३
४८) ज्ञानप्रकाश २३.१.२३
४९) चित्रमय जगत जाने. १९१३
५०) ज्ञानप्रकाश २१.३.१७
५१) " १२.२.२२
५२) " १९.४.२२
५३) " ४.७.२३
५४) " .....
५५) " ८.३.२४
५६) " ९.४.२४
५७) खैरमोडेकृत डॉ. आंबेडकर चरित्र, खंड २, पृष्ठ ५५
५८) ज्ञानप्रकाश १६.२.२४
५९) " २०.१२.२३
६०) " २७.१२.२३
६१) " १७.४.२४
६२) " २४.५.२४

परिशिष्ट १

THE LOYAL MAHAR SABHA, NAGPUR.
(A brief Summary of its record.)

1) A Fete was held, on three successive days, to celebrate Viceroy's birthday.

2) Thousands of Mahars attended the general meeting, which was presided over by Rev. G. D. Philip, and when a tea party was given to the European guests.

3) The Sabha expressed their grateful thanks to Mr. Vithoba Raoji Sant Pande, who built a separate bathing place for the Mahars at Ramtek and placed the whole community under a deep obligation.

4) A meeting was held on 3.1.14 to confirm the resolution, passed 8 years ago, by the Mahar Community, conferring rights upon Mr. Vithoba to receive all Charities & Dakshinas at the Ghat, from Mahar pilgrims.

5) The actions of all those, who have revolted against the decision of the Sabha, as well as the private meetings held, as counter–movements, were strongly disapproved by the Sabha.

6) The Sabha has permitted Mr. Vithoba Sant Pande to take such legal steps as may be necessary to check the attempts that are being created with a view to question the rights of Mr. Vithoba Sant Pande to receive the charities at Ramtek, such attempts were made by certain people by publishing false manifestoes & misleading handbills against the decision of the Sabha.

President

Reverend G. D. Philip.

Vice–Presidents

1 Kalicharan Ganoji Nanda Gavli, Malguzar, Member, M. C. Gondia.

2 Karnoji Vitthal, Malguzar, Mauza, Nande Pimpleker.

3 Vithoba Raoji Sant Pande, Nagpur

4 Gomaji Ganesh Saokar, Khadkpurkar

5 Mukinda Tukaram Shetya Murharkar, Nagpur
6 Bhobaji Segoji Malguzar, Lakh Merchant, Gondia
7 Jankuji Sakharam, Contractor, Nagpur
8 Ganpat Sakharam, Contractor, Nan Waidikar
9 Sukaji Gomaji Bandsode Patil, Nagpurkar
10 Ganpat Gundu Dalal, Tande–Peth, Nagpur
11 Jairam Peku Sethia Gayakwar, Nagpur

Members

1 Dhondbaji Jaimal Master, Siraspeth, Nagpur
2 Kishan Fagoo Bandsode, Patil
3 Ramchandra Domaji Patwari, Mathni
4 Dashrath Panduji, Nagpur Railway Foreman
5 Sheoram Janba Kamli, Punekar
6 Dhondiba Master, Mumbaikar
7 Niluji Manuji Bagde, Badegaonkar
8 Adkoba Atmaram Saokar Asaware
9 Balaram Narayen Bhugaonkar
10 Undruji Yaswant Borekar
11 Lakshman Urkuda Clerk, Kamtha
12 Ganesh Akaji Gavai, Amraoti
13 Raghoonath Pusaji Chichkhede
14 Chango Lakshman Rahate
15 Tukaram Maglu, Masud
16 Sukharam Tulsiram, Nandanbadi
17 Govind Kirot Ghoratkar
18 Bala Bhawani Thekedar Warudkar
19 Timaji Sital Sant Gajanan Sewak, Dighi
20 Chindhu Sant Thekeder, Belbazar, Kamptee
21 Vithoba Raghu, Malguzar, Mudhure Pd. Bagicha, Kamptee
22 Chindhu Mango Naranje
23 Ganesh Shivaji Chandankhede
24 Charandas Hiradas
25 Ramchandra Shankar Manke, Bhankheda
26 Pandurang Raghunath Talewale, Nagpur
27 Dodku Dalal, Nagpur

28 Dharmadas Sant, Adgaon Adali, Dist. Nasik
29 Shyamdas Bholadas, Lalganj, Nagpur
30 Abhiman Bhilan Saokar, Sitabaldi
31 Govinda Sheoram, Sitabaldi
32 Krishnaji Saokar, Navi Dharampeth
33 Juman Saokar, Gadgia
34 Kissan, Sadarbazar, Nagpur
35 Foosa, Gadheghat, Nagpur
36 Tukaram, Gaddigudam, Nagpur
37 Chokha Gangaram, Chimabaichi Peth, Nagpur
38 Bhikaji Sinde, Laka
39 Isram Sheoram Talwala
40 Bhadu Mirchiwala, Juni Mangalwari
41 Maruti Jhadya, Hootkhana, Nagpur
42 Mangru Mistri, G. I. P. R, Khadan
43 Udho Master, G. I. P. R, Kumbhar Pura
44 Pandhari Wanwasu Dalal, Bagadganj
45 Ramji Arjun, Mohurzari

Nagpur, 15.3.1914 Bapuji Madhorao Patole.

Marwadi Nagpur Press, Nagpur

REFBK-0025523



सूची

अणे मा. श्री.-३६
आठवले- ११७
आगरकर गो. ग.- २८
आनंदी प्रसाद- ५४, ६१, ७१, ७५, ८१, ८३ ८६,
आर्मस्ट्रॉंग- ३७, ५८
आंवेडकर भी. रा- २९, ४३, ४४, ४६, ४७, १०१, १०८, ११४, ११५, ११९, १२४,
आवडे, मल्हारी– ११०
ओगले लक्ष्मण कृष्णाजी ३६,
ऐदाळे जीवाप्पा- १००, १०१, ११२,
इंगळे अ. ज्ञा- १०७, ११०-११
इंगळे मु. बी- १०७, ११०-११
कंटरे एल. जी- ५८, ६५, ७१, ७८
कदम एन के- १०१
कदम आर के- १०१
करणूजी विठ्ठल मालगुजार- १०, १६-१८, २८
कर्वे धों. के- ४४,
कवाडे, पंडित रेवाराम- २८,
क्रॅडॉक (सेटलमेंट कमिशनर)-५
कांदळे टी. एस- १०१
कानिटकर प्रि- ९९
काणे रा- ८४, ११६
कांबळे नारायण सावळाराम- १०६,
कांबळे पां. रा- ११४
कांवळे रामचंद्र- १०८, ११०
कांबळे शिवराम जानबा- १०, ११, १९, १०७, ११५, १२०,
कांबळे शिवा ज्ञानबा- १०७,
काळमोरे व. मु.- १०१, १११
काळोखे, तुकाराम- १
केदारे- ११२
केळकर नरसिंह चिंतामण- ३६, ९८ ९९, ११५
केळकर नारायणराव- २३, ५३, ५५, ६६- ६७, ७३-, ७६, ८७- ८८, ९०
केंजळकर बहिर्जी- १०९
क्लेटन- ११३
कोठारी बालचंद रामचंद- ११५
कोल्हटकर अ. ब.- ११४
कोव्ह इ. इ. ए.- ३७
खरे डॉ. ना. भा.- २३
खडतकर एन. टी- ५३- ५५, ७१, ७९- ८०,
खरात बी. एस- ११३
खंडारे जानोजी- ३५, ४६, ८३, ८६
खंडारे केशव जानोजी- ३५,
खंडारे संभू अनसू- ३५,
खाडे- ११५,
खापर्डे दादासाहेब- ५०
खैरमोडे चां. भ- १२०
गडकरी राम गणेश- २,
गणपत गुंडू दलाल- १९,
गणपत सखाराम ठेकेदार- १९,
गरीबदास बुवा साधु- १०६,
गरुड- ९६,
गवई ग. आ.- १०, १६, १९, २२, २३, २८, ३४, ३७, ४०, ४६, ४७, ५०- ५१, ५४, ५६, ५९, ६१, ६८- ७०, ७७, ७९, ९०- ९४, १०१, ११७- १९,
गाडगीळ बॅ. जी. के- ९९, ११३-१४
गायकवाड तात्याबा साधुजी- १०१, १०५- ०८,
गायकवाड धुंडीराम नारायण- १९,२२
गायकवाड डी. एस. १०१, १०८, ११४, ११५

गायकवाड डी. व्ही.- ११३,
गायकवाड एस. एस.- ११३
गांधी मो. क.- ६५, ९९, ११७
गुजर पांडुरंगराव- १२
गुरू डी. एस- ११४
गोडघाटे संभाजी- ३४
गोखले गोपाळ कृष्ण- ४८, ६५, ६८
गोपाळबावा वलंगकर- १०
गोमा गणेश सावकार- १०, १६-१८, २८,
गौर डॉ. हरिसिंग- २९
गंगावले- ११४
घटकांबळे दंडप्पा- ११५
घाटगे सुभेदार- ९९
घोलप- १००, १०७
चतुर्वेदी मनमोहन पांडे- ८३
चंदावरकर नारायणराव- १०५- ०६
चंदुबुवा- ७, ८,
चांदोरकर- १०३,
चिटणवीस गंगाधरराव- १२, ११७
जयकर डॉ. एम. आर- ९७
जयस्वाल जी. पी- ७०, ७१, ७९
जाधव मडकेबुवा- २२
जाधव मा. का.- ११५
जाधव श्रीमती पार्वतीबाई- ११२
जाधव राजे रतनसिंग- ११३
जांभेकर- ११४
जावडेकर शं. द- ९८
जाधव राजे शंभूसिंग- ११३
जोशी एम. व्ही- ६१, ७१, ७४, ११६
जोशी एन. एम- ९४
टाटा जमशेटजी- ३
टिळक बा. गं- ६५, ९८
ठक्कर ए. व्ही- ११४
ठवरे गं. म- ३४
ठेंगडी धुंडीराजपत- २५
डायर जे. एम- ६
डिक बॅ. जी. पी- २५, ३५, ३७, ४० ४१, ५१, ५८, ६७-६८, ७७, ८२, ८४, ११७, ११९
डोळके सुरेश म- ३१
डोळस आर, डी- ११३
तावडे- ११७
तुकाराम संत- २३
दादाभाई एम. बी- ४८-४९
द्रवीड नरेश अप्पाजी- ५४, ९४, १०७
दीक्षित एम. आर- ७२
देशमुख बॅ. गोविंदराव- २३
देशमुख बॅ. रामराव- ११६
देशमुख बी. वाय- ६२, ८०
देवधर गोपाळकृष्ण- ११२-१३
थोरात छत्रपती रामजी- ९९, १०७, ११५
नगरारे धरमदास एम- २२, २४
नंदागवळी कालीचरण- ४, १०, १७, १८, २८, ३४, ३७, ३९, ४४, ४६-४८, ५१, ५३- ५५, ५८, ६१, ६३, ६४, ६६ -७१, ७४- ७८, ८१-९४, ९६, ११६, ११९
निकाळजे आर. एस- ११४
नियोगी डॉ. भवानीशंकर- २३, २५, ३८-३९, ५१, ८८
नेल्सन ए. ई- ३७, ३९, ४९, ५१, ५७, ६२, ६८, ७५, ८१-८३, ९५
नेहरू मोतीलाल- ९६
नगरकर बॅ.- ११६
धोट शंकरराव- ३६
धुवे धनजी देवमन- ९२
पडोळे बापुजी माधवराव– २१
पंडे दामोदरपंत- १२

पंडवार पूरनराज- ३४
पफर डॉ. रेव्ह- ३६
परांजपे डॉ. २३, २५, २६, १०२, १०६, १०८
प्रधान गोविंद राधनाथ- २३- २५
पांडे के. पी- ५४
पातोडे- १००, १०७
पाध्ये दा. ग-
पाटील द. ल- ४, २६
पाटील सी. ल- ४
पारेख सी. बी-४९, ५३
प्रिन्स ऑफ वेल्स- ११७, ८४
पुराणिक दा. म- ११८
पेठे गेनूजी जैराम- ११५
पोवार पी. आर- १००, १०१
फडणवीस गोपाळ गणेश- १२, १३,
फाटक अण्णाराव पुंजाजी- ९७
फिलीप्स जी. डी- १६, १८-२१, ११७
बनसोडे किसन फागोजी- १०, १९, २३, २८, ३४, ४६, ११७, ११८
बॅनर्जी- ३५
बुऱ्हाण हरीष- १०३
बेहाडे हैबती देवाजी- ३४
बेलवी नामदार- ९६
बोले सी. के- १०३, ११३
बोस बिपिन कृष्ण- ६०, ११८
भट डॉ. प. ह- १०५, ११४, ११६
भटकर पांडुरंग नंदराम- २३, ११६, ११८
भटकर एल. एस- ११७
भटकर सौ. वेणुताई- ११८
भांदेकर अनंता- १००
भाटे गो. चि- ९८
भिंगारदिवे रा. तु- १०६, १०७
भुते जी सी- २९
भिडे सदाशिवशास्त्री- ३६
भोंडे पांडुरंगराव- १०७
भोपटकर भाऊसाहेब- ९९
भोपटकर लक्ष्मण बळवंत- ९७-९९, १०७, ११५, १२३
भोसले श्रीमती वीणाताई- १११
भोसले राजे रघुजी- ७, ११, १२, ३१, ११५
मनमोहन रॉय- ९६
मकेसर विठ्ठल दशरथ- ३६
मॅकेन्झी डॉ.- ८
मथुराप्रसाद रावसाहेब- ६२
महापुरे तुकाराम- १०७
महाजनी आर. व्ही- ५३, ६०, ६४, ६८-७१, ७८, ९०, ९४
मंडल जोगेन्द्रनाथ- ४४
माटे श्री. म- १, ९७, ९९, १००-०१, १०७, ११३
माने नागोराव- ३५
मांडवधरे रामभाऊ- ३५
मॉ डब्ल्यू एन- ३५
मिस मेयो- ११७
मीर मेहंदी अलीखान- ८४, ११७
मुरारकर मुकिंदा तुकाराम शेटचे-१०, १६, १८-१९, २४, २६, २८,
कुप्पुस्वामी-
मुंजे डॉ. बी. एस- २३, २५
मुंडले आर. जी- ३६
मुदलियार- ९६
मूनपंडे विठोबा रावजी- १०, १७, १९-२१, ३४, ४६, ९४, ९५, ९८, ११७
मून भा. वि- २४
मून वा. वि- २४
मेश्राम जी. टी- ३४, ९२

मेहचू ३५, ३८, ४०-४१
मुधोळकर- ७५
मोडक (अमरावतीकर)- ११६
मोडवे राणूजी विठूजी- १०८
मोतीलाल सेठ- ६१, ८०-८२
मोरे पिराजी- १०३
मोवाजी सेकोजी- १९
यकू सखाराम– १६
रणदिवे कोंडीराम दाजीराम- १०७- ०८, ११०, ११४
रणपिसे ज. स- ११३-१५
रंगराव रा. सी- ९७
रतनसिंग ठाकूर- ७३, ७५, ७८-७९
रॅम्से डब्ल्यू- २
राघो महार- ४
रानडे म. गो- ४८
राव कुलकर्णी व्ही. जी- ७४, ७६, ८१-८२
रोकडे के. एम- ११३
लवाटे भाऊसाहेव- ९८-९९
लांडगे सीताराम वावाजी- १०६-०७
लोखंडे गणपतराव- १०५, ११०
लो, सर सी ई- २५
लिमये कृ. ग- ११४
वनमाळी रा. ना- १०३
वाघमारे जे. ए- ११३
वाघमारे पांडुरंग सटवाजी- १००-०१, ११६
वानखेडे (चिखली)- ११७
वानखेडे लक्ष्मण- ३५
वायदंडे बावू धोंडी- ९९, १०५-०७, ११०
विठोवा मिस्त्री- २६
वुड ॲलेक्स- ७
वुड सर चार्लस- ३१
शंभरकर रघुनाथराव- ११६
शंभरकर सौ. रंगुबाई- ११८
शाहू छत्रपती राजर्षी- ११५
शाहू महाराज- ४९
शिंत्रे- ९९
शिंदे तात्यावा नारायण- १००
शिंदे वि. रा- १, ४४, ९७, ९९-१०१, ११६, १२३
शिरोडकर- १०३
शिवदासबुवा जामके- ९८
शिवाजी महाराज, छत्रपती- ९८
शिवलाल सेठ- ८०
शेटचे करणूजी विठ्ठल- ४
शेडगे स. स- १०५, ११०
सकट के. के- ९९-१०१, १०५-१११,
स्टँडन वी. पी- ५१-५२, ७३
स्टॅन्ले एच एस- ३५
सकाजी सखाराम ठेकेदार- १९
सयाजी महाराज गायकवाड- ५७, ९८
साखरे तुलाराम- ३३
साधुराम मझबी- ३४
साळवे संभाजी पिराजी- १०५
सायमन कमिशन– ४१-४३
सावरकर डॉ.-९७
सावंत डी. एस- ११४
स्लाय सर फ्रँक- ३३
सुकाजी गोमाजी बनसोडे पाटील- १९
सेटलवाड चिमणलाल- ११३
सेटलवाल चुनीलाल- ११३
स्टेन्ट पी. जे. एच- ३७
सोनवणे रंगनाथ गंगाधर- १०१
सोनवणे जयराम गणपत- ९२
हरदास एल. एन- ३४
हिंगणेकर- ९९, ११०
हिस्लॉप रेव्ह- ८, ३१

सुगावा प्रकाशनाची पुस्तके

१) **आंबेडकर आणि मार्क्स**
प्रा. रावसाहेब कसबे - ८० रु.

२) **बुद्धधम्मातील अनात्मवाद**
वसंत मून – १० रु.

३) **डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व**
डॉ. एलिनॉर झेलियट/ वसंत मून – ६ रु.

४) **जनजागृतीचा प्रयोग**
बाळ धनवट – ३.५० रु.

५) **विषमतेचा पुरस्कर्ता मनू**
डॉ. प्रदीप गोखले – २० रु.

६) **साखरशाळा**
सुरेश शिंदे – ८ रु.

७) **न्याय (नाटक)**
बाबुराव कांबळे – ५ रु.

८) **म्युझिका (काव्यसंग्रह)**
संगीता जोशी – ८ रु.

९) **माझा भाऊ आण्णा भाऊ**
शंकरभाऊ साठे (आवृत्ती संपली)

१०) **भ. बुद्धांचा मध्यम मार्ग**
एम्. एस्. मोरे – २५ रु.

११) **दलितांची नियतकालिके**
डॉ. हरिश्चंद्र निर्मळे – ३५ रु.

१२) **डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल**
चां. भ. खैरमोडे – १५ रु.

१३) **मज्झिम निकाय– १**
मा. श. मोरे – ३० रु.

१४) **मध्यप्रांत वऱ्हाडातील डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळ**– वसंत मून– ३०रु.

१५) **अमृतनाक आणि इतर कविता**
चां. भ. खैरमोडे– १५ रु.

१६) **मज्झिम निकाय– २**
मा. शं मोरे – ३५ रु.